टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत

‘इतिहास’ विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी

सादर केलेला शोधप्रबंध

वाकाटकांच्या मराठवाड्यातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास.

संशोधक

प्रा. किशोरकुमार गव्हाणे

शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

ता. भूम जि. उस्मानाबाद

मार्गदर्शक

डॉ. एस.पी. शिंदे,

छत्रपती शिवाजी कॉलेज,

सातारा.

फेब्रु. - २०१२.

प्रकरण पहिले

पार्श्वभूमी

दक्षिण भारतात जी अनेक महत्त्वाची प्राचीन राजघराणी होऊन गेली ; त्या राजघराण्यांमध्ये वाकाटक राजघराणे उल्लेखनीय ठरते. वाकाटक राजघराण्यांने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत म्हणजेच तीनशे वर्ष दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटक राजघराण्याची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. वाकाटक राजघराण्याच्या नंदिवर्धन आणि वत्सगुल्म या दोन शाखा होत्या. नंदिवर्धन ही वाकाटकांची जेष्ठ शाखा असून प्रथम प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र आणि गौतमीपुत्राचा पुत्र प्रथम रुद्रसेन याने या शाखेची स्थापना केली. तसेच प्रथम प्रवरसेन याचा दुसरा पुत्र सर्वसेन याने वत्सगुल्म शाखेची स्थापना केली. वत्सगुल्म म्हणजेच आजचे विदर्भातील वाशिम होय. वाशिम हे आज जिल्ह्याचे ठिकाण आहे. वाकाटक राजघराण्यांने विदर्भातून दक्षिण भारताच्या अनेक भूभागावर राज्य केले. दक्षिण भारतातच मराठवाडा हा प्रदेश समाविष्ट होता. वाकाटकांनी संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. या काळात मराठवाड्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कला व स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. प्रस्तुत शोध प्रबंधात वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि पुरातत्वीय अवशेष, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती आणि कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे.

१.१ विषयाची निवडः

मराठवाड्यावर प्रथम सातवाहन राज घराण्याने राज्ये केले. सातवाहन घराण्याच्या कारकिर्दीपासूनच मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. या घराण्याने एकूण ४६० वर्षे राज्य केले. या कालखंडात मराठवाड्याचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक कला आणि स्थापत्य कलेत मोठ्या प्रमाणात विशेष उल्लेखनीय प्रगती झाली. या सर्व घटकावर प्रकाश टाकणे महत्वाचे ठरते. वाकाटकांची राजवट ही मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. त्यामुळे वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास करणे अत्यंत

महत्वाचे ठरते. त्यामुळे संशोधनासाठी 'वाकाटकांच्या मराठवाड्यातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास' या विषयाची निवड केली.

१.२ संशोधनाची उद्दिष्टये :

१) मराठवाड्याचा भौगोलिक आढावा घेणे.

२) मराठवाड्याचा ऐतिहासिक आढावा घेणे.

३) वाकाटक घराण्याच्या राजकीय इतिहासावर थोडक्यात प्रकाश टाकणे.

४) वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळांचा व पुरातत्वीय अवशेषांचा शोध घेणे.

५) वाकाटक कालीन मराठवाड्यातील अवशेषांचा शोध घेणे तसेच त्याचा सांस्कृतिक अभ्यास करणे.

६) वाकाटककालीन मराठवाड्यातील पुरातत्वीय अवशेषांच्या आधारे तत्कालीन सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणे.

७) वाकाटककालीन मराठवाड्यातील कला व स्थापत्याचा अभ्यास करणे.

८) वाकाटककालीन लेण्या, मुर्तीकला आणि चित्रकलेचा आढावा घेणे.

१.३ संशोधनाची गृहितके :

१) वाकाटक घराण्याने ३०० वर्षे मराठवाड्यावर राज्य केले.

२) वाकाटाकांचा कालखंड हा मराठवाड्यासाठी सुवर्ण काळ ठरला. कंधार, नांदेड, तेर, भोकरदन, पैठण, लातूर, अजिंठा, उस्मानाबाद व वेरुळ ही वाकाटककालीन स्थळे अर्थात नगरे आहेत.

३) वाकाटक राजे धर्मसहिष्णु असल्यामुळे त्यांनी हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मालाही राजाश्रय दिला.

४) अजिंठा आणि वेरुळ येथील कांही लेण्यांची निर्मिती वाकाटक काळात झाली.

५) अजिंठा लेण्यातील चित्रकला आणि शिल्पकला जगप्रसिध्द असून त्यामुळेच वाकाटक घराणे अजरामर ठरले.

६) वाकाटक सम्राटाने बौध्द लेण्या बरोबरच वैष्णव धर्माच्या लेण्याही खोदविल्या.

७) नांदेड जिल्ह्यातील शिऊर येथील वैष्णव लेण्या वाकाटककालीन कला व स्थापत्याचा उत्तम नमुना ठरतो.

१.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

वाकाटकांच्या मराठवाडयातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास या विषयाचे संशोधन करत असताना मराठवाडयातील एकूण ८ जिल्हयाच्या क्षेत्रावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. मराठवाडा या विभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ २५ हजार चौ. मैल आहे. महाराष्ट्राच्या चार विभागापैकी मराठवाडा हा प्रादेशिक विभाग असून तो महाराष्ट्र राज्याचा एक महसूल विभाग आहे. मराठवाडयाला फार मोठया प्रमाणात इतिहास आणि संस्कृतीचा वारसा मिळालेला आहे. मराठवाडयाची राजधानी औरंगाबाद असून मराठवाडयामध्ये ८ जिल्हे व ७८ तालुके आहेत. वाकाटक घराण्याने इ.स. २५० ते ५५० या कालखंडामध्ये संपूर्ण मराठवाडयावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले होते. या कालखंडामध्ये मराठवाडयाची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कला व स्थापत्य क्षेत्रामध्ये फार मोठया प्रमाणात प्रगती झाली आहे. संदर्भानुसार वाकाटक पुर्वीचा इतिहास सांगणे आवश्यक ठरते.

१.५ संशोधनाची आवश्यकता :

वाकाटक घराण्याने विदर्भातून संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. वाकाटकांची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. पुढे वाकाटक राजघराण्याच्या दोन शाखांचा उदय झाला. नंदिवर्धन ही जेष्ठ शाखा होती. तर वत्सगुल्म ही कनिष्ठ शाखा होती. वाकाटकांची राजवट मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. कारण या कालखंडात मराठवाड्याचा सर्व क्षेत्रात अभूतपूर्व विकास झाला. साहित्य लेणी आणि मंदिर स्थापत्य, चित्रकला आणि मुर्तीकला या क्षेत्रात या काळात अभूतपूर्व विकास झाला. या काळात अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, उस्मानाबाद या ठिकाणी या काळात चैत्यगृह आणि विहार खोदविण्यात आले. या काळातील अंजिठा, वेरुळ येथील बौध्द विहार आणि चित्रकला जगप्रसिध्द आहेत. हे सर्व वाकाटक कालीन सांस्कृतिक ठेवा आहे. यावर संशोधन होणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे प्रस्तुत विषयावर संशोधनाची आवश्यकता आहे.

१.६ संशोधन पध्दती व संदर्भ साधने :

वाकाटकांच्या मराठवाड्यातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास. या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण आणि संदर्भ या दोन संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळांना भेट देऊन तेथील पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास केला आहे. या अवशेषांत मुर्तिशिल्प, लेणी, चित्रकला आणि इतर अवशेषांचा समावेश होतो. याच अवशेषांच्या आधारे

प्रस्तुत संशोधन पूर्ण केले आहे. पुरातत्वीय अवशेषांशिवाय संशोधनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. संदर्भ ग्रंथाची सर्वसमावेश यादी शोधप्रबंधात शेवटी दिली आहे.

१.७ मराठवाड्याची भौगोलिक स्थिती :

मराठवाडा हा एक प्रादेशिक विभाग आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार या विभागाची लोकसंख्या१,६६,४९,३०२ असून त्यामध्ये ८१,०८,९६७ पुरुष व ८५,४०,३३५ स्त्रिया आहेत.[१] या विभागात एकुण आठ जिल्हे असून त्यामध्ये ७८ तालुके आहेत. पुढील तक्त्यावरुन आधुनिक मराठवाड्यातील जिल्हे, त्याचे क्षेत्रफळ, त्यामधील गावे, लोकसंख्या व त्यामधील तालुक्यांची कल्पना येते.

जिल्ह्याचे नाव	**क्षेत्रफळ**	**गावे**	**लोकसंख्या**	**तालुके**
१. औरंगाबाद	१०,१००चौ.कि.मी.	१,३४४	३१२०६२८	१. औरंगाबाद
				२. कन्नड
				३. खुल्ताबाद
				४. गंगापूर
				५. वैजापूर

			६. पैठण
			७. सोयगाव
			८. फलंब्री
			९. सिल्लोड
२. जालना	११,०३१ चौ.कि.मी.	१६१२३५७	१. जालना
			२. भोकरदन
			३. जाफराबाद
			४. मंठा
			५. अंबड
			६. परतूर
			७. बदनापूर
			८. घनसावंगी
३. परभणी	११,०३१ चौ.कि.मी.	१४९११०९	१. परभणी
			२. सोनपेठ
			३. मानवत
			४. जिंतूर
			५. गंगाखेड
			६. पाथरी
			७. सेलू
			८. पूर्णा
			९. पालम ४.
हिंगोली	४,६३३ चौ.कि.मी.	९८६७१७	१. हिंगोली
			२. कळमनुरी

				३. वसमत
				४. औंढा नागनाथ
				५. सेनगाव
३. नांदेड	१०,५२८ चौ.कि.मी.	१,५८०	२८६८१५७	१. नांदेड
				२. लोहा
				३. कंधार
				४. मुखेड
				५. बिलोली
				६. धर्माबाद
				७.नायगाव बाजार
				८. उमरी
				९. किनवट
				१०. अर्धापूर
				११. मुदखेड
				१२. हिमायतनगर
				१३. माहूर
				१४. हदगाव
				१५. भोकर
				१६. देगलूर
४.उस्मानाबाद	७,५१२.४ चौ.कि.मी.		१४७२२५६	१. उस्मानाबाद
				२. भूम
				३. कळंब
				४. वाशी
				५.उमरगा

			६. तुळजापूर
			७. परंडा
			८. लोहारा
५. लातूर	७३,७२ चौ.कि.मी.	२०७८२३७	१. लातूर
			२. औसा
			३. निलंगा
			४. उदगीर
			५. चाकूर
			६. अहमदपूर
			७. जळकोट
			८ शिरुर अनंतपाळ
			९. रेणापूर
			१०. देवणी
			११.शिरुर ताजबंद
१०,६१५ चौ.कि.मी.		५१५९८४१	१. बीड
			२. पाटोदा
			३. आष्टी
			४. गेवराई
			५. माजलगाव
			६. केज
			७. नेकनूर
			८. अंबाजोगाई
			९. किल्ले धारुर
			१०. परळी

मराठवाड्याचे क्षेत्रफळ आणि चतु:सीमा :

मराठवाडा हा प्रदेश उत्तरेस उत्तर अक्षांस १५°-४०' ते २०°-४०' आणि रेखांस ७०°-४०' ते ८१°-१५' विस्तारलेला आहे.[२] या विभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ २५००० चौरस मैल आहे.[३] तसेच मराठवाड्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत.[४]

१. पूर्वेस - आंध्रप्रदेश

२. पश्चिमेस - नाशिक व अहमदनगर जिल्हा

३. दक्षिणेस - सोलापूर जिल्हा व कर्नाटक जिल्हा

४. उत्तरेस - जळगाव, बुलढाणा व वाशिम जिल्हा

थोडक्यात मराठवाड्याच्या सीमा महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, सोलापूर, जळगाव, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्याशी, कर्नाटकातील गुलबर्गा व बीदर जिल्ह्याशी आणि आंध्रप्रदेशातील निजामाबाद या जिल्ह्याशी जोडलेल्या आहेत.

जमीन :

मराठवाड्याची जमीन काळी, मुरमाड आणि खडकाळ स्वरुपाची आहे. मराठवाड्याचा भूभाग भूस्तरशास्त्राच्या दृष्टीने तृतीय युगापासून बनलेला एकजिनशी कृष्णप्रस्तर आहे. त्याची जाडी क्वचीत चार हजार फूट भरते. मराठवाड्याचा काही भाग गोदावरी आणि इतर नद्या यांच्या वालुकामय थरांनी बनलेला आहे. या भागाला उत्क्रांत तृतीय युगीन असे नाव आहे. यातील बराच प्रदेश कारी (बॅसॉल्ट) काथरी (डॉलराईट) या कृष्ण पाषाणाचा बनलेला आहे. मराठवाड्याचे दक्षिण (दख्ख्न) पठार समुद्रसपाठीपासून सरासरी बाराशे पन्नास फूट उंच आहे. क्वचित ही उंची साडे तीन हजार फूट पर्यंत जाते. पश्चिमेकडून पूर्वेकडे असा या पठाराचा उतार आहे.[५]

मराठवाड्याचा भूभाग भूकंपप्रवण भाग आहे. आजपर्यंत मराठवाड्यातील भूभागाला अनेक वेळा भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. ३० सप्टेंबर १९९३ रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी पहाटे तीन वाजून बेचाळीस मिनिटांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील सर्व गावांना आणि लातूर जिल्हा, औसा तालुक्यातील किल्लारी या गावास भूकंपाचा पहिला तीव्र धक्का बसला.[६] नंतर

तीन वाजून छपन्न मिनिटांनी पुन्हा दुसरा धक्का बसला. या भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता ६.४ रिश्टर स्केल होती. याचवेळी संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातील बऱ्याच मोठ्या भूभागाला भूकंपाचा धक्का बसलेला होता. फरक एवढाच आहे की, किल्लारी व उमरगा परिसरातील भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता सर्वाधिक होती. या भूकंपामुळे जगाला प्रचंड हादरा बसला. त्यामुळे मराठवाडा हा भाग जगाला परिचित झाला. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ६७ गावांना भूकंपाचा धक्का बसला होता. या भूकंपामुळे प्रचंड जिवित व वित्तहानी झाली. संपूर्ण गावे उध्द्वस्त झाली. शासकीय आकडेवारीनुसार लातूर जिल्ह्यातील ३७२६ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील ३८५६ असे एकूण ७५८२ लोक भूकंपात ठार झाले. परंतु हा आकडा चुकीचा आहे. भुकंपामुळे ठार झालेल्या लोकांची संख्या पन्नास हजारांच्या वर आहे असे काही सेवाभावी संस्थांचा अहवाल आहे. भूकंपामुळे लातूर जिल्ह्यातील ८५,००० आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील ६०,००० घरांना तडे गेले असून आजही या भूभागाला भूकंपाचे सतत धक्के बसत आहेत.

पर्वत आणि डोंगर :

मराठवाड्यात पर्वताच्या रांगा आणि मोठमोठे डोंगर आहेत. मराठवाड्याचे दक्षिण पठार समुद्रसपाटीपासून सरासरी १२५० फूट उंच आहे. क्वचित त्याची उंची ३५०० फूट जाते. या पठाराचा उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. पर्वताच्या रांगा प्रामुख्याने सह्याद्रीशी संबंधित आहेत. पूर्व भागातील बालाघाटच्या डोंगराची रांग सुमारे २०० मैल लांब साडे चार मैल रुंद आहे.[७] बीड, लातूर, परभणी व नांदेड या जिल्ह्यात बालाघाटचा डोंगराळ प्रदेश आहे. औरंगाबाद जिल्ह्यात सुरतपालनाथ टेकड्या आहेत. वेरुळ, चौका व सातारा हे डोंगर आहेत. औरंगाबाद शहराजवळ एक मोठी टेकडी आहे. त्या टेकडीस संभाजी टेकडी या नावाने आज ओळखले जाते. याच जिल्ह्यात सातमाळ आणि अजिंठाच्या डोंगर रांगा आहेत. जालना जिल्ह्यात जांबुवंत टेकडी आणि अजिंठ्याचे डोंगर आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्याचा बराच भूभाग हा बालाघाट पठाराचा आहे. यामध्ये उस्मानाबाद भूम, कळंब व तुळजापूर तालुक्याचा काही भाग व उमरगा तालुक्याचा समावेश होतो. या जिल्ह्यात राणा टेकडी व देवबेट या टेकड्या आहेत. उस्मानाबादच्या पश्चिमेला हातलादेवीचा डोंगर म्हणून

ओळखली जाणारी एक मोठी टेकडी आहे. जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवर बालाघाटचे डोंगर आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदखेड टेकड्या, सातमाळ, निर्मल व बालाघाट या डोंगररांगा आहेत. डोंगराळ भागात भीमटेक व शिवलिंगप्पा ही शिखरे आहेत. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेला सातमाळ व निर्मलचे डोंगर आहेत. यामध्ये भोकर, हदगांव व किनवट तालुक्यांचा भूभाग येतो. कंधार व मुखेड हे तालुके आणि देगलूर तालुक्याचा दक्षिणेकडील भाग हे बालाघाट डोंगराच्या प्रदेशात येतात. लातूर जिल्ह्यात बालाघाटचे काही डोंगर आहेत. या डोंगराळ भागात लातूर, औसा, निलंगा हे तालुके व चाकूर तालुक्याचा दक्षिण भाग व उदगीर तालुक्याचा दक्षिण व पश्चिम भाग येतो.

मराठवाड्यातील पर्वताच्या रांगा मुख्यत: सह्याद्रीशी संबंधित आहेत. पूर्व भागातील बालाघाट डोंगराची रांग सुमारे दोनशे मैल लांब आणि साडेचार मैल रुंद आहे. मराठवाड्यात पसरलेल्या सह्याद्री पर्वताच्या रांगानी या भागाच्या सांस्कृतिक इतिहासात महत्वाची भर घातली आहे. अजिंठा आणि वेरुळ - येथील जगप्रसिध्द लेणी हे त्याचे बोलके उदाहरण आहे.[८] येथील पर्वतरांगेतील दगडावर कला निर्माण करण्यात मूर्तिकार आणि स्थापत्य कलाकार यशस्वी झालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या पश्चिम टोकापासून नांदेड जिल्ह्यातील माहूरपर्यंत पसरलेली इन्ध्याद्री किंवा अजिंठ्याच्या डोंगराची जी रांग आहे तिचा प्राचीन साहित्य व अभिलेखीय साधनात सह्याद्री पर्वत या नावाने उल्लेख केला आहे.[९] पितळखोरा (पितंगल्य) व अजिंठा (मंदारगिरी) लेण्यांचा डोंगर या त्याच्या शाखा आहेत. अजिंठा लेण्याच्या डोंगराचे प्राचीन नाव मंदरगिरी (मंदारगिरी) असून हा पर्वत पवित्र असल्याचे म्हटले आहे. [१०] अजिंठ्याची पर्वतरांग ही पश्चिम घाटातील पर्वतरांगेत महत्वाची आहे. या पर्वतरांगेने खानदेश व विदर्भाला मराठवाड्यापासून व तापी व गोदावरी यांची खोरी विभक्त केली आहेत. या परिसरातील सह्याद्री पर्वताची दुसरी महत्वाची रांग म्हणजे देवगिरी किल्ला ते जालना ही आहे. जालन्याचे डोंगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पर्वतमालेतील वेरुळजवळील रांगेस चरणाद्री आणि इंध्याद्री या नावाने ओळखले जाते.[११] या डोंगरात वेरुळची जग प्रसिध्द लेणी कोरली गेली. बीड व उस्मानाबाद भागात असणारी बालाघाट पर्वताची रांग ही मराठवाड्यातील तिसरी सह्याद्री पर्वताची रांग आहे. या रांगेने मराठवाडा पश्चिम

महाराष्ट्रापासून विभक्त केला. याशिवाय या महत्वाच्या पर्वतरांगाना जोडणाऱ्या अनेक लहान - मोठ्या रांगा या परिसरात पसरलेल्या आहेत.

नद्या :

गोदावरी, मांजरा व पूर्णा या मराठवाड्यातील मुख्य नद्या आहेत. त्र्यंबकेश्वराजवळ उगम पावलेली गोदावरी नदी पुणतांबे या गावाजवळ मराठवाड्यात प्रवेश करते. दक्षिण गंगा म्हणून लोक तिची प्रदक्षिणा करतात. पूर्णा व मांजरा या दोन नद्या गोदावरी नदीला मिळतात. गोदावरी नदीच्या काठावर नांदेड व पैठण ही दोन ऐतिहासिक शहरे वसलेली आहेत. उस्मानाबाद तालुक्यातील तेरणा व भोगावती या दोन नद्या महत्त्वाच्या आहेत. तेरणा नदीच्या काठावर तेर हे ऐतिहासिक खेडे वसलेले आहे व भोगावती नदीच्या काठावर उस्मानाबाद हे शहर वसलेले आहे. उस्मानाबाद शहराच्या अगदी मध्यभागातून भोगावती नदी वाहते. मराठवाड्यातील सर्व नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात.[१२] गोदावरी, मांजरा व पूर्णा या मराठवाड्यातील प्रमुख नद्या आहेत. गोदावरी ही या भागातील प्रमुख नदी आहे. नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येथे उगम पावलेली ही नदी पुणतांबे गावाजवळ मराठवाड्यात प्रवेश करते आणि पुढे ती उस्मानाबाद शिवाय मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून वाहते. नांदेडजवळ या नदीची नाभी मानून सिंहस्थान दक्षिणेतील लोक तिची प्रदक्षिणा करतात.[१३] दक्षिण भारतातील द्विपकल्पात ही सर्वात मोठी आणि भारतातील पवित्र नदी म्हणून तिला गौतमी गंगा किंवा गंगा[१४] आणि दक्षिण गंगा[१५] नावाने ओळखले जाते. गौतम ऋषीच्या प्रयत्नाने गोदावरी भूतलावर अवतरली म्हणून तिला गौतमी गंगा या नावाने ओळखले जाते.[१६] गोदावरी नदीचा प्रवास ९०० मैलांचा असून ती १,१२,००० चौरस मैलांचा प्रदेश आपल्या पाण्याने भिजविते.[१७] पूर्णा व मांजरा या गोदावरीच्या प्रमुख उपनद्या आहेत. याशिवाय प्राणहिता, वर्धा, वैनगंगा, इंद्रावती[१८], दुधना, गिरजा, तेरणा, सिंधफर्णा, कनाद, प्रवरा, मुळा, शबरी व धारणा या नद्या गोदावरीला येऊन मिळतात. पूर्णा नदीचा उगम अजिंठा डोंगरात झाला असून तिची लांबी २१५ कि.मी. आहे. सिंधफणा नदीचा उगम ता. आष्टी जि. बीड येथे झाला असून तिची लांबी २५० कि.मी. आहे. गोदावरीच्या जलौघामुळे मराठवाड्याचे दोन भागात विभाजन झाले. उत्तरेकडील

भागात औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेडचा काही भाग येतो, तसेच दक्षिणेकडील भागात बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद व नांदेडच्या दक्षिण भागाचा समावेश होतो.

मांजरा ही मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी नदी आहे. या नदीचे उगमस्थान ता. पाटोदा जि. बीड येथे असून तिची लांबी ३०० कि.मी. आहे. याच नदीला मंदाकिनी व मंजीसुदा या नावानेही ओळखले जाते.[१९] नांदेड जिल्ह्यातील जुन्नी येथे कलचुरी राजवटीच्या प्राप्त झालेल्या इ.स. ११८४ मधील एका शिलालेखात या नदीचा उल्लेख मंजरतीर्थ[२०] व गोदावरीचा उल्लेख गौतमी या नावाने केला आहे. याशिवाय वंजरा, मंजुळा, व वंजुळा[२१] या नावांनीही या नदीचा उल्लेख प्राचीन साहित्यात केला आहे. बीडच्या पश्चिमेस बालाघाटात उगम पावलेली मांजरा नदी बीड, उस्मानाबाद कर्नाटक व आंध्र प्रदेश असा प्रवास करुन शेवटी ती आंध्र - महाराष्ट्रात सीमेवर गोदावरीला मिळते. या नदीचे उगमस्थान असलेल्या बालाघाट डोंगराचे प्राचीन नाव मंजर किंवा वंजर असे होते. त्यावरुन मांजरा नावाची नदी उत्पन्न झाली.

तेरणा ही मराठवाड्यातील तिसरी महत्त्वाची नदी आहे. या नदीचे प्राचीन नाव नगर[२२] असून याच नदीच्या दक्षिण काठावर तेर हे गाव (ता. उस्मानाबाद) वसले आहे.[२३] बिंदुसरा किंवा बेंडसुरा ही या भागातील चौथी नदी असून तिचे प्राचीन नाव कलिंदकन्या असे आहे. बीडच्या दक्षिणेस बालाघाटाच्या डोंगरात या नदीचा उगम झाला आहे. बालाघाटच्या या शाखेचे नाव कलिंद असल्याने या नदीचे नाव कलिंद कन्या असे पडले.[२४] या नदीच्या काटावर बीड हे शहर वसलेले आहे. ही नदी बीडच्या उत्तरेस काही अंतरावर गोदावरीची उपनदी असलेल्या सिंहफणा (सिंधफणा) नदीस मिळते. पेनगंगा ही गोदावरीची उपनदी मराठवाड्याच्या उत्तर सरहद्दीवरुन वाहते. या नदीचे प्राचीन नाव प्राणहिता (प्रणिता) आहे. सीना ही अहमदनगर जवळील बालाघाट डोंगरात उगम पावते व ती उस्मानाबाद जिल्ह्याच्या पश्चिमेस सरहद्दीवर वाहते. या नदीचे प्राचीन नाव सिंहा असे होते.[२५]

मन्याड (मनार) ही या भागातील महत्त्वाची नदी आहे. औरंगाबाद व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवरुन वाहणाऱ्या या नदीचे नाव प्राचीन राष्ट्रकुटांच्या ताम्रपटात मणिआडा असे आढळते.[२६] याच नावाची एक नदी नांदेड जिल्ह्यात आहे. या नदीच्या उत्तर काठावर राष्ट्रकूटांची

राजधानी असलेले कंधार वसलेले आहे. या नदीचे उगमस्थान बीड जिल्ह्यातील धर्मापुरीजवळ आहे. अशाप्रकारे गोदावरी व तिच्या उपनद्यांनी मराठवाड्याचा परीसर सुपीक व समृध्द बनविला आहे.

हवामान :

मराठवाड्यातील सरासरी हवामान किंचित उष्ण आणि कोरडे आहे.[२७] नांदेड जिल्ह्यातील हवामान उन्हाळ्यात उष्ण व हिवाळ्यात जास्त थंड असते. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात उन्हाळ्यात सर्वाधिक उष्णता असते. परभणी जिल्ह्यात पावसाळ्यातील हवामान उष्ण आणि दमट असते. लातूर जिल्ह्याचा भाग डोंगराळ आणि पठारी असल्यामुळे उन्हाळ्यात तेथील हवामान सौम्य व कोरडे असते. पावसाळ्यात तेथील हवामान दमट असते तर हिवाळ्यात थंड आणि कोरडे असते. मराठवाड्यात पाऊस फार कमी पडतो. काही भागात मात्र पाऊस अधिक पडतो. उस्मानाबाद जिल्ह्याच्या पूर्व भागात पाऊस जास्त पडतो तर पश्चिम भागात कमी पाऊस होतो. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुका, परभणी जिल्ह्याचा पूर्व भाग (वसमत व पूर्णा) आणि उत्तरेकडील डोंगराळ भागात (जिंतूर, चारठाणा, येलदरी व सेनगाव) तसेच नांदेड जिल्ह्यातील किनवट, भोकर व हदगाव तालुक्यात पाऊस जास्त पडतो. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुका, उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग, लातूर जिल्ह्यातील उदगीर, रेणापूर, निलंगा, चाकूर, लातूर व औसा तालुका आणि परभणी जिल्ह्याच्या पश्चिम (सेलू व पाथरी) भागातही पाऊस जास्त पडतो.

नैसर्गिक संपत्ती :

मराठवाड्यात नैसर्गिक संपत्तीभरपूर आहे.[२८] मराठवाड्यात अनेक ठिकाणी वने आणि डोंगराळ भाग आहे. तुळजापूर ते येरमाळा डोंगरावर तुळजाई - येडाई वनीकरण योजनेखाली अनेक वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. कन्नड येथे गवताळ अभयारण्य व नांदेडजवळ पैनंगंगा अभयारण्य आहे. किनवटच्या परिसरात नैसर्गिक जंगल आहे. जिंतूर, हिंगोली, वसमत, सेनगांव, कळमनुरी, भोकर, हदगाव, तुळजापूर, उस्मानाबाद, भूम, परांडा, कन्नड, औरंगाबाद, खुलताबाद, बीड, अंबाजोगाई, पाटोदा, गेवराई, माजलगाव, आष्टी, अहमदपूर आणि इतर अनेक ठिकाणी सुध्दा वने आणि डोंगर आहेत. या वनात बाभूळ, खैर, कडूलिंब, पळस, टेंभूर्णी, चिंच, आंबा,

जांभूळ, मोह, वड, पिंपळ, केकताड, (घायपात), बेल, आपटा, बोर, अरोनी, हिवर, कवठ, साग, बांबू, तेंदू, धावडा, ऐन, बेहडा, सिताफळ, सौदंड व उंबर इत्यादी वृक्ष आढळतात. नांदेड जिल्ह्यात सागाची झाडे जास्त आहेत.

मराठवाड्यातील वनात हरीण, अस्वल, काळवीट, वानर, माकड, कोल्हा, ससा, मुंगूस, तरस, रानडुक्कर, लांडगा, वाघ व बिबट्या हे प्राणी आणि मोर, पोपट व इतर पक्षी आहेत. किनवटजवळ असलेल्या पैनगंगा अभयारण्यात वाघ, बिबट्या, अस्वल व मोर आढळतात. गंगाखेड तालुक्यातील जांभूळबेट येथे मोर पाहावयास मिळतात. नांदेड जिल्ह्यात किनवट, माहूर, सिंदखेड व साखणी या भागात जंगले आहेत. त्यामध्ये अनेक प्रकारचे प्राणी आहेत. इ.स. १९९७ साली या भागातील प्राण्यांची गणना वनविभागातर्फे करण्यात आली. त्यानुसार या भागात एक वाघ, तीस अस्वल, तेरा बिबटे, ५३१ हरीण व ७८५ मोर आढळून आले आहेत. इ.स.१९०० साली भारतात चाळीस हजार वाघ होते. पण शिकारीमुळे त्यांची संख्या १९७३ साली १८२७ झाली. १९८९ साली ही संख्या ४३३४ झाली. पण १९९३ साली पुन्हा वाघांची संख्या घटली व ती ३७५० झाली. कंधार, मुखेड व देगलूर तालुक्यात गवताची मोठी कुरणे आहेत. हिंगोली, जिंतूर व सेनगाव तालुक्यात रोशा नावाचे गवत वाढते.

मराठवाड्यातील वनात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आढळतात. अहमदपूर तालुक्यातील वडवळ या गावाजवळ एक लहान डोंगर आहे. यास वडवळ बेट असे म्हटले जाते. या डोंगरावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. अंबाजोगाई शहराच्या उत्तरेस दोन कि.मी. अंतरावर मुकुंदराज स्वामीच्या मंदिराजवळून बुट्टेनाथाची दरी सुरु होते. औषधी वनस्पतीचा खजिना असलेली ही दरी व वाणा नदीचे खोरे बुट्टेनाथची दरी या नावाने ओळखली जाते.

१.८ मराठवाड्याचा ऐतिहासिक आढावा :

मराठवाड्याला इतिहास व संस्कृतीचा फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या विभागाने महाराष्ट्र व देशाच्या सांस्कृतिक जडण-घडणीत, कला - स्थापत्य व मूर्तिकलेच्या क्षेत्रात फार मोलाची भर घातली. अजिंठा, वेरुळ, खरोसा, पितळखोरा, औरंगाबाद व उस्मानाबाद येथील लेणी व तेथील कला - स्थापत्य हे याचे बोलके उदाहरण आहे. आज मराठवाडा हा महाराष्ट्र

राज्याचा स्वतंत्र प्रशासकीय विभाग आहे. महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेले औरंगाबाद हे शहर मराठवाड्याच्या राजधानीचे ठिकाण तसेच प्रशासनाचे विभागीय मुख्यालय आहे. आज मराठवाडा विभागात नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, हिंगोली, बीड, लातूर व उस्मानाबाद हे आठ जिल्हे आहेत.

प्राचीन महाराष्ट्राचे केंद्रस्थान असलेल्या मराठवाडा या प्रदेशाला प्राप्त झालेली मराठवाडा ही भौगोलिक संज्ञा म्हणजे ऐतिहासिक अपघाताची निष्पत्ती होय, या शब्दाचे मराठ हे पूर्वपद महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रुप असून त्याचे उपपद वाडा हे वाटक या संस्कृत शब्दाचे तद्भव होय. वाडा किंवा वाडी ही उपपदे प्राचीन काळात दक्षिणेत प्रांतिक प्रशासन विभागांना लावलेली आढळतात. उदा. गंगवाडी ९६०००, नोलम्बवाडी ३२००० व मराठवाडी ७००० इत्यादी. अशाच अर्थाने मराठवाडी व मरहटवाडी या प्रादेशिक संज्ञेचा उल्लेख टिपू सुलतानच्या (१७५३ ते १९७७) पत्रात सर्वप्रथम आढळतो.[२९] अठराव्या शतकात उत्तरार्धातील हा उल्लेख हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिक प्रदेशाच्या म्हणजेच मराठवाड्याच्या संदर्भातील होय.

हैदराबाद संस्थानाच्या कागदोपत्रीही पुढे या प्रदेशाचा उल्लेख मराठवाडी असाच केल्याचे आढळते. याचेच पुढे मराठवाडा असे रुपांतर झाले. ते आजही कायम आहे. मीर महबुब अलीखान बहादुर (इ.स. १८६९-१९११) या निजामाच्या कारकीर्दीतील सरकारी कागदपत्रात मराठवाडी या प्रादेशिक संज्ञेचा उल्लेख आढळतो. याच निजामाचा मुख्यमंत्री सर सालारजंग पहिला याने इ.स. १८७० मध्ये आपल्या राज्याची नवीन जिल्हाबंदी करुन मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या प्रदेशाचा औरंगाबाद सुभा निर्माण केला आणि त्यास मराठवाडी - मराठवाडा असे नाव दिले.[३०]

मराठवाडा हा शुध्द मराठी शब्द असून त्याचा अर्थ मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची मातृभूमी, जन्मभुमी असा होतो. हैदराबादचे निजाम राज्य स्थापन होण्यापूर्वी हा प्रदेश मोगल साम्राज्यातील औरंगाबाद सुभ्याचा एक भाग होता. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात मात्र मराठवाडा हे प्रादेशिक नाव अस्तित्वात नव्हते. प्राचीन काळात हा प्रदेश दक्षिणापथाचा तर

मध्ययुगीन काळात दख्ख्नचा (Deccan) एक भाग होता. या प्रदेशाची सीमा वेळोवेळी बदलत गेल्या.

दक्षिणापथ आणि मराठवाडा :

विंध्यपर्वत व त्याच्या दक्षिणेकडील समांतर वाहणाऱ्या नर्मदा नदीमुळे भारतवर्षाचे दोन मोठ्या भागात विभाजन झाले. यापैकी उत्तरेकडील भागास उत्तरापथ आणि दक्षिणेकडील भागास दक्षिणापथ असे म्हटले जाते. प्राचीन साहित्यात डेक्कन पठार (दख्ख्न पठार) या भूमीस दक्षिणदेशा या नावाने उल्लेखिले आहे. दक्षिणदेशा हा संस्कृत शब्द आहे. डेक्कन हा शब्द दक्षिणा या संस्कृत शब्दांचा अपभ्रंश आहे. संस्कृत साहित्य व शिलालेखातून त्याचा उल्लेख्र दक्षिणापथ असा येतो, तर त्यालाच दक्षिणात्य, दाक्षिणाशा असे संबोधिले आहे. इ.सनाच्या पहिल्या शतकात भारताला भेट दिलेल्या एका अज्ञात महान खलाशाने डेक्कन भूमीचा (दक्षिणापथ) उल्लेख्र दक्षिणाबेडस या नावाने केला आहे.[३१] त्याच्या सीमा भडोचपासून दामीटिका (द्रविडदेश) पर्यत असल्याचेही त्याने म्हटले आहे. इ.सनाच्या पाचव्या शतकात फाहीएन या चीनी प्रवाशाने भारताला भेट दिली. त्याने भारताचा उल्लेख ता.थीझम (Ta-Thism) या नावाने केला आहे.[३२] ता-थीझम हा दक्षिण या नावाचा अपभ्रंश असावा. तसेच दक्षिण हे नाव पाचव्या शतकाच्या प्रारंभापासून प्रचलीत असले पाहिजे. गुलाम यांच्या खंडप्राय भारताच्या सह्याद्रीपासून महेंद्रगिरीपर्यंत आणि उत्तरेस महानदी-गोदावरीपासून ते कृष्णा -तुंगभद्रे पर्यंत व बंगालच्या उपसागरापासून ते अरबी समुद्रापर्यंतच्या प्रदेश म्हणजे डेक्कन (दख्ख्न) होय.[३३] थोडक्यात डेक्कन भूमीस दाक्षिणात्य दक्षिणदेशा, दक्षिणापथ, दंडकारण्य, संस्कृत ग्रंथ व शिलालेखात दक्षिणाबेडस, इत्यादी नावानी उल्लेखिले आहे. प्राचीन काळात मराठवाडा हा दक्षिणापथाचा एक भाग होता.

सह्याद्रीच्या असंख्य लहानमोठ्या रांगा हे दक्षिणापथाचे खास वैशिष्ट्ये असून या रांगानी अनेक ठिकाणी घाट निर्माण केलेले आहेत. यापैकी काही घाट अनादी अनंत काळापासून प्रसिध्द असून याच घाटांनी पूर्व - पश्चिमेचा दुवा सांधलेला आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रमुख्र रांगेतून पूर्वेकडील भूप्रदेशात व पर्वताच्या अनेक लहान लहान रांगा विख्रुरलेल्या आहेत. या पर्वतरांगामधूनच दक्षिणापथाच्या अनेक नद्यांचा उगम झालेला आहे. एवढेच नाही तर पर्वतरांगामुळेच गोदा आणि

तापी या दोन नद्यांची खोरी विभागली गेली.[३४] या अनुषंगानेच दक्षिणापथामध्ये अश्मक[३५], मुलक[३६], भोगवर्धन[३७], कुंतल[३८], कलिंग, आंध्र[३९] व महाराष्ट्र[४०] इत्यादी जनपदांचा विकास झाला आहे.

जनपदे आणि राज्ये :

अश्मक

मराठवाड्यात प्राचीन काळात बरीच जनपदे आणि राज्ये होती. अश्मक, मूलक, भोगवर्धन, कुंतल महाराष्ट्र व पितनीक ही जनपदे व राज्ये आहेत. इ.पू. सहाव्या शतकात भारतात सोळा राज्ये अस्तित्वात होती. बौध्द वाङ्मयात त्यांचा उल्लेख षोडसमहाजनपद या नावाने केला आहे. यापैकी बहुतेक जनपदे उत्तर भारतात होती. अश्मक आणि मूलक राज्येच केवळ दक्षिणेत होती. ही दोन्ही जनपदे मराठवाड्यात होती. अश्मक हे जनपद दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन जनपद असून ते गोदावरी नदीच्या खोऱ्यात होते. अश्मक जनपदाची राजधानी पोटन होती. हे पोटन म्हणजेच आजचे निजामाबाद जिल्ह्यातील बोधन हे नगर होय.[४१] कंधार आणि बोधन यांच्यातील अंतर कमी आहे. या शिवाय कंधारचा भाग गोदावरीच्या खोऱ्यातच मोडतो. यावरुन कंधारचा भाग हा पूर्वी अश्मक जनपदात मोडत होता हे सिध्द होते. डॉ. हरिहर ठोसर यांच्या मते अश्मक जनपदाने नांदेड जिल्ह्याचा प्रदेश व्यापला असून इ.पू. ६०० हा त्याचा काळ आहे.[४२]

दक्षिणेतील एक प्रमुख राज्य म्हणून या जनपदाचा उल्लेख बौध्द वाङ्मय (सुत्तनिपात व अंगुत्तरनिकाय) पाणिनीची अष्टाध्यायी, महाभारत, पुराणे व काव्यमिंमांसा इत्यादी ग्रंथात आढळतो. प्लीनी याने लिहिले की, डेक्कन म्हणजेच दक्षिणापथामध्ये प्रतिष्ठाण (आधुनिक पैठण) या नगराच्या दक्षिणेस गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर अस्मगी नावाचे आदिवासी लोक राहत होते. या आदिवासी लोकांचा उल्लेख अस्सक व अस्मक या नावानेही केला आहे.[४३]

गोदावरी व मांजरा नद्यांच्या परिसरात आणि निजामाबाद जिल्ह्यातील संलग्न प्रदेशात वसलेल्या अश्मक राज्याचा विस्तार कालांतराने नर्मदा नदीपर्यंत झाला. इ.पू. चौथ्या शतकात ते मगधाच्या नंदानी जिंकून घेतले. त्यामुळे आता अश्मक राज्य मगध साम्राज्याचा एक भाग बनला. अश्मक राज्यात सर्वत्र मोठमोठे शिलाखंड विखुरलेल्या स्थितीत आढळतात. त्यामुळे या राज्याला

अश्मक नाव प्राप्त झाले असावे. या परिसरात असना नावाचीही नदी आहे. असना या संस्कृतमध्ये अश्मनाम्ना म्हणतात. म्हणून आसना या नदीचाही संबंध अश्मक या नावाशी असावा.

भोगवर्धन :

जालना जिल्ह्यात भोकरदन नावाचे प्राचीन नगर आहे. हे भोकरदन पूर्वी भोगवर्धन या नावाने ओळखले जात असे.[४४] दक्षिणेतील एका जनपदाची ही राजधानी होती. शिवाय व्यापारी आणि औद्योगिक केन्द्र असल्याने ते एक वैभवशाली नगर म्हणून ओळखले जात असे. अजिंठ्याचे डोंगर व जालन्याचे डोंगर यामधील पठार म्हणजे औरंगाबाद, जालना आणि बुलढणा या जिल्ह्यातील संलग्न प्रदेश या जनपदात समाविष्ट होता. इ.स.च्या सातव्या शतकात हे एका विषय विभागाचे मुख्यालय होते. अश्मक राज्यात विलीन झाल्यामुळे नंतरच्या काळात त्याचे फारसे उल्लेख आढळत नाहीत. वेरुळ आणि अजिंठा या बौध्द केंद्राचा भोगवर्धन या नगराशी संबंध होता. विनय ग्रंथात उल्लेख आढळतो की, भोगवर्धन जनपद ही दक्षिणापथ भूमी असून ते गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसलेले होते. या जनपदात अजिंठ्याचे डोंगर आणि जालन्याचे डोंगर यामधील पठार म्हणजे औरंगाबाद, जालना व बुलढाणा या जिल्ह्यातील संलग्न प्रदेश समाविष्ट होता.[४५] या जनपदाचा संभाव्य काळ इ.स. पू. ४०० असून नंतरच्या काळात हे जनपद अश्मक जनपदात विलीन झाले. भोगवर्धन व मूलक जनपदाचा उल्लेख पुराणात आढळतो. इ.सनाच्या सातव्या शतकात भोगवर्धन हे एका विषय विभागाचे मुख्यालय होते.

मूलक :

मूलक या जनपदाचा उल्लेख कौटिल्याचे अर्थशास्त्र, पुराण आणि सुत्तनिपात व अंगुत्तरजिकाय या पाली साहित्यात आढळतो. या जनपदाचा उल्लेख काही ठिकाणी स्वतंत्रपणे तर काही ठिकाणी अश्मकाबरोबर केलेला आढळतो. यावरुन असे स्पष्ट होते की, प्रारंभी अश्मक व मूलक ही स्वतंत्र राज्ये होती. परंतु नंतरच्या काळात मात्र मूलक हे जनपद अश्मकात विलीन झाले. दौलताबाद ते जालना, पर्वतरांगेत मूलक हे जनपद वसलेले होते. या जनपदाचे औरंगाबाद व जालना जिल्ह्याचा दक्षिण भाग आणि नगर व नासिक जिल्ह्याचा सलग प्रदेश व्यापलेला होता. या

जनपदाचा काळ इ. पू. ५०० असून त्याची राजधानी प्राचीन प्रतिष्ठान म्हणजेच आजचे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण होय. पाली साहित्यात मूलकाची राजधानी प्रतिष्ठान असल्याचा उल्लेख आढळतो.[४६] टॉलेमी याने पैठणचा (प्रतिष्ठान) उल्लेख बैठण (Baithan) असा केला असून तो म्हणतो की हे बैठण नगर पश्चिम घाटाच्या पूर्वेस गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे.[४७]

अनेक जातककथा व पुराणावरुन स्पष्ट होते की गोदावरी नदीच्या काठावर अश्मक व मूलक ही दोन जनपदे वसलेली होती. ही दोन्ही जनपदे परस्परांना लागून असली तरी ती दोन स्वतंत्र टोळ्यांनी वसविलेली होती, असे पाली साहित्यावरुन स्पष्ट होते. गोदावरी नदी हा या दोन राज्यातील विभाजक अर्थात सरहद्द असावी. परमार्थ जातकावरुन स्पष्ट होते की अश्मकाच्या उत्तर - पश्चिमेस मुलक आणि दक्षिण - पूर्वेस कलिंग होते. अश्मक व मूलक या दोन टोळ्यांचा उल्लेख बौध्द साहित्यात आढळतो.

पितनीक

मौर्य सम्राट अशोकाच्या पाचव्या व आठव्या शिलासनात पितनीक किंवा पेत्तनिकांचा उल्लेख आढळतो. हा उल्लेख टोळीच्या राज्याचा किंवा टोळीचा असला पाहिजे. पाचव्या शिलासनात पेतनिक शब्द राष्ट्रीक शब्दाबरोबर तर तेराव्या शिलासनात अर्थात शासनात भोजिक बरोबर आलेला आहे.[४८] काशीप्रसाद जयस्वाल व डॉ. रा.श्री. मोरवंचीकर[४९] यांनी पेतनीक हे पैठणचे रहिवाशी होते, हे मान्य केले आहे. पेतनिक हा पैठण येथील राजकीय संघ होता. मगधातील नंदाच्या ऱ्हासानंतर संधी मिळताच या संघाने पैठण परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व अल्पावधितच प्राचीन मूलक राज्याच्या परिसरात आपले राज्य स्थापन केले. हेच पेतनीक जनपद होय. या पेतनिक जनपदाची राजधानी प्रतिष्ठान म्हणजेच आधुनिक पैठण होती.[५०] या जनपदाच्या काळात पैठण येथील महामंडलेश्वराच्या नियंत्रणाखाली संपूर्ण दख्ख्न प्रदेश होता. इ.स.पू.४०० हा या जनपदाचा काळ आहे.

कुंतल :

सातवाहन काळापासून ते बाराव्या शतकापर्यंतच्या अनेक ताम्रशिलासनातही कुंतल देशाचे वर्णन केलेले आढळते.[५१] ग्रीक इतिहासकारांनी मात्र कुंतल देशाचा उल्लेख गोंडोलोई या नावाने केलेला

आहे.[५३] सोढ्ढलाच्या उदयसुंदरी कथेत कुंतल देशाची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) असल्याचे म्हटले आहे.[५३] कुंतल देशाच्या सीमा भीमा व वेदवती या नद्यांनी मर्यादीत झालेल्या होत्या. इ.सनाच्या सातव्या शतकानंतर मात्र कुंतल देशाच्या राज्याची व्याप्ती वाढत गेली. काव्यमिमांसेचा लेखक राजशेखरनकुंतल देशात विदर्भ समाविष्ट असल्याचे म्हटले आहे.[५४] कल्याणच्या चालुक्यांचा संपूर्ण राज्यात कुंतल अशी संज्ञा होती.[५५] चालुक्य आणि राष्ट्रकूट घराण्यातील राजांना कुंतलेश्वर या उपाधीने संबोधले जात होते.[५६] इ.सनाच्या अकराव्या शतकातील मराठवाड्यातील शिलालेखावरुन स्पष्ट होते की, मराठवाडा हा भूभाग कुंतल देशात समाविष्ट होता.[५७] पुढे सातारा, कोल्हापूर, सांगली व अहमदनगर जिल्ह्याचाही समावेश कुंतल देशात झाला. उस्मानाबाद जिल्ह्यात भूम तालुक्यात बालाघाट पर्वताच्या रांगा आहेत. त्यास कुंतलगिरी या नावाने ओळखले जाते.

महाराष्ट्र

मौर्य सम्राट अशोकाच्या आलेखात सर्वप्रथम महाराष्ट्र हे देशनाम आढळते. [५८] महाराष्ट्र या राज्याची राजधानी पैठण असल्याचा उल्लेख आढळतो.[५९] यावरुन आधुनिक मराठवाडा प्रदेश हा मूळचा महाराष्ट्र होता असे स्पष्ट होते. उत्तर भारतातील मगधांच्या नंद सम्राटांनी दक्षिण भारत जिंकल्यानंतर येथील अश्मक, मूलक, विदर्भ व कुंतल हे या प्रदेशाचे एकत्रिकरण करुन त्यास महाराष्ट्र असे नाव दिले आहे. मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील इ.स. ३६५ मध्ये कोरलेल्या एरण गावच्या स्तंभलेखात श्रीधरवर्म्याचा आरक्षिक व सेनापती सत्यनाग याने स्वत:ला महाराष्ट्रीय असे म्हटले आहे.[६०] या स्तंभलेखातील महाराष्ट्राचा उल्लेख सर्वात प्राचीन ठरतो. ऐहोळी येथील (विजापूर जिल्हा मलप्रभातीरी) जितेंद्र मंदिराच्या कोरीव लेखात पंडीत रविकीर्तीकृत प्रशस्ती श्लोक दिले आहेत. त्यातील एका श्लोकात सत्याश्रय पुलकेशीने ९९ हजार गावे असणाऱ्या महाराष्ट्रक नावाने ओळखल्या जाणाऱ्या तिन्ही प्रदेशाचे अधिपत्य मिळविल्याची नोंद आहे.[६१] हा लेख इ.स. ७१२ मधील आहे. चालुक्य सम्राट पुलकेशी दुसऱ्याच्या ऐहोळी येथील शिलालेखात त्याने तीन महाराष्ट्र (विदर्भ, मध्य महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र) जिंकल्याचे म्हटले आहे.[६२] महाराष्ट्रातील पारंपारीक विभाग नद्यांच्या नावावरुन पडलेले होते. उदा. गंगथडी, भीमथडी व नीरथडी. हे तीनही थडी चालूक्य राज्यात होते. गोदावरी नदीच्या खोऱ्यातील प्रदेश गंगथडी या नावाने ओळखला जात

असे. मराठवाड्याचा ८८ टक्के भूभाग गोदावरी नदीच्या खोऱ्यात मोडतो. हाच प्रदेश गंगथडी होय. हाच गंगथडी प्रदेश प्राचीन महाराष्ट्र राज्याचा एक भाग होता.

१.९ मराठवाड्याचा राजकीय इतिहास :

मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाची सुरुवात सातवहान राजघराण्यापासून होते. मौर्यानंतर दक्षिण भारतात सातवाहन घराण्याची सत्ता उदयास आली. या घराण्याची राजधानी ओरंगाबाद जिल्ह्यातील पैठण (प्रतिष्ठान, प्रतिष्ठानपुरा) होती. [६३] या घराण्याने इ.स. पूर्व २३० पासून इ.स. २३० पर्यंत म्हणजेच एकुण ४६० वर्ष राज्य केले. दक्षिण भारतात राजकीय स्थैर्य आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करण्याचे श्रेय सातवाहन घराण्यातील सम्राटानांच द्यावे लागते. उत्तर भारताच्या राजकीय इतिहासात मौर्यांना जे स्थान आहे, तेच स्थान सातवाहनांना दक्षिण भारताच्या इतिहासात आहे. संपूर्ण मराठवाडा नव्हे, तर संपूर्ण दक्षिण भारत सातवाहनांच्या ताब्यात होता. नदीच्या काठावर असणारी पांढऱ्या मातीची उंच टेकाडे हे सातवाहन स्थळाचे खास वैशिष्ट्ये आहे. सातवाहन काळातील पांढऱ्या मातीचे शेत व टेकाडया या भोकरदन पैठण व तेर येथे आढळतात.

सातवाहन काळात पैठणप्रमाणेच भोगवर्धन, तगरपूर व देवपाली ही प्रमुख नगरे आणि प्रसिध्द व्यापारी केंद्रे होती. भोगवर्धन म्हणजेच जालना जिल्ह्यातील तालुक्याचे मुख्यालय असलेले भोकरदन हे शहर आहे, तर तगरपूर हे नगर उस्मानाबाद तालुक्यातील तेरणा नदीच्या काठावर वसलेले आजचे तेर हे खेडेगाव आहे. भोकरदन[६४] आणि तेर[६५] येथे केलेले उत्खनन व त्यामध्ये मिळालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन या दोन्ही नगराचे प्राचीनत्व सिध्द झालेले आहे. टॉलेमी[६६] याने असा उल्लेख केला आहे की, बैठणच्या

(पैठण) उत्तर - पूर्वेस असलेले तगर (तेर) हे या काळातील प्रमुख नगर व व्यापारी केंद्र होते. शिलाहारांच्या आलेखात[६७] त्यांनी तगरनगरभूपालक, तगरपूरवराधिश्वर व तगरपूरपरमेश्वर या बिरुदावली धारण केल्याचे आढळते. यावरुन तगरपूर म्हणजेच आजचे तेर ही त्यांची मुळ भूमी होती, हे स्पष्ट होते. डॉ. फ्लिट जे एफ. यांनी टॉलेमीने उल्लेखिलेले तगर नगर म्हणजे पैठणच्या दक्षिण - पूर्वेस साधारणपणे ९५ मैल अंतरावर असलेले आणि तेरणा नदीच्या काठावर वसलेले

उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे खेडेगाव असल्याचे मान्य केले आहे.[६८] या तेरचाच उल्लेख तगरपूर[६९] व थेर[७०] या नावानेही केलेला आढळतो. पेरिप्लसनेही वर्णन केलेले आढळते की तगर हे दक्षिणबेडसा मधील दोन प्रसिध्द व्यापारी केंद्रापैकी एक असून हे नगर पैठणपासून पूर्वेस दहा दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर आहे.[७१] तगर हे आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र होते. ग्रीक, इजिप्त व फिलाडेल्फीया या देशाशी तगरचे व्यापारी संबंध होते असे दिसून येते.

देवपाली हे नगरही या काळातील प्रमुख नगरापैकी एक होते. देवपाली हे नगर म्हणजेच आजचे औरंगाबाद पासून १३ कि.मी. अंतरावर असलेले देवगिरी - दौलताबाद होय.[७२] येथे उत्खननात मिळालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन या नगराचे प्राचीनत्व सिध्द झालले आहे. डिसेंबर २००३ पासून पुन्हा दौलताबाद येथे किल्ल्यातील भारतमाता मंदिराच्या जवळ भारतीय पुराततव विभागाने भारतीय पुरातत्व विभागाचे विभागीय अधिकारी डॉ. एस.के. मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खनन सुरु केले. १२५ मजुर उत्खननाचे काम करीत होते. या उत्खननात हिंदू व जैन संस्कृतीची अनेक स्मारके आढळली. तसेच इ.स. ११८३ ते १२८४ या काळातील यादवकालीन सोन्याची व कास्य नाणी मोगलकालीन अवशेषही उत्खननात मिळाले आहेत. उत्खननात मिळालेल्या अनेक ऐतिहासिक वस्तूंचे वजन २० ते ३० कि. ग्रॅमच्या आसपास आहे. टॉलेमीने दौलताबाद हे नगर दख्खनमधील एक महत्त्वाचे नगर असल्याची नोंद केली आहे.[७३] सातवाहन सम्राटांनी कला व स्थापत्यालाही आश्रय दिला. त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात पितळ्ख्रोरा येथील डोंगरात एकुण १३ लेणी खोदिवल्या. ह्या सर्व लेणी बौध्द धर्मीय असून ह्यामध्ये ३,१०, १२ व १३ क्रमांकाच्या लेणी चैत्यगृह व बाकीच्या विहार लेणी आहेत. ह्या लेणी दक्षिण भारतातील प्राचीन लेणी आहेत. अजिंठा येथील ८,९, १०,१२,१३ व १५ या क्रमांकाच्या बौध्द लेणीही सातवाहनांनीच खोदविल्या आहेत. सातवाहन काळात येथील लेणी क्रमांक ९ व १० मध्ये चित्रकाम करण्यात आले.

सातवाहनानंतर दक्षिण भारतात वाकाटक वंशाची सत्ता उदयास आली. या वंशाने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले. विदर्भात वाकाटकांच्या दोन स्वतंत्र शाखा राज्य करीत होत्या. पहिली शाखा नागपूर जिल्ह्यातील नंदीवर्धन येथे (इ.स. ३३० पासून

इ.स. ४९० पर्यंत) राज्य करीत होती. वाकाटकांची ही शाखा जेष्ठ शाखा या नावाने ओळखली जाते. वाकाटकांच्या दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म (वाशिम) होती. अजिंठा लेणी क्र. १६ मधील शिलालेखावरुन समजते की, ही वाकाटकांची कनिष्ठ शाखा होती. वाकाटकांच्या काळात नांदेड हे विषय मुख्यालय होते. या विषय मध्ये कंधारचा समावेश होता. याशिवाय याठिकाणी वाकाटक काळातील पुरावशेषही सापडू लागले आहेत. येथे सापडलेले बौध्द विहाराचे शिल्पावशेष वाकाटक कलाशैलीतील आहेत. अजिंठा येथील चैत्यांच्या दर्शनी भागावर असलेली शिल्प आणि कंधार येथे मिळालेली शिल्पे यांच्यात साम्य आहे. मराठवाड्यातील परभणी, औरंगाबाद, नांदेड आणि बीड जिल्ह्याचा प्रदेश वाकाटकांच्या राज्यात मोडत होता.[७४] सर्वसेन या राजाने दिलेल्या एका दानपत्रावरुन समजते की, त्याचे राज्य नांदेड जिल्ह्यातील भूभागावर होते. अजिंठा शिलालेखावरुन विंध्यशक्तीच्या कार्याची माहीती मिळते.[७५] त्याच्या राज्यात खानदेश, दक्षिण वऱ्हाड, पुणे, नासिक व अहमदनगर जिल्हे व जुन्हे हैदराबाद राज्याचा उत्तर भाग हे प्रदेश समाविष्ट होते. डॉ. ए.व्ही. नाईक यांच्या मते, वाकाटक राज्याचा विस्तार हैदराबाद राज्याच्या उत्तर - पश्चिम भागपर्यंत झ ालेला होता.[७६] म्हणजेच हैदराबाद राज्याचा उत्तर - पश्चिम भाग वाकाटकांच्या राज्यात समाविष्ट होता. वाकाटक काळात अजिंठा येथील लेणी क्रमांक १,२,१६,१७ व १९ चे खोदकाम झाले. लेणी क्रमांक सोळा वाकाटक सम्राट हरिशेण (इ.स. ४७५-५००) याचा सचिव हस्तिभोज याचा पुत्र वराहदेव याने खोदविली. याच लेणीत असलेल्या वाकाटककालीन शिलालेखात त्याचा उल्लेख आढळतो. येथील लेणी क्रमांक १,२,१६ व १७ मध्ये असलेले चित्रकामही वाकाटक काळातीलच आहे. नांदेड जिल्ह्यातील कंधार येथे वाकाटककालीन शिल्प मोठ्या प्रमाणात आढळते. येथे दर्गापूरा भागात हाजीसया मुकदम यांच्या दर्ग्यांच्या समोर एक प्राचीन वास्तू आहे. ही वास्तू प्राचीन बौध्द विहार असून त्यामधील स्तंभावरील शिल्प वाकाटककालीन अजिंठा कला परंपरेतील आहेत.

वाकाटक सम्राट सर्वसेन याचे राज्य विंध्याचल पासून गोदावरी पर्यंत पसरले होते. सर्वसेनानंतर विंध्यसेन सत्तेवर आला. सर्वसेनाच्या वाशिम ताम्रपटावरुन समजते की त्याच्या काळात नंदीतट हे विषय विभागाचे केंद्र होते. याच विषय विभागातील एक गाव त्याने नंदीतटावरील

अग्रहारास दान म्हणून दिलेले होते. नंदीघाट (नंदीतट) हे नगर म्हणजेच आजचे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले नांदेड होय.

वाकाटकाच्या नंतर दक्षिण भारतात बदामीच्या चालुक्याची सत्ता उदयास आली. या चालुक्यांची राजधानी कर्नाटकातील बदामी हे नगर असल्याने हे चालुक्य घराणे बदामीचे चालुक्य या नावाने इतिहासात प्रसिध्द आहे. या चालुक्यांची सत्ता मराठवाड्यावर होती. चालुक्यांच्या शिलाताम्रशासनात नांदेड हे एक शैक्षणिक केंद्र व विद्वानाचे माहेरघर म्हणून उल्लेखिले आहे.

राजघराण्यात पुलकेशी दुसरा हा कर्तबगार राजा होऊन गेला. संपूर्ण दक्षिण भारतावर त्याची सत्ता होती. गोदावरी नदीच्या काठावरच त्याने उत्तर भारतातील सम्राट हर्षवर्धनाचा पराभव केलेला होता. याच चालुक्य सम्राटाची पाषाणात घडविलेली एक मूर्ती कंधार येथे मिळालेली आहे. तसेच याठिकाणी चालुक्य काळात बरीच मूर्तिशिल्प आढळतात. उस्मानाबाद, नांदेड व लातूर या जिल्ह्याचा प्रदेश चालुक्य साम्राज्यात समाविष्ट होता.

बदामीच्या चालूक्यानंतर मराठवाड्यावर राष्ट्रकूट घराण्याने राज्य केले. राष्ट्रकुटांची राजधानी कंधार आणि मान्यखेट होती. कृष्ण तिसरा याने अमोघवर्ष पहिला यानेही लत्तलूरपूरवराधिश्वर असे बिरुद धारण केले होते.[७७] कंधार येथे इ.स. १९५९ मध्ये कृष्ण तिसरा याच्या काळातील एक शिलालेख मिळालेला आहे.[७८] राष्ट्रकूटकाळात येथे २६ हिंदू, ४० जैन ७ बौध्द मंदिरे बांधण्यात आली. मराठवाड्यातील लातूर, वेरुळ व कंधार या राष्ट्रकुटांच्या प्रारंभिक काळातील राजधान्या होत्या. प्रतिष्ठान
(पैठण) हे तर राष्ट्रकूटांच्या काळातील राजकीय हालचालीचे प्रमुख केंद्र होते. धर्मापूरी, परळी, अंबाजोगाई, धारुर, नांदेड, तेर व उस्मानाबाद ही या काळातील प्रमुख व्यापारी व नागरी केंद्रे होती. उमरगा तालुक्यातील मुरुम हे याकाळात विषयविभागाचे मुख्य केंद्र होते. संपूर्ण मराठवाडा राष्ट्रकूटांच्या राज्यात समाविष्ट होता.

राष्ट्रकूटांच्या सत्तेनंतर दक्षिणेत कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता स्थापन
झाली. तैल दुसरा हा या राज्याचा संस्थापक असून तो राष्ट्रकुटांचा महासामंत होता. राष्ट्रकुट सम्राट कर्क दुसरा याला युध्दात ठार करुन त्याने राष्ट्रकूटांचे राज्य मिळविले. इ.स. ९७५ पासून इ.स.

११९० पर्यंत या चालुक्य घराण्याची सत्ता दक्षिण भारतावर होती. या राज्याची राजधानी कर्नाटक प्रदेशातील बिदरजवळ असलेले कल्याणी नावाचे नगर होते. नांदेड जिल्ह्याचा बहुतांश भाग याच चालुक्यांच्या साम्राज्यात मोडत होता. याच चालुक्यांच्या राजवटीत कंधार हे त्यांच्या रट्टवंशीय मांडलीकांची राजधानी होती.[७९]

याच काळात नांदेड येथे एक शाळा व त्रैपुरुषदेवाचे मंदिर बांधले. उमरगा तालुक्यातील मुरुम (मोरंबपूर, मोरंब, मुरंब) या नगराचा उल्लेख तेथील चालुक्यकालीन शिलालेखात राजधानी म्हणून केलेला आढळतो. याचकाळात मुरुम हे जैन संघाचे मुख्य पीठ होते. येथे अनक जैन मंदिर होती. हेच ठिकाण ऐंशी गावाच्या समुहाचेही मुख्यालय होते. या काळात परळी तालुक्यातील धर्मापूरी येथे राज्याची मुख्य टाकसाळ होती. त्यामुळेच या नगराभोवती भक्कम तटबंदी उभारली होती. या नगराच्या संरक्षणासाठी मल्लराज या विशेष अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. कल्याणीच्या चालुक्यानंतर देवगिरीच्या यादवांनी राज्य केले.

यादव वंशातील पहिला ज्ञात होता दृढप्रहारी (इ.स. ८६० ते ८८०) होय. यादवांच्या प्रारंभीक लेखात व हेमांद्रीच्या वृत्तखंडातील राज प्रशस्तीत त्यांच्या मुळ प्रदेशाचे नाव सेऊणदेश (खानदेश) व राजधानीचे नाव सेऊणनगर असे देण्यात आले आहे. प्रारंभीच्या काळात यादव हे राष्ट्रकूटांचे मांडलीक होते. नंतर ते कल्याणीच्या चालुक्यांचे मांडलीक म्हणून राज्य करु लागले. यादव राजे स्वत:ला श्रीकृष्णाचे वंशज मानतात. भिल्लम पाचवा (इ.स. ११६५-११९३) या यादव राजाने कल्याणीच्या चालुक्यांचा पराभव करुन स्वत:ला स्वतंत्र घोषीत केले. त्यामुळेच त्याला यादव घराण्याचे संस्थापक म्हटले जाते. त्याने देवगिरी (दौलताबाद) या नगराची स्थापना केली. व त्यास आपल्या राज्याची राजधानी बनविले. याचठिकाणी त्याने इ.स. ११८७ मध्ये दक्षिणेचा सम्राट म्हणून स्वत:चा राज्याभिषेक करुन घेतला. येथून यादवांनी इ.स. १३१८ पर्यंत महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशावर राज्य केले.

कदंब, पांड्य, होयसळ, कलचूरी व यादव हे कल्याणीच्या चालुक्यांचे सामंत राजे होते. चालुक्यांच्या पतनानंतर यादवांनी दख्ख्नच्या उत्तर भागात आणि पांड्य, कदंब कलचुरी व होयसळ यांनी दक्षिण भागात स्वतंत्र राज्य स्थापन केली. यादवांची राजधानी औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी

म्हणजेच आजचे दौलताबाद हे ठिकाण होते. त्यामुळे मराठवाडा प्रदेश हे यादवांच्या हालचालीचे प्रमुख केंद्र राहीले. यादव काळात कला, स्थापत्य व साहित्याचा विकास झाला. याचकाळात हेमाडपंती नावाची एक स्वतंत्र मंदिरशैली उदयास आली. मराठवाड्यात या शैलीची मंदिरे मोठ्या प्रमाणात आढळतात. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात चारठाणा येथे ३६५ हेमाडपंती मंदिरे होती. वरंगळचे काकतीय घराणे हे यादवांना समकालीन होते. नांदेड जिल्ह्याचा परिसर काही काळ त्यांच्या ताब्यात होता. प्रारंभी नांदेड व उत्तरार्धात कंधार हे काकतीयांचे केंद्र होते. इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीवर आक्रमण करुन यादवांचा पराभव केला. पुढे १३१८ मध्ये अल्लाउद्दीनचा पुत्र मुबारकशहा याने शंकरदेवानंतर सत्तेवर आलेल्या हरपाळ देवाचा (रामचंद्र यादवाचा जावई) पराभव करुन यादवाचे संपूर्ण राज्य आपल्या साम्राज्याला जोडले. आता दक्षिण भारताचा कारभार दिल्ली सुलतानाने नेमलेल्या राज्यपालाकडून पाहिला जाऊ लागला. अशाप्रकारे यादवांच्या पराभवामुळे संपूर्ण मराठवाडा मुस्लिम सत्तेच्या ताब्यात गेला. इ.स. १३२७ मध्ये मुहम्मद तुघलकाने आपल्या राज्याची राजधानी दिल्ली येथून देवगिरी येथे स्थलांतरीत केली. याचवेळी त्याने देवगिरीचे नाव दौलताबाद असे ठेवले.

मुहम्मद तुघलकाच्या काळात दक्षिण भारतात बंडाळ्या सुरु झाल्या. याचवेळी हसनगंगु उर्फ जाफरखानाने मुहम्मद तुघलकाविरुध्द बंड करुन स्वत:ला सुलतान म्हणून इ.स. १३४७ मध्ये घोषित केले. त्याने अल्लाउद्दीन बहमनशहा या नावे राज्य करण्यास प्रारंभ केला. त्याने स्थापन केलेले हे राज्य बहमनी होय. बहमनी सुलतानानी दक्षिणेत १३४७ पासून १५२६ पर्यंत राज्य केले.[८०] या कालखंडात संपूर्ण मराठवाडा त्याच्याच ताब्यात होता. बहमनी राज्याचे विघटन होऊन अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडची इमादशाही. बिजापूरची आदिलशाही, बीदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी पाच राज्य उदयास आली. या पाचही राज्यांच्या ताब्यात मराठवाड्याचे विभिन्न प्रदेश होते. तसेच मराठवाड्याचा प्रदेश मिळविण्यासाठी त्यांच्यात सतत संघर्ष होत असत. इ.स. १६०० मध्ये मोगलांनी अहमदनगरच्या निजामशाहीच राज्य जिंकले.[८१] त्यामुळे मोगलांचा दक्षिणेत प्रवेश झाला. प्रथम निजामशाहीच्या ताब्यातील मराठवाड्यातील काही प्रदेश मोगलाच्या ताब्यात आला. मोगलांनी पुढे संपूर्ण दक्षिणेवर ताबा मिळविला. त्यामुळे संपूर्ण

मराठवाड्यावर त्यांची सत्ता स्थापन झाली. मोगलांनी दक्षिण भारताच्या प्रशासकीय सोयीसाठी त्याचे खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर व हैदराबाद असे सहा सुभे निर्माण केले. औरंगाबादहून दक्षिण सुभ्यांचा राज्यकारभार केला जात असे. मीर कमरुद्दीन उर्फ चिन कुलीज खानहा दक्षिणेचा सुभेदार म्हणून १७१३ मध्ये दक्षिणेत आला.[८२] ह्यानेच ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याचे घराणे आसिफजाही या नावाने प्रसिध्द आहे. या राज्याची राजधानी हैदराबाद होती.

मराठवाडयावर प्रथम सातवाहन घराण्याने राज्य केले असून सातवाहन घराण्याच्या कारकीर्दीपासूनच मराठवाडयाच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. सातवाहन घराण्यानंतर मराठवाडयावर वाकाटक घराण्यांने राज्य केले असून प्रस्तुत प्रकारणामध्ये मराठवाडयाचा भौगोलिक व ऐतिहासिक आढावा घेण्यात आलेला आहे.थोडक्यात मराठवाडयाला इतिहास व संस्कृतीचा फार मोठा ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभलेला आहे.

संदर्भ सूची

१. Census Report, Maharashtra State - 2001.

२. Shelke G.C.(Edi.), History of Marathwada rigion from earliest times to 13th century, 1979, p. 3.

३. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, 1987, p. 12.

४. Kate P.V., Marathwada Under the Nizams, 1987, p.1.

५. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड-६,१९९२, पृ.७४९,७५०.

६. कठारे अनिल व नगराळे एन.एन. मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.३३.

७. कित्ता, पृ.३२,३३.

८. Yazdani Gulam M. (Edi.), The Early History of the Deccan.Vol-I, 1960,p.7.

९. Ibid.

१०. दंडवते मि.रा. (संपा.), श्रीशिवलीलामृत, १९९८, अ.९, श्लो.९१.

११. Pathy T.V., Elura-Art And Culture, 1980, p. 1.

१२. Morwanchikar R.S., The city of the Saitns-Paithan through the ages, 1985. p. 5.

१३. कर्वे चि.ग. व इतर (संपा.), महाराष्ट्र परिचय, १९५४, पृ.३५,३६.

१४. Sastri Nilakanta, A History of South India, 1976, p. 4.

१५. Day N.L., Geographical Dictonary of Ancient and Medieval India, 1927.

१६. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण, १९८७, पृ.२.

१७. Sastri Nalakanta, Op.Cit., p. 41.

१८. Ibid

१९. Morwanchikar R.S., Op. Cit.

२०. Ritti & Shelke G.C.(Edi.), Inscriptions from Nanded District, 1968, Introduction, p. XXXVIII.

२१. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977, M. University, P. 102.
२२. E.I. Vol-XXI, p. 29.
२३. देव शां.भा., तेर, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, पृ.१.
२४. E.I. Vol-III, pp. 110-113.
२५. I.A. Vol- VI, p. 68.
२६. E.I., Vol-XXXVIII, Part I, pp. 5-22.
२७. कठारे अनिल व नगराळे एन.एन., पूर्वोक्त, पृ.२९.
२८. कित्ता, पृ.३०.
२९. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, २००१, पृ.५.
३०. काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज, १९८६, पृ.५१, ५२.
३१. Schoff W.H. (Edi.), Periplus of the Erythrean Se. 1912, p. 43,51,52.
32. Beal Samuel, Travels of Fa-hien and Sung-Ynn, 1964, pp. 139-141.
33. Yazadani G.M. (Edi.), Op. Cit., Introduction.
34. Kane P.V., Ancient Geography and Civilization of Maharashtra, (XXIV), pp. 618-655.
35. Mccrindle, Ancient India described by Ptolemy, 1927, p. 79.
36. Morwanchikar R.S., Op.cit., p. 1.
37. Sircar D.C., Studies in the Geography of Ancient and Mediaeval India, 1960, p. 154,58.
38. Thosar H.S., Op. Cit., p. 105.
39. डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, १९६४, पृ.१२.
40. Law B.C., Historicl Geography of Ancient India, 1954, p. 152.
४१. Sircar D.C., Op. Cit., p. 154.

४२. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त, पृ.५९.

४३. Law B.C., Op. Cit., p. 142.

४४. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त.

४५. कित्ता.

४६. Gazetter of India, Maharashtra State, Osmanabad District, 1972, p. 26.

४७. Mccrindle, op. cit., p. 79.

४८. वाजपेयी कृष्णदत्त/अग्रवाल कन्हैयालाल/वाजपेयी संतोष, ऐतिहासिक अभिलेख, १९९२, पृ.७५,६९-९४.

४९. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त, पृ.१०.

५०. Law B.C., Op. Cit., p. 183.

५१. Ibid

५२. काळे भगवान (संपा.), पूर्वोक्त, पृ.६०.

५३. मिराशी वा.वि. ,सोढ्ढल, उदयसुंदरी संशोधन मुक्तावली, पृ.२१.

५४. Rajshekhara, Kavya Mimamassa, p. 53.

५५. Yazadani G.M. (Edi.), Op. Cit., p. 43.

५६. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.४७.

५७. Ritti & Shelke, Op.Cit., No. 41.

५८. Law. B.C.,Op. Cit.,

५९. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.२७.

६०. शेनोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, १९७२, पृ.३२,३३.

६१. कित्ता, पृ.३३.

६२. Gupte R.S., The Art and Architecture at Aihole, 1967, p. 4.

६३. Morwanchikar R.S., Op.Cit., p. 1.

६४. Deo S.B. & Gupte R.S., Excavation at Bhokarden,1947.

६५. Chapekar B.N., Exacavation at Ter, 1958.

६६. Mccrindle, Op. Cit., p. 177.

६७. E.I., Vol-III, p. २६९.

६८. Fleet J.F., Tagara, Ter, Journal of royal Asiatic Society Vol-IV, 1901, p. 573.

६९. Ibid

७०. Ibid

७१. Schoff W.H., Op.Cit., pp. 43.

७२. Mate M.S./ Pathy T.V., Daulatabad- A Report, 1992.

७३. Mccrindle, Op.Cit., p. 171.

७४. Kate P.V., Marathwada Under the Nizams, 1967, p. 6.

७५. Gupte R. S./ Mahajan B.D., Ajanta, Ellora and Aurangabad Caves, 1962, p. 48.

७६. Naik A.V., Structural Architecture of the Deccan, , Vol-IX, Nos. 7-12, July 1947, p.193.

७७. E.I., VI, p. 98, 102, 103.

७८. E.I., Vol - XXXV, p. 105.

७९. Annual Report of Indian Epigraphy, 1937, 1-38.Nos. A 20.

८०. कुंटे भ.ग., बहमनी राज्याचा इतिहास, जुलै १९६६, पृ. ४,८.१९८३, पृ. ४६.

८१. कुंटे भ.ग., दिल्लीच्या शहाजहानचा इतिहास, १९६६, पृ. ४, ८.

८२. पगडी सेतुमाधवराव (अनु. व संपा.), मोगल दरबारची बातमीपत्रे, खं.२,

प्रकरण दुसरे

वाकाटकांचा राजकीय इतिहास

दक्षिण भारतात अनेक राजघराणी होऊन गेली. त्यापैकीच एक वाकाटक घराणे होय. या राजघराण्याची राजधानी विदर्भातील नागपूर जिल्ह्यातील रामटेकजवळील नंदिवर्धन होती. या राजघराण्याने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत म्हणजेच ३०० वर्षे दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटकांच्या दोन शाखा अस्तित्वात होत्या. नंदिवर्धन ही जेष्ठ शाखा होती तसेच वत्सगुल्म ही कनिष्ठ शाखा होती. वत्सगुल्म शाखेने संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. वाकाटकांचे सांस्कृतिक योगदानही फार मोठे आहे. गुप्त राजवंश आणि वाकाटक राजवंश हे समकालीन होते. गुप्त राजवंशाने उत्तर भारतात व वाकाटक राजवंशाने दक्षिण भारतात राज्य केले. सातवाहन घराण्यानंतर वाकाटकांची दक्षिण भारतात सत्ता उदयास आली.

सातवाहनानंतर मराठवाड्यावर वाकाटक घराण्यांने राज्य केले. भारताच्या इतिहासांत उत्तर भारताचा किंवा दक्षिण भारताचा इतिहास असा काही प्रकार अस्तित्वात नाही. भारताचा इतिहास हा सर्वसमावेशक दक्षिण - उत्तर पूर्व - पश्चिम असाच आहे. परंतु सर्वच पाश्चात्य आणि भारतीय अभ्यासकांचे लक्ष उत्तर भारतातील प्रमुख राजकीय घडामोडीवरच केंद्रीत झालेले होते. प्राचीन भारतातील राजकारणाच्या ध्रुवीकरणाची प्रक्रिया ही मगध परीसरांत घडून आली. नंद - मौर्य - साम्राज्य याच परिसरांत उदयास आले. शुंग कण्वाची सत्ता स्पर्धा उत्तर भारतातच घडून आली. पल्लव व कुशाणांची आक्रमणेही याच उत्तर भारतीय परिसरातच झाली. येथेच कनिष्काचे राज्य अस्तित्वात आले व चौथी बौध्द धर्म परीषद भरली. गुप्त साम्राज्यही याच भागांत उदयास आले व भारताचे सुवर्णयुगही येथेच अवतरले होते. नंदमौर्य साम्राज्य उदयापासूनच नव्हे तर हडाप्पा मोहंजोदाडोच्या सिंधू संस्कृतीपासूनचा सर्व इतिहास हा प्रामुख्याने नर्मदा नदीच्या उत्तरेला विंध्यपर्वताच्या पलिकडेच घडला. साहजिकच भारतीय इतिहासाच्या संशोधनाचे लक्षही सुरुवातीला उत्तर भारतावरच केंद्रीत झाले होते.

याचा अर्थ असा नव्हे की विंध्य पर्वताच्या दक्षिणेला नर्मदा नदीच्या परिसरांतील म्हणजे दक्षिणतीराकडील प्रदेशांत काहीच घडले नाही. तर गेल्या काही दशकातील इतिहास संशोधनानी दक्षिण भारतीय इतिहासातील अनेक गोष्टी प्रकाशात आल्या आहेत. बौध्द कालखंडात अश्मक व मुलकांची जनपदे याच दक्षिण भारतात म्हणजेच मराठवाड्यात घडून आली. सम्राट अशोकाच्या काळातील पितनिकांचे राज्य औरंगाबाद जिल्ह्यातील पितळखोऱ्याच्या परिसरात होते हेही स्पष्ट झ ाले आहे. नंदाचे राज्य नर्मदेखाली अगदी नांदेडपर्यंत पसरले होते ; ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे.

मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर प्राचीन भारतीय सत्तेचा केंद्र बिंदु उत्तर भारतातून मगध परिसरांतून केंद्रीत होऊन पुढे तो विंध्य पर्वत ओलांडून नर्मदापार करुन दक्षिण भारतात म्हणजे मराठवाड्यात पैठण परिसरात स्थिरावला. पैठणची सातवाहन सत्ता ही इतर प्राचीन भारतीय सत्तेपक्षा सामर्थ्यवान सत्ता होती. या काळातील प्रमुख बाजारपेठात मराठवाड्यातील (तगर) तेर, प्रतिष्ठान, भोगवर्धन (भोकरदन) यांचा समावेश होता. सातवाहनांची सत्ता दक्षिणेत आंध्रप्रदेशात होती. त्यांनी शकांना पराभूत करुन उत्तरेतील त्यांची आक्रमणे थोपवली होती. या काळात उत्तर भारतात प्रचंड राजकीय अनागोंदी कारभार असला तरी मराठवाड्यात सातवाहनांचे समर्थ आणि वैभवशाली राज्य अस्तित्वात होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर पासून रोम पर्यंत व्यापार भरभराटीला आलेला होता. औरंगाबाद जिल्ह्यातील भोगवर्धनचे व्यापारी सांचीच्या स्तूपाला देणगी देण्याइतपत श्रीमंत होते. प्रतिष्ठान व तेर या मराठवाड्यातील बाजारपेठाही गजबजलेल्या होत्या. गुप्तकाळातच दक्षिण भारतात म्हणजे महाराष्ट्रातील विदर्भ-मराठवाडा परिसरात वाकाटकांचे राज्य उदयास आले होते. वाकाटकांचा हा काळ प्राचीन भारतीय इतिहासातील एक उल्लेखनीय कालखंड ठरतो. गेल्या शंभर - दीडशे वर्षातील इतिहास संशोधनामुळे वाकाटकांचा इतिहास आता बराच स्पष्टपणे रेखाटता येतो.

अजिंठ्याच्या लेणीतील शिलालेखातुन वाकाटकांविषयी माहिती उपलब्ध होते. पुराण ग्रंथातूनही वाकाटकांची वंशावळ आढळते. विंध्यशक्ती दुसरा ; या वाकाटक राजाचा वाशिम ताम्रपट[१] आणि प्रभावती गुप्ताचा पुणे ताम्रपट[२] हा सर्वात महत्त्वाचा असा पुरावा डॉ. मिराशी

वा.वि. यांनी खुप सविस्तरपणे संशोधिला आहे. प्रवरसेन दुसरा या वाकाटक राजांचा शिवनी ताम्रपट हाही एक दुर्मिळ साधन ठरतो. अमरावती शिलालेख उल्लेखनीय ठरतो. त्याशिवाय स्थापत्य अवेशषही मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेले आहेत. नागपूरजवळ रामटेक येथे आणि पवनार येथे महत्वपूर्ण अवशेष आढळले आहेत. नांदेड जिल्ह्यातील पैनगंगेच्या काठावरील शिऊरची लेणी ही देखील वाकाटक कालीन असल्याचे सिध्द झाले आहे. अजिंठ्याच्या लेणीपैकी लेणी क्रमांक १,२,१६,१७ आणि १९ या सर्व लेणी वाकाटक कालीन आहेत. याकाळात कला, स्थापत्य व साहित्य क्षेत्रात भरीव स्वरुपाची प्रगती झाली. त्यामुळे वाकाटकांची राजवट सुवर्णकाळ ठरली.

२.१ वाकाटकांचे मूळस्थान कोणते ?

वाकाटक घराण्याचे मूळस्थान कोणते ? याबाबत सुरुवातीच्या काळात इतिहास संशोधकात मतभेद होते. परंतु आज ते मतभेद राहिलेले नाहीत. वाकाटक घराण्याची माहिती आपणास पुराणे आणि वाकाटकांच्या कोरीव लेखावरुन होते. वाकाटकांच्या मूळ स्थानाविषयी विभिन्न मते मांडली आहेत. डॉ. वा.वि. मिराशी यांच्या मते वाकाटक हे राजघराणे दक्षिणेतीलच होते. याउलट डॉ. के.पी. जायस्वालच्या मते वाकाटक घराणे हे उत्तरेकडील होते. पुढे पुणे या ठिकाणी मिळालेल्या प्रभावती गुप्ताच्या ताम्रपटावरुन वाकाटकांचा वंश व त्यांचा काळ याविषयी माहिती मिळते. सातवाहनाच्या अस्तानंतर महाराष्ट्राच्या पश्चिम भागात अभिरांची सत्ता निर्माण झाली होती तर विदर्भात वाकाटकांची सत्ता निर्माण झाली होती. वाकाटक राजांनी धारण केलेल्या पदव्या या दक्षिणेकडील कदंब व पल्लव राजांनी धारण केलेल्या पदव्यांसारख्याच होत्या. वाकाटक स्वत:स हरितीपुत्र म्हणवून घेत असत.[३] वाकाटक घराणे मूळ दक्षिणेकडील होते हे यावरुन सिध्द होते. तसेच अनेक विद्वानांनीसुध्दा वाकाटकांना दक्षिणेकडील असल्याचे मान्य केले आहे. डॉ. के.पी. जयस्वाल यांना मध्यप्रदेशात झांशी परिसरात वाकाटक काळातील अवशेष सापडले आहेत. ओरछा संस्थानात वाकाटक या नावाच्या परिसराचेही त्यांनी अवलोकन केले. त्यावरुन त्यांनी वाकाटक हे मूळचे ओरछा संस्थानातले असावेत असा विचार मांडला. असे असले तरी त्या भागात वाकाटकांच्या अस्तित्वाचे इतर कोणतेच पुरावे उपलब्ध झाले नाहीत. डॉ. वा.वि. मिराशी यांनी वाकाटकांच्या अस्तित्वाच्या अनेक पाऊलखुणा विदर्भ-मराठवाड्यात धुंडाळल्या नंतर डॉ. के.पी.

जयस्वालांचे मत खोडून काढले. वाकाटकांचे मूलस्थान विदर्भात रामटेक जवळ नंदिवर्धन हेच होते ही गोष्ट आता निर्विवादपणे सिध्द झाली आहे.[४] वाशिम ताम्रपटाने वाकाटकाच्या वत्सगुल्म शाखेचाही इतिहास प्रकाशात आला. महाराष्ट्रातील वाशिम जिल्हा (वत्सगुल्म) ही वाकाटकांची राजधानी असल्याचे सिध्द झाले आहे.

२.२ वाकाटक कोण होते :

इ.स. १८३६ मध्ये शिवनी येथे एक ताम्रपट प्राप्त झाला. या ताम्रपटावरुन प्रथम वाकाटक राजघराणे प्रकाशात आले. हा ताम्रपट द्वितीय प्रवरसेन यांच्या कारकीर्दीतील आहे. वाकाटक राजघराण्याचा संस्थापक प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख पुराणात आढळतो. परंतु त्यास पवन किंवा ग्रीक वंशातील असल्याचे समजण्यात आले. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा येथील लेणी क्रमांक १६ मध्ये एक कोरीव लेख मिळाला. या कोरीव लेखाचा अभ्यास केल्यावरही डॉ. भाऊ दाजी लाड यांनी इ.स. १८६२ मध्ये वाकाटक यांना यवन किंवा ग्रीक समजण्यात आले. परंतु अजिंठा लेणीतील कोरिवलेखात प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख द्विज असा केला आहे. वाकाटकांच्या ताम्रपटातही त्यांचे गोत्र विष्णुवृध्द असल्याचा उल्लेख केलेला आढळतो. यावरुन वाकाटक ब्राह्मण जातीय होते हे स्पष्ट होते.[५]

२.३ प्रथम विंध्यशक्ती :

विंध्यशक्ती हा वाकाटक घराण्यातील पहिला राजा असून तो वाकाटक घराण्याचा संस्थापक मानला जातो. अजिंठा येथील लेखात विंध्यशक्तीची स्तुती केल्याचे दिसून येते. विंध्यशक्तीने अनेक लढाया जिंकून आपल्या सामर्थ्यांमध्ये भर टाकली होती. विंध्यशक्तीच्या पुरिका व चनका या दोन राजधान्यांचा उल्लेख पुराणात आहे. विंध्यशक्ती चनका या ठिकाणाहून राज्य करत असावा. परंतु याविषयी निश्चित काही सांगणे कठीण आहे. विंध्यशक्तीचा काळ इ.स. २५० ते २८० हा असावा. हरितीपुत्र विंध्यशक्ती हा वाकाटक घरांण्याचा संस्थापक राजा होय. अजिंठा शिलालेखातून वाकाटक वंशकेतू म्हणजेच त्याचा उल्लेख केला जातो. अजिंठ्याच्या लेणीलेखातून त्याचे सविस्तर वर्णन आढळते. अजिंठ्याच्या १६ व्या क्रमांकाच्या लेणीतील शिलालेखातही त्याचे नाव आढळते.

विंध्यशक्ती हा औदार्यात आणि शौर्यात अतुलनीय होता. असे त्याचे वर्णन केले जाते. इंद्रासारखा श्रेष्ठ आणि विष्णुसारखा प्रबळ असलेला विंध्यशक्ती वाकाटक घराण्याचा एक महत्त्वाचा राजा होय. अजिंठा कोरिवलेखात प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख द्विज म्हणजे ब्राह्मण आणि वाकाटकवंश या नावाने केला आहे.[६] याच कोरीवलेखात असे म्हटले आहे की त्याने मोठमोठ्या लढायांत विजय मिळवून आपले सामर्थ्य वाढविले होते. तो कुध्द झाला म्हणजे प्रत्यक्ष देवांनाही अनिवार्य होत असे, त्याच्या घोड्यांच्या टापांनी उडविलेल्या धुळीने आकाशांत सुर्य झाकून जात असे त्याच्या शौर्याने पराभूत झालेले शत्रु त्याच्या पुढे विनम्र होत. प्रथम विंध्यशक्ती याची शब्दोपाधी अजिंठा शिलालेखात उल्लेखिली नाही. त्यामुळे त्याचा राज्याभिषेक झाला नसावा असे कांही इतिहासकारांचे मत आहे. परंतु यामध्ये तथ्य आढळत नाही. वाकाटकांच्या दानपत्रात विंध्यशक्तीचा उल्लेख आढळत नाही. कारण वाकाटक साम्राज्याचा खरा संस्थापक विंध्यशक्ती नसून त्याचा पुत्र प्रवरसेन हा होता. अजिंठा कोरीवलेखात विंध्यशक्तीचाच नव्हे तर त्याच्या वंशजाच्याही बाबतीत राजवंशब्दोपाधि लावलेली आढळत नाही.

महाराष्ट्राच्या प्रारंभीच्या राजकीय काळाविषयी श्री.पु.ग.सहस्त्रबुध्दे लिहितात.

स्वतंत्र राज्य प्रस्तापित करणारे सातवाहन राजघराणे त्याला लाभले. या पहिल्या घराण्याचे
"इ.स. पुर्वी तिसऱ्या शतकात महाराष्ट्राला पृथगात्मता आली त्याचवेळी या भूमीचे राज्य साडेचारशे वर्षे टिकले. त्यानंतर पन्नास पाऊनसे वर्षे महाराष्ट्रावर आभीर, शक व कुशाणांप्रमाणेच परकीय असलेल्या जमातीचे राज्य होते. पण सुदैवाने लवकरच वाकाटक नृपती 'विंध्यशक्ती' याचा उदय झ ाला, आणि त्याच्या घराण्याने सुमारे तीनशे वर्षे महाराष्ट्रावर राज्य केले "[७]

प्रथम प्रवरसेन :

विंध्यशक्तीनंतर त्याचा पुत्र पहिला प्रवरसेन हा वाकाटकांचा राजा झाला. हा राजा शक्तिशाली असून याने जवळपास साठ वर्षे राज्य केले. त्याने वाकाटकांच्या राज्याचा विस्तार केला. त्याने राज्याची राजधानी पुरिका केली होती. ह्याने अनेक लढाया जिंकल्या होत्या. तसेच त्याने अग्निस्त्रोत, अप्तार्यम, वाजपेय, ज्योतिस्त्रोत, सद्यास्क, बृहस्पतीसव आणि अश्वमेध असे सात प्रकारचे यज्ञ केले होते.[८] ह्याने प्रथमच सम्राट आणि धर्ममहाराज या पदव्या धारण केल्या होत्या. कलिंग, आंध्र व कोसल या राज्यांनी पहिला प्रवरसेन याची अधिसत्ता मान्य केली असल्याचे दिसते. प्रवरसेन हा वैदिक धर्माचा अनुयायी असावा. याने भारशिवनाथ या शक्तिशाली राजाशी वैवाहिक

संबंध निर्माण केले होते. भारशिव राजा भवनाग याने आपली कन्या प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र यास दिली होती. परंतु गौतमीपुत्र हा प्रवरसेनाच्या हयातीतच मरण पावला.

पुराणातील उल्लेखानुसार विंध्यशक्ती नंतर प्रवीर नावाचा राजा सत्तेवर आला. प्रवर हा विंध्यशक्तीचा पुत्र होता व त्याने प्रवरसेन हे नाव धारण केले होते. वाकाटक घराण्याची खरी प्रतिष्ठा यानेच प्रस्थापिली. त्याने वाकाटक राज्याचा विस्तार करुन वाकाटकांचे सामर्थ्य वाढविले व विशाल राज्य निर्माण केले. पुढे वाकाटकांचे राज्य आता साम्राज्य बनले. तत्कालीन रीतीनुसार प्रवरसेनाने आपल्या साम्राज्याला राजमान्यता मिळविण्यासाठी वैदिक परंपरेतील अश्वमेध यज्ञ केल्याची नोंद आहे. घटोत्कच लेणीतील शिलालेखात त्याने केलेल्या अध्वमेध यज्ञांचा स्पष्ट उल्लेख आहे. या अश्वमेध यज्ञामुळे अनेक राजा महाराजानी त्यांचे मांडलीकत्व स्विकारले होते. निरनिराळ्या दिशांनी अश्वमेधाचा अश्व पाठवून, त्याने चार अश्वमेध यज्ञ केले. त्यानंतर तो सार्थपणे सम्राट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याने आपली राजधानी चनाकाहून पुरिका या राज्याच्या केंद्रस्थानी असलेल्या गावी आणली. त्याने पुरीकाच्या परिसरांतील नागराजांना पराभूत केले. त्याने आपली सत्ता नर्मदा नदी पर्यंत विस्तारली होती.

प्रवरसेनाने पश्चिमेचे महाराष्ट्र, गुजराथ, कोकण हे प्रदेश जिंकले असणे असंभवनीय आहे. कारण या प्रदेशांवर त्या काळी आभीरांचे बलाढ्य राज्य होते. मात्र दक्षिणेत उत्तर कुन्तलांतील कोल्हापूर, सातारा, सोलापूर या भागात प्रवरसेनाने आपली सत्ता पसरविली असावी. पूर्वेस दक्षिण कोसल, कलिंग व आन्ध्र या देशातील लहान लहान राजांनीही प्रवरसेनाचे वर्चस्व कबूल केले असावे.[९] पण या काळातील फारच कमी लेख उपलब्ध झाल्याने प्रवरसेनाच्या साम्राज्याच्या निश्चित मर्यादा सांगणे कठीण झाले आहे. त्याच्या साम्राज्याच्या सीमा पुराव्याअभावी निश्चित करता येत नसल्या तरी कोसल, कलिंग व आंध्र हा संपूर्ण परिसर आणि आजचा विदर्भ, मराठवाडा त्यांच्या राज्यात समाविष्ट होता.[१०] ६० वर्षे राज्य करणाऱ्या या प्रवरसेनाने वाकाटक साम्राज्याला खरोखर स्थैर्य प्राप्त करुन दिले.

प्रथम प्रवरसेन हा धार्मिक वृत्तीचा राजा असून वैदिक धर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याने स्वत: अनेक श्रोत याग केले. त्याच्या वंशजांच्या बहुधा सर्व ताम्रपटात त्याने केलेल्या चार अश्वमेधांचा

व सप्तसोम संस्थेचा उल्लेख आढळतो. पुराणांत त्याच्या वाजपेय यज्ञांचा व त्यात त्याने दिलेल्या बहुमूल्य दक्षिणांचा मुद्दा निर्देश केला आहे. या वाजपेय यज्ञांच्या अनुष्ठानानंतर त्याने सम्राट ही अत्यंत मानार्ह पदवी धारण केली.[११] उत्तर किंवा दक्षिण भारतांतील इतर कोणाही प्राचीन राजाने ही पदवी धारण केल्याचे इतिहासात नमूद नाही. पूर्वीच्या नृपतीप्रमाणे त्याने आपल्या धर्मविजयित्वाची निदर्शक अशी धर्ममहाराज ही उपाधिही धारण केली. तसेच विण्हुक्रड सातकर्णि राजाप्रमाणे तो आपणास हारीतीपूत्र म्हणवून घेई.[१२] या दोन उपाधीचा उल्लेख वाशीम ताम्रपटात आला आहे. चार अश्वमेध यज्ञ करुन प्रवरसेनाने दक्षिण भारतात आपले

सम्राट पद उद्घोषित केले. नंतर आपल्या सत्तेला जास्त बळकटी आणण्याकरिता राज्य स्थापन केले. त्याने उत्तर भारतातील भारशिवाशी वैवाहिक संबंध जोडला होता. भारशिव हे नागवंशी असून मूळचे विदर्भातील असावे. कारण भारनृपति भगदत्त याचा ख्रिस्तोतर द्वितीय शतकातील एक शिलालेख मध्यप्रदेशाच्या भंडारा जिल्ह्यातील पौनी गावी सापडला आहे. नंतर त्यांनी उत्तरेस स्वाऱ्या करुन तेथे आपले राज्य स्थापले असे दिसते. भारशिवांचा अधिराज (अधिपति) भवनाग याची तांब्याची नाणी मध्य भारतातील सुप्रसिध्द नागराजधानी पद्मावती (सध्याचे पदमपवाया) येथे सापडली आहेत.

प्रवसरसेनाचा देव नामक अत्यंत धार्मिक, विद्वान व कर्तबगार प्रधानमंत्री होता. त्याचे वर्णन घटोकत्च लेण्यातील लेखात आले आहे. त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक कृत्याच्या अनुष्ठानात गुंतले होते, असे त्यात म्हटले आहे. प्रथम प्रवसरसेनाच्या कारकीर्दीतील अनेक श्रोत यज्ञांचे अनुष्ठान या विद्वान व धर्मशील मंत्र्याच्या उपदेशानुसार झाले असावे. पहिला प्रवसरसेन याने इ.स. २८० पासून इ.स. ३४० पर्यंत राज्य केले.

प्रवसरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटकांचे प्रबल साम्राज्य दुबळे व अस्थिर बनले. पुराणांतील संदर्भानुसार प्रवसरसेनला चार पुत्र होते. त्यापैकी जेष्ठपुत्र गौतमीपुत्राचा विवाह भारशीव राजकन्येशी झाला होता. त्याच्या नावाची नाणी सापडलेली नाही. त्याचा अल्पवयात आकस्मिक मृत्यू झाला असावा. सम्राट प्रवरसेनच्या मृत्यूनंतर वाकाटक साम्राज्याचे विघटन होऊन त्याचे तीनही पूत्र स्वतंत्रपणे राज्य करु लागले. वत्सगुल्म

(वाशिम) व नंदीवर्धन (रामटेक) या ठिकाणी स्वतंत्र राज्य अस्तित्वात आली. तिसऱ्या राजपुत्रानेही आपले राज्य स्थापन केले असावे ; परंतु त्याच्या नावाविषयी अजूनही निश्चित अशी माहीती देणारा पुरावा हाती आलेला नाही. इ.स. १९३९ साली सापडलेल्या वासिम ताम्रपटात सर्वसेन या प्रवरसेनाच्या राजपुत्राचा उल्लेख आहे.[१३] औरंगाबाद जवळच्या अजिंठ्याच्या लेणीतील एका शिलालेखातही त्याचे नाव स्पष्टपणे आढळते. तेव्हा प्रवरसेनच्या चार पुत्रापैकी गौतमीपुत्र आणि सर्वसेन हे दोन राजपुत्र होते हे आता स्पष्ट झाले आहे. उरलेल्या राजपुत्रांविषयी अजूनही शोध घ्यावा लागेल अजिंठ्याच्या लेणीतील शिलालेखात वाकाटक वंशावळीत ही नावे होती. परंतु ती आज स्पष्टपणे वाचता न येण्याइतपत अस्पष्ट झालेली आहेत.

पहिल्या प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र मृत्यू पावल्यामुळे त्याचा नातू रुद्रसेन पहिला हा वाकाटक वंशाचा राजा झाला. हा समुद्रगुप्तास समकालीन होता. समुद्रगुप्ताने दक्षिणेतील सर्व राज्यांना जिंकून घेऊन आपली अधिसत्ता मान्य करावयास भाग पाडले होते ; परंतु रुद्रसेनच्या राज्याला त्याने धक्का लावला नाही. यावरुन वाकाटकांच्या सामर्थ्याची कल्पना येते. गुप्तापासून रुद्रसेन याने आपले राज्य सुरक्षित ठेवले होते. अलाहाबाद प्रशस्तीमध्ये या राजाचा उल्लेख रुद्रदेव असा केल्याचा दिसतो. समुद्रगुप्ताने वाकाटकांच्या सामंत राजांचे प्रदेश मात्र जिंकून घेतले होते. रुद्रसेन पहिला याने समुद्रगुप्ताविरुध्द आठ राजांचा राज्य संघ स्थापन केला होता. व त्या राज्यसंघाचा समुद्रगुप्ताने पराभव केला आणि त्यामुळे वाकाटकांचा मध्य भारतातील प्रभाव कमी झाला. परिणामी रुद्रसेनाचे राज्य प्रत्यक्षात उत्तर विदर्भापुरतेच मर्यादीत राहिले. प्रत्यक्षात अलाहाबादच्या स्तंभलेखात गुप्त वाकाटक संघर्षाचा आणि रुद्रसेनच्या पराभवाचा उल्लेख नाही. म्हणूनच काही इतिहासकार हा संघर्ष झालाच नाही असे मानतात. वाकाटक सत्ता मात्र बरीच सिमित झाली होती, हे ऐतिहासिक सत्य आता सर्वानीच मान्य केले आहे. रुद्रसेन पहिला याने इ.स. ३४० पासून इ.स. ३६५ पर्यंत राज्य केले.

पृथ्वीसेन पहिला :

रुद्रसेन पहिला याच्या नंतर त्याचा पुत्र पृथ्वीसेन पहिला हा सत्तेवर आला. हा राजा चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या समकालीन होता. पृथ्वीसेन याने राज्याचा विस्तार केला. तसेच कुंतल हा

प्रदेश जिंकून राज्यास जोडला होता. चंद्रगुप्ताने माळवा व सौराष्ट्र येथील शक सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी वाकाटक राजा पृथ्वीसेन याची मदत घेतली होती. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावती पृथ्वीसेन पहिला याचा पुत्र रुद्रसेन दुसरा यास दिली होती. पृथ्वीसेन हा शिवोपासक असून त्याने राज्याची राजधानी नागपूरजवळच २८ मैलावर असलेल्या नंदिवर्धन या ठिकाणी नेली. पृथ्वीसेन हा शिवोपासक होता व सत्य, ऋजुत्व, कारुण्य, शौर्य, विक्रम, बुध्दिमत्व, योग्य जनाविषयी परमादर, मनोनैर्मल्य इत्यादी गुणांविषयी त्याची ख्याती होती असे समजते. याची तुलना अजातशत्रु धर्मराजाशी केली आहे व याला धर्मविजयी म्हटले आहे.[१४] त्यावरुन त्याने कधीही परराज्यापहरणाकरिता युध्द केले नव्हते असे म्हणता येते. हा पृथ्वीसेन गादीवर आला त्यावेळी वाकाटक राज्यस्थापनेपासून शंभर वर्षे झाली होती. त्याचा खजिना भरला होता व लष्कर मोठे व जय्यत तयार होते, असे वर्णन वाकाटकांच्या दानपत्रात केले आहे. उत्तरेत समुद्रगुप्त व त्याचा पुत्र द्वितीय चंद्रगुप्त यांनी चढाईचे धोरण स्वीकारुन अनेक राजांना जिंकले होते व आपल्या राज्याच्या सीमा वाढविल्या होत्या. याच्या उलट पृथ्वीसेनाने शांततेचे धोरण स्वीकारुन प्रजेच्या कल्याणाकडे आपले सर्व लक्ष दिले. पृथ्वीसेन पहिला याने इ.स. ३६५ पासून इ.स. ३९५ पर्यंत राज्य केले.

रुद्रसेन दुसरा :

पृथ्वीसेन पहिला यांच्यानंतर त्याचा पुत्र रुद्रसेन दुसरा हा वाकाटक वंशाच्या गादीवर आला ; परंतु याची कारकीर्द अगदी अल्पायुषी ठरली. हा चंद्रगुप्ताचा समकालीन असून त्याचा जावई होता. चंद्रगुप्ताने आपली कन्या प्रभावती हिचा विवाह रुद्रसेन दुसरा याच्याशी केला होता. रुद्रसेन इ.स.४०५ मध्ये मरण पावला.[१५] यास दिवाकरसेन व दामोदरसेन ही दोन मुले होती. ही मुले अज्ञान असल्यामुळे वाकाटक राज्याचा राज्यकारभार प्रभावतीने आपल्या मुलाच्या नावाने पाहण्यास सुरुवात केली. चंद्रगुप्ताने (तिचा पती) प्रभावतीस प्रशासनात सहकार्य करण्यासाठी काही अधिकारी पाठविले होते. रुद्रसेन दुसरा याने इ.स. ४०० पासून इ.स. ४०५ पर्यंत राज्य केले.

प्रभावती गुप्ता :

प्रभावती गुप्ता ही गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्याची कन्या व वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा याची राणी होती. रुद्रसेन दुसरा हा अल्पावधीतच मृत्यू झाला. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले

दिवाकरसेन व दामोदरसेन हे अल्पवयीन होते. त्यामुळे प्रभावती गुप्ताने त्यांच्या नावाने राज्यकारभार पाहिला. पुणे[१६] येथे उपलब्ध झालेल्या प्रभावतीच्या ताम्रपटात तिने राज्यकारभारांत प्रत्यक्ष भाग घेतल्याचे म्हटले आहे.[१६] या ताम्रपटात दोन पत्रे असून ती संस्कृतमध्ये आहेत. दान नंदीवर्धन येथून देण्यात आले असून ताम्रपटात प्रभावती देवीचा रुद्रसेन (द्वित्तीय) ची महाराणी व युवराज दिवाकर सेन याची राजमाता म्हणून गौरव करण्यात आला आहे. यामध्ये आचार्य चनल स्वामी यांना कार्तिक शुध्द द्वादशीच्या दिवशी ४८ गुण खेडे अग्रहार म्हणून दान दिल्याची नोंद आहे. दान दिलेले खेडे सुप्रतिष्ठ आहारातील आहे. युवराज दिवाकरसेनच्या तेराव्या वर्षी हे दान दिल्याचे म्हटले आहे. आहार याचा अर्थ-जिल्हा, जिल्हयाचे ठिकाण. यावरुन वाकाटक काळात पैठण हे जिल्हयाचे केंद्र असून त्याचे धार्मिक महत्व वाढले असल्याचे स्पष्ट होते.[१७] प्रभावतीगुप्ता या सम्राज्ञीचा वाकाटकांच्या एकुण राज्यकारभारावर खूप वचक होता. गुप्त सम्राटाचे पूर्ण सहाय्य तिला लाभले असल्याने तिने वाकाटक साम्राज्याला आर्थिक आणि राजकीय स्थैर्य प्राप्त करुन दिले. चंद्रगुप्त विक्रमादित्यानी प्रशासनात मदत करण्यासाठी काही अधिकारी प्रभावतीगुप्ताकडे पाठविले. विवाहनंतरही तिने माहेरचेच नाव उपयोजिलेले दिसते. कविकुलगुरु कालीदासही या काळात रामगिरीवर आला होता. नागपूर परिसरातील रामटेक - रामगिरी पर्वतावरुन कालीदासाने मेघदूत या काव्यांची रचना केली. प्रभावतीगुप्ताने स्वत: कला आणि साहित्याला राजाश्रय दिला. ती स्वत: रामभक्त होती तिने रामटेक व पवनार या ठिकाणी राममंदिरे बांधली. लेणी स्थापत्याचाही विकास घडवून आणला. नांदेड जिल्ह्यातील शिऊरची लेणी याच काळात कोरविली गेली. याठिकाणी देखील रामाची अप्रतिम शिल्प आहेत. तसेच तेथे विष्णुच्या सुध्दा मूर्ती आहेत. प्रभावतीगुप्ता श्रेष्ठ प्रतिची प्रशासक होती. तिच्या विषयीचे जसजसे पुरावे हाती येतील तसतसी अधिक माहिती उपलब्ध होईल. प्राचीन भारतातील सर्वश्रेष्ठ सम्राज्ञी म्हणून प्रभावतीगुप्ताचा उल्लेख केला जातो. तिने सुरुवातीला दिवाकरसेनाच्या नावाने राज्यकारभार सुरु केला. दिवाकरसेनाच्या अल्पकालीन मृत्यूनंतर तिचा धाकटा मुलगा दामोदरसेन हा राज्यावर आला.

दामोदरसेन उर्फ प्रवरसेन दुसरा :

रुद्रसेन दुसरा याचा जेष्ठ पुत्र इ.स. ४१० मध्ये मरण पावला. पुढे त्याचवर्षी रुद्रसेन दुसरा याचा कनिष्ठ पुत्र दामोदरसेन हा वाकाटक राजा झाला. राज्यरोहणाच्यावेळी त्याने प्रवरसेन दुसरा ही उपाधी धारण केली. याने प्रवरपूर या नवीन शहराची स्थापना करुन ते शहर राजधानी म्हणून घोषित केले. (वर्धा जिल्ह्यातील पवनार) दुसरा प्रवरसेन हा शिवोपासक होता. त्याने आईच्या आदेशावरुन सेतुबंध हे श्रीरामाच्या चरित्रावरील काव्य रचले. त्याने परमेश्वर ही पदवी धारण केली होती. कदंब राजकुमारी अजित भट्टारिका हिचा विवाह आपला पुत्र नरेंद्रसेन याच्याशी प्रवरसेन याने घडवून आणला होता. कदंबाशी वाकाटकांचे मैत्रिसंबंध प्रस्थापित झाले होते. प्रवरसेन दुसरा याचे आजपर्यंत अनेक ताम्रपट व शिलालेखही प्रकाशात आले आहेत. तो स्वत: अत्यंत उदार राजा होता. त्याची आतापर्यंत १३ दानपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्याने आपली राजधानी नंदीवर्धनाहून प्रवरपूर येथे (पवनार जि. वर्धा) आणली.[१८] या ठिकाणी वाकाटाककालीन अनेक अवशेष सापडले आहेत. त्याच्या कारकिर्दीत वाकाटकांचे कदंम्बाशी देखील मैत्रीचे आणि पुढे नातेसंबंध प्रस्थापित झाले. त्याने आपला राजपुत्र नरेंद्रसेन याचा विवाह कदम्ब राजकन्या अजिभट्टारिका हिच्याशी लावला.

द्वितीय प्रवरसेन हा शिवोपासक होता. भगवान शंकराच्या कृपाप्रसादाने आपणास आपल्या राज्यांत कृतयुग स्थापन करता आले असे त्याने आपल्या ताम्रपटात म्हटले आहे. हा मोठा दानशूर होता. त्याने दिलेले बारा तेरा ताम्रपट आतापर्यंत उपलब्ध झाले आहेत. वाकाटक वंशाच्याच नव्हे, तर इतर प्राचीन भारतीय वंशाच्या कोणाही राजाची इतकी दानपत्रे क्वचितच सापडली असतील. कालिदास वाकाटक दरबारी होता. त्या काळात त्याच्याशी याचा संबंध येऊन याला कवित्वाची स्फूर्ती झालेली दिसते. याच्या अनेक प्राकृत गाथा सप्तशतीत घातल्या आहेत. हा स्वत: शिवभक्त होता तरी आपल्या विष्णूपासक मातेच्या - प्रभावतीगुप्तेच्या आज्ञेवरुन याने भगवान रामचंद्राच्या चरित्रावर सेतुबंध काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचले.[१९] गादीवर आल्यावर लवकरच त्याने या काव्याच्या रचनेस आरंभ केला, असे त्या काव्याच्या पहिल्या आश्वासातील नवव्या गाथेवरुन दिसते. ते रचतांना त्याला अनेकदा अडचणी येत होत्या, अनेक चुका होत होत्या व ते काव्य पूर्ण करणे कठीण जात होते, असे त्याने स्वत:च सांगितले आहे. अशा प्रसंगी कविकुलगुरु कालिदासाचे त्याला बहुमोल साहाय्य झाले असावे. या कारणाने हे काव्य प्रवरसेनाच्या नांवावर मोडत असले तरी

ते त्याच्याकरिता विक्रमादित्याच्या आज्ञेने कालिदासाने रचले होते, अशी समजूत प्रचलित झाली. तिचा उल्लेख त्या काव्याच्या प्रत्येक सर्गाच्या अखेरीस व रामदास नामक टीकाकाराच्या टीकेच्या आरंभीही आढळतो. राजधानी प्रवरपुराला नेल्यावर तेथे प्रवरसेनाने आपल्या मातेच्या इच्छेवरुन भगवान रामचंद्राचे उत्तुंग देवालय बांधले व त्यास सुंदर शिल्पांनी शूशोभीत केले. त्याचे काही अवशेष पवनार येथे मिळाले आहेत. दामोदरसेन याने इ.स. ४१० पासून इ.स. ४४५ पर्यंत राज्य केले.

नरेंद्रसेन

नरेंद्रसेन हा दुसरा प्रवरसेन याचा पुत्र होता. याची पत्नी अजित भट्टारिका ही कदंबाची राजकन्या होती. याच्या कारकीर्दीत बस्तरच्या भवदत्तवर्मन या नलराजाने वाकाटकाच्या राज्यावर आक्रमण करुन नंदिवर्धन या राजधानीवर ताबा घेतला होता ; परंतु काही काळातच नल राजाचे आक्रमण नरेंद्रसेन याने परतवून लावले. हुणांच्या गुप्त साम्राज्यावर होणाऱ्या आक्रमणाचा फायदा नरेंद्रसेनाने घेतला व गुप्त साम्राज्यातील मेखल, कोशल व माळव्याचा काही प्रदेश त्याने जिंकून घेतला. मेखल, माळवा आणि माळव्याच्या राज्यकर्त्यांनी नरेंद्रसेनाचे श्रेष्ठत्व मान्य केले. नरेंद्रसेन याने इ.स. ४४५ पासून इ.स. ४७० पर्यंत राज्य केले. इ.स. ४७० मध्ये त्याचा मृत्यू झाला, आणि वाकाटकाच्या नंदिवर्धन घराण्याच्या ऱ्हासाची प्रक्रिया गतिमान सुरु झाली. पृथ्वीसेन दुसरा आणि हरीसेन हे या घराण्याचे शेवटचे राजे होते. इ.स. ५०० च्या दरम्यान नंदिवर्धनचे वाकाटक राज्य नष्ट झाले. पुढे हा परिवार वत्सगुल्मच्या राज्यात समाविष्ट झाला. नरेंद्रसेन याचा एकही लेख अद्यापी मिळाला नाही. तथापि त्याचे नाव त्याचा मुलगा द्वितीय पृथ्वीषेण याच्या बालाघाट ताम्रपटात उल्लेख आला आहे. त्याचा मांडलिक मेकल देशाधिपति भरतबल यानेहि आपल्या बम्हनी ताम्रपटात त्याचा प्रसन्न रीतीने उल्लेख केला आहे. बालाघाट ताम्रपटात म्हटले आहे की त्याने आपल्या अंगच्या गुणांनी आपल्या वंशाच्या राज्यलक्ष्मीचे अपहरण केले होते. या वर्णनावरुन त्याच्या राज्यारंभी कलह उत्पन्न झाला असावा व नरेंद्रसेनाने आपल्या वडील भावास बाजूस सारुन गादी बळकावली असावी. वाकाटक नृपति नरेंद्रसेन याने ज्या अज्झितभट्टारिका नामक कुन्तल

राजकन्येशी विवाह केला होता. ती राष्ट्रकूटवंशी देवराजाचा मुलगा अविधेय याची कन्या असावी. हा अविधेय सुमारे सन ४४० ते ४५५ या काळात होऊन गेला.

नरेंद्रसेनाने आपल्या राज्याच्या पूर्व व उत्तर दिशांस आक्रमक धोरण अवलंबिले होते असे दिसते. त्याचा मुलगा द्वितीय पृथ्विषेण याच्या बालाघाट ताम्रपटात नरेंद्रसेनाने शौर्याने आपल्या शत्रूंचा पराभव केला होता व कोसला, मेकला व मालव या देशांचे अधिपति त्याच्या आज्ञा शिरसावंद्य मानत होते, असे वर्णन आले आहे.[२०] यापैकी मालवदेश पश्चिम क्षत्रपांच्या उच्छेदापासून स्वत: गुप्तांच्या अमंलाखाली होता. ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हूणांच्या स्वाऱ्यामुळे गुप्त साम्राज्य खिळखिळे झाले तरीही स्कंदगुप्ताने मोठ्या शौर्याने त्यांच्या टोळ्यांच्या लाटा थोपूवन धरल्या होत्या तरी देशांत एकंदरीत अस्थैर्य व अशांतता यांचे वातावरण उत्पन्न झाले होते. याचे प्रमाण मन्दसोर येथील विक्रम संवत ५२९ च्या शिलालेखात सापडते.[२१] त्यात म्हटले आहे की विक्रम संवत ४९३ ते ५२९ यामधील ३६ वर्षाच्या अल्पावधीत दशपूर येथे कित्येक राजे होऊन गेले. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या विक्रमसंवत ५२४ च्या मंदसोर शिलालेखात म्हटले आहे की दशपुर (मन्दसोर) येथील गुप्तांचा मांडलिक प्रभाकर याला आपल्या स्वामीच्या अनेक शत्रूंशी लढावे लागले होते. यापैकी काहीनी वाकाटक नृपति नरेंद्रसेनाचे स्वामित्व स्वीकारुन गुप्तांचे जोखड टाकून देण्याचा प्रयत्न केला असावा.

नरेंद्रसेन गादीवर आला तेव्हा त्याचे बरेच वय झाले असावे ; कारण त्याचा पिता द्वितीय प्रवरसेन याने दीर्घकाळ राज्य केले होते. नरेंद्रसेनाची कारकीर्द वीस वर्षे चालून सन ४७० च्या सुमारास समाप्त झाली असावी. तिचा शेवट होण्यापूर्वी वाकाटक राज्यावर एक गंडांतर आले. नलवंशी भवदत्तवर्मा याने वाकाटकांच्या मुलाखावर स्वारी करुन त्याचा बराचसा भाग काबीज केला. नल राजे कोसला देशांत राज्य करीत होते असे पुराणे सांगतात. पुराणातील या विधानाला नलांच्या कोरीव लेखांच्या व नाण्यांच्या प्राप्तिस्थानावरुन दुजोरा मिळतो. वराह, भवदत्तवर्मा व अर्थपति या तीन नलराजांची सोन्याची नाणी मध्यप्रदेशात बस्तर जिल्ह्यातील कोंडेगाव तहसिलीत एडेंगा येथे सापडली होती.[२२] या राजांपैकी वराह हा सर्वात अगोदर आणि अर्थपति सर्वात नंतर राज्य करीत असावा. भवदत्तवर्म्याने वाकटकांच्या मुलखावर स्वारी करुन नन्दिवर्धन या त्यांच्या पूर्वीच्या

राजधानी पलीकडचाही प्रदेश काबीज केला. त्याचा एक ताम्रपट अमरावती जिल्ह्यात ऋद्धपूर येथे सापडला आहे.[२३] त्यामध्ये भवदत्तवर्म्याने यवतमाळ जिल्ह्यातील कदंबगिरिग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. भवदत्त वर्मा प्रयागला यात्रेच्या निमित्ताने गेला असता तेथे त्याने आपल्या व आपल्या राणीच्या पुण्योपार्जनाकरिता हे दान दिले होते. त्याचा ताम्रपट भवदत्तवर्म्याचा पुत्र अर्थपति याने नन्दिवर्धनाहून दिला आहे. या ताम्रपटातील स्थानोल्लेखावरुन वाकाटकांच्या जेष्ठ शाखेच्या अमंलाखाली बराचसा प्रदेश नलरांजानी जिंकला होता, हे स्पष्ट आहे. नरेंद्रसेन याने इ.स. ४४५ पासून इ.स. ४७० पर्यंत राज्य केले.

दुसरा पृथ्वीसेन :

दुसरा पृथ्वीसेन हा नरेंद्रसेन याचा पुत्र होता. याच्या कारकीर्दीत नलराजा भवदत्त वर्माने वाकाटकाच्या राज्यांवर आक्रमण केले व विदर्भातील बराचसा भूभाग जिंकून घेतला होता. पृथ्वीसेन याने पुन्हा वाकाटकांच्या प्रतिष्ठेची पुनर्स्थापना केली. संरक्षणाच्या दृष्टीने पृथ्वीसेन याने आपली राजधानी पद्मपूर येथे नेली.[२४] (भंडारा जिल्ह्यातील आमरगावजवळ) पृथ्वीसेन याने नलराजावर आक्रमण करुन त्याला विदर्भातून हाकलून लावले. नलराजाची राजधानी पुष्करी ची नासधूस केली. याने उत्तरेकडे साम्राज्याचा विस्तार केला. हा विष्णूपासक असून याचा मृत्यू इ.स. ४९० मध्ये झाला. त्याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या मृत्यूनंतर वाकाटकांची मुख्य शाखा समाप्त झाली आणि वत्सगुल्म शाखेने वाकाटकाच्या मुख्य शाखेचे राज्य जिंकून घेतले. नल राजावर मिळविलेल्या विजयानंतर राजधानी पद्मपूर या नगरास महत्व आले. येथे विद्वान ब्राम्हण व संस्कृत कविंचे वास्तव्य राहिले. द्वितीय पृथ्वीसेनाने उत्तरेतहि आपली सत्ता दृढ केली व मेकला देशाच्या उत्तरेच्या चेदि देशापर्यंत आपले साम्राज्य वाढविले. त्याचा मांडलिक व्याघ्रदेव याचे दोन शिलालेख विंध्यप्रदेशात नचना[२५] व गंज[२६] येथे सापडले आहेत. हा व्याघ्रदेव उच्चकल्पवंशी असावा. कारण या राजवंशाचे कित्येक ताम्रपट त्या प्रदेशात सापडले आहेत, त्यामध्ये व्याघ्रनामक राजाचा उल्लेख आहे. या व्याघ्राचा पुत्र जयनाथ हा सुमारे गुप्त संवत १७० ते १९० (इ.स. ४९० ते ५१०) या कालांत राज्य करीत होता. तेव्हा त्याचा पिता व्याघ्र ह्याचा काळ गुप्त संवत १५० ते १७० (इ.स. ४७० ते ४९०) हा येतो. याच काळात द्वितीय पृथ्विषेण राज्य करीत असल्यामुळे हा उच्च कल्पवंशी व्याघ्रव त्या वाकाटक नृपतीचा

मांडलिक असावा, पांडववंशी राजांप्रमाणे उच्चकल्प राजेही प्रथम गुप्त सम्राटाचे मांडलिक होते, पण पुढे ख्रिस्तोत्तर पाचव्या शतकाच्या अखेरीस गुप्तांची सत्ता निर्बल झाल्यावर त्यांनी वाकाटकांचे वर्चस्व मान्य केले असावे. वाकाटक राजे शिवोपासक होते. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय पृथ्वीसेन मात्र यास अपवाद होते. बालाघाट ताम्रपटात पृथ्वीसेनाचे वर्णन पदमभागवत म्हणजेच विष्णूचा उपासक असे केले आहे.[२७] नंदिवर्धन या शाखेत शूर, राज्यशासनकुशल, दानशील आणि साहित्य व शिल्पादि कला याचे उदार आश्रयदाते असे पुरुष उत्पन्न होऊन त्यांनी आपल्या घराण्याची कीर्ती पसरविली. त्यांनी बांधलेली देवालये आता विद्यमान नाहीत, पण रामटेक व पवनार येथे जे अवशेष सापडले आहेत त्यावरुन तत्कालीन शिल्पांची रमणीयता अजमावता येते.त्यांच्या काळी अनेक काव्ये निर्माण होऊन वैदर्भी रीतीला सर्वत्र मान्यता मिळाली. त्यापैकी दोनच काव्ये सध्या अवशिष्ट आहेत. एक कालिदासाचे संस्कृतांतील मेघदूत व दुसरे द्वितीय प्रवरसेनाचे महाराष्ट्री प्राकृतांतील सेतुबंध किंवा रावणवहो. दुसरा पृथ्वीसेन हा नंदिवर्धन या जेष्ठ शाखेचा शेवटचा राजा आहे. त्याच्यानंतर या जेष्ठ शाखेचे राज्य वत्सगुल्म शाखेने ताब्यात घेतले. दुसरा पृथ्वीसेन याने इ.स. ४७० पासून इ.स. ४९० पर्यंत राज्य केले आहे.

वत्सगुल्म शाखा :

विदर्भात जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या वाशिम येथे इ.स. १९३९ मध्ये वाकाटक राजा द्वितीय विंध्यशक्ती याचा एक ताम्रपट मिळाला.[२८] या ताम्रपटावरुन तसेच अजिंठा लेणी क्र. १६ मधील वाकाटककालीन कोरीव लेखावरुन वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहीती प्राप्त झाली. अजिंठा कोरीव लेखात वत्सगुल्म वाकाटक राजवंशाची वंशावळ दिली आहे. पहिल्या प्रवरसेनचा कनिष्ठ पुत्र सर्वसेन हा वत्सगुल्म शाखेचा संस्थापक आहे.

सर्वसेन (इ.स. ३३० ते ३५५) :

पहिल्या प्रवरसेनाच्या चार मुलांत वाकाटक साम्राज्याची विभागणी करण्यात आली होती. प्रवरसेनाचा धाकटा पुत्र सर्वसेन याने या शाखेची स्थापना केली. याचे राज्य विंध्याद्री पर्वतापासून दक्षिणेत गोदावरी नदीपर्यंत पसरले होते. वत्सगुल्म ही (वाशिम जिल्हा) त्याची राजधानी होती. साम्राज्य विस्तारासाठी रवी या सचिवाने सर्वसेन यास फार सहकार्य केले. सर्वसेन स्वत:ला

धर्ममहाराज म्हणवून घेत असे.[२९] तो प्रसिध्द कवी होता. त्याने हरिविजय या नावाचे प्रकृत काव्य रचले. सर्वसेनानंतर त्याचा पुत्र विंध्यसेन राजा झाला. त्याने जवळपास ३७ वर्षे राज्य केले. याने धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती. याने कुंतल देशाचा पराभव केला असावा. याने दिलेल्या दानपत्रावरुन समजते की याचे राज्य नांदेड जिल्ह्यातील काही भूभागावर असावे. सर्वसेनाने आपल्या राजधानीकरिता वत्सगुल्म या प्राचीन पुण्यक्षेत्राची निवड केली हे वत्सगुल्म म्हणजे सध्याचे जिल्ह्याचे ठिकाण वाशीम होय. याच्या सभोवतालच्या प्रदेशाला वात्सगुल्मक असे म्हणत. याचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रात आला आहे. वत्सगुल्माची पवित्र क्षेत्र म्हणून ख्याती होती. वत्सगुल्ममहात्म्यात म्हटले आहे की त्या ठिकाणी वत्स नामक ऋषीने आपल्या आश्रमाजवळ देवांच्या गुल्मांची (म्हणजे समूहाची) वस्ती करिवली होती म्हणून त्याला वत्सगुल्म हे नाव पडले.[३०] कामसूत्राच्या जयमंगला नामक टीकेत या स्थलनामाची दुसरीच व्युत्पत्ति दिली आहे. त्या टीकेत म्हटले आहे की वत्स व गुल्म हे सख्खे भाऊ असून दक्षिणापथाचे राजपुत्र होते. त्यांनी वसविलेल्या देशास वत्सगुल्म हे नाव पडले. वाकाटकांच्या राजवटीत वत्सगुल्म राजधानीची विद्या व संस्कृति याचे प्रमुख केंद्र म्हणून मोठी ख्याती झाली व तेथील उत्कृष्ट प्राकृत काव्यामुळे वच्छोमी रीति सर्वत्र मान्यता पावली. सर्वसेनांच्या राज्याचा प्रदेश उत्तरेस इंध्याद्रि पर्वतराजीपासून दक्षिणेस गोदावरी नदीपर्यंत पसरला होता. या प्रदेशावर आपले स्वामित्व प्रस्थापित करण्यामध्ये याला सोम नामक ब्राह्मणाला क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या रवि या सचिवाचे साहाय्य झाले होते.

या रवीचे वंशज वत्सगुल्मच्या वाकाटकांचे कित्येक पिढ्यांपर्यत मुख्य प्रधान झाले व त्यांची त्यांनी एकनिष्ठपणे सेवा केली. वाशिम ताम्रपटात वाकाटक राजांनी नंदीतटावरील अग्रहाराला एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. नंदीतट व नंदीतरु या स्वरुपाचा नांदेडचा इसवी सनाच्या ४ थ्या शतकातला पहिला उल्लेख म्हणजे वाकाटकाचे राज्य नांदेड पर्यंत होते याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. सर्वसेन याने इ्स. ३३० पासून इ.स. ३५५ पर्यंत राज्य केले.

विंध्यसेन दुसरा (इ.स. ३५५ - इ.स. ४००) :

सर्वसेन याच्यानंतर विंध्यसेन हा वत्सगुल्मचा राजा झाला. वाशिम ताम्रपटात याचा उल्लेख द्वितीय विंध्यशक्ती या नावाने केला आहे.[३१] याने कुंतल देशाचा पराभव केल्याचा उल्लेख

अजिंठा कोरीव लेंख्रात आहे. कुंतल देशात एक राष्ट्रकूट घराणे उदयास आले. त्याचा मूळ पुरुष मानाङ्क याने बहुधा प्रथम प्रवरसेनाच्या दुसऱ्या एका मुलाच्या ताब्यात असलेला गोदावरीच्या दक्षिणचा प्रदेश जिंकला व इतरही विजय संपादन केले. त्याच्या एका वंशजाच्या लेखात मानाङ्काचे समृध्द अशा कुन्तल देशाचा अधिपति आणि विदर्भ व अश्मक देशांचा विजेता असे वर्णन केले आहे. अश्मक देश गोदातीरी असून त्यात अहमदनगर व बीड जिल्ह्याचा अन्तर्भाव होत होता. अश्मकाधिपति वत्सगुल्मच्या वाकाटकांचा मांडलिक होता असे दिसते. मानाङ्.काचे आपल्या नावे मानपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली.[३२] हे मानपूर सातारा जिल्ह्यातील माण नदी काठचे सध्याचे माण गाव असावे. मानाङ्काच्या वंशजाचे काही ताम्रपट मुंबई भागात सापडले आहेत. त्यांच्या अक्षरवाटिकेवरुन मानाङ्क ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकाच्या अख्रेरच्या पादांत राज्य करीत असावा. तेव्हा तो विंध्यसेनाचा समकालीन होता असे दिसते. विंध्यसेन व मानाङ्क हे दोघेही परस्परांचा पराभव केल्याची बढाई मारतात. तेव्हा त्यापैकी कोणालाही पूर्ण विजय प्राप्त झाला नसावा. मानाङ्काचा पुत्र देवराज याच्या कारकीर्दीत हे कुन्तलांतील राष्ट्रकूट घराणे गुप्त सम्राट द्वितीय चन्द्रगुप्ताच्या राजनैतिक वर्चस्वाख्राली आले व त्यांचा कारभार चन्द्रगुप्ताच्या सल्ल्याप्रमाणे होऊ लागला.

विंध्यसेनाने वाशीम ताम्रपट आपल्या कारकीर्दीच्या ३७ व्या वर्षी वत्सगुल्म राजधानीहून दिला होता. त्यातील लेखात नान्दीकट विषयातील (म्हणजे जिल्ह्यातील) एक गाव दान दिल्याचा निर्देश आहे.[३३] हे नान्दीकट म्हणजे हैदराबाद संस्थानातील सध्याचे नांदेड होय. या ताम्रपटांतील लेखाच्या आरंभीचा राजवंशप्रशस्तीपर भाग संस्कृतमध्ये असून नंतरचा दानविषयक भाग प्राकृतमध्ये आहे. यापूर्वीचे शिलालेख व ताम्रपट बहुधा प्राकृतध्येच लिहिले असत. तेव्हा या ताम्रपटावरुन वाकाटकांच्या काळी संस्कृत भाषा राजदरबारी हळू हळू कशी मान्यता पावू लागली, ते स्पष्ट दिसते. आपल्या दोन पूर्वजांप्रमाणे विन्ध्यसेनानेही धर्ममहाराज ही पदवी धारण केली होती.[३४] घटोत्कच लेण्यातील लेखात त्याचा प्रधान प्रवर याचा उल्लेख आहे. म्हणजेच विंध्यसेन यांने मराठवाडयातील बीड, औरंगाबाद, नांदेड, दक्षिण गोदावरी , अजिंठा, घटोत्कच, प्रतिष्ठान त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील नगर, सातारा, नाशिक व पुणे या ठिकांणी - पुणे या ठिकाणी त्याने आपले साम्राज्य

पसरविले होते.[३४]विंध्यसेन हा नन्दिवर्धनाच्या त्याने आपले साम्राज्य पसरविले होते.[३५] विंध्यसेन हा नन्दिवर्धनाच्या प्रथम पृथ्विषेणाचा समकालीन होता. विंध्यसेन याने इ.स. ३५५ पासून इ.स. ४०० पर्यंत राज्य केले.

प्रवरसेन दुसरा (इ.स. ४०० ते इ.स. ४१५) :

विंध्यसेनानंतर त्याचा पुत्र द्वितीय प्रवरसेन हा गादीवर आला. पण त्याने अल्पकाळ राज्य केले ते फक्त १५ वर्ष. याच्या कारकीर्दीविषयी फारशी माहिती नाही. अजिपुत्राच्या कोरीव लेखात म्हटले आहे.[३६] याने सुमारे ४०० ते ४१५ पर्यंत पंधरा वर्षेच राज्य केले असावे ; त्याच्या मृत्यूसमयी त्याचे मुलाचे वय केवळ ८ वर्ष होते.[३७]

त्याचा सचिव श्रीराम हा होता. याचा उल्लेख घटोत्कच लेण्यामध्ये आलेला आहे हे स्पष्ट झाले. त्यांनी आपल्या कारकीर्दीमध्ये अनेक सुधारणा घडवून केलेल्या दिसून येतात.[३८] त्याने अल्पकाळामध्ये वाकाटक साम्राज्य कमावले व त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हा देवसेन गादीवर आला.

देवसेन - इ.स. ४५० ते ४७५ :-

वत्सगुल्मच्या गादीवर द्वित्तीय प्रवरसेन नंतर आलेल्या बालराजाचे नाव अज्ञात आहे. अंजिठा कोरीव लेखात वत्सगुल्म शाखेची वंशावळ दिली आहे.[३९] परंतु प्रवरसेन नंतर सत्तेवर आलेल्या राजाचे नाव अस्पष्ट झाले आहे. त्याने उत्तम रितीने राज्य केल्याचाही उल्लेख अंजिठा लेखात आढळतो. घटोत्कच लेण्यातील लेखात त्याच्या सचिवाचे नाव कीर्ती आढळते.[४०] यानंतर इ.स. ४५० मध्ये त्याचा पुत्र देवसेन सत्तेवर आला. देवसेन याने जवळजवळ २५ वर्ष राज्य केले. देवसेन हा इ.स. ४५० मध्ये गादीवर आला. याच्याविषयीची माहिती अजिंठा लेणी व घटोत्कच लेण्यांमध्ये असलेली दिसून येते. तसेच देवसेनचा इंडिया ऑफिस हा एक ताम्रपट सापडला आहे. डॉ. रॅन्डल याने त्याचा पूर्ण अभ्यास केला व त्याविषयीची माहिती प्रसिध्द केली.[४१]

त्यात देवसेनची संपुर्ण माहिती मिळते तसेच देवसेनने दिलेल्या दानविषयीचीही संपुर्ण माहिती मिळते. उदा . तांड गटकरकाच्या उत्तर मार्गावरील - सुध्दा राज्य केले या विषयीची पुरावा दिलेला आहे. यावरुन स्पष्ट होते की, इतर प्रदेशांबरोबर प्रवरसेनने मराठवाडा या भागावर आपले

वर्चस्व निर्माण केले होते. त्याच्या शासनातील राजसेकव हस्तीभोज नावाच्या अत्यंत दक्ष व विनीत या अधिकाऱ्याचा उल्लेख केल्याचा दिसून येतो. त्याने आपल्या कारकर्दीमध्ये शांतता व सुबत्ता निर्माण केली होती. त्याचे वर्चस्व इतर मांडलिक राजांनी मान्य केले होते. देवसेनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हरिषेण हा गादीवर आला.

६) हरिषेण - इ.स. ४७५ ते ५१० :-

देवसेननंतर त्याचा मुलगा हरिषेण हा इ.स. ४७५ मध्ये गादीवर आला. त्याने जवळ जवळ ६० वर्षेपर्यंत राज्य केले. याची कारकीर्द सर्वात जास्त होती. वाकाटक घराण्यातला हा शेवटचा ज्ञात राजा होता. त्याने आपल्या पराक्रमाने आपले साम्राज्य
चारीही दिशांना पसरविले होते. याची राजधानी वत्सगुल्म ही होती.

तेथून त्याने आपल्या पूर्वजाप्रमाणेच आपल्या साम्राज्याचा विस्तार चारीही दिशांना केला. त्याने जिंकलेल्या साम्राज्याचे व विजयाचे वर्णन मराठवाडयातील अजिंठा लेणीमधील १६ व्या क्रमांकाच्या सापडलेल्या शिलालेखावरुन दिसून येते.[४०] त्याने चारही दिशांना विजय मिळविला व आपल्या साम्राज्याच्या विस्तार केलेला दिसून येते. उत्तरेस आवंती (माळवा), पूर्वेस-कोसल (छत्तीसगढचा प्रदेश), कलिंग (ओरिसाचा भाग), आंध्र प्रदेशाच्या पश्चिमेस लाट (मध्य व दक्षिण गुजरात), त्रैकूट (नाशिक जिल्हा आणि दक्षिणेस कुंतल, (दक्षिण महाराष्ट्र), उत्तरेस आवंती (माळवा) पासून तर दक्षिणेस कुंतल देश, दक्षिण महाराष्ट्र पूर्व आणि पश्चिमेस- अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंतच्या प्रदेशावर हरिषेणने आपली सत्ता प्रस्थापित केली होती. इतर काही प्रदेशांवरसुध्दा त्याने आपले वर्चस्व निर्माण केले. बाकीच्या राज्यांनी हरिषेणचे मांडलिकत्व स्वीकारले.

उदा . पश्चिमेकडील ऋषिक खानदेशचा राजा हा हरिषेणचा मांडिलक होता. याचा उल्लेख मराठवाडयातील अजिंठयाच्या सतराव्या क्रमांकाच्या लेणीत केला आहे. [४४] तसेच महाराष्ट्रातील काही प्रांतांवर हरिषेणेचे वर्चस्व होते. त्यामध्ये कोल्हापूर, मुंबई, नाशिक, खानदेश होते. त्याचप्रमाणे मराठवाडा विभागातील बीड, अजिंठा, नांदेड, घटोत्कचं, गुलवाडा, औरंगाबाद, प्रतिष्ठान व इतर जवळजवळ संपूर्ण मराठवाडावर हरिषेणचे वर्चस्व होते हे स्पष्ट झाले आहे. [४५]

हरिषेणचा सचिव वराहदेव हा होता.[४६] वराहदेव हा बौध्द धर्माचा उपासक होता. वराहदेवाने आपल्या कारकीर्दीत म्हणजेच हरिषेणच्या कारकीर्दीत मराठवाडयातील अजिंठा लेणी क्रमांक १६ कोरविली व त्यात त्याने शिलालेख कोरविला. या शिलालेखात त्याने संपूर्ण वत्सगुल्म वाकाटक शाखेची माहिती दिलेली दिसून येते. यात त्याने हरिषेणच्या साम्राज्याचा उल्लेख केल्याचा दिसून येते. त्याप्रमाणे त्याने अजिंठयापासून १० मैलांवर गुलवाडा टेकडीत घटोत्कच लेणी खोदून त्याने आपल्या वंशाचा संपूर्ण उल्लेख केला आहे.या लेण्यावरुन असे स्पष्ट होते की, संपूर्ण मराठवाडयावर हरिषेणने आपले वर्चस्व निर्माण केले होते. तसेच त्याने आपल्या पराक्रमाने चारही दिशांमध्ये आपले साम्राज्य पसरविले होते. हरिषेणची कारकीर्द इ. ४७५ ते इ.स. ५१० होती.

हरिषेण वाकाटकांचा महत्वाचा राजा ठरला आहे.[४७] अमेरिकन लेखक डॉ. स्पिंक व बेगले यांनी मराठवाडयातील संपूर्ण अजिंठा लेण्यांचा अभ्यास केला व विशेषत: लेणी क्र. १,२,५,१२,१४,१५,१६,१७ यामध्ये संपूर्ण अभ्यास करुन असे स्पष्ट मत मांडले आहे की, या सर्व लेण्या वाकाटककालीन होत्या. या लेण्यांमधील दिलेल्या माहितीवरुन त्यांनी स्पष्ट केले आहे की, हरिषेण या वाकाटक राजाने संपूर्ण मराठवाडयावर आपले वर्चस्व निर्माण केले होते असे दिसून येते.[४८]

हरिषेणनंतर एक -दोन राजे झाले असावेत. पण त्यांची माहिती उपलब्ध होत नाही. इ.स. ५५० च्या सुमारास वाकाटकांचे राज्य नष्ट झाले असावे. वाकाटकांच्या प्रदेशावर नल, कलचुरी, चालुक्य आणि कदंब वंशाने सत्ता प्रस्थापित केली व वाकाटक राजवंश काळाच्या पडद्याआड गेला.[४९] हरिषेणनंतर वाकाटक सत्तेचा अस्त कसा झाला याचा अधिकृत पुरावा किंवा इतिहास उपलब्ध नाही. वाकाटकांच्या अस्तानंतर १००-१२५ वर्षांनी दण्डी यांनी लिहिलेल्या 'दशकुमारचरित' यात ८ व्या उच्छवासांत जी कथा आली आहे त्यावरुन वाकाटकांच्या ह्रासाची प्रक्रिया काही प्रमाणात लक्षात येते.[५०] दण्डीच्या कथेवरुन असे स्पष्ट दिसते की, उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत पसरलेले विशाल साम्राज्य हरिषेणाच्या पुत्राच्या आणि सामंताच्या फितुरीमुळे एकाएकी कोलमडून पडले. अशा प्रकारे ३०० वर्षाची उज्ज्वल राजकीय परंपरा व वैभवशाली असा सांस्कृतिक वारसा असणारे वाकाटकांचे राज्य ५५० च्या सुमारास नामशेष झाले.

गुप्त राजवंश व वाकाटक राजवंश हे समकालीन होते. गुप्त राजवंशाने उत्तर भारतात तर वाकाटक राजवंशाने दक्षिण भारतात राज्य केले.प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासातील या उज्ज्वल कालखंडाविषयी अनेक मान्यवर विद्धानांनी संशोधनपर लेखन केले आहे. वाकाटकांच्या दोन्ही शाखेच्या काळात या राजवंशाचा मराठवाडा विभागाशी अतिशय जवळचा संबंध होता. मराठवाडा विभागातील अंजिठा येथील काही लेणी या राजवंशाच्या काळात निर्माण झाल्यामुळे त्यांचे नाव सर्व जगात सुप्रसिध्द झाले आहे. वाकाटक नृपतींचा कालानुक्रम पुढील प्रमाणे.[५१]

वाकाटक नृपतींचा कालानुक्रम

प्रथम विंध्यशक्ती

(सन २५० ते २७०)

प्रथम प्रवरसेन

(सन २७० ते ३३०)

जेष्ठ शाखा		वत्सगुल्म शाखा
		सर्वसेन
गौतमीपुत्र		(सन ३३० ते ३५५)
प्रथम रुद्रसेन		द्वितीय विंध्यशक्ति
(सन ३३० ते ३५०)		(सन ३५५ ते ४००)
प्रथम पृथ्वीषेण		द्वितीय प्रवरसेन
(सन ३५० ते ४००)		(सन ४०० ते ४१०)
द्वितीय रुद्रसेन		पुत्र
(सन ४०० ते ४०५)		(नाम अज्ञात)
		(सन ४१० ते ४५०)
दिवाकर सेन	दामोदर सेन	देवसेन
(सन ४०५ ते ४२०)	उर्फ	(सन ४५० ते ४७५)
	द्वितीय प्रवरसेन	
	(सन ४२० ते ४५०)	हरिषेण (सन ४७५ ते ५००)
	नरेन्द्रसेन	पुत्र
	(सन ४५० ते ४७०)	(नाम अज्ञात)
		(सन ५०० ते ५१०)
	द्वितीय पृथ्वीषेण	
	(सन ४७० ते ४९०)	

२.४ वाकाटकांचे योगदान :

भारतीय इतिहास आणि संस्कृतीला वाकाटक राजवंशाने फार मोठे योगदान दिले आहे. वाकाटकांचे साम्राज्य विशाल होते. प्रशासनाच्या सोयीसाठी या विशाल साम्राज्याचे विभाजन राज्य आणि राज्याचे विभाजन विषय यामध्ये केले होते.[५२] विषयाचे पुन्हा आर भोग (भुक्ती) हे उपविभाग होते. मार्ग हा विभाग भक्तीपेक्षा मोठा आणि विषयापेक्षा लहान होता. साम्राज्याचा सर्वाधिपती राजा असे. धर्मशास्त्रातील नियामानुसार राजे राज्य करत असत. वाकाटकांच्या लेखामध्ये मंत्रिपरिषदेचा उल्लेख सापडत नाही. वाकाटककालीन राज्यशासनात ब्राह्मण उच्च पदावर असले तरी क्षेत्रीय सुध्दा शासकीय पदांवर नियुक्त केलेले होते. त्यांच्या दानपत्रात क्षत्रीय नावांचा ब्राह्मण नावापेक्षा अधिक उल्लेख आढळतो.[५३] प्रशासन व्यवस्थेमध्ये राजा हा मुख्य घटक होता. राजपद हे अनुवंशिक दिसून येते, वाकाटक राजे आपल्या साम्राज्याची जबाबदारी राजपुत्रावर सोपवत असत.

प्रवरसेन प्रथम याने आपले साम्राज्य चार मुलामध्ये विभागले. ज्यानी पुढे प्रवरसेनच्या मृत्यूनंतर स्वतंत्र राज्य प्रस्थापित केले.[५४] वाकाटकांनी विशाल साम्राज्याची स्थापना केली. या साम्राज्यामध्ये राजाच्या मृत्यूनंतर राजपुत्र अज्ञानी असले तर राज्याचा कारभार महाराणी पहात असे. राजपुत्राला शिक्षण साहित्य, प्रशासन, ज्ञान दिले जात होते. शिक्षणाबरोबरच विशेष करुन सैनिकी प्रशिक्षण दिले जात असावे.[५५] वाकाटकाच्या लेखांत मंत्री परिषदेचा कोठेही उल्लेख नाही.[५६] द्वित्तीय रुद्रसेन याची पत्नी प्रभावती गुप्ता व नरेद्रसेनची पत्नी अज्झित भट्टरिका या दोन राण्यांचा अपवाद वगळता इतर राण्यांनी राज्यकारभारात भाग घेतला असे दिसत नाही. देशाचे राष्ट्र किंवा राज्य या नावांचे मोठे विभाग होते. त्यांचा कारभार पाहण्यासाठी 'चट,''भट,''पुलिस'आणि 'सेना' असे अधिकारी होते.[५७] जमीन महसुल, राज्याचे इतर कर वसुल करणे उघडकीस आलेले भूमिगत द्रव्य जप्त करणे, मिठाच्या इतर खाणी चालविण्याची व्यवस्था - करण्याचा व राज्याचा कामाकरिता वेठबिगार धरण्याचा वरिल अधिकाऱ्यांना हक्क असे. वाकाटक राजे स्वत:ला धर्ममहाराज म्हणून घेत असत. वाकाटकांनी आपल्या मांडलिक राजांना अंतर्गत स्वायत्तता बहाल केली होती. मांडलिक राजांच्या ताम्रपटात वाकाटकांचा उल्लेख सापडत नाही. यावरुन वरील अंदाज करता येतो. वार्षिक

कर देणे आणि आदेश येईल तेव्हा ससैन्य वाकाटकांना मदत करणे ही बंधने मांडलिक राजांवर होती. राष्ट्र किंवा राज्य यावरील प्रमुखास राज्याधिकृत म्हणत असत. सचिवालयाच्या प्रमुखास सर्वाध्यक्ष म्हणत असत आणि सर्वाध्यक्षाच्या सहकाऱ्यास कुलपुत्र या नावाने ओळखले जात असे. राज्यात शांतता आणि सुव्यवस्था ठेवण्याचे काम सैनिक आणि पोलिस यांचे होते. पोलिस अधिकाऱ्यास दंडनायक म्हणत असत तर मुख्य लष्करी अधिकाऱ्यास सेनापती म्हणत असत. गावचा प्रमुख ग्रामकुट किंवा ग्रामणी हा अधिकारी असे.

राज्यांचे मुख्य उत्पन्न जमीन महसूल व प्रत्यक्ष कर यापासून होत असले पाहिजे. त्यांना 'क्लृप्त' व 'उपक्लृप्त' अशा संज्ञा ताम्रपटात लावल्या आहेत. क्लृप्त किंवा निश्चित कर याचा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आला आहे.[५८] ज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे भूमीकर होय. राज्याचा गुप्त धनावरसुध्दा अधिकार असे. किरकोळ करांना पुष्पक्षीरसन्दोह नावाने ओळखले जात असे.[५९] वाकाटकांच्या काळात एका ताम्रपटात 'रजुक' नावाचा उल्लेख आलेला आहे.[६०] 'रजुक' हा शब्द 'रज्जू' दोरी, यापासून बनला आहे. कदाचित हा अधिकारी जमीनीचे मोजमाप करुन त्यावरील सारा ठरविण्याचे काम करीत असावा.गावांत पशूच्या विक्रीने प्राप्त झालेल्या धनावर तसेच इतर रीतीने मिळालेल्या रोख पैशांवर हल्लीच्या प्राप्ती करासारखा हा शेकडा २ टक्के कर दयावा लागत असे. याशिवाय गुप्त धन किंवा निक्षेप उघडकीस आल्यावर त्याच्यावर राजाचा हक्क असे. मिठाच्या खाणीचे उत्पन्न सरकारच्या मालकीचे असे. दारु गाळण्याचा अधिकार राजाकडे असे.[६१] पुष्पक्षीरसन्दोह याशिवाय अनेक किरकोळ कर असत. हे कर ग्रामाधिकारी वसुल करी. सार्वजनीक कामाकरीता लोकांना वेठीने कामास लावण्याचा अधिकार राजाकडे असे. राजाचे अधिकारी व शिपाई दौऱ्यावर असत तेव्हा त्यांच्या घोडयांना व बैलांना वैरण पुरविणे, त्यांच्या आसनाकरीता चामडी देणे, त्यांच्या सैपाकाकरीता जळणाची तजवीज करणे याबद्दल गावकरी लोक जबाबदार असत.

वाकाटकांचे राज्यशासन कार्यक्षम असून त्यायोगे प्रजाजनांस समृध्दी, शांतता व सुव्यवस्था यांचा लाभ झाला होता, असे दिसते. वाकाटकांनी देशाचा राज्यकारभार न्यायाने चालविला व आपल्या गुणांनी, पुण्योपार्जनाने आणि कीर्तीने स्वत:स उज्जवल केले. मी माझ्या

अभ्यासातून या प्रबंधात स्पष्ट करु इच्छितो की, बहुतांश वाकाटक नृपतींचा मराठवाडयाशी संबंध आला होता. उपलब्ध पुराव्यावरुन स्पष्ट करु इच्छितो की, मराठवाडयातील अजिंठा लेणी, त्यातील शिलालेख, त्यात स्पष्ट केलेली वाकाटकांचे राजवंश तसेच त्यांच्या साम्राज्यविस्ताराविषयीची संपूर्ण माहिती मिळते. तसेच वाकाटक राजांनी मराठवाडयातील काही गावे ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख प्रभावती गुप्ता हिच्या पुणे ताम्रपटात मराठवाडयातील प्रतिष्ठान या ठिकाणी ब्राह्मणांना दिलेले आहे. तिने या नगरीला आषाढी एकादशीच्या दिवशी ब्राह्मणांना दिलेले दान हे पुन्हा ताम्रपटात स्पष्ट केले आहे. म्हणजेच तिने मराठवाडा या भागाला भेट दिली होती. मराठवाडा या प्रदेशावर तिने आपले वर्चस्व निर्माण केलेले दिसून येते. तसेच विंध्यशक्ती दुसरा याने मराठवाडयातील गोदावरी किनाऱ्यावरील प्रदेश जिंकला होता. त्याने नांदेडपासून ४० ते ४५ मैलांवर असलेले टाकळी व मोहन टाकळी ही गावे ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख मिळतो.

संदर्भ सूची

१. Epigraphia Indica Vol-XXVI, Delhi, p. १३७.

२. Ibid, Vol-XV, p. ३९.

३. डॉ. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर विश्वविद्यालय नागपूर, १९५७, पृ.२४.

४. कित्ता, पृ.१४-२१.

५. कित्ता, प्रास्ताविक पृ.२.

६. Dhavlikar Madhukar, Ajanta, A Cultural study, Poona, University of Pune, १९७३, p. ११२.

७. Sastri Nilakanta, History of south India, Delhi, Oxford University press, १९७६, p. १०८.

८. डॉ. मिराशी वा. वि., पूर्वोक्त, पृ.३१.

९. कित्ता, पृ.३२.

१०. E.I., Vol-XXVI, Delhi, p. १३७.

११. डॉ. मिराशी वा.वि., पृ.३९.

१२. Indian Antiauary, Vol XXXXI, Delhi, १९१३, p. २१५.

१३. याजदानी गुलाम (संपा.), दख्ख्न का प्राचीन इतिहाय, दिल्ली, दी मॅकमिलन कंपनी ग्राफ इंडिया लि-१९७७, पृ.१६५.

१४. डॉ. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.४४.

१५. व्ही.व्ही. मिराशी, वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ.४१

१६. Indian Antiauary, Vol XXXXI, Delhi, 1913, p. 215.

१७. मोरवंचीकर,रा.श्री. दक्षिण काशी पैठण, पृ. ३०

१८. याजदानी गुलाम (संपा.), दख्ख्न का प्राचीन इतिहाय,१९७७, पृ.१६५.

१९. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.४४.

२०. Epigraphia Indiaca, Vol-IX, p. 267.

२१. Corps Inscriptions Indicaram Vol-III, p. 79.

२२. मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, १९५४, पृ. ५९.

२३. Epigraphia Indica, Vol-XXIX, p. 100.

२४. Yazdami Gulam M. (Edi.), the Early History of the Deccan, Vol - I, 1960, p.6.

२५. Archaeological Survey of India -A report -Vol 221, 1883-84, p. 97.

२६. Epigraphia Indica - Vol - XVII, p. 12.

२७. Epigraphia Indica - Vol - IX, p. 267

२८. Ibid. P- 137

२९. याजदानी गुलाम (संपा.), पूर्वोक्त, पृ. १६६.

३०. मिराशी वा.वि., वा.न. आणि त्यांचा काल ; पूर्वोक्त, पृ. ५५.

३१. E.I., Vol -XXVI, p. 137.

३२. मिराशी वा.वि. पूर्वोक्त, पृ. ५७.

३३. E.I., Vol -XXVI, p. 137.

३४. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ. ५७.

३५. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन, -१९६०, पृ. १८६.

३६. Archaeological survery of western India- Vol -IV, 1883, p. 124 Plate 67.

३७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर, पृ. ५८.

३८. शां.भा.देव, महाराष्ट्र व गोवे शिलालेख, पृ.१३९.

३९. कित्ता.

४०. कित्ता.

४१. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ द डेक्कन, १९६०, पृ. १८७.

४२. रॅन्डल, द न्यू इंडियन ॲटिक्युटी, पृ. २ मध्ये प्रसिध्द केला.

४३. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ (देवसेनाचा इंडिया ऑफिस ताम्रपट), पृ.३३८,३३९.

४४. देव शां. भा. , महाराष्ट्र व गोवे शिलालेख सूची.

४५. इन्स्टिटयूट क्र. ६३, अंपगलेख, पृ. २४,२५, उपरोक्त लेख क्र. ६६, पृ. २६.

४६. Archaelogical survery of westera India, p. 138.

४७. मिराशी वा.वि., बुलेटिन ऑफ द डेक्कन कॉलेज, पृ. ८-४७.

४८. याजदानी गुलाम, द अर्ली हिस्ट्री ऑफ द डेक्कन इंडिया पार्ट १ ते ६, १९६०
पृ. १८८.६१. डॉ. स्पिंक व बेगले, अजिंठा आणि वाकाटक आर्ट, पृ. १८३.

४९. Tripathi R.S. Op. Cit.p.289.

५०. गाठाळ एस.एस. ,भारताचा इतिहास (इ.स. ६५० पर्यंत) पृ. ३२४.

५१. मिराशी वा.वि.,वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, नागपूर, १९५७.पृ. १३.

५२. E.I. Vol. p. 137.

५३. जामखेडकर अ.प्र.,प्राचीन काळ, पृ. ४०.

५४. याजदानी जी.,दक्कन का प्राचीन इतिहास , पृ. १८०.

५५. 'इं० ऐ०'VII, पृ.३७.

५६. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, पृ.६९.

५७. याजदानी जी., दक्कन का प्राचीन इतिहास , पृ. १८१.

५८. अर्थशास्त्र, पृ. ६०

५९.. साखरे विजया, पुर्वोक्त, पृ. १४३.

६०. 'ए० इं०'XXIV, P.56..

६१. मिराशी वा.वि. , वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, पृ. ७८

प्रकरण तिसरे

वाकाटककालीन स्थळे व पुरातत्वीय अवशेष

वाकाटक राजवंशाने विदर्भातील नंदिवर्धन आणि वत्सगुल्म येथून दक्षिण भारतावर ३०० वर्षे राज्य केले. संपूर्ण दक्षिण भारत वाकाटकांच्या ताब्यात नसला तरी दक्षिण भारतातील बहुतेक प्रदेशावर त्यांनी राज्य केले संपूर्ण विदर्भ व मराठवाडा प्रदेशावर त्यांचे राज्य केले होते. तसेच मराठवाड्यावर त्यानी राज्य केले असले तरी मराठवाड्यात सर्वत्र या काळातील पुरातत्वीय अवशेष आढळत नाहीत. मराठवाड्यातील काही भागात वाकाटककालीन पुरातत्वीय अवशेष आढळतात. मराठवाड्यात औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा, वेरुळ आणि पैठण, उस्मानाबाद जिल्ह्यात तेर व उस्मानाबाद, नांदेड जिल्ह्यात कंधार आणि नांदेड तसेच लातूर जिल्ह्यात खरोसा व लातूर येथे या काळातील मंदिरस्थापत्य, गुहास्थापत्य, विहार व स्तूप स्थापत्य व मुर्तिशिल्पांचे अवशेष आढळतात. प्रस्तुत प्रकरणात वाकाटककालीन स्थळे व तेथील पुरातत्वीय अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास केला आहे.

नांदेड :

मराठवाड्यात असलेल्या आठ जिल्ह्यापैकी नांदेड हे एक जिल्ह्याचे मुख्यालय असलेले ठिकाण आहे. औरंगाबाद जिल्ह्यानंतर नांदेड जिल्ह्यातच भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा मोठा वारसा प्राप्त झालेला आहे. नांदेड जिल्ह्यात कंधार, होट्टल, एरगी, येताळा, जुन्नी, अर्धापूर, लहान, करडखेड व नांदेड ही प्राचीन नगरे आहेत.

नांदेड या नगरास प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा महत्वाचा वारसा मिळालेला आहे. हे नगर गोदावरी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेले असून या नगराचे प्राचीनत्व नंद - सातवाहन काळापर्यंत जाते. प्राचीन काळात नांदेड या नगरास पुढील नावांनी ओळखले जात होते.

नंदीतट[1]

नंदीकड[2]

नंदीनगर[3]

नंद्यज़ल[४]

नंदीकट[५]

नांदीतट[६]

नंदीएड[७]

नंदीग्राम[८]

नंदआहार[९]

नवनंदडोरा[१०]

नंदी हे शिवाच्या गणाचे नाव आहे. नांदेड या नगराच्या नावाची व्युत्पत्ती नंदी या नावापासून झाली.

नंदवंश हा प्राचीन राजवंश असून या राजवंशाने उत्तर भारतात राज्य केले. या राज्याची राजधानी मगध होती.या राजवंशाने दक्षिण भारतावरही राज्य केले. पैठण ही त्यांची दक्षिण भारतातील राजधानी होती,[११] तर नंदआहार म्हणजेच नांदेड हे ठिकाण त्यांची उपराजधानी होती.[१२] या काळात नांदेड हे नंदआहार आणि नवनदंडेरा या नावाने प्रसिध्द होते. नवनंदडेरा या नावाचे अपभ्रंश रुप नंदेड-नांदेड असे आहे.[१३] डॉ. मोरवंचीकर रा. श्री यांच्या मते नांदेड ही नंद राजवंशाची दक्षिणेकडील सीमा असावी.[१४] सातवाहन काळात नांदेड हे नगर प्रसिध्द बौध्दपीठ होते. सांचीच्या स्तुपावरील दानलेखात नांदेड म्हणजेच नंदिनगराच्या अनेक बौध्द भिक्खु आणि भिक्खुणींनी दिलेल्या दानाचा उल्लेख आढळतो.[१५] अनेक भिक्खू व भिक्खुणीची नावे या दानलेखात आढळतात. यावरुन नांदेड हे सातवाहन काळात प्रसिध्द बौध्दपीठ असल्याचे स्पष्ट होते. नांदेड हे नगर अमरावतीहून विदिशाकडे जाणाऱ्या राजमार्गावर असलेले प्रमुख नगर होते. डॉ. प्रभाकर देव यांच्या मते नंदगिरी ही सातवाहनांची पहिली राजधानी होती.[१६]

वाकाटक घराण्याच्या दोन शाखा होऊन गेल्या.[१७] नंदिवर्धन येथील शाखा जेष्ठ होती, तर वत्सगुल्म येथील शाखा कनिष्ठ होती.[१८] वत्सगुल्म वाकाटक घराण्याने इ.स. ३३० पासून इ.स. ५१० पर्यंत राज्य केले. या काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते.[१९] कल्याणीचे चालुक्य, राष्ट्रकुट व कदंब राजवटीच्या काळात नांदेड हे प्रसिध्द शैक्षणिक केंद्र आणि विद्वानांचे माहेरघर

होते. या काळातील शिलालेखात एक वैभवशाली नगर म्हणून नांदेडचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कंधार ही राष्ट्रकुटांची राजधानी होती.[२०] कंधारपासून जवळच असलेल्या मानसपुरी येथे इ.स. १९५९ मध्ये राष्ट्रकूट सम्राट कृष्ण तिसरा याच्या काळातील एक शिलालेख मिळाला.[२१] या शिलालेखात प्रसिध्द शिक्षण केंद्र आणि एक वैभवशाली नगर म्हणून नांदेडचा उल्लेख केलेला आढळतो. या शिलालेखात नांदेडचा उल्लेख नांदितट या नावाने केलेला आहे.[२२] नांदेड येथील अग्रहारास कंधार येथून तेल, मीठ व दुधाचा पुरवठा केला जात असे.

वाकाटक काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्य केंद्र होते. याचा उल्लेख वत्सगुल्म शाखेतील वाकाटक राजा विंध्यशक्ती द्वितीय याच्या वाशिम ताम्रपटात आढळतो.[२३] वाकाटक काळात नांदेड येथे विषय विभागाचे मुख्य केंद्र असल्यामुळे या काळात नांदेड व परिसरात बौध्द आणि हिंदू मंदिर स्थापत्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली गेली. परंतु आज त्याचे केवळ पुरातत्वीय अवशेष आपल्याला काही ठिकाणी पहावयास मिळतात. नांदेड भागात मोठा व इतवारा वसाहत आहे. हेच प्राचीन नांदेड होय. गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या इतवारा वसाहतीत वाकाटक काळातील बौध्द विहार व नृसिंह मंदिर स्थापत्याचे भग्नावशेष आढळतात.

नांदेड या ठिकाणी प्राचीन नृसिंहाचे मंदिर गोदावरी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर होते. आज हे मंदिर उद्ध्वस्त झालेले आढळते. या मंदिराचे काही अवशेष होळी भागात नृसिंह गल्लीत पाहावयास मिळतात.[२४] या मंदिरात केवल नृसिंहाची मूर्ती होती. ही मूर्ती आनंदीदास लक्ष्मीकांत देशमुख यांच्या वाड्यात आहे. ही मूर्ती गोदावरी नदीच्या पात्रात मिळाली आहे. केवल नृसिंहाची ही मूर्ती द्विभूज व आसनस्थ असून १२२ सें.मी उंचीची आहे. नृसिंहाने डाव्या पायाची मांडी घातलेली आहे, तर उजवा पाय पंजावर टेकवून मांडी वर उचलेली आहे. या मांडीखाली १५ सें.मी. उंचीची प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंहाचा डावा हात गुडघ्यावर टेकलेला आहे तर उजवा हातही गुडघ्यावर टेकलेला असून त्या हातात चक्र आहे, मनगटात कडे आणि दंडात बाजूबंद आहेत. नृसिंह द्विभुज असून ते ७.५ सें.मी. उंचीच्या आणि १२० सें.मी. लांब व ६० सें.मी. रुंदीच्या आसनावर आसनस्थ झालेले आहेत. आसनावर कमळ कोरले असून त्याखालच्या सिंहासनावर हत्ती कोरलेला आहे. ही मूर्ती वाकाटककालीन आहे.[२५]

वाकाटक राजे हिंदुधर्माचे उपासक होते. परंतु त्याने इतर धर्मालाही राजाश्रय दिला. या काळात वाकाटक राजाने बौध्दधर्माला राजाश्रय दिल्यामुळे बौध्द विहार व मुर्तीशिल्प मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. नांदेड येथे ब्रह्मपुरी भागात बौध्द विहाराचे अवशेष प्राप्त झाले होते.[२६] त्यामध्ये विहारातील दगडी स्तंभ, छताचे अवशेष व शिल्पावेष समाविष्ट होते. हा विहार वाकाटक काळातील विहार असावा. या काळात नांदेड हे दक्षिणेतील प्रसिध्द बौध्द पीठ होते. अनेक बौध्द भिक्खू व भिक्खुनीचे येथे वास्तव्य होते. उस्मानाबाद तालुक्यातील तेर हेही वाकाटक काळात प्रसिध्द बौध्द पीठ होते.[२७] त्याचप्रमाणे नांदेड येथेही बांधलेले विहार आढळून आले.

भोकर :

नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. त्यापैकीच एक भोकर हा तालुका आहे. भोकर हे ठिकाण नांदेड पासून ४० कि.मी. आंतरावर आहे. भोकर हे प्राचीन नगरअसून या ठिकाणी मंदिर, मुर्तीशिल्प आणि प्राचीन नागरी वास्तुचे अवशेष आढळतात. या ठिकाणी कळवातनीचा महाल, शिवमंदिर आणि प्राचीन जलाशयाचे अवशेष प्राप्त झाले आहेत. याठिकाणी वाकाटककालीन विटा मंदिरस्थापत्य व मूर्तीशिल्पाचे अवशेष आढळतात.

भोकर - किनवट रस्त्याच्या डाव्या बाजूस बौध्द मंदिर स्थापत्याचे अवशेष आढळतात. याठिकाणी गौतम बुध्दाची सुंदर प्रतिमा मिळाली.[२८] या प्रतिमेच्या आकारावरुन ती बौध्द मंदिरातील प्रतिमा असल्याचे प्रतिमेसमान आहे. अजिंठा काही लेण्यांचे खोदकाम आणि त्यामधील शिल्पकाम वाकाटक काळात झाले आहे.[२९] त्यावरुन भोकर येथील बुध्द प्रतिमा म्हणजे बौध्द विहार वाकाटक काळातील आहे, हे स्पष्ट होते.

कंधार :

नांदेड जिल्ह्यात असलेल्या एकूण सोळा तालुक्यापैकी एक तालुका म्हणजे कंधार होय. कंधार हे नगर महाराष्ट्रात असलेल्या प्राचीन नगरांपैकी एक असून ते मन्याड नदीच्या उत्तर किनाऱ्यावर अक्षांश १८°, ५२ उत्तर आणि रेखांश ७७°, १४ पूर्व वसले आहे. कंधार हे नगर नांदेडच्या दक्षिणेस ५२ कि.मी. अंतरावर बालाघाट डोंगराच्या उतरणीला वसलेले असून डोंगर उतरणीस येईपर्यंत हे नगर आपल्या दृष्टीस पडत नाही, हे या नगराचे वैशिष्ट्ये आहे.

कंधार नगरास प्राचीन इतिहास व संस्कृतीचा महान वारसा प्राप्त झालेला आहे. प्रागैतिहासिक कालखंडातही याठिकाणी मानवाची वस्ती होती. याचे पुरावे मन्याड नदीच्या खोऱ्यात आढळून आले आहेत. कंधार नगराची स्थापना महाभारत काळात झाल्याचे स्पष्ट होते. या काळात कंधार हे नगर पांचाळपूर,[३०] पांचाळपुरी[३१], पांचाळनगरी[३२] व पांचाळेश्वर[३३] इत्यादी नावाने ओळखले जात होते. महाभारत काळात कंधार परिसरात पांडव राजघाराण्याची सत्ता होती. या राजघराण्यात कन्हार नावाचा एक राजा होऊन गेला.यानेच कंधार नगराची स्थापना केली. त्यामुळे त्याच्याच नावावरुन या नगरास कन्हार असे नाव पडले. कन्हार या नावाचेच पुढे कंधार असे नाव रुढ झाले. हे नाव आजही कायम आहे. कंधारची स्थापना महाभारत काळात झाल्याचे स्पष्ट होत असले तरी त्याला ऐतिहासिक आधार नाही. राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला याने या नगराची स्थापना इ.स. ७५८ मध्ये केली.

पुरातत्वीय दृष्टिकोनातून कंधार नगराला फार महत्व आहे. कंधार व कंधारच्या परिसरात विविध कालखंडातील विभिन्न प्रकारचे पुरातत्वीय अवशेष आजही आपल्याला विखुरलेल्या अवस्थेत पाहावयास मिळतात. कंधारचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन डेक्कन कॉलेज, पुणे आणि महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या सहकार्याने डॉ. एम.के. ढवळीकर व डॉ. शोभना गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली येथे फेब्रुवारी- मार्च १९८२ मध्ये मानसपुरीजवळ उत्खनन करण्यात आले. या उत्खननात इ.स. ९०० मधील क्षेत्रपाल भैरवाच्या मंदिराचा संपूर्ण आराखडा प्राप्त झाला.[३४] पाषाणात घडविलेली क्षेत्रपाल भैरवाची ७२ फूट उंचीची मूर्तीही याच ठिकाणी मिळाली. इ.स. १९८६ मध्ये लालवाडी येथे पुन्हा उत्खनन करण्यात आले.[३५] उत्खननामध्ये घरगुती वापरातील वस्तु, खापरे, मातीची खेळणी, बांगड्यांचे तुकडे व मातीच्या भांड्यांचे अवशेष मिळाले आहेत. कंधार शहर व परिसरात हिंदू, बौध्द आणि जैन मंदिरांचे भग्नावेशष आणि मूर्तिशिल्पही पाहावयास मिळते. मूर्तिशिल्पामध्ये लज्जागौरी व सप्तमातृकांच्या मूर्ती विशेष उल्लेखनीय ठरतात. येथे प्राप्त झालेल्या अनेक बुध्दमूर्ती गांधार व सारनाथ कला परंपरेतील आहेत. सारनाथ येथे ८ विहार व ३ स्तुप आहेत.[३६]

कंधार येथेही ८ बौध्दविहार[३७] आणि ८ बौध्द स्तूप होते.[३८] यावरुन सारनाथप्रमाणेच कंधारही बौध्द धर्मप्रसाराचे व कलास्थापत्याचे प्रसिध्द केंद्र होते हे स्पष्ट होते. सारनाथ येथे धम्मेख्र स्तुपात ये धर्मा हेतु प्रभवा हा बौध्द मंत्र कोरलेला एक शिलापट्ट प्राप्त झाला.[३९] हाच आशय कोरलेला एक मूर्तीलेख्र कंधार येथेही प्राप्त झाला.[४०] यावरुन कंधारचे पुरातत्वीय महत्व स्पष्ट होते. १ मार्च २००७ पासून किल्ल्यातील मातीचा भराव काढण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत आहे. यासाठी केलेल्या खोदकामात खंडोबाची मूर्ती व दैनंदिन वापरातील मातीची भांडी, सुरई, बोळके व मातीची खेळणी मिळाली आहेत.

वाकाटककाळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते आणि या विषय विभागातच कंधार या नगराचा समावेश होता. कंधार या नगराचा इतिहास राष्ट्रकुट काळापासून जात असला तरी राष्ट्रकुट काळापूर्वी सुध्दा कंधार हे नगर आस्तित्वात होते. या ठिकाणी वाकाटककाळातील कला व स्थापत्याचे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळतात. वाकाटककाळात कंधार हे कला व स्थापत्याचे प्रमुख्र केंद्र होते.

याठिकाणी या काळातील बौध्द विहार, बौध्द मुर्तीशिल्प आणि बौध्दस्तुपाचे अवशेष आढळून आले. याठिकाणी कंधार, बाळांतवाडी आणि बुध्दटेकडी येथे वाकाटक काळातील बुध्दविहार व मूर्तीशिल्पाचे अवशेष आढळतात. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा हेही वाकाटक काळातील कलेचे प्रमुख्र केंद्र होते.[४१] कंधार येथील शिल्पकला आणि वास्तुकला अजिंठा कलापरंपरेतील आहे. कंधार शहरात दर्गापुरा भागात वाकाटक काळातील बौध्द विहार होते.[४२] त्यांचे अवशेष येथील मिळाले आहेत. हे बौध्द विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा (इ.स. ३५५-४००) याच्या कारकिर्दीतील असावे. दर्गापुरा भागात सईदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर मकदूम सैया या अवलियांचा दर्गा आहे. हा दर्गा बडी दर्गा म्हणून ओळखला जातो. या दर्गाच्या वास्तुशेजारी एक प्राचीन वास्तू असून ती पाषाणात बांधलेली आहे. या वास्तुची बांधकाम शैली बौध्द कलापरंपरेतील आहे. पुढे सभामंडप आणि पाटीमागे गर्भगृह अशी, या वास्तुची रचना आहे. या गर्भगृहात गौतम बुध्दांची मोठी प्रतिमा असावी. गर्भगृह आणि सभामंडपाला आधार दिलेल्या दगडी स्तंभांवर ज्या प्रतिमा आहेत, त्या प्रतिमा बौध्द परंपरेतील आहेत. अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी

भागाची प्रतिकृती प्रतिमेच्या रुपाने येथील स्तंभावर कोरलेली आढळते. अजिंठा येथील सर्वच लेणी बौदधर्मीय आहेत. यावरुन कंधार येथील ही वास्तू सुध्दा प्राचीन बौध्द विहार होते, असा निष्कर्ष निघतो. या वास्तुमधील स्तंभांवर नागाचीही शिल्पे कोरलेली आढळतात. गौतम बुध्दांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दांची उत्तम प्रतीके समजली गेली. बुध्द व नाग यांचा संबंध जवळचा आहे. गया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुध्द जवळच्या तळ्यातील मूचलिंद नागाकडे गेले. त्यावेळी पाऊस पडू लागला म्हणून मुचलिंदाने आपला फणा त्यांच्या डोक्यावर उभारुन त्यांचे (गौतम बुध्दांचे) पावसापासून रक्षण केले.[४३] त्यामुळे बौध्द वास्तुंमध्ये नागांच्या प्रतिमा आढळतात. त्यावरुन ही वास्तू बौध्द विहार आहे, हे स्पष्ट होते. ही वास्तू पूर्णपणे दगडांनी बांधलेली आहे. पुढे बौध्द धर्माचा प्रभाव कमी झाला पुढे हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. त्याचवेळी या बौध्द विहाराला हिंदू मंदिर बनविले. हेच हिंदू मंदिर म्हणजे कालप्रिय (शिवमंदिर) मंदिर होय. याच मंदिरात हाजी सरवर मकदूम सैया यांचे वास्तव्य होते. येथेच त्यांचा मृत्यू झाला. याच ठिकाणी त्यांचा दर्गा बांधण्यात आला. त्यामुळे बौध्द मंदिर अर्थात विहाराचे अस्तित्व संपुष्टात आला आहे.

कंधार तालुक्यात बाळांतवाडी नावाचे गाव आहे. हे गाव कंधारच्या पश्चिमेस कंधार - घोडज रस्त्यावर असून ते कंधारपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. हे गाव ८०० लोकवस्तीचे अगदी लहान असले तरी या ठिकाणी प्राचीन शिल्पावशेष आढळतात. या गावाच्या उत्तरेस श्री शंकर संभाजी जाधव यांच्या शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. या ठिकाणी आंब्याच्या झ्ाडाखाली देवीची एक प्रतिमा आहे. ही प्रतिमा भवानी देवी म्हणून ओळखली जाते. एक बुध्दाची मस्तक तुटलेली पद्मासनस्थ मूर्ती व हत्तीची मूर्ती भग्न अवस्थेत आहे. येथील भग्नावशेषांचे सर्वेक्षण केले असता या ठिकाणी प्राचीन बौध्द विहार होते, हे स्पष्ट होते. याठिकाणी ५ फूट उंचीचे दोन स्तंभ असून हे दोन्ही स्तंभ आणि दर्गापुरा भागातील विहाराचे स्तंभ यांच्यात साम्य असून या दोन्ही स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९च्या दर्शनी भागाच्या प्रतिमा आढळतात. यावरुन असे दिसते की हा विहार वाकाटक सम्राट विंध्यसेन दुसरा यांच्या कारकिर्दीतील असावे.[४४]

गौतम बुध्दाच्या प्रतिमा निर्माण होण्यापूर्वी बुध्दाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक प्रतीकांचा शोध घेण्यात आला. अशा परिस्थितीत बुध्दाच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू ह्या बुध्दाची उत्तम प्रतीके समजली गेली.[४५]मग या प्रतीकांच्या रुपानेच बुध्दाची उपासना सुरु झाली. बुध्दांच्या अनेक प्रतीकांपैकी हत्ती हा एक उत्तम प्रतीक समजला गेला.[४६] महामायादेवीच्या गर्भात ज्यावेळी तथागताने (बुध्द) प्रवेश केला, त्यावेळी तिला स्वप्नात पांढरा हत्ती दिसला होता. त्यामुळे हा हत्ती बुध्द जन्माचे प्रतीक आहे. याठिकाणी हत्तीच्या चार प्रतिमा पाहावयास मिळाल्या आहेत. याशिवाय येथे बुध्दाची एक खंडित प्रतिमाही आढळली. यावरुन स्पष्ट आहे की, येथे प्राचीन बौध्द विहार होते. बुध्द टेकडीवरील विहारापासून हा विहार केवळ अर्धा फर्लांगावर आहे. येथील भग्नावशेषातील हिंदू धर्मीय मूर्तिशिल्पही आढळले. येथे ६० सें.मी उंचीची व चतुर्भुज असलेली ध्यान मुद्रेतील देवीची प्रतिमा आहे. दोन हात अभय मुद्रेत आहेत तर दोन हात सरळ दोन्ही गुडध्यांवर ठेवलेले आढळतात. या प्रतिमेचे मस्तक खंडीत झाले आहे. या प्रतिमेशिवाय येथे आणखी एक स्त्री प्रतिमा आहे या प्रतिमेचीही उंची ६० सें.मी. आहे. याचठिकाणी एका मोठ्या शिळेवर त्रिशूल कोरलेले आहे. आज जरी हे हिंदूधर्मीय मंदिर वाटत असले तरी हे मंदिर मूळ बौध्द विहार होते.[४७] हिंदू धर्माचा प्रभाव वाढल्यानंतर व बौध्द धर्माचा प्रभाव नाहीसा झाल्यावर या बौध्द विहाराचे रुपांतर हिंदू मंदिरात करण्यात आले. इतर बौध्द विहारांच्या ठिकाणी जी बौध्दशिल्पे पाहावयास मिळतात. त्याच प्रमाणे बौध्दशिल्पे येथेही पाहावयास मिळतात. हीच बौध्दशिल्पे येथे बौध्द विहार असल्याचा प्रत्यक्ष पुरातत्वीय पुरावा आहे.

कंधार शहराच्या दक्षिणेस एक माळटेकडी आहे. ही टेकडी कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस असून ती कंधारपासून २ कि.मी. अंतरावर आहे. ही टेकडी बुध्द टेकडी या नावाने ओळखली जाते. आज मात्र या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे. भुताची हा बुध्दाची या शब्दाचा अपभ्रंश आहे. येथे बौध्द विहार होते. या विहारातील बुध्दमूर्ती १२२ सें.मी. उंचीची होती. हे बौध्द विहार पूर्वाभिमुख असून त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६२ फूट आणि दक्षिण - उत्तर रुंदी ५१ फूट होती. आज याठिकाणी बौध्द विहाराचे केवळ पुरातत्वीय अवशेष आढळतात. या ठिकाणी एक मुस्लीम तुरबत आहे. या तरबतचे कच्चे बांधकाम केलेले आहे. या बांधकामासाठी बौध्द विहाराच्या

बांधकामासाठी उपयोगात आणलेल्या दगडी शिळांचा वापर केलेला आहे. येथे बरेच बौध्द शिल्पावशेष आढळतात. परंतु ते सर्व खंडीत स्वरुपात आहेत. येथील विहाराच्या छताला आधार दिलेल्या दगडी खांबाचा खंडीत भाग येथे पाहावयास मिळतो. खांबाचा एक शीर्षभागही येथे पाहावयास मिळतो. २X२ फूटाच्या एका चौरसाकृती दगडावर कोरलेले कमळाचे फूल अत्यंत सुंदर आहे. हे शिल्प एखाद्या स्तंभाचा शीर्षभाग असावा. गौतम बुध्दाची पद्मासन अवस्थेतील तीन शिल्पे येथे आहेत, पण या शिल्पांना चुना लावल्यामुळे त्यांचे मूळ ऐतिहासिकत्व संपले आहे. या ठिकाणी एका २X२ फूटांच्या चौरसाकृती दगडावर चारही बाजूने अजिंठा येथील लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. अशी शिल्पे कंधारमध्ये सर्वत्र आढळतात. एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीसमान असलेल्या शिल्पांवर वरच्या बाजूस मध्यभागी एक वृक्ष आहे. हा बोधिवृक्ष आहे. बोधिवृक्ष हे बुध्दाच्या ज्ञ ानप्राप्तीचे प्रतीक आहे.[४८] यामुळे बौध्द कलापरंपरेत बोधिवृक्ष दाखविण्यात येतो. हा विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय (इ.स. ३५५-४००) यांच्या काळातील असावा.[४९] कारण अजिंठा कला परंपरेतील बौध्दशिल्प येथे आढळून आली आहेत.

कंधारच्या परिसरात बौध्द विहार स्थापत्याप्रमाणेच स्तूप स्थापत्याची निर्मिती वाकाटक काळात झाली. या स्तूप स्थापत्याचे अवशेष याठिकाणी आढळुन आले. डॉ. अनिल कठारे यांनी या स्तूप स्थापत्याच्या अवशेषांचा प्रथम अभ्यास करुन त्यावर प्रकाश टाकला आहे.[५०]

चैत्यगृह, विहार आणि स्तूप हे बौध्द वास्तुकलेचे तीन प्रकार पडतात. प्राचीन भारतीय कला व वास्तुकलेत हे तिनही वास्तुप्रकार प्रचलित झाले. महाराष्ट्रात भाजे, कार्ले, अजिंठा, कोंडाणे, जुन्नर, पितळखोरा, धाराशिव, नाशिक, वेरुळ इत्यादी ठिकाणी डोंगर पोखरुन अर्थात खोदून चैत्यगृह, विहार व स्तूप या वास्तुंची निर्मिती केली गेली. चैत्यगृह, विहार व स्तूप जसे डोंगर खोदून तयार करण्यात आले त्याचप्रमाणे विटा, दगड व मातीने बांधूनही चैत्यगृह, विहार व स्तूप निर्माण करण्यात आले. हिनयान काळात बुध्दपूजा प्रचलित नव्हती, तर बुध्दाच्या काळात अनेक प्रतीकांची पूजा प्रचलित होती. तर अनेक प्रतीकांपैकी एक म्हणजे स्तूप होय.[५१] स्तूप हे बुध्दाच्या निर्वाणाच प्रतीक समजले जात असे.[५२] प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी स्तूप हा शब्द वापरला जातो.

अवशेषांवर बांधलेले स्मारक म्हणजे स्तूप होय.[५३] स्तूप हा बौध्द धर्माशी संबंधित असलेला एक वास्तुप्रकार आहे. स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय. या समाधीमध्ये त्या महापुरुषाचे शरीरावशेष (अस्थी) व त्याने वापरलेल्या वस्तुंचे अवशेष ठेवण्यात येत असत. थोडक्यात, एखाद्या महापुरुषाच्या दफनानंतर त्याच्या अवशेषांवर त्याच्या स्मरणार्थ तयार केलेल्या वास्तुला अर्थात स्मारकाला स्तूप अशी संज्ञा प्राप्त झाली. एखाद्या महापुरुषाची स्मारकरुप समाधी म्हणजे स्तूप अशीही स्तुपाची व्याख्या करता येते. स्तूप हा संस्कृत शब्द आहे. जोडणे किंवा एक करणे आणि प्रशंसा करणे किंवा स्तवन करणे असे स्तुपाचे दोन अर्थ आहेत.[५४] त्यावरुन लोकांची श्रध्दा असणारे स्मारक उभारणे असा स्तुपाचा अर्थ काढता येतो. शारिरीक, पारिभोगिक व उद्देशिक असे स्तूपाचें तीन प्रकार कल्पिले गेले. मौर्य सम्राट अशोकाने बौध्द स्तूप निर्मितीस प्रारंभ केला. ही परंपरा पुढेही चालू राहिली. वाकाटक काळात कंधार परिसरात बुध्द टेकडी व बाळांतवाडी येथे बौध्द स्तूपाची निर्मिती करण्यात आली होती. त्याचे अवशेष येथे मिळाले आहेत.

कंधारच्या दक्षिणेस कंधार - घोडज रस्त्यावर कंधारपासून २ कि.मी. अंतरावर उजव्या बाजूस एक माळटेकडी आहे. ही माळटेकडी चारजमुनी माळालगत आहे. ही माळटेकडी बुध्दटेकडी या नावाने ओळखली जाते. या माळटेकडीच्या उतरणीस बौध्द विहार[५५] आणि पूर्वेस बौध्द स्तुपाचे अवशेष मिळाले.[५६] आज याठिकाणी केवळ बौध्द शिल्पावेशष पाहावयास मिळतात. येथील शिल्पावशेष आणि परिसराचे अवलोकन केले असता असे दिसते की, टेकडीच्या वरच्या बाजूस विहार आणि खालच्या बाजूस स्तूप होता. हा स्तूप मानसपुरी येथील स्तुपाच्या तुलनेत आकाराने थोडा मोठा असावा. या स्तुपाचे बहुतेक बांधकाम दगड व मातीने केलेले असावे. केवळ अर्धगोलाकार अंड हा भाग विटांनी बांधलेला असावा. या स्तुपाला एकच प्रवेशद्वार असावे. या प्रवेशद्वाराचा अर्थात तोरणाचा दगडी भग्नावस्थेतील स्तंभ येथे आढळून आला. येथे एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीत मध्यभागी बोधिवृक्ष दाखविला आहे.[५७] येथे मिळालेल्या स्तुपांच्या अवशेषात अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. यावरुन अजिंठा चैत्यगृह आणि या स्तुपाचा कालखंड

एकच असावा. हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय इ.स. (३५५-४००) यांच्या काळातील असावा. या काळातील भरपूर शिल्पावशेष येथे आढळतात.

कंधार तालुक्यात कंधारच्या पश्चिमेस कंधारपासून साधारणपणे ५ कि.मी. अंतरावर कंधार-घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस काही अंतरावर बाळांतवाडी नावाचे एक खेडेगाव आहे. या गावाच्या उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावेशष आढळतात. हे भग्नावशेष आणि शिल्पावशेष हिंदू व बौध्द धर्माशी संबंधित आहेत. याचठिकाणी एक बौध्द विहार होते. या विहाराच्या जवळच बौध्द स्तुपाचे भग्नावशेष आढळतात. याठिकाणी बौध्दस्तुपाच्या त्रिदली तोरणाचे अवशेष आढळून आले. याठिकाणी ५ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकराचे २ स्तंभ आणि ७ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे ४ स्तंभ प्राप्त झाले आहेत. या स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार चैत्यकमानी आहेत. पदविन्यास पाहता या स्तुपाचा व्यास ३० फूट असावा. अंड, वेदिका, हर्मिका, छत्रावली व प्रदक्षिणापथ हे सर्व स्तुपाचे घटक येथे अवशेषरुपाने आढळतात.[५८] याच ठिकाणी हत्तीची ४ शिल्पे व बुध्दाची खंडीत मूर्ती प्राप्त झाली आहे.[५९] प्राप्त शिल्प शैलीवरुन हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा याच्या काळातील असावा.

बहाद्दरपुरा :

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात बहाद्दरपुरा नावाचे ऐतिहासिक खेडेगाव आहे हे गाव कंधार - मुखेड रस्त्यावर असून कंधार पासून २ कि.मी. अंतरावर आहे. बहाद्दरपुरा या गावचे प्राचीन नाव भद्रपूर आहे.[६०] मौर्य काळात जैन पंडित भद्रबाहू व मौर्य सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांनी श्रवणबेळगोळ येथे जाताना बहाद्दरपुरा येथे वास्तव्य केले होते. त्यामुळे या गावास भद्रपूर हे नाव मिळाले. मोगलकाळात किल्लेदार बहादूरखान यांनी बहाद्दरपुरा वसाहतीचा विकास केला. त्यामुळे त्याच्याच नावावरुन भद्रपूरचे नाव बहाद्दरपूरा असे पडले.[६१] याठिकाणी वाकाटककालीन मूर्तिशिल्प आणि मंदिरे स्थापत्याचे अवशेष येथे आढळतात. बहाद्दरपुरा येथे राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय आहे. येथे वाकाटककालीन अजिंठा कला परंपरेतील विहार स्थापत्याचे अवशेष आढळतात. वाकाटक काळात गौतम बुध्दाच्या मूर्ती प्रमाणेच बोधिसत्वाच्याही मूर्ती बनविल्या गेल्या. बोधिसत्व

म्हणजे बोधी प्राप्त करण्याची इच्छा करणारा व्यक्ती. बुध्दत्व प्राप्त करण्याच्या प्रयत्नात बुध्दत्वाकडे अग्रेसर होत असताना गौतम बुध्दाने अनेक जन्म धारण केले. बोधिसत्व हा मनुष्यापेक्षा सर्वोच्च मानला जातो ; परंतु ते बुध्दत्वापर्यंत पोहोचू शकले नाहीत. ते बुध्दत्व प्राप्तीकडे अग्रेसर राहिले आहेत. मूर्तिकलेत बोधिसत्वाचे अंकन पूर्णपणे राजकुमाराप्रमाणे केलेले नाही ; परंतु ते मुकूट मंडीत व आभूषणाने अलंकृत दाखविलेले आहेत. बेधिसत्वाची जी कल्पना केली आहे. त्यामध्ये त्यांचा संबंध अमिताभ, अक्षोम्य, रत्नसंभव, अमोघसिध्द व वैरोचन या पाच ध्यानी बुध्दांशी जोडलेला आहे. प्रत्येक बोधिसत्व मूर्तिकेलेत आपल्या ध्यानी बुध्दावरुन ओळखला जातो. बोधिसत्वाच्या मुकूटावर ध्यानी बुध्दाचे अंकन केलेले असते. हे ध्यानी बुध्द मूर्तिकलेत अवलोकितेश्वर, सिध्दैयकवीर, मुंजूश्री, मैत्रय व संबर हे पाच बोधिसत्वाचे रुप आहे. बोधिसत्वाच्या मुद्रा भूमीस्पर्श, वरद, अभय व धम्मचक्र प्रवर्तन अशा स्वरुपात आढळतात. वाकाटक कालीन मूर्तिकलेत अवलोकीतेश्वर, मंजूश्री व मैत्रय या बोधिसत्वाच्या मूर्ती पाहावयास मिळतात. या बोधिसत्वाची अनेक रुपे आहेत. त्यापैकीच एक बोधिसत्व पद्मपाणी अवलोकीतेश्वर होय.

बहाद्दरपुरा येथील गणेश मंदिर वाकाटककालीन बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची सुंदर प्रतिमा आहे. १८० सें.मी. उंचीच्या ६० सें.मी. रुंदीच्या आणि ६० सें.मी. जाडी असलेल्या मोठ्या शिलेवर बोधिसत्व पद्मपाणिचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प स्थानक स्थितीत असून त्याची उंची १५० सें.मी आहे. पद्मपाणिच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात मण्याची माळ, दंडात बाजूबंद, कमरेवर मेखला व हातात कंगण आहे. उजवा हात अभयमुद्रेत असून त्याच हातात कमळाचे फुल (पद्म) आहे. डावा हात वरमुद्रेत आहे. मुकूटावर ध्यानी बुध्द अमिताभचे अंकन केले आहे. तर उजव्या बाजूस अमोघसिध्दीची १२० सें.मी. उंचीची स्थानक प्रतिमा आहे. पद्मपाणिच्या मुकुटाच्या वरील बाजूस धर्मचक्र प्रवर्तन मुद्रा आहे. पद्मपाणीची उभे राहण्याची विशिष्ट शैली चांगलीच नजरेत भरते.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मानसपुरी येथे बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची एक खंडीत मूर्ती मिळाली. ही मूर्ती तेथील मारुती मंदिराजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या बुडाला ठेवण्यात आली होती. या मूर्तीच्या कमरेच्या वरचा भाग मिळाला. या

मूर्तीचे मस्तकही खंडीत झालेले आहे. बोधिसत्वाच्या हातात पद्म आहे. या मूर्तीचा खालचा भाग येथेच भीमनगर वसाहतीत मरीआईच्या ओट्यावर आढळून आला आहे. प्राप्त अवशेषावरुन या मूर्तीची उंची १०५ सें.मी. आणि जाडी ३० सें.मी. असावी.

अजिंठा :

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात अजिंठा हे गाव आहे. अजिंठ्याच्या डोंगरात हीनयान आणि महायान पंथीय बौध्द धर्माच्या एकूण तीस लेण्या आहेत. औरंगापादपासून अजिंठा ११० कि.मी. तर जळगावपासून ६० कि.मी. अंतरावर आहे. अजिंठा लेणी जगप्रसिध्द आहेत. इंध्याद्री किंवा अजिंठ्याचे डोंगर या नावाने ओळखली जाणारी मराठवाड्याच्या उत्तर सरहद्दीवरील सह्याद्रीची जी रांग आहे, तिच्या अजिंठा लेणीच्या परिसरातील शाखेला मंदार हे नाव होते. या नावाचा उल्लेख अजिंठा लेणी क्रमांक १६ मध्ये असलेल्या वाकाटककालीन शिलालेखात आहे. थोडक्यात अजिंठ्याच्या डोंगराचे प्राचीन नाव मंदार होते. अजिंठा या गावाचे प्राचीन नाव अचिंत असे होते. बौध्द साहित्यात अचिंत विहार असा उल्लेख आढळतो. तेथील लेणी क्रमांक १७ मधील शिलालेखात तेथील चैत्य अचित या नावाच्या मंत्र्याने कोरल्याचा उल्लेख आहे. या नावावरुन अचिंत विहार हे नाव रुढ झाले असावे. इ.सनाच्या सातव्या शतकात अचिंत विहार हे दक्षिण भारतातील एक मुख्य बौध्दपीठ गणले जात होते. बुध्दभद्र, अचिंत्य, स्थविर अचल, धर्मदत्त व भद्रबंधू हे बौध्द पंडित या ठिकाणी राहत होते. बुध्दभद्र हे एका बौध्द आम्नायाचे संस्थापक होते, तर स्थविर अचलचा उल्लेख ह्यूएनत्संगाच्या प्रवासवर्णनात करण्यात आला आहे.

अजिंठा लेणींचा शोध इ.स. १८१९ साली लागला. मद्रास सेनेतील ब्रिटिश सैनिक शिकार करण्यासाठी अजिंठा परिसरातील अरण्यात आले, तेव्हा त्यांना तेथील लेणी दृष्टीस पडल्या. या लेणी पाहण्याचा जो केंद्रबिंदू आहे, त्यास व्ह्यू पॉईंट म्हणतात. येथून सर्व लेणी सहजपणे दिसतात. अजिंठ्याच्या ज्या डोंगरात या लेणी कोरल्या आहेत तो डोंगर घोड्याच्या नालेच्या आकाराचा असून तो दोनशे पन्नास फूट उंचीचा अर्धवर्तुळाकार डोंगर आहे. येथूनच वघोरा नदी वाहते. सर जेम्स अलेक्झांडर यांनी जंगलात प्रवेश करुन या लेणी प्रसिध्दीस आणल्या.[६२] १९५१ मध्ये अजिंठा व

वेरुळ लेणींना राष्ट्रीय स्मारक म्हणून भारत सरकारने घोषित केले. यानंतर दोन वर्षानी या लेणी भारतीय पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आल्या.

वाकाटक राजांनी बौध्द धर्मास आश्रय दिला. अजिंठा याठिकाणी ३० बौध्द लेणी खोदविल्या गेल्या. त्यापैकी लेणी क्रमांक एक, दोन, सोळा, सतरा व एकोणिसचे खोदकाम वाकाटक काळात झाले. अजिंठा लेणी क्रमांक १६ च्या खोदकामासाठी वाकाटक सम्राट हरिसेन यांचा सचिव हस्तिभोज यांचा पुत्र वराहदेव यांनी अर्थसहाय्य केले.याच लेणीतील शिलालेखात त्याचा आणि वत्सगुल्म शाखेचा उल्लेख आढळतो. अजिंठा लेणी क्रमांक सोळा आणि सतरामध्ये लेणीच्या भिंतीवर व छतावर वाकाटक काळात चित्रकाम केले गेले. येथील चित्रशिल्प जगप्रसिध्द आहे. आज याठिकाणी असलेली चित्रकला नष्ट होत चालली असून त्याचे केवळ आज अवशेष बाकी राहिलेले आहेत. येथील लेणीत व लेणीच्या दर्शनी भागावर बौध्द धर्माशी संबंधित शिल्पकाम करण्यात आले आहे. यामध्ये बुध्दमूर्तीचाही समावेश होतो. लेणी क्रमांक एकच्या दर्शनी भागावर गौतम बुध्दाच्या गृहत्यागाचा आणि ज्ञानप्राप्तीचा प्रसंग शिल्पबध्द केला आहे. येथील चित्रकला आणि शिल्पकलेच्या अवशेषांवरुन वाकाटककालीन पोषाख, अलंकार, केसरचना, स्त्री - पुरुषांची शरीररचना, इत्यादीविषयक माहिती मिळते.

वेरुळ :

औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यात वेरुळ हे एक गाव आहे. औरंगाबाद पासून हे ठिकाण २८ कि.मी. अंतरावर आहे. येथील डोंगरात खोदलेल्या लेणी जगात प्रसिध्द आहेत. येथील लेणी चरनाद्री पहाडच्या खोऱ्यात कोरलेल्या असून त्या उत्तर - दक्षिण दिशेत दोन कि.मी. अंतरावर पसरलेल्या आहेत. अजिंठा लेणीच्या खोदकामानंतर वेरुळच्या लेणीचे खोदकाम झाले. या लेण्यांच्या खोदकामाचा काळ इ.स. सहावे शतक ते नववे शतक असा आहे. चरनाद्री पहाडाला इंध्याद्री पर्वताच्या टेकड्या या नावानेही ओळखले जाते. इंध्याद्री टेकड्या या सह्याद्री पर्वताच्या रांगांशी संबंधित आहेत. वेरुळचे प्राचीन नाव एलापूर असून या नावाचा पहिला उल्लेख राष्ट्रकूट राजा कर्क दुसरा याने दान दिलेल्या बडोदा ताम्रपटात आढळतो.[६३] वेरुळालाच एलोरा असेही नाव आहे. डॉ. फ्लिट यांच्या मते वेरुळ हे नाव वेलुरा (Vellura) या शब्दापासून पुढे बनले आहे.

अरब भूगोलशास्त्र अल - मास उदी (Al-mas-udei) याने इ.सनाच्या दहाव्या शतकात वेरुळ येथे लेणी असल्याचा सर्वप्रथम उल्लेख केला. महमूद कसित फरिस्ता या मुस्लिम इतिहासकारानेही वेरुळ लेणीची माहिती दिली.[६४]

वेरुळ हे वाकाटककालीन कला आणि स्थापत्याचे केंद्र होते. याठिकाणी हिंदू, जैन आणि बौध्द लेणी आहेत. येथील लेण्यांची संख्या साठ ते ६५ आहे. परंतु केवळ ३४ लेणींनाच क्रमांक दिलेले आहेत. या ३४ लेणीपैकी १२ लेणी बौध्द, १७ लेणी हिंदू आणि ५ लेणी जैन लेणी आहेत. वेरुळ येथील सर्व लेणींमध्ये वाकाटक काळात खोदण्यात आलेल्या याच पाच लेणी प्राचीन आहेत. ह्यापैकी काही लेणी चांगल्या स्थितीत आढळतात. तर काही लेणी अवशेष रुपाने पाहावयास मिळतात.

उस्मानाबाद :

मराठवाड्यात असलेल्या आठ जिल्ह्यापैकी उस्मानाबाद हा एक जिल्हा आहे. उस्मानाबाद हे नगर प्राचीन असून त्यास प्राचीन इतिहास संस्कृतीचा वारसा प्राप्त झालेला आहे. उस्मानाबादच्या परिसरावर सातवाहन, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट कल्याणीचे चालुक्य आणि देवगिरीच्या यादव घराण्याने राज्य केले. याठिकाणी वाकाटककालीन लेणी स्थापत्य आढळते. यापैकी काही लेणी चांगल्या स्थिती आढळतात तर काही लेणी अवशेषरुपाने पाहावयास मिळतात.

उस्मानाबादचे प्राचीन नाव नागसेननगर होते. पुढे नागसेननगर हे नाव मागे पडून धाराशिव असे नाव पडले. इ.पू. काळात राजा करकंड याने धाराशिव (धारापूर) नगराची स्थापना केली.[६५] करकंड हा अंग देशातील चंपापुरीचा राजा होता. त्याने दक्षिणेत चेर, चोल व पांड्य या राजवटीविरुध्द मोहीम काढली होती. इ.स. १९०४ पर्यंत जिल्ह्याचे मुख्य केंद्र नळदुर्ग होते. शेवटचा निजाम मीर उस्मान अली खान यांच्या काळात ते धाराशिव येथे हलविण्यात आले. मीर उस्मान अलीच्या नावावरुन धाराशिव या नगरास उस्मानाबाद असे नाव देण्यात आले.

मराठवाड्यातील सर्वात प्राचीन लेणी उस्मानाबाद पासून तीन मैलावर असलेल्या हातलादेवीच्या डोंगरात आहेत. या लेणी शैव असून त्यांना चांभार लेणी म्हणतात. तसेच

उस्मानाबादच्या ईशानयेला सुमारे बारा मैल अंतरावर खानापूर गावाजवळील डोंगरात सात जैन लेणी आहेत. या लेणी दाबर लेणी किंवा थोरल्या लेणी म्हणून ओळखल्या जातात. उत्तराभिमुखी चार व ईशान्याभिमुखी तीन अशा एकूण सात लेणी आहेत. त्यापैकी लेणी क्रमांक दोन आणि तीन या बौध्द लेणी असून त्या वाकाटक काळातील आहेत. कला व स्थापत्य क्षेत्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून धाराशीव लेणी ओळखली जाते.

विविध अलंकार बनविण्याचे कारखाने व नाण्याची टाकसाळ अस्तित्वात होती.
या नगरीचे उल्लेख बौध्द, जैन व हिन्दु आणि या तिन्ही धर्माच्या वाङ्मयात आलेले आहेत. टॉलेमी आणि पेरिपल्स या ग्रीक साधनांतही या नगराचे वर्णन आलेले आहे. यावरुन सातवाहन काळातील या शहराच्या समृध्दीची कल्पना येते. पैठणचा उल्लेख असलेले सर्वात प्राचीन शिलालेख पितळखोरा, अजिंठा आणि सांची या ठिकाणी आढळतात. वाकाटकांच्या ताम्रपटात पैठणचा सुप्रतिष्ठितपुर असा उल्लेख करण्यात आलेला असून ते आहार विभागाचे मुख्य ठिकाण असल्याची नोंद करण्यात आली आहे. ह्युएनत्संगच्या वर्णनावरुन बदामीच्या चालूक्यांच्या राजवटीत या नगरास उत्तरेकडील उपराजधानीचा दर्जा प्राप्त होतो असे दिसते. उदय सुंदरी कथा आणि कथासरित्सागर या ग्रंथातील वर्णनावरुन सातवाहनोत्तर काळातही या शहराचे वैभव कायम असल्याचे प्रत्यंतर येते. राष्ट्रकुटांच्या ताम्रपटातील या नगराच्या वर्णनावरुन ते तीर्थक्षेत्र व विद्येचे केंद्र तसेच भूत्विविभागाचे मुख्य ठिकाण होते. यादवांच्या काळी पैठण म्हणजे दक्षिणेतील काशी समजली जात होती.

विविध प्रकारच्या साधनात पैठण येथील भव्य राजप्रासाद, गोदावरीच्या काठावरील रमणीय असे देवीकृत उद्यान, बाजारपेठा व उपनगराचे वर्णन, आढळते. उत्खननातील पुरावे त्यास दुजोरा देतात. यावरुन पैठण हे प्राचीन काळातील एक अतिशय वैभवशाली नगर असल्याची प्रचीती येते. स्थानपोथी मध्ये पैठण येथील ६५ ते ७० मंदिराची नावे देण्यात आलेली आहेत. जैनमुनी भद्रवाहू व कालकाचार्य, बृहत्कथाकार गुणाढ्य, ज्योतिष शास्त्रज्ञ वराहमिहिर आणि अनेक मराठी संत कवीचे वास्तव्य इथे होते. कैलासचा कलावंत कोकस हा देखील पैठणचाच अशाप्रकारे विविध काळात विविध क्षेत्रातील महान व्यक्ती इथे नांदल्या. वाकाटकांच्या ताम्रपटात पैठणचा उल्लेख

सुप्रतिष्ठितपूर या नावाने केला आहे.[६७] या काळात पैठण हे वैभवशाली नगर प्रसिध्द बाजारपेठ आणि व्यापारी केंद्र होते. त्यामुळे सर्वच क्षेत्रात पैठणचा विकास झाला. या काळात पैठण व परिसरात मोठ्या प्रमाणात हिंदू मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्प निर्माण करण्यात आले. आज त्याचे केवळ अवशेष काही प्रमाणात आढळतात. यामध्ये विष्णु, शिव आणि नृसिंह मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाच्या अवशेषांचा समावेश होतो.

हिमायतनगर :

नांदेड जिल्ह्यात हिमायतनगर नावाचा एक तालुका आहे. हे नगर नांदेड - किनवट मुख्य रस्त्यावर असून नांदेड पासून ७५ कि.मी. अंतरावर आहे. हिमायतनगर (वाढोणा) प्राचीन इतिहास व संस्कृतीचा मोठा वारसा मिळालेला आहे ; परंतु या नगराची स्थापना नेमकी कोणत्या कालखंडात झाली. या बाबत पुरातत्वीय किंवा वाङ्मयीन लिखित स्वरुपाचा पुरावा उपलब्ध नाही, परंतु येथे प्राप्त झालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन आपणास या नगराच्या स्थापनेचा कालखंड निश्चित करता येतो. हिमायतनगर (वाढोणा) व परिसरात प्रचलित असलेल्या लोकपरंपरा, दंतकथा, आणि आख्यायीका नुसार या नगराचे अस्तित्व रामायण, महाभारत कालखंडापर्यंत पोहोचते. आख्यायीका, दंतकथा व लोकपरंपरा यांना ऐतिहासिक साधन मानता येणार नाही, परंतु त्यांच्यातील सत्यही नाकारता येत नाही. कारण लिखीत इतिहास म्हणजेच संपूर्ण इतिहास असेही म्हणता येणार नाही. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच लोकपरंपरा, अख्यायीका व दंतकथा यांना मौखिक साधन म्हणून त्यामधील केवळ सत्यता स्विकारली ; तर अज्ञात इतिहास आणि घटना इतिहासात येऊ शकतात आणि हिमायतनगर (वाढोणा) या नगराचा एक नवा इतिहास प्रकाशात येऊ शकतो. हिमायतनगर (वाढोणा) या ठिकाणी पांढऱ्यामातीची शेते, पाण्यावर तरंगणाऱ्या विटा मोठ्या प्रमाणात आणि काळी व गुलाबी रंगाची फिकट खापरे काही प्रमाणात मिळतात. यावरुन सातवाहन काळात हिमायतनगर (वाढोणा) चे अस्तित्व होते हे स्पष्ट होते. सातवाहन कालीन नाणे हे तेर येथील उत्खननात तसेच पेठण (प्रतिष्ठान) भोकरदन, नांदेड या ठिकाणी मिळाले आहेत. विशेषत: येथील देखील हिमायतनगर (वाढोणा) नगराच्या उत्तरेस गावालगत एक नाला आहे. या नाल्याच्या बांधावर श्री भाऊराव ढोणे यांना एक सातवाहन कालीन नाणे प्राप्त झाले आहे. हे नाणे

आज श्री सटवाजीराव ढोणे (गुरुजी) यांच्याकडे आहे. या नाण्यावरुन सातवाहन घराण्याचे या नगरासी असलेले संबंध स्पष्ट झाले आहेत. म्हणूनच या नगराची स्थापना इ.स. पूर्व दुसऱ्या किंवा पहिल्या शतकात सातवाहन काळात झाली असे म्हणता येते.

हिमायतनगर (वाढोणा) च्या नावाला प्राचीन इतिहास आहे. या नगराचे मुळ आणि प्राचीन नाव वारणावत (आरणावती) होते. असे लोकपरंपरेनुसार म्हटले जाते. परंतु या नावाचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. वारणावत येथे पांडव आले असा उल्लेख महाभारतात आहे. परंतु महाभारतातील वारणावत वारणावती हेच नगर असेल असे स्पष्ट म्हणता येत नाही. वारणावत या नावाबद्दल या परिसरात काही दंतकथा, अख्यायीका आणि मौखीक परंपरा रुढ आहेत. या अख्यायिका नुसार हिमायतनगर (वाढोणा) या नगराचे प्राचीनत्व रामायण, महाभारत कालखंडापर्यंत जाऊन मिळाले. पांडव वनवासात असताना दंण्डकारण्यात वावरत होत. याच दंण्डकारण्यात या नगराचा समावेश होता. म्हणून हिमायतनगर (वाढोणा) येथे पांडवाचे वास्तव्य होते. असे म्हटले जाते. येथील प्रचलित असलेल्या एका आख्यायिकेनुसार पांडव अज्ञातवासात असताना त्यांना वारणावती येथे कौरवाकडून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या नगरापासून जवळच असलेल्या टेंभीच्या माळावर एक मोठे भुयार आहे. हा भुयारी मार्ग माहूर येथे असलेल्या डोंगरातील पांडव लेणी जवळ निघतो. आणि याच भुयारी मार्गाने येथून पांडव माहूर येथे पोहोचले. असे म्हटले जाते. दुसऱ्या आख्यायिकेनूसार पांडवांना याच नगरात जाळण्याचा प्रयतन करण्यात आला. त्यावेळी पांडव टेंभी येथील भुयारी मार्गाने कंधार येथे पोहांचले. हा भुयारी मार्ग कंधारला निघतो, असेही लोकपरंपरेने म्हटले जाते. एक शेळ्या, मेंढ्या हाकणारा व्यक्ती जवळपास एक खंडी शेळ्या (२०) टेंभीच्या माळावर चारत होता. अचानक त्याच्या शेळ्या त्या भुयारी मार्गाने पुढे गेल्या. त्यापैकी एक शेळी माहूर येथे निघाली, काही शेळ्या कंधारला निघाल्या असे म्हटले जाते आज येथे जे भुयारासारख्ये दिसणारे भगदाड आहे ते अबाबकराचे थडगे या नावाने ओळख्ले जाते. कंधारच्या परिसरात देख्ील पांडव कालीन अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. कंधार व कंधारच्या परिसरात पांडव वास्तव्यास असल्याचे अनेक ग्रंथातही लिख्ान केलेले आहे. कंधार आणि हिमायतनगर (वाढोणा) अंतर साधारणपणे १०० कि.मी. आहे. यावरुन हिमायतनगर (वाढोणा)

या परिसरात असलेल्या आख्यायिकांना पुष्टी मिळते. म्हणजेच या नगरात पांडवाचे वास्तव्य असल्याचे स्पष्ट होते. म्हणून या नगराचे मूळ आणि प्राचीन नाव वारणावत (आरणावती) होते असे म्हणता येईल.

हिमायतनगर (वाढोणा) या नगराचे दुसरे नाव वाढवणे किंवा वाढोणा असेही आहे. मध्ययुगात माहूर येथे श्री विष्णूदास नावाचे संत होऊन गेले. या संताने हिमायतनगर (वाढोणा) येथील परमेश्वरदेवतेच्या रचलेल्या आरतीमध्ये या नगराचा उल्लेख वाढवणे असा केला आहे. पुढील काळात वाढवणे या नावाचा अपभ्रंश होऊन वाढोणा असे झाले आहे. आजही या परिसरातील लोक, तसेच जात्यावरील ओव्यामधुन स्त्रिया या नगराचा उल्लेख वाढवणे किंवा वाढोणा या नावानेच करतात. निजामकाळाच्या उत्तरार्धात वाढोणा या गावाचे नाव बदलून हिमायतनगर (वाढोणा) असे रुढ झाले. येथील काही वरिष्ठ व जेष्ठ नागरीकांच्या मते हैदराबादचा राजा निजाम, निजामाचा पुत्र किंवा त्यांच्या सरदाराच्या नावावरुन या नगराचे नाव बदलून त्यांनीच हिमायतनगर असे ठेवले असे म्हटले जाते. परंतु त्या संबंधीचा लेखी पुरावा उपलब्ध झालेला नाही. इ.स. १९०९ मध्ये या परिसरातील काही नेत्यांनी हिमायतनगर नगरास श्री परमेश्वरनगर असे नाव देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु यात त्यांना यश मिळाले नाही. नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील माजी आमदार व खासदार डॉ. केशवराव शंकरराव धोंडगे यांनी गुरुवार दि. ४ फेब्रुवारी २०१० रोजी हिमायतनगरला भेट देऊन येथील मंदिरातील परमेश्वराचे दर्शन घेतले. तसेच परमेश्वर मंदिर ट्रस्ट व या नगरातील काही प्रतिष्ठीतासमवेत त्यांनी चर्चा केली पुढे ९ फेब्रुवारी २०१० रोजी जिल्हाधिकारी नांदेड यांना एक निवेदन देऊन हिमायतनगर (वाढोणा) चे नामांतर परमेश्वरनगर असे करण्याची मागणी केली आहे. हा या नगराच्या नावाचा थोडक्यात इतिहास म्हणता येतो. सातवाहन (शालीवाहन) यांच्या कालखंडात या हिमायतनगर (वाढोणा) नगराची स्थापना झाली. तेव्हापासून या नगराचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास सलगपणे मांडता येतो ; परंतु या पूर्वीही या परिसरात नागरी वस्ती होती हे मान्य करावे लागते. वाकाटक काळात हिमायतनगराचा समावेश नांदेड विषय विभागात होत होता. याठिकाणी वाकाटक काळातील हिंदू मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाचे अवशेष आढळतात. या अवशेषांत पुढील अवशेषांचा समावेश होतो.

१. मंदिराचे स्तंभ.

२. स्तंभशिर्ष.

३. विष्णूमूर्ती.

४. शिवमूर्ती

५. नृसिंह मूर्ती.

६. पार्वती मूर्तीशिल्प.

७. सप्तमातृका.

८. महिषासूरमर्दिनी.

९. राम.

१०. पद्मनाथ.

वाकाटक काळात हिमायतनगर हे वैभवशाली नगर आणि हिंदू धर्मपीठ होते.[६८]

उपलब्ध पुराव्यावरुन मी असे म्हणू शकतो की,, वाकाटक राजघराण्यांनी विदर्भातून दक्षिण भारताच्या भूभागावर राज्य केले. मराठवाडा हा प्रदेश दक्षिण भारतात समाविष्ट असून काही निवडक ठिकाणीच या काळातील पुरातत्वीय अवशेष आढळतात.या अवशेषावरुन वाकाटकांच्या सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

संदर्भ सूची

१. Thosar H.S., Historical Geography of Maharashtra and Goa, 2004, p. 78.

२. Ibid

३. Journal of the Bombay Branch of royal Asiatic Society, p. 639.

४. Thosar H.S., Op. Cit., p. 79.

५. Ibid

६. Ritti Shrinivas and Shelke G.C. (Edi.), Inscriptions from Nanded District 1968, No. 2.

७. काळे भगवान (संपा.), मराठवाडा काल आणि आज, १९८६, पृ. ७८.

८. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977, p. 102.

९. मोरवंचीकर रा.श्री, दक्षिणकाशी पैठण, १९८७, पृ.१०.

१०. Mukharjee R. K., Ancient India, 1990, p. 44.

११. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त, पृ.१०.

१२. Mukharjee R.K., Op. Cit.

१३. Ibid

१४. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त.

१५. Thosar H.S., Op. Cit., Appendix - B.

१६. देव प्रभाकर, स्थापत्य अवशेष, स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, १९८६, पृ.३१.

१७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, १९५७, पृ.१३.

१८. कित्ता.

१९. Eipgraphia Indica, Vol. XXVI, p. 137.

२०. Sircar D.C. (Ed.), Select Inscriptions Vol.II, 1983, p. 514.

२१. Ibid

२२. Ibid

२३. Epigraphia Indica Vol XXVI, p. 137.

२४.. साखरे विजया, नांदेड जिल्ह्यातील पुरातत्व एक अभ्यास, जुलै २००८, पृ. १६९.

२५. कित्ता.

२६. Cousens Henry, Archaeological Survey of India, 1902-03, p. 102.

२७. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.२४७.

२८. पाटील समुद्रगुप्त, भोकर येथील विलोभनीय भगवान गौतम बुध्दाची प्रतिमा, जानेवारी १९९८, पृ.४४.

२९. मिराशी वा.वि., वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, १९५७, पृ.१४१, १५३.

३०. दास मारुती विरचित, अथ श्रीसाधू सुधा, खंदार, शके - १९०७, अध्याय-४, श्लोक -४४.

३१. कित्ता, अध्याय - ३, श्लोक - १९

कित्ता, अध्याय -४, श्लोक - ५४.

३२. शेंडगे एम.व्ही. (संपा.), रौप्य महोत्सवी स्मरणिका, १९८६, पृ.१.

३३. अथ श्री साधूसुधा, अध्याय -२, श्लोक - ४.

३४. Kandhar Excavation - A report, 1982.

३५. Ibid. P.1986.

३६. अग्रवाल वासुदेवशरण, सारनाथ, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, १९९२, पृ.१७-२०.

३७. कठारे अनिल, राष्ट्रकूटकालीन बौध्द विहार, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल - जून २००४, पृ.१८-२५.

३८. पवार दत्ता (संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, २००७, पृ.२८-३५.

३९. अग्रवाल वासुदेवशरण, पूर्वोक्त, पृ.१९.

४०. Ritti Shrinivas and Shelke G.C. (Edi.), No.1.

४१. Dhavlikar Madhukar, Ajanta, A Cultural Study, 1973, p. 112.

४२. Kandhar through Epigraphy and Archaeology - Journal of Epigraphical Society of India, Vol VII, 1980, p. 23.

४३. दळवे अरुण, राष्ट्रकुटकालीन कंधार, २००४, पृ.१९५.

४४. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.२५१.

४५. जोशी नि.पू., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.३६१, ३६६.

४६. कित्ता, पृ. ३६३.

४७. Indian Archaeology - A Review, 1937-38, p. 96.

४८. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६२.

४९. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ२४३.

५०. कठारे अनिल, कंधार येथील बौध्द स्तुप - पुरातत्वीय आढावा. २००७, पृ. २८-३५.

५१. जोशी नि.पू., पूर्वोक्त, पृ.३६३.

५२. कित्ता.

५३. पाठक अ.शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड -१, भाग - २, स्थापत्य व कला, २००२, पृ. २९८.

५४. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, १९९३, पृ. १९१.

५५. Indian Archaeology- A Review, Delhi, 1937-38, p. 96.

५६. Ibid. P -98

५७. Ibid. P -102

५८. Ibid. P -96-99

५९. Archaeological Survey of India, Delhi, 1958, p. 107.

६०. दळवे अरुण; राष्ट्रकूटकालीन कंधार, २००४.

६१. कित्ता.

६२. Pathu T.V. & Prasad V.R.N., Ajanta- Ellura and aurangabad caves - An Appreciation, 1972, p. 10.

६३. Pathu T.V., Ellura - Art and cuture, 1980, p. 8.

६४. Ibid. P -3

६५. कठारे अनिल व नगराळे एन.एन, १९९९, पृ. ३२०.

६६. ठोसर हरिहर, प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व, काळे भगवान संपादित मराठवाडा काला आणि आज, १९८६, पृ. ८१.

६७. Thosar H.s., Op., Cit, pp. 151-55.

६८. कदम वसंत, ऐतिहासिक हिमायतनगर, २००१, पृ.२०.

प्रकरण चौथे

सामाजिक-धार्मिक-आर्थिक स्थिती

आतापर्यंतच्या प्रकरणात वाकाटक राजवंशाचा राजकीय इतिहास आणि वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि तेथील पुरातत्वीय अवशेषांचा आढावा आपण घेतला आहे. वाकाटककालीन मराठवाड्यातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला वाकाटकांचे कोरीव लेख, ताम्रपट, अजिंठा लेण्यांतील चित्रकला आणि अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, शिऊर, खरोसा व घटत्कोच येथील लेण्यातील मूर्तिशिल्पाचा साधन म्हणून उपयोग होतो. याच साधनांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात वाकाटककालीन मराठवाड्यातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीचा आढावा घेतला आहे.

४.१ सामाजिक स्थिती :

वर्णव्यवस्था - वाकाटक काळात मराठवाड्यातील समाजात वर्णव्यवस्था प्रचलित होती. वाकाटक काळातील समाजव्यवस्थेचा प्रमुख आधार वर्णव्यवस्था हा होता. यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णाचा समावेश होतो. त्यांची कर्तव्य व अधिकार ठरलेले असत. ही वर्णव्यवस्था कार्य व श्रमाच्या आधारावर बनलेली होती. भारतात वर्णव्यवस्थेचा उदय केव्हा आणि कसा झाला याबाबत कसलाही निश्चित व ठोस पुरावा उपलब्ध नाही. विद्वानांच्या मते वर्णव्यवस्थेचे कोणते ना कोणते तरी रुप वैदिक काळापूर्वी अवश्य असावे. परंतु वर्णव्यवस्थेचा जन्म कसा झाला या संदर्भात त्यांच्यात एकमत नाही. ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तात वर्णव्यवस्थेचा सर्वात प्राचीन उल्लेख सापडतो.[१] ऋग्वेदिक ऋषीने संपूर्ण समाजाला एका विराट पुरुषाच्या रुपात कल्पिले आहे. याच पुरुषापासून सृष्टी जन्माला आली. या पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यापासून वैश्य व पायापासून शूद्राची निर्मिती झाली.[२] हाच सिध्दांत महाभारत, मनुस्मृती, विष्णुपूराण व वायुपूराणात प्रतिपादन केला आहे.[३]

गुण व कर्मावरुन वर्णोत्पत्ती झाली असाही एक सिध्दांत प्रतिपादन केला जातो. या सिध्दांताचे प्रतिपादन गीतेमध्ये करण्यात आले आहे. श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे की गुण व

कर्मानुसार विभागपूर्वक मी चार वर्णाची सृष्टी केली आहे.[४] विष्णू व वायू पुराणांतही वर्णाचा आधार गुण व कर्म असल्याचे म्हटले आहे. महाभारतातही गुणक्रमानुसार वर्ण व्यवस्थेचाच पुरस्कार केलेला आहे.[५] व्यवसायावरुनही वर्णाची उत्पत्ती झाली. बुध्दीच्या आधारावर व्यवसाय करणारे विद्वान ऋषी ब्राह्मण झाले. बाहुबलाच्या जोरावर कर्म करणारे क्षत्रिय झाले. व्यापार करणारे वैश्य तर या तिघांची सेवा करीत राहणारे लोक शूद्र झाले.[६] कर्माच्या आधारावर विश्वमित्र, नाभाग व राजा शर्याती यांचे वर्ण बदलले होते. वर्णोत्पत्तीच्या उदयाचे शेवटचे कारण म्हणजे समाजाची आवश्यकता होय. प्रारंभी मानवी समाज अत्यल्प होता आणि त्यांच्या गरजासुध्दा मर्यादित होत्या. कालांतराने बुध्दीचा विकास व लोकसंख्येच्या वाढीमुळे समाजातील कार्य वाढले. त्यामुळे या कार्याचे विभाजन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार प्रकृती, रुची व सामर्थ्यानुसार विभिन्न कर्मे निश्चित केली गेली. त्यामधुनच समाजात चार वर्णाचा जन्म झाला.[७] अशा रीतीने ऋग्वेदिक काळाच्या अंतिम चरणात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णाचा उदय झाला. त्यांचे अधिकार व कर्तव्ये या विषयी या ठिकाणी माहिती घेणे आवश्यक ठरते.

१) ब्राह्मण :

चार वर्णातील पहिला वर्ण ब्राह्मण आहे. चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेत ब्राह्मण वर्णाला सर्वोच्च स्थान होते. या वर्णाची निर्मिती एका विराट पुरुषाच्या मुखापासून झाली. धर्मसूत्रे व स्मृतीमध्ये वर्णाची कर्तव्ये व त्यांच्या विशेषाधिकारांची सविस्तर चर्चा केलेली आहे. अध्ययन करणे, यज्ञ करणे व दान देणे ही या वर्णाची कर्तव्य होती तर वेदाध्ययन करणे, यज्ञ करुन घेणे व दान घेणे हे या वर्णाचे विशेषाधिकार होते.[८] ब्राह्मण यावर्णाच्या उदरनिर्वाहाची प्रमुख तीन साधने होती.

१) वेदांचे अध्यापन करुन धन प्राप्त करणे.

२) पौरोहित्य (धार्मिक कार्य) कर्म करुन धनग्रहण करणे.

३) कोणत्याही योग्य व्यक्तीपासून किंवा दोषरहित व्यक्तीपासून दान ग्रहण करणे.[९]

या तीन कर्तव्याशिवाय धनप्राप्तीसाठी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना नेमून दिलेली कामे करुन उपजीविका करु शकत असत. आपत्काळात ब्राह्मण शूद्रासाठी निश्चित केलेली कामे सुध्दा करु शकतो. परंतु तो शूद्राबरोबर भोजन करु शकत नाही. आपत्काळ संपल्यानंतर शूद्राची कामे

करणाऱ्या ब्राह्मणास शुध्दीसाठी प्रायश्चित घ्यावे लागे. त्यानंतरच तो पुन्हा आपली कर्तव्ये करु शकत असे.

चातुवर्णात ब्राह्मणाला अग्रस्थान दिले होते. त्याने आपले आयुष्य वेदाध्ययनात, यज्ञानुष्ठानात व धर्मोपदेशात घालवावयाचे असे. धर्मसूत्रातील बहुतांश नियम त्याच्या आचरणाविषयी आहेत. तसे संयमी जीवन न जगणाऱ्याला तो मान मिळत नसे. एवढेच नाही, तर तो पतित गणण्यात येई. त्याला व्यापार, सावकारी, वैद्यकीय इत्यादी व्यवसाय करता येत नसत.[१०] आपत्काली मात्र हे निर्बन्ध शिथिल केले जात. सामान्यत: ब्राह्मणाने पाहण्याकरिताही शस्त्र हातात घ्यावयाचे नसे.[११] पण समाजात बंडाळी माजून धार्मिक जीवन अशक्य झाल्यास क्षत्रियाप्रमाणे इतर द्विजातींनीही शस्त्रग्रहण करावे असे मनूने म्हटले आहे.[१२] त्याला अनुसरुन अनेक ब्राह्मणांनी वर्तन केल्याचे प्राचीन भारतीय इतिहासात नमुद आहे. शुंग, काण्व, सातवाहन, वाकाटक व कदम्ब इ.प्राचीन भारतातील प्रस्थापित राजवंश ब्राह्मण जातीचे होते.

जे ब्राह्मण वेदशास्त्रात पारंगत होत त्यास समाजात अत्यंत मानाचे स्थान असे. काही ब्राह्मण एकापेक्षा अधिक वेदांचे अध्ययन करीत, त्यांच्या नावामागे द्विवेद यासारखे उपपद लावीत. ही उपपदे अद्यापि आडनावे झाली नव्हती. काही ब्राह्मण श्रौत व गृह्य यागांचे पौराहित्य करीत. गणयागासारख्या काही यागांचे अनुष्ठान दुसऱ्या करिता करणे धर्मसूत्रांत निषिध्द मानले असल्याने ते याग करणाऱ्यांना मोठमोठी दाने मिळत, पण त्यांना समाजात मान्यता नसे, व श्राध्दादि प्रसंगी त्यांना आमंत्रण मिळत नसे. काही ब्राह्मण नैष्ठिक ब्रह्मचर्याचे पालन करीत. जांब ताम्रपट ज्याला दिला होता तो कालुट्टक ब्राह्मण अशा तऱ्हेचा ब्रह्मचारी दिसतो. काही ब्राम्हण आपल्या विशुध्द धार्मिक आचरणाबद्दल प्रसिध्द होते. प्रभावतीगुप्ताचा पुणे ताम्रपट ज्याला दिला तो आचार्य चनालस्वामी या तऱ्हेचा ब्राह्मण दिसतो. त्याला भगवतभक्त असे विशेषण लावले आहे. हा रामगिरी येथे राहत होता, व त्याच्यावर भगवान रामचंद्राच्या पादुकांच्या पूजाअर्चेची व्यवस्था सोपविली होती असे दिसते. कारण प्रभावतीगुप्तेने आपले दान भगवान रामचंद्राच्या पादमूलांना (पादूकांना) अर्पण करुन मग ते त्याला दिले होते. ब्राह्मणांच्या नावाच्या शेवटी शर्मन, आर्य, आचार्य, सवामिन यासारखा एखादा शब्द असे. ते भिन्न वेदांचे आणि शाखेचे किंवा चरणांचे अनुयायी होते. सर्वच

लेखांत ब्राह्मणांच्या वेदशाखांचा उल्लेख केला नसल्याने ही माहिती अर्थातच त्रोटक आहे, पण मिळतात त्या उल्लेखांवरुन काही अनुमाने काढता येतात. वाकाटकांच्या लेखांत ऋग्वेदी व सामवेदी ब्राह्मणांचा स्पष्ट उल्लेख कोठेही येत नाही, हे आश्चर्य आहे. यजुर्वेदाच्या शाखांपैकी तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यन्दिन शाखेचा होता. तो मेकला देशात राहत असे. दुसरे दोन दान दिलेले ब्राह्मणही वाजसनेय शाखेचे किंवा शुक्ल यजुर्वेदाचे असावे, कारण त्यांच्या गोत्राच्या मागे वाजि हे उपपद लावले आहे. अथर्ववेदीय ब्राह्मण सध्या अत्यंत अल्पसंख्य आहेत. पण त्या काळी ते तसे नव्हते. कारण वाकाटकांचे तिरोडी व वाशीम ताम्रपट या वेदाच्या ब्राह्मणांना दिले होते. यापैकी एक ब्राह्मण बालाघाट जिल्ह्यात व दुसरा अकोला जिल्ह्यात राहत होता.

काही ब्राह्मण राज्यशासनांत उच्च पदांवर असावेत. कोरीव लेखांत राजसेवकांच्या जातीचा उल्लेख कोठेही येत नसल्यामुळे या बाबतीत फारशी माहिती मिळत नाही. तथापि प्रभावतीगुप्ताच्या ताम्रपटांत दूतक म्हणून उल्लेखिलेला देवनन्दस्वामी हा ब्राह्मण असावा. तसेच ज्यांच्या नावांच्या शेवटी दास आहे काही दानपत्रांचे लेखकही ब्राह्मण असण्याचा संभव आहे.

२) क्षत्रिय :

वर्णव्यवस्थेतील क्षत्रिय हा दुसऱ्या क्रमाचा वर्ण आहे. या वर्णाची निर्मिती विराट पुरुषाच्या बाहूपासून झाली. जो वर्ग समाजाचे रक्षण करण्यासाठी तत्पर झाला त्या वर्गास क्षत्रिय वर्ण म्हणून ओळखले जाऊ लागले. अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे, समाजाचे रक्षण करणे, युध्दक्षेत्रातून पळून न जाणे, प्रजेचे पालनपोषण करणे व सांसारिक विषयभोगाची इच्छा न करण ही या वर्णाची कर्तव्य होती.[१३]

क्षत्रियांची कर्तव्येही आपस्तंबाने अशीच विस्तारपूर्वक सांगितली आहेत. राजाने आपले गुरु व अमात्य यांच्या पेक्षा जास्त ऐश्वर्याने राहू नये.[१४] त्याच्या राज्यात क्षुधेने, रोगाने, थंडीने किंवा ऊष्माघाताने कोणीही मृत्यू पावू नये.[१५] त्यांच्या राज्यातील ग्रामांत किंबहुना अरण्यांतही तस्करांचे भय नसावे,[१६] त्याने संदेह असल्यास कोणालाही दंड करु नये.[१७] शरण आलेल्या शत्रूला ठार मारु नये.[१८] इत्यादि सुसंस्कृत राज्यपध्दतीतील सर्व विशेषांचा आपस्तंब - धर्मसूत्रात उल्लेख आहे.

क्षत्रियांच्या उदरनिर्वाहाची पुढील तीन साधने प्रचलित होती.[१९]

१) युध्द करुन विजय मिळविलेल्या प्रदेशात मिळालेली लूट (धन) क्षत्रियांची असे.

२) न्यायकार्य संपल्यानंतर अपराध्याकडून प्राप्त झालेले दंडधन क्षत्रिय उपजीविकेसाठी वापरु शकत असत.

३) रक्षण कार्याचा मिळणारा मोबदला क्षत्रियांचा असे.

याशिवाय आपत्काळात क्षत्रिय वैश्य वृत्ती व शूद्र वृत्ती करु शकत असत. मात्र त्यांना ब्राह्मणवृत्ती करता येत नसे.

वर्णव्यवस्थेत ब्राह्मणानंतर क्षत्रियांचे स्थान येते. बरेचसे क्षत्रिय राज्यशासनांत नियुक्त केले असावे. द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या अकराव्या व तेराव्या वर्षी दिलेल्या दानपत्रांत उल्लेखिलेला सेनापती चित्रवर्मा हा त्याच्या नावावरुन क्षत्रिय दिसतो. दुसरे कित्येक सेनापती जसे चमिदास, नमिदास, बाप्पदेव व कात्यायन - हेही क्षत्रिय असण्याचा संभव आहे, पण त्याविषयी निश्चित सांगणे अशक्य आहे. ऋध्दपुरच्या ताम्रपटाचा लेखक प्रभुसिंह हा त्याच्या नावावरुन क्षत्रिय दिसतो.

३) वैश्य :

वैश्य या तिसऱ्या वर्णाची निर्मिती विराट पुरुषाच्या मांड्यापासून झाली आहे. अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे, शेती, व्यापार व पशुपालन करणे तसेच कर्जावरील व्याज घेणे.[२०] ही वैश्यांची कर्तव्ये होती. वैश्य वर्ण संपत्तीच्या दृष्टीने सर्वाधिक समृध्द होता. वैश्याच्या उपजीविकेचे साधन म्हणजे आपल्या वर्णधर्माचे पालन करणे हे होते. वैश्यांना शेती व व्यापार करुनच आपली उपजिवीका करावी लागे. वैश्य आपत्काळात दुसऱ्या वर्णाची सेवा करुन शूद्र वृत्ती करु शकत असे. परंतु त्यांना ब्राह्मण वृत्ती व क्षत्रिय वृत्ती करता येत नसे. वैश्यांनी निर्माण केलेल्या संपत्तीवर केवळ वैश्यांचाच एकाधिकार नव्हता, तर आवश्यकता पडल्यास ती समाजाची संपत्ती मानली जात होती. अन्य तीन वर्ण या संपत्तीतील आपापला भाग घेऊ शकत असत. केवळ याचमुळे समाजात आर्थिक असंतोष निर्माण होत नसे.

४) शूद्र :

शूद्र हा सर्वात शेवटचा वर्ण आहे. त्याची उत्पत्ती विराट पुरुषाच्या पायापासून झाली. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांची सेवा करणे.[२१] एवढेच कर्तव्य शूद्राचे होते. समाजाची सेवा करण्यासाठीच शूद्रांची निर्मिती केली. तीनही वर्णाची सेवा करुन त्यांना संतुष्ट ठेवण्यामुळेच शूद्र स्वर्गसुख प्राप्त करु शकतो. अशी कल्पना करण्यात आली आहे. शुद्रांना धर्मकार्य, संस्कार व मंत्रोच्चार करण्यास परवानगी नव्हती. त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार तर नव्हताच, परंतु वेदाध्ययन करणाऱ्या व्यक्तीजवळ सुध्दा ते बसू शकत नव्हते. एखाद्या शुद्राने असे केलेच तर त्याला कठोर शिक्षा दिली जाई. शूद्राचे अनिर्वासित व निर्वासित असे दोन प्रकार आहेत. अनिर्वासित शूद्र नगरात राहतो व निर्वासित शूद्र नगराबाहेर राहत असत. तीन वर्णाची सेवा करुनच शूद्र उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्याकडून मिळालेली जूनी वस्त्रे, चप्पल, चटई, पगडी व उष्टे जेवण शूद्र स्वीकार करीत असत.[२२] शूद्रांना संपत्तीचा साठा करता येत नसे. शूद्राचं प्रमुख कर्तव्य इतर वर्णाची सेवा हे असले तरी तो कारुकर्मात व विविध धंद्यांत निपुण असे.

वाकाटक काळात वर्णव्यवस्था लवचिक होती. त्याकाळात राजवंश ब्राह्मण व क्षत्रिय होते. वाकाटक राजे ब्राह्मणअसून त्यांचे गोत्र विष्णुवृध्द होते.[२३] मेकला देशावर राज्य करणारे वाकाटकांचे मांडलिक आपणास सोमवंशी पांडवाचे वंशज मानत असत. अर्थात ते क्षत्रिय होते.

कुटूंबपध्दती :

वाकाटक काळात संयुक्त कुटूंबपध्दती प्रचलीत होती. एकाच कुटूंबात पती, पत्नी, भाऊ, बहीण, त्यांचे मुले, मुली, आजोबा व आजी रहात होते. समाजात पितृसत्ताक कुटूंबपध्दती प्रचलित होती. पिता हाच संपूर्ण कुटूंबाचा कर्ता व स्वामी होता. त्याला गृहपती म्हटले जात असे.[२४] कुटूंबातील सर्व सदस्यांवर त्यांचे नियंत्रण असे. कुटूंबातील सर्व सदस्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी गृहप्रमुख या नात्याने पित्यावर येत असे. एकाच कुटूंबात जवळपास तीन पिढ्यापर्यंतचे लोक रहात होते व पित्याला कुटूंबाबाबतचे असीमित अधिकार असत. गृहप्रमुख हा आपल्या पत्नीच्या व कुटूंबातील इतर सदस्यांच्या मदतीने सामाजिक व धार्मिक कार्य पार पाडत होता. कुमारी कन्या ही पिता व आपल्या भावांच्या संरक्षणात राहत होती. कुटूंबात माता - पित्यांचा आदर

व सन्मान केला जाई. पिता व पुत्र यांच्यातील संबंध स्नेहपूर्ण असत. पित्याप्रमाणेच मातेचाही कुटूंबावर अधिकार चालत असे. पित्याच्या अनुपस्थितीत मोठा भाऊ कूटुंबाचे संरक्षण व पालनपोषण करीत असे. सर्वात प्रथम कुटूंबातील जेष्ठ पुत्राचा किंवा कन्येचा विवाह केला जात असे. घरी आलेल्या पाहुण्यांचा सत्कार करणे महत्वपूर्ण समजले जाई. कुटूंबाच्या सर्व संपत्तीचा अधिकार गृहप्रमुखाकडे असे. त्याच्या मृत्युनंतर हा अधिकार त्याच्या जेष्ठ पुत्राला प्राप्त होत असे. कुटूंबातील सर्व सदस्यांना पित्याच्या आज्ञांचे पालन करावे लागे.

कुटूंबप्रमुखाच्या निधनानंतर सर्व भाऊ एकत्रच राहात असत. पुढेमागे त्यांच्या वाटण्या झाल्यास पैतृक संपत्तीचे समान विभाजन होत असे. संपत्तीच्या विभाजनामध्ये स्मृतिकारांनी परस्परविरोधी मते दिलेली आहेत. जेष्ठ पुत्राला मोठा वाटा मिळावा असे मत असले तरी व्यवहारात ते रुढ नसल्याचे दिसते. पति-पत्नी संयोगातूनच कुटूंबाची निर्मिती होत असल्याने पत्नीच्या वेगळ्या अस्तित्वाची स्मृतिकारांनी दखल घेतलेली दिसत नाही. त्यामुळे तिचा वेगळा हिस्सा नाकारला आहे. मात्र पतीच्या संपत्तीमधून तिचा दान देण्याचा अधिकार मान्य केल्याचे दिसते.

विवाह :

हिंदू धर्मातील सोळा संस्कारात सर्वात महत्त्वाचा संस्कार म्हणजे विवाह संस्कार होय. गृहसुत्रात संस्काराच्या वर्णनाची सुरुवात विवाह या संस्कारापासून केली आहे. विशुध्द कामभावना मनुष्य व पशूंमध्ये नैसर्गिक आहे. मुक्त कामतृप्ती ही अमर्यादित पशू जीवनाची परिचर्या आहे. तसेच मर्यादित कामभावना ही मनुष्याची सृजनशीलता, सौंदर्यवृध्दी व परस्पर सहकार्याचे मूळ द्योतक आहे. काम व लैंगिक संबंधास मर्यादित रुप प्रदान करण्यासाठी संभवत: संस्कृतीच्या आदिम काळातच विवाह हा संस्कार प्रतिष्ठित झाला. पुत्रप्राप्ती करुन मनुष्य अमरत्व प्राप्त करु शकतो म्हणून अमरत्व प्राप्तीसाठी, आपल्या संततीच्या पालनपोषणासाठी मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे तो एकाकी जीवन जगू शकत नाही. म्हणून धार्मिक समारंभ पार पाडण्यासाठी व पती - पत्नीतील निर्माण झालेले भावबंध या कारणामुळे मनुष्याला विवाहाची आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतीय परंपरेत विवाह हा एक समारंभ पार पाडण्यासाठी व पती - पत्नीतील निर्माण झालेले भावबंध या कारणामुळे मनुष्याला विवाहाची आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतीय

परंपरेत विवाह हा एक पवित्र संस्कार असून, ते ईश्वरीय बंधन आहे म्हणून हा संस्कार अटळ आहे. धर्मपालन करणे, प्रजा अर्थात पुत्रप्राप्ती करणे व रतिप्रयोजन हे विवाहाचे प्रमुख तीन हेतू होते. रतीप्रयोजनास दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, मनुष्याच्या इंद्रिय लालसेला संकुचित करुन तिला मर्यादित करणे, प्राचीन भारतीय समाजात विवाहाचे आठ प्रकार प्रचलित होते. ऋग्वेदात विवाह प्रकाराचा स्पष्ट उल्लेख मिळत नाही. तसेच विवाह विधीचेही वर्णन आढळत नाही. आश्वालायन गृहसूत्रात विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. हेच आठ प्रकार वाकाटक काळातही प्रचलित होते. हे आठ विवाह प्रकार पुढीलप्रमाणे होते.[२५]

१) ब्राह्म विवाह :

ब्राह्म विवाह हा सर्वश्रेष्ठ विवाह प्रकार मानला जातो. यामध्ये कन्येचा पिता स्वेच्छेने आपल्या कन्येचा विवाह मुलाशी करुन देत असे.

२) दैव विवाह :

कन्येचा पिता यज्ञ करणाऱ्या पुरोहिताच्या प्रभावित होऊन आपल्या कन्येचा विवाह त्याच्याबरोबर करुन देत असे. अशा प्रकारे पुरोहिताला दक्षिणेच्या रुपात कन्या प्राप्त होत असे.

३) आर्ष विवाह :

कन्येचा पिता मुलाकडून एक गाय व एक बैल घेऊन आपल्या कन्येचा विवाह त्याच्या बरोबर करुन देत असे. या गाय व बैलास यज्ञात बळी दिले जात असे.

४) प्रजापत्य विवाह :

प्रजापत्य हा विवाह प्रकार आदर्श मानला जातो. संतती निर्माण करणे हा या विवाहाचा प्रमुख हेतू आहे. या विवाह प्रकारात कन्येचा पिता विधिपूर्वक आपल्या कन्येचा विवाह मुलाबरोबर लावून देतो तसेच त्या वधू - वरांस सुखी जीवन व्यतीत करण्याचा आशीर्वाद देतो.

५) गांधर्व विवाह :

गांधर्व विवाह हा एक प्रकारे प्रेम विवाह होतो. या विवाहासाठी आई - वडिलांच्या परवानगीची आवश्यकता नसते. मुलगा व मुलगी यांच्यात प्रथम प्रेम निर्माण होते व त्यांच्यात

शारीरिक संबंध स्थापन होत असत. त्यानंतर ते विवाह करीत असत. स्त्री जीवन नष्ट होऊ नये यासाठी समाज या विवाहास मान्यता देत असे.

६) असूर विवाह :

असूर विवाह हा विवाह प्रकार क्रय - विक्रय पध्दतीवर आधारित होता. कन्येचा पिता मुलाकडून निश्चित मूल्य घेतल्यानंतरच आपल्या कन्येचा विवाह त्याच्याशी करुन देत असे. धर्मशास्त्रात या विवाह प्रकारची निंदा केली आहे.

७) राक्षस विवाह :

कन्येच्या इच्छेविरुध्द तिचे जबरदस्तीने अपहरण करुन तिच्याशी केल्या जाणाऱ्या विवाहाला राक्षस विवाह म्हणतात. कालांतराने हा विवाह प्रकार क्षत्रिय वर्णात लोकप्रिय झाला होता.

८) पैशाच विवाह :

हा विवाह प्रकार सर्वात कनिष्ठ समजला जातो. या विवाह प्रकारात निद्रामग्न, बेहोश, पागल व मद्यपेय घेतलेल्या कन्येशी धोका करुन किंवा जादू टोण्याच्या शक्तीच्या प्रभावाने शारीरिक संबंध ठेवले जातात. आधुनिक काळातील बलात्काराला पैशाच कर्म समजले जाते. स्त्रीबरोबर विवाह करण्यासाठी विवश केले जाते.

वरील आठ विवाह प्रकारात ब्राह्य प्राजापत्य विवाहास सर्वश्रेष्ठ व देव तसेच आर्ष विवाहास धर्मसंगत मानले आहे. काही विद्वानांनी गांधर्व विवाहास धर्मसंमत मानले आहे. काहींनी यास विरोध केला आहे. असूर, राक्षस व पैशाच विवाहास सूत्रकारांनी अधार्मिक म्हटले आहे. या आठ विवाह प्रकाराशिवाय समाजात प्रतिलोम विवाह सुध्दा प्रचलित होता- कनिष्ठ वर्णातील पुरुष व उच्च वर्णातील स्त्री यांच्यात झालेल्या विवाहाला प्रतिलोम विवाह म्हटले जाई. ब्राह्मणांना कोणत्याही वर्णातील स्त्रीशी विवाह करता येत असे. प्रतिलोम विवाहासंबंधी मनुस्मृतीमध्ये तीव्र नापसंती दर्शविली आहे. क्षत्रियांमध्ये प्रतिलोम, गांधर्वादि विवाह प्रकार रुढ होते. विवाह आपापल्या जातीतच करण्याची प्रवृत्ती होती. परंतु आंतरजातीय विवाहही होत असत. द्वितीय रुद्रसेन या ब्राह्मणजातीय वाकाटक राजपुत्राचा विवाह प्रभावती गुप्ता या वैश्य राजकन्येशी झाला होता.[२६]

या विवाहानंतर तिला किंवा तिच्या अपत्यांना कोणताही हलका दर्जा प्राप्त झाला नाही. ती आपल्या पतीची अग्नमहिषी (पट्टराणी) झाली व दिवाकरसेन व दामोदरसेन हे तिचे पुत्र यथाकाल विदर्भाच्या गादीवर बसले. दुसरा आंतरजातीय विवाह घटोत्कच लेण्यांतील लेखांत उल्लेखिला आहे. वल्लूरच्या विद्वान ब्राह्मण कुळांतील सोम याने ब्राह्मण व क्षत्रियजातीय स्त्रियांशी विवाह केला होता.[२७] ब्राह्मण स्त्रियांपासून त्याला झालेल्या पुत्रांनी वेदविद्येत पारंगत होऊन आपल्या वल्लूर कुलाला कीर्तिमान केले. क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या रवि नामक पुत्राच्या ठिकाणी राजचिन्हे दिसत होती. त्याने सभोवरच्या सर्व प्रदेशावर आपला अंमल बसवला. तो पुढे वाकाटक राजाचा सचिव झ ाला. त्याच्या वंशजांनीही वाकाटक राजांची सेवा एकनिष्ठपणे केली आहे. त्यापैकी शेवटच्या दोघांचे वर्णन अजंठा व गुलवाडा (घटोत्कच) येथील लेखांत आले आहे.

आहार :

वाकाटक काळातील लोक शाकाहारी आणि मांसाहारी होते. त्यांच्या भोजनात विविध प्रकारच्या पदार्थाचा समावेश होत होता. दूध, दही, लोणी, तूप, तांदूळ, मूग, उडीद, गहू, तीळ, मीठ, साखर, हरभरा, मोहरी, कारले, गुळ खीर व विभिन्न प्रकारची फळे या पदार्थाचा प्राचीन लोकांच्या आहारात समावेश होता. तांदळाचा भात हा लोकांचा आवडीचा पदार्थ होता. या भातात अनेक पदार्थ मिसळून त्यांची खीर बनविली जाई. गहु व जवस यांच्या मिश्रणापासूनही खीर तयार केली जाई. दुधापासून अनेक पदार्थ बनविले जात. धान्य बारीक करुन अनेक पदार्थ तयार करीत व ते आवडीने सेवन केले जात असत. या पदार्थाशिवाय अनेक फळांचाही त्या काळात समावेश होता. द्राक्षे, आंबा, जांभूळ, बोर, व कंदमुळे ही फळे त्या काळात लोकप्रिय होती. दाळ व तेलाचाही आहारात समावेश होता. समाजात मांसाहार प्रचलित होता. बैल, भेड व बकरी या प्राण्यांचे मांस शिजवून सेवन केले जाई. अनेक प्रशुपक्षांचे मांस सेवन केले जात असे. या काळात मद्यपान केले जाई. अन्न व झाडाच्या रोपट्यापासून सूरा तयार करीत असत. त्यासाठी अन्न व झाडाच्या रोपट्याला सडविले जाई. तयार केलेली सुरा कातड्यापासून तयार केलेल्या पात्रात ठेवली जात असे. पेय पदार्थात सोमरस महत्त्वाचा असे. अथर्ववेद व स्मृती साहित्यात सुरापान व मद्यपानाची निंदा केली

आहे. तरीही सुरापान व मद्यपान या काळात प्रचलित होते. कवी कालिदासाच्या साहित्यात लोक मद्यपान करीत असल्याचे उल्लेख आढळतात.

स्त्रियांचे स्थान व दर्जा :

वाकाटक काळात समाज व कुटूंबात स्त्रियांना सन्मानाचे स्थान होते. त्यांना पुरुषांची अर्धांगीनी समजले जात असे. त्यांच्याशिवाय पुरुषांचे जीवन अपूर्ण समजले जात असे. कवि कालिदासच्या कुमार संभव या ग्रंथत कन्येला कुटूंबाचा प्राण म्हटले आहे. शिक्षणाचा अधिकार मात्र फक्त श्रीमंत घरातील स्त्रियांनाच होता. स्त्रियांना सामाजिक व धार्मिक उत्सवात पतीबरोबर सहभाग घेता येत असे. पतीच्या आदेशाशिवाय कोणत्याच सामाजिक व धार्मिक उत्सवात सहभागी होता येत नसे हे मात्र खरे आहे. पत्नीला पतीची परमेश्वर म्हणून सेवा करावी लागे. वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा यांची राणी प्रभावती गुप्ता ही उत्कृष्ट प्रशासक होती. समाजात बालविवाह, बहुपत्नीत्वाची प्रथा आणि सती प्रथा प्रचलित होती. वाकाटक काळात अनुलोम विवाह होत असत.[२८] उच्च वर्णातील पुरुष आणि त्या वर्णापेक्षा कनिष्ठ असलेल्या वर्णातील स्त्री यांच्यात झालेल्या विवाहाला अनुलोम विवाह म्हणतात. अनुलोम विवाहाचे प्रमाण या काळात अत्यंत कमी झाले. बहुपत्नीत्व आणि सती प्रथाही केवळ श्रीमंत लोक, राजघराणे आणि उच्च वर्णीय लोकांतच प्रचलित होती. या काळात स्त्रियांच्या स्थितीतही परिवर्तन झाले. वैदिक काळात स्त्रियांना असलेली सन्मानाची स्थिती या काळात राहीलेली नव्हती. मुलीपेक्षा मुलगा जन्माला येणे महत्वाचे समजले जाऊ लागले. त्यामुळे साहजिकच मुलगी जन्माला येताच दु:ख व्यक्त केले जाई. वयाच्या आठव्या व नवव्या वर्षीच मुलीचे लग्न करण्यात येत असे.[२९] बालविवाह प्रथा प्रचलित असली तरी किमान उच्चवर्णीयात तरी विधवांचे पुनर्विवाह होत नव्हते. पडदा पध्दती आस्तित्वात नव्हती. केवळ उच्चवर्णीयातील आणि राजघराण्यातील स्त्रियांनाच शिक्षण देण्यात येई. सर्वसामान्य स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. त्यांच्यावर पतीची बंधने आली. त्यांना फारसे स्वातंत्र्य राहिले नाही. पतीच्या उत्पन्नातील त्यांच्या वाट्यास हळूहळू मान्यता मिळू लागली होती. पतीच्या आज्ञेबाहेर जाऊन पत्नी स्वतंत्रपणे वागू शकत नाही. पतीची उपेक्षा करणाऱ्या स्त्रियांसाठी याज्ञवल्क्याने व कौटिल्याने त्यांचे नाक व कान कापण्याची भिक्षा फर्माविली, तर मनूने तिला मृत्यूदंडाची शिक्षा फर्माविली.

अलंकार :

वाकाटक काळात स्त्री - पुरुषांना अलंकाराची फार आवड होती. अजिंठा वेरुळ, शिऊर व घटोत्कच लेण्यांतील शिल्पकला आणि अजिंठा लेणीतील चित्रकलेवरुन या काळातील अलंकाराची आपणास कल्पना येते. कवि कालिदासच्या साहित्यातुनही अलंकाराची माहिती होते. अलंकार व सौंदर्यप्रसाधने ही स्त्री - पुरुषांच्या सौंदर्यात भर टाकणारी महत्वाची साधने आहेत. त्यामुळे स्त्री - पुरुषांना विभिन्न प्रकारचे अलंकार व विभिन्न प्रकारची सौंदर्यप्रसाधने वापरण्याची आवड होती. कानातील कुंडले, गळ्यात स्वर्णहार व मण्याच्या माळा, दंडात बाजुबंद (भुजबंध), दणकड्या, गजरे, अंगठी, पायात पैंजन, कमरपट्टा इत्यादी अलंकार वापरत असत. विवाहप्रसंगी स्त्रिया वेगवेगळे अलंकार वापरत असत. सोने, चांदी, शंख व शिंपल्यापासून आणि मोती - हिऱ्यापासून विभिन्न प्रकारचे दागिने तयार केले जात असत.

अजिंठा लेणीतील चित्रात व्यापारी, सामान्य व गरीब लोक यांच्या अंगावर दागिने दिसत नाहीत पण राजे,राण्या, राजपुत्र, उच्चपदस्थ अधिकारी, श्रीमंत लोकांच्या स्त्रिया, त्यांच्या दासी यांनी विविध प्रकारचे अलंकार घातलेले आढळून येतात. राजे लोक उंच रत्नजडित मुकूट त्यांच्या कानात रत्नजडित कुंडले व गळ्यात रत्नांचे व मोत्यांचे अनेक हार असत.[३०] बाहूवरच्या रत्नयुक्त अंगदांना मोत्यांचे लोंबते पदर लावले असत. इंदुमतीस्वयंवरात एका राजाने आपल्या रत्नजडित अंगदाच्या टोकांत अडकलेला हार पुन: व्यवस्थित करुन ठेवल्यांचे वर्णन कालिदासाने केले आहे. हातात एक दोन सुवर्णवलये असत. रामगिरीवर प्रियाविरहाने कृश झालेल्या यक्षाच्या मनगटांतून कनकवलये गळून पडल्यामुळे ती मनगटे रिक्त दिसू लागली असे वर्णन मेघदूतांत आले आहे. बोटांत अंगुलीयकें (अंगठ्या) घालत. शाकुंतलात दुष्यन्ताने शकुंतलेला दिलेले अंगुलयक हरवल्यामुळे झालेला घोटाळा सर्वविदित आहे. वक्ष:स्थलावर यज्ञोपवीता सारखा घातलेला अनेक पदरांचा मोत्यांचा हार असे. त्याला मुक्ता वैकक्षक म्हणत. सतराव्या लेण्यांतील बुध्दाच्या धर्मोपदेशाच्या वेळी जमलेल्या राजांचे किंवा त्याच लेण्यातील आकाशातून उडणाऱ्या इंद्राचे चित्र पाहिले असता तत्कालीन श्रीमंत लोकांच्या अलंकाराची कल्पना येते. मुलांचेही अलंकार बहुतांशी याच प्रकारचे असत. हे यशोधरा व राहुल बुध्दाला सामोरे जातात त्या चित्रावरुन दिसून येते.

स्त्रियांचे अलंकार अत्यंत सुंदर व विविध प्रकारचे असत, अजिंठ्याच्या बहुतेक चित्रांत स्त्रियांनी आपल्या केसांत सध्याच्या बिंदू - सारखा अलंकार घातलेला दिसतो. त्याला ललाटिका म्हणत, कारण तो ललाटावर (कपाळावर) केसांत सभोवार बांधला जात असे.[३१] त्याचा एक पदर सीमन्त किंवा भांग याच्या अनुरोधाने जोडला जात असे, म्हणून यांचे वर्णन बाणाने सीन्तचुम्बि तिलकमणि असे केले आहे. या ललाटिकेला पुढील भागी मोत्यांचा झुपका किंवा रत्नजडित सोन्याचे पदक जोडत असत. ते भालप्रदेशावर लोंबत असे, म्हणून त्याला चटूला तिलक अशी संज्ञा असे. सोन्याच्या साखळीत नाना प्रकारची रत्ने ओवून ललाटावर लोबता टेवलेल्या अलंकाराला चटूलातिलक म्हणतात. शिरोभूषण स्त्रियांप्रमाणे मुलेही धारण करीत. यशोधरा व राहुल या दोघांनीही ते घातले आहे. काही स्त्रिया मोत्यांचे जाळे कंसात घालत. त्याचे वर्णन कालिदासाने मुक्ताजालग्रथितमल अशा शब्दांनी केले आहे. गळ्यात नाना प्रकारचे एक किंवा अनेक पदरांचे हार घालत. काहीत मोत्यांच्या एकसरांत मध्ये मोठा इंद्रनीलमणि बसविला असे. त्याचा उल्लेख कालिदासाने आपल्या मेघदूतात एक मुक्तागुणमिव: भुव:स्थूलमध्येन्द्रनीलम् असा केला आहे.[३२] काही कंठिकेत (गळसरीत) माणिक व पाचू ही रत्ने ओवली जात असत, तसेच काही सोन्याच्या पुतळ्यांच्या बनविल्या असत. त्यांना निष्ककण्ठी असे नाव असे. प्राचीन काळची अनेक भारतीय व परदेशी सोन्याची नाणी वरच्या भागी भोक पाडलेली सापडली आहेत. ती अशा निष्ककण्ठ्यांत ओवली जात असावी हे उघड आहे.

अजिंठ्याच्या लेण्यांत कोठेही स्त्रीयांच्या नाकांत नथ दिसत नाही. त्यामुळे त्यावेळी नथ घालण्याचा प्रघात नव्हता हे उघड आहे. कानांत मात्र वाटोळी मोठी कुंडले घालीत. बाहूंवर कोपराच्या वर रत्नजडित केयूर असे. त्याला मोत्याचे लोंबते पदर लावले असत. हातात अनेक वलये घालत. यशोधरेने आपल्या हातात या वलयांशिवाय वर्तुळाकार कड्यांचा बनविलेला अलंकार सध्याच्या पाटलीच्या जागी घातला आहे. कमरेत नाना प्रकारच्या रत्नांनी बनविलेल्या अनेक पदरी रशना असत. त्यांना मणिमेखला म्हणत. काही रशनांना बारीक सोन्याच्या किंकिणी लावत, तेव्हा त्यांना कांची असे म्हणत. स्त्रियां घरांत फिरतांना या कांचीच्या आवाजाने हंसांना आकृष्ट करीत, असे वर्णन कवि कालिदासाने केलेले आढळते. पायात एक दोन वलये घालत असत.

सौंदर्य प्रसाधने :

स्त्री - पुरुषांना विभिन्न प्रकारची सौंदर्यप्रसाधने वापरण्याची आवड होती. सुगंधी तेल, अंजन, अंगराग, लेपन व सुवासिक शृंगार सामग्रीच्या आणि ओठाला लावण्यात येणाऱ्या रंगाचा सौंदर्यप्रसाधने म्हणून उपयोग केला जात असे. या प्रतिमेचे अवलोकन केल्यास लेण्यातील चित्रकलेचे स्त्रियांच्या अलंकाराची आणि त्या वापरत असलेल्या सौंदर्यप्रसाधनांची कल्पना येते. या स्त्रिच्या ओठाला लावलेला सोनेरी रंग स्पष्ट दिसतो. सौभाग्याचे प्रतीक म्हणून स्त्रिया आपल्या भागात सिंदुर भरत असत.

शिक्षण :

चारित्र्यसंवर्धन, व्यक्तिमत्वाचा विकास, कर्तव्यपरायणता व संस्कृतीसंवर्धन ही प्राचीन काळातील शिक्षणाची उद्दिष्ट्ये होती. या काळात पाठांतर पध्दतीने गुरुगृही शिक्षण देण्यात येत असे. पदपाठ, सूत्रपाठ, जयपाठ व धनपाळ अशा पाठांतराच्या चार पध्दती होत्या. गुरु मौखिक व चिंतनपर अशा दोन अध्यापन पध्दतीचा अवलंब करीत. वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, गणित, इतिहास, भुगोल, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, पुराणे, नीतीशास्त्र, व्याकरण व भाषाशास्त्रया विषयाचे शिक्षण देण्यात येत असे.[३३] ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्यांना शिक्षणाचा अधिकार होता. ब्राह्मण विद्यार्थ्यास वरील सर्व विषय शिकविले जात असत. क्षत्रियांना वरील विषयाशिवाय अन्विक्षिकी, वार्ता व दंडनितीचा अभ्यास करावा लागे. वैश्य विद्यार्थ्यांना वरील शिक्षणाशिवाय आपल्या व्यवसायाचेही शिक्षण दिले जात असे. बौध्द शिक्षण पध्दतीत प्रवज्या विधिनंतर मुलाच्या शिक्षणाचा प्रारंभ होत असे. या विविधप्रसंगी त्या मुलाचे केशवपन करण्यात येऊन त्यास पिवळी वस्त्रे परिधान करावी लागत असत. बौध्द विहारात दिल्या जाणाऱ्या शिक्षणात वैदिक साहित्य, त्रिपीटके, जैन साहित्य, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, साहित्य, व्याकरण, तर्कशास्त्र, न्याय, वैद्यक, दर्शन, योग व जातके या विषयांचा समावेश होता.[३४] बौध्द शिक्षण केंद्रानाही सम्राट आणि व्यापारी लोक दान देत असत. बौध्दाप्रमाणेच जैन लोकांनीही शिक्षण चळवळीवर भर दिला. त्यांनी धर्माचरण, संस्कृतीसंवर्धन आणि व्यक्तीमत्वाचा विकास यावर भर दिला होता. पैठण, नांदेड, कंधार, अजिंठा औरंगाबाद, वेरुळ, वत्सगुल्म, नंदिवर्धन व रामटेक ही याकाळातील शिक्षणाची केंद्र होती.

गुरुकूल ही प्राचीन शिक्षण संस्था होती. गुरुकूल नगराच्या बाहेर वनात असे. गुरुकूल हेच शिक्षणाचे सर्वप्रथम केंद्र होते. गुरुकूलाशिवाय राजधानी, तीर्थस्थळे, बौध्द विहार, जैन मंदिरे, हिंदू मंदिरे, मठ व अग्रहार ग्राम ही सुध्दा शिक्षणाची केंद्रे होती.[३५] राजे - महाराजाकडून विद्वान ब्राह्मणांना विद्यादानासाठी दान दिलेल्या गावाला अग्रहार म्हणत असत. अग्रहारात शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था अग्रहार मार्फत मोफत केली जाई.

मनोरंजन :

याकाळातील लोकांना विविध मनोरंजनाच्या साधनाद्वारे मनोरंजन करुन घेण्याची आवड होती. मनोरंजनाची साधने विविध प्रकारची होती. नृत्य, संगीत, शिकार करणे, रथदौड, द्युतक्रिडा, जुगार ,खेळणे, मल्लयुध्द, मुष्ठीयुध्द, गायन, ढोल, शततंतू, झांज, मृदंग वीणा, खंजिरी, बासरी, दुदूंभी, पणव व शंख ही वाद्ययंत्रे, घोडदौड, नाट्यअभिनय, मूक अभिनय, विदुषक, लीला, चारणगीत, रज्जूनर्तन, सांडाचे युध्द, मनुष्य व पशूच्या लढाई, नंट मदारीयाचे कलाप्रदर्शन, वादक, वाग्वीजक, नरनर्तक, नक्षाच्या झुंजी, कोंबड्याच्या झुंजी, होळी प्रमाणे रंग पंचमी खेळणे. मेंढ्याची टक्कर, पोहणे, नौका विहार, जल क्रीडा, झोके खेळणे, शरसंधान, विटीदांडू व धावणे ही मनोरंजनाची साधने होती. स्त्रिया रंग शिंपडणे, गायन, वादन, नाचगाणी, फुगडी, सोंगट्या, गंजीफा, सारीपाट व लपंडाव यासारखे खेळ खेळत असत.[३६] मैदानी, मर्दानी व बैठे खेळ हेही मनोरंजनाचे महत्त्वाचे साधन होते. मर्दानी खेळात मल्लयुध्द, शिकार, द्वंद्व, रथशर्यती, पोहणे, शरसंधान, विटीदांडू, कोंबड्यांची झुंज आर्दीचा समावेश होता, तसेच स्त्रियांच्या खेळांत सोंगट्या, फुगडी, रंग शिंपडणे, गायन, वादन, नृत्य, गंजीफा, सारीपाट आदि खेळ मोडत असत. द्वंद्व, रथदौड, शिकार, धावणे व पोहणे ही सुध्दा मनोरंजनाची साधने होती.

पोषाख :

अजिंठा लेणीतील मुर्तिशिल्प आणि चित्रावरुन वाकाटककाळातील स्त्री - पुरुषांच्या पोषाख्याची अर्थात वस्त्राची कल्पना येते. पुरुष फेट्यासारखे उष्णीय आणि कमरेखाली धोतर नेसत असत. धोतर कधी कधी निरी घालूनही वापरले जात असे. दरबारातील पुरुष बंदिस्त अंगरख्या व तंग पायजमा घालीत असत. पुरुष डोक्यावर शिरस्त्राण वापरीत असत. स्त्रिया कमरेच्यावरील उत्तरीय

म्हणजे ओढणीसारखे वस्त्र व कमरेखालील लुंगीसारखे वस्त्र वापरत असत. याशिवाय चोळी, साडी, कंचुकी व पायजमा घालीत असत. स्त्रि - पुरुषांना विभिन्न प्रकारची रंगीबेरंगी कपडे वापरण्याची आवड होती. श्रीमंत लोक तलम व रेशमी वस्त्रे वापरत असत. अजिंठा लेणीतील चित्रकलेत बहुतेक स्त्री-पुरुष अधोवस्त्र नेसलेले दिसतात. हे वस्त्र भिन्न भिन्न रंगाच्या पटट्याचे असे. पवनार येथे सापडलेल्या शिल्पपट्टांतील राम, लक्ष्मण, भरत व सीता यांची वस्त्रेही याच प्रकारची आडव्या पटट्यांची दाखविली आहेत, पण ती जास्त रुंद जवळ जवळ घोट्यापर्यंत खाली आलेली दिसतात. या वस्त्राचा एक शेवट डाव्या मांडीवरुन जाऊन त्याचा मागे कच्छ (कासोटा) होत असे. दुसरा शेवट दोन्ही मांड्यांना मागून पुढून वेष्टून नंतर मागे खोवून खाली शेपटासारखा लोंबत असे. या प्रकारच्या परिधान पध्दतीत पुढील भागी निऱ्या दिसत नसत, पण पाठीमागे मात्र अधोवस्त्राचा शेवट शेपटासारखा लोंबत असत.[३७] उत्तर हिंदूस्थानातील अन्तरीयक नेसण्याची पध्दत याच्या उलट होती. त्याच्या निऱ्यांचे सोगे पुढे सुटलेले सांची व भरहूत येथील शिल्पांत आढळतात. अजिंठ्याच्या वाकाटककालीन लेण्यांत अशा तऱ्हेच्या पुढील निऱ्या कोठेही दिसत नाहीत, पण मागील शेपटासारखे सोगे मात्र अनेक ठिकाणी दाखविले आहेत.

स्त्रियांचीही अधोवस्त्र नेसण्याची पध्दत याच तऱ्हेची होती, हे काही चित्रांत त्या पाठमोऱ्या बसल्या किंवा उभ्या असता त्यांच्या खाली लोंबणाऱ्या कासोट्यावरुन दिसते. काही स्त्रिया मात्र अधोवस्त्र कच्छरहित पध्दतीने नेसत असत हेही अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रावरुन स्पष्ट होते. काही पुरुष हल्लीच्या हाफपँट सारखा मांडचोळणा घालीत व तो कटिबंधाने कमरेत बांधत. त्याला चंडातक असे म्हणत.[३८] सतरा क्रमांकाच्या लेण्यातील उजव्या भिंतीजवळच्या खांबावरील यक्ष अशा तऱ्हेचे चंडातक नेसला आहे. बाणाच्या हर्षचरितांतील वर्णनावरुन स्त्रियाही अशा तऱ्हेचे चंडातक नेसून त्यावर पायघोळ कंचुक किंवा झगा घालत असे दिसते. पुरुष घोड्यावर बसतांना किंवा शिकारीला गेले असता तुमान घालून वर पूर्ण ब्राह्मांचा गुडघ्यापर्यंत खाली आलेला कोट घालत असे दिसते. सतराव्या क्रमांकातील लेण्यांत मृग जातकांत शिकारीला गेलेल्या राजाचा पोषाख या तऱ्हेचा आहे. अनेक नाण्यांवर गुप्तनृपतीचा पोषाखही याच तऱ्हेचा आहे, काही चित्रांत नोकरांनीही पूर्ण बाह्यांचे अंगरखे घातलेले आढळतात.

पुरुष सामान्यत: उत्तरीय वापरीत. ते जानव्याप्रमाणे डाव्या खांद्यावरुन व उजव्या काखेखालून जाई. त्यामुळे उजवा हात मोकळा राहत असे. काही चित्रांत हे उत्तरीय पुन: दुमडून डाव्या खांद्यावर टाकलेले दिसते. काही लोक उत्तरीयाची पट्टी करुन ते वैकक्षकासारखे वापरीत तसेच इतर काही ते कमरेला बांधून बध्दपरिकर होत. म्हैसूरच्या राजदरबारांत सर्व सेवकांनी अशा रीतीने बध्दपरिकर होऊन राहिले पाहिजे असा नियम होता. काही लोक एकच लांब वस्त्र नेसून त्याचाच नंतर उत्तरीयासारखा उपयोग करीत. काही पुरुष पूर्ण बाहयांचा अंगरखा घालून वर उत्तरीय पांघरत. सतराव्या लेण्यांच्या हंसजातकांतील प्रधानाचा पोषाख या तऱ्हेचा आहे.

काही स्त्रिया आपल्या स्तंनावर रुंद पट्टी बांधत असत. अशा पटट्यांना पयोधरपट असे म्हणत.[३९] मरणोन्मुख सुंदरीच्या चित्रांत तिला पंख्याने वारा घालणाऱ्या स्त्रीने अशा तऱ्हेचा पयोधरपट वापरलेला दाखविला आहे. विश्वन्तर जातकाच्या चित्रांत जूजक राजदरबारांत पैसे घेतो. त्यावेळी राजाजवळ बसलेल्या राणीनेही असाच पयोधरपट धारण केला आहे. शाकुंतल नाटकांत शकुन्तला प्रियवंदेने आपले वल्कल घट्ट बांधले आहे, अशी तक्रार करते. त्यावर प्रियवंदा म्हणते, पयोधर विस्तारयितृकमात्मनो योवनमुपालभस्व (स्तन मोठे करणाऱ्या आपल्या यौवनाला दोष दे), असा प्रसंग कालिदासाने घातला आहे. त्या ठिकाणीही पयोधरपट विवक्षित आहे यात संशय नाही. या पटाची गाठ पाठीवर बांधीत असल्यामुळे ती सैल करण्याकरिता शकुंतलेला आपल्या सखीची मदत घ्यावी लागली, हे उघड आहे. चोळी (कुर्पासक) घालण्याचा प्रघात सार्वत्रिक होता असे दिसत नाही. तथापि काही स्त्रिया तिचा उपयोग करीत यात संशय नाही. सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील चित्रात मायादेवी शुध्दोदन राजाला आपले स्वप्न सांगत आहे त्या ठिकाणी जवळ उभ्या राहिलेल्या स्त्रीने चोळी घातलेली दाखविली आहे.[४०] तसेच सतराव्या लेण्यांतील विश्वंतर जातकाच्या एका चित्रांत दान मागण्यासाठी अनेक याचक जमले आहेत. त्यामध्ये कडेवर मूल असलेल्या एका स्त्रीने वर रंगीत फुले काढलेली चोळी किंवा अर्धबाह्यांचे जाकीट घातल्याचे दाखविले आहे. याच लेण्यांतील सिंहलावदानांत तर हल्ली महाराष्ट्रीय स्त्रिया घालतात त्याप्रमाणे खणांची हिरवी चोळी घातलेली एक स्त्री दाखविली आहे. परदेशी शक व कुशाण जातीच्या स्त्रिया चोळीऐवजी

अर्धबाह्याचे जाकीट घालत असे दिसते. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत त्या प्रकारच्या स्त्रीचे चित्र रंगविले आहे.

मुलांची नेसण्याची पध्दत पुरुषांच्या सारखी असे हे सिध्दार्थ (गौतम) याच्या बाळपणाची चित्रे सोळाव्या लेण्यांत काढली आहेत. त्यावरुन स्पष्ट होईल. काही मुलांच्या अन्तरीयाचे मागचे शेपटे स्पष्ट दिसतात. काहीनी उत्तरीयासारखा स्कार्फ खांद्यावर टाकलेला दिसतो. सिध्दार्थ शाळेत शिकत असता त्याने पूर्ण बाह्यांचा अंगरखा घातलेला दाखविला आहे, तर त्याच्या काही मित्रांच्या कमरेच्या वरचा भाग उघडङ्गि आहे.

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुध्द तीन वस्त्रे वापरीत असे.[४१] १) अन्तरावासक (याला ह्युएनत्संग निवासन म्हणतो) किंवा अधोवस्त्र, हे कमरेत पटट्याने बांधले अस; २) उत्तरासंग, याचे दुसरे नाव संकक्षिका असावे. बाणाने उत्तरासंगाचा उल्लेख केला आहे. हे उत्तरीयासारखे पांघरले जात असे ; आणि ३) संघाटी किंवा लांब अंगरखा. अजंठ्याच्या लेण्यांत काही ठिकाणी गौतम बुध्दाने उत्तरासंग पांघरले आहे, तर काही ठिकाणी पायघोळ अंगरखा घातला आहे, असे दिसते.

केशरचना :

वाकाटक काळातील स्त्री - पुरुषांच्या केसरचनेची माहिती आपल्याला अजिंठा लेण्यातील चित्रकलेवरुन होते. स्त्रिया विविध प्रकारची केशरचना करीत असत. त्या आधुनिक स्त्रियाप्रमाणे वेण्या घालत असत. अनेक पेडांच्या वेण्या आणि साधी भांगवेणी घालण्यात येई. कधी कधी केस डोक्यामागे घेऊन त्यास पंख्याचा आकार दिला जाई. तसेच सर्व केस एकत्र सुध्दा बांधण्यात येत असत. त्यासाठी मोत्याच्या झालरीचा उपयोग करण्यात येत असे. अजंठ्याच्या चित्रांत स्त्रीपुरुषांची विविध प्रकारची केशरचना व शिरोभूषण दिसतात.[४२] सोळा व सतरा लेण्यांतील चित्रांत कोठेही पुरुषांनी शिरोवेष्टने किंवा पागोटी घातलेली आढळत नाहीत. राजे लोक डोक्यावर रत्नजडित उंच मुकुट घालीत. तसेच रुंद सोन्याचा पट्ट कपाळावर बांधून राजत्व दाखविले जाई. इतर मंत्री, अधिकारी व सामान्य जन आपले केस मानेवर, पाठीवर किंवा छातीवर सोडीत. काही लोक केसांवर कापडाची किंवा रेशमी वस्त्राची

पट्टी बांधत. तिचे वर्णन बाणाने धौतदुकूलपट्टिकापरिवेष्टितमौलि: अशा शब्दांनी केले आहे. सतराव्या लेण्यांत बुध्द धर्मोपदेश करीत असतां त्यांच्या श्रोतवृंदामध्ये बिंबिसार राजाजवळ बसलेल्या एका उच्च दर्जाच्या पुरुषाने अशी शुभ्र दुकूलपट्टिका बांधली आहे. तिच्या खाली त्याचे केस लहान लहान झुपक्यांनी कपाळावर पडलेले दिसत आहेत. दिसत आहेत. परकीय शक, कुशाण व पल्हव राजांपैकी काहीच्या डोक्यावर वर निमुळते होत गेलेले टोप आहेत. तसेच काहीनी रुंद वाटोळ्या टोप्या घातल्या आहेत. ब्राह्मणांच्या डोक्यावर शेंडीची गाठ असे. तशीच गाठ सिध्दार्थाच्या सहाध्यायी मुलाच्या डोक्यावर दाखविली आहे. काही मुलांच्या कानावर झुलपे (काकपक्षक) आहेत. अशी पांच

झुलपे ठेवण्याचा प्रघात होता, काही शिल्पांत पूर्णभद्र, पत्रिक वगैरेच्या डोक्यावर हल्ली न्यायाधीश केसांची टोपी (विग)घालतात तशी केशरचना दिसते.[४३] बौध्द भिक्षु केशकर्तन करीत असत, पण अजिंठ्याच्या चित्रांत सर्वांनी पूर्णपणे मुंडन केलेले दिसत नाही. श्रावस्ती येथे बुध्दाने चमत्कार दाखवून नग्न क्षपणकांना निरुत्तर केले त्या प्रसंगाच्या चित्रांत ते क्षपणक मात्र मुंडितशिर दाखविले आहेत. गौतम बुध्द, ऋषि, मुनि वगैरंच्या डोकीवर जटा आहेत.

स्त्रियांची केशरचना विविध प्रकारची असे. अजिंठ्याच्या लेण्यांत स्त्रियांच्या केशरचनेचे व शिरोभूषणांचे अनेक विविध व सुंदर प्रकार दिसतात की त्यांनी प्रेक्षकांचे मन आश्चर्यचकित होते. अजिंठ्याच्या सोळा व सतरा क्रमांकाच्या लेण्यांत बहुधा कोठेही स्त्रियांनी डोकीवरुन पदर घेतलेला किंवा अवगुंठन (बुरखा) केलेले दिसत नाही.[४४] क्वचित परकी दासदासीनी डोकीवर टोकाची वाटोळी टोपी घातली आहे. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत अशा ओबडधोबड चेहऱ्याच्या दासीच्या डोकीवर तुरा असलेली उंच वाटोळी टोपी आहे. फक्त एका ठिकाणी बुध्द धर्मोपदेश करीत असता त्याच्या श्रोतृवर्गात बसलेल्या एका पार्शियन स्त्रीने कशिदा काढलेली टोपी घातली आहे, तिला सफेद जाळीचा पडदा लावला आहे असे श्री यजदानी म्हणतात. हा अपवाद सोडला तर इतर कोठेही स्त्रियांचे अवगुंठन दिसत नाही. हल्लीही महाराष्ट्रात हीच पध्दत आहे. परंतु आज महाराष्ट्रीयन स्त्रिया कपाळावर कुंकू किंवा तिलक लावतात तसे मात्र या लेण्यांतील चित्रांत कोठेही दिसत नाही. दहाव्या लेण्यांतील चित्रांत पुरुषांच्या डोकीवर पागोटे, स्त्रियांच्या डोकीवर पदर व

भालप्रदेशावर मोठा वाटोळा तिलकआढळतो. तसेच पुरुषाच्या व स्त्रियांच्या वस्त्रांच्या निऱ्या व सोगे पुढे सोडलेले आढळतात.

घरे :

वाकाटक काळातील घरे विटा, चिखल, माती आणि गवताची असत. श्रीमंत लोक आणि गरिब लोकांची घरे यांच्यात फरक होता. श्रीमंत व गरीब लोकांची घरे ही बांधण्याकरिता दगडमातीचा उपयोग सर्रास केला जात होता, असे दिसत नाही. अजिंठ्याच्या उपरिनिर्दिष्ट लेण्यांतील चित्रावरुन तत्कालीन राजवाडे, घरे, दुकाने वगैरे लाकडाची असत, असे दिसते.[४५] बौध्द लोकांची चैत्य वाकाटककाळात व तत्पुर्वीही पर्वतात कोरली जात असत. पण त्यात अनावश्यक असलेल्या तुळ्या, कड्या वगैरेही कोरल्या जात . त्यावरुन त्यामध्ये तत्पूर्वीच्या लाकडी चैत्याचे अनुकरण केले होते हे स्पष्ट दिसते. किंबहूना कार्ल्यासारख्या काही अत्यंत प्राचीन चैत्य लेण्यांत अद्यापी काही लाकडी भाग अवशिष्ट आहेत, त्यावरुनही ही गोष्ट स्पष्ट होते.

अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रांवरुन तत्कालीन राजवाडे व श्रीमंत लोकांची उंच लाकडी खांबावर उभारली असत असे दिसते. हे खांब तीन ठिकाणी, खाली, मध्यभागी व शिरोभागी, कोरीवकामाच्या किंवा रंगाच्या पटट्यांनी सुशोभित केलेले असत. त्यांच्या खाली उथळ्या असत. वरील शीर्षके (Capitals) गोल, चपट्या किंवा उभट आकाराची असत. छावणीवर चैत्यवातायनाच्या आकृतीनी दिवाणखान्यांना (आस्थानमंडपांना) शोभिवंत केले जाई. दिवाणखाने बहुदा चौकोनी, काही ठिकाणी गोल आकाराचे असत. सोळा क्रमांकाच्या लेण्यांत जेथे शुध्दोदन राजाला मायादेवी आपले स्वप्न सांगत आहे तो दिवाणखाना वाटोळा दाखविला आहे. दिवाणखान्यात भिन्न भिन्न रंगाचे पडदे सोडून त्यांना सुशोभित करण्यात येई. काही घरांवर त्रिकोनी छपराचे कबुतरखाने असत. त्याचे वर्णन कालिदासाने आपल्या मेघदूतात तो कस्यांचिदवनालमौ सुप्तपारवतायां नीत्वा रात्रिक इत्यादी शब्दांनी केले आहे. राजवाड्याच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जाण्याकरिता जे दरवाजे असत त्यावर लांबट पिपाच्या आकाराचे (Barrel shaped) छप्पर असे व त्याला दोन्ही बाजूंनी चैत्यवातायनांच्या आकृतींनी सुशोभित केलेले असे. जरुर तेव्हा खांबावर शामियाने (उपकार्या) व तंबू (पटमंडप) उभारले जात. त्यांचा उल्लेख कालिदासाच्या

रघुवंशात विदर्भराजाने केलेल्या अजाच्या स्वागताच्या वर्णनात आला आहे. दुकाने लहान लहान व चौकोनी असून त्यांच्या पुढील बाजूत उन्हापावसापासून संरक्षण करण्याकरिता बासावर कापडाच्या किंवा तट्ट्याच्या झापड्या लावत. गरिबांची घरे हल्लीप्रमाणे गवताच्या छपरांची असत.

दिवाणखान्यांतील सामान (फर्निचर) साध्या प्रकारचे असे. बसण्यास चौरंगासारखे कातीव पायांचे मंच असत. त्यांना पाठीमागे टेकण्याकरिता गोल आकाराची पाठ व पुढे पाय टेकण्याकरिता पादपीठ असे. मंचावर टेकण्याकरिता हल्लीसारखे वाटोळे लोड असत. सैपाक घरात शिक्यावर एकावर एक भांडी रचून ठेवण्याची पध्दत हल्लीप्रमाणेच प्रचलित होती. भोजन करताना बसण्यास चौरंग व पुढे ताट ठेवण्याकरिता वाटोळ्या आकाराचे लहानसे मेज असे.

मानवाची शरीररचना :

वाकाटक काळातील मानवाच्या शरीररचना, आंतरजातीय रचनेची, अनेक समाजातील विभिन्न वंशाची कल्पना आपल्याला अजिंठा लेण्यातील चित्रावरुन येते. येथील काही लोक काळ्या वर्णाचे, खुजे व चपट्या नाकाचे असे दाखविले आहेत. हे या प्रदेशांतील मूळचे आदिवासी होत. काही नागवंशी होते. अजिंठ्याची लेणी ज्यांनी कोरली ते या वंशाचे असावेत. म्हणूनच त्यांनी अनेक लेण्यांत डोक्यावर फणा असलेल्या नागराजांची शिल्पे कोरली आहेत व चित्रे काढली आहेत. राजे, राण्या, ब्राह्मण, दास, दासी वगैरे आर्य वंशाचे लोक सर्वत्र आढळतात. हे गौरवर्णी, उंच व देखणे आहेत. याशिवाय शक, कुशाण, पल्हव, ग्रीक वगैरे परदेशी लोकही महाराष्ट्रांत येऊन स्थायिक झाले होते. त्यांची चित्रेही काही ठिकाणी आढळतात. सतरा क्रमांकाच्या लेण्यांत बुध्द धर्मोपदेश करीत असतां त्याच्या श्रोतृवर्गात बिंबिसार, अजातशत्रु, वगैरे राजांबरोबर
काही दाढी मिशा असलेले, डोक्यावर उंच निमुळता टोप आणि अंगात पूर्ण बाह्याचे कोट घातलेले काही पुरुष बसलेले दाखविले आहेत. ते या परदेशी वर्गाचे प्रतिनिधी असावे. त्याशिवाय एकदोन ठिकाणी रुंद चेहऱ्याचे बारीक मिशा व डोळे असलेले व लांब अंगरखा घातलेले असे पुरुष दिसतात, ते चिनी असावेत.

संगीत व प्राणी :

वाद्यांपैकी मृदंग, शंख, झांज, मुरली, एकतारी किंवा दोनतारी यांची चित्रे आहेत. मृदंग गळ्यांत पट्टयांनी समोर बांधून वाजविला जात असे. जनावरांपैकी हत्ती, घोडे, गाय, बैल, वाघ, सिंह, हरिण, माकड, कुत्रे हे चित्रांत रंगविलेले दिसतात. उंट मात्र कोठेही आढळत नाहीत. जलचर प्राण्यांमध्ये मासे, कांसव व सुसरी दिसतात.

४.२ धार्मिक स्थिती :

वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौध्द धर्म प्रचलित होते. हिंदू धर्मात शैव आणि वैष्णव संप्रदाय अर्थात पंथाचाही विकास झालेला होता.

हिंदू धर्म :

वाकाटक काळात अभूतपूर्व धार्मिक जागृती झाली होती. वाकाटक राजवंशाचा मूळ पुरुष गृहपती वाकाटक हा बौध्द धर्माचा अनुयायी होता. त्याने आंध्रप्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील अमरावती येथे आपल्या दोन पत्नी व इष्टमित्रासह जाऊन तेथे दान दिले होते. याचा उल्लेख तेथील स्तूपाच्या स्तंभलेखात आढळतो.[४६] पुढे गृहपती वाकाटकांच्या वंशजाचे धार्मिक परिवर्तन झाले आणि ते वैदिक पौराणिक धर्माचे अनुयायी बनले. त्यांनी वैदिक अर्थात हिंदू धर्माला राजाश्रय दिला. यासाठी वल्लूरच्या ब्राह्मण घराण्यातील मुळ पुरुष यज्ञपति याचे योगदान महत्त्वाचे ठरले.

यज्ञपति याच्या उपदेशावरुन प्रथम विंद्यध्यशक्तीने अनेक यज्ञ केले. यज्ञपतीचा मुलगा देव याचे राजदरबारात मोठे वजन होते. त्याच्या प्रभावामुळेच सर्व लोक व स्वत: राजे धार्मिक कृत्यात गढून गेले.[४७]

प्रथम प्रवरसेन हा धार्मिक वृत्तीचा राजा असून वैदिक धर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याने स्वत: अनेक श्रोत याग केले. त्याच्या वंशजांच्या बहुधा सर्व ताम्रपटांत त्याने केलेल्या चार अश्वमेधाचा व सप्तसोम संस्थेचा उल्लेख आढळतो. पुराणांत त्याच्या वाजपेय यज्ञांचा व त्यात त्याने दिलेल्या बहुमूल्य दक्षिणांचा मुद्दाम निर्देश केला आहे. या वाजपेय यज्ञांच्या अनुष्ठानानंतर त्याने सम्राट ही अत्यंत मनार्ह पदवी धारण केली. उत्तर किंवा दक्षिण भारतातील इतर कोणाही प्राचीन राजाने ही पदवी धारण केल्याचे इतिहासात नमूद नाही. पूर्वीच्या नृपतीप्रमाणे त्याने आपल्या धर्म विजयत्वाची निदर्शक अशी धर्ममहाराज ही उपाधिही धारण केली. तसेच विण्हुकड सातकर्णि राजाप्रमाणे तो

आपणास हारीतीपूत्र म्हणवून घेई. या उपाधीचा उल्लेख वाशीम ताम्रपटांत आला आहे. प्रवरसेनाचा देव नामक अत्यंत धार्मिक, विद्वान व कर्तबगार प्रधानमंत्री होता. त्याचे वर्णन घटोत्कच लेण्यांतील लेखांत आले आहे. त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक त्यांच्या अनुष्ठांनात गुंतले होते, असे त्यात म्हटले आहे. प्रथम प्रवरसेनाच्या कारकीर्दीतील अनेक श्रोत यज्ञाचे अनुष्ठान या विद्वान व धर्मशील मंत्र्याच्या उपदेशानुसार झाले असावे. द्वितीय प्रवरसेन हा शिवाचा भक्त होता. भगवान शंकराच्या कृपेने आपल्याला आपल्या राज्यात कृतयुग स्थापन करता आले असे त्याने आपल्या ताम्रपटात म्हटले आहे. त्याने भरपूर दानधर्म केला. त्याचे आजपर्यंत १३ दानपत्र मिळाले आहेत. इतके दानपत्र आजपर्यंत कोणत्याही प्राचीन भारतीय राजवंशाच्या राजाची मिळाली नाहीत.

वाकाटक काळात पौराणिक हिंदू धर्माचा मोठा विकास झाला. वाकाटक राजे शिवाचे उपासक असल्याने या काळात अनेक शिवमंदिरे बांधली गेली. अनेक श्रोत याग करुन सुविख्यात झ ालेल्या प्रथम प्रवरसेनाने वर्धा जिल्ह्यात भगवान शंकराचे देवालय बांधून त्याला प्रवरेश्वर असे नाव दिले होते. ते ज्या सव्वीस गावाच्या विभागात होते. त्याला त्याच्या योगे प्रवरेश्वर षडिंवशितवाटक असे नाव पडले होते, असे बेलोरा ताम्रपटावरुन समजते.[४८] प्रवरसेनाचा पुत्र प्रथम रुद्रसेन हा महाभैरवाचा भक्त होता. त्याने चांदा जिल्ह्यातील चिक्कम्बुरी (सध्याचे चिक्कमारा) येथे एक धर्मस्थान

(देऊळ) बांधले असल्याचा उल्लेख देवटेक येथील शिलालेखांत आढळतो.[४९] हे देऊळ अर्थातच महाभैरवाचे असावे. शंकराच्या प्रमाणे विष्णूची देवालयेही त्या काळी बांधली होती. वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन हा बहुधा आपली अग्रमहिषी प्रभावती ही रामभक्त होती.[५०] ती नंदिवर्धन राजधानी पासून केवळ तीन मैलांवर असलेल्या रामगिरीवर भगवान रामचंद्राच्या दर्शनास जात असे. त्या काळी रामगिरीवर श्रीरामप्रभूचे उत्तुंग देवालय बांधले असावे. त्यामध्ये रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे. कविकुलगुरु कालिदासानेही या रघुपतिपदाचा उल्लेख आपल्या मेघदूत काव्यात केला आहे. प्रभावतीगुप्ताचे आतापर्यंत सापडलेले दोन्ही ताम्रपट तिने कार्तिक शुक्ल एकादशीस उपवास करुन द्वादशीस पारण्याच्या वेळी रामगिरीवर दिले होते. एकांत रामगिरीस्वामीच्या (म्हणजे भगवान

रामचंद्राच्या) पादमूलांचा स्पष्ट उल्लेख आहे. दुसऱ्यांतील दानही भगवंताच्या पदमूलांना निवेदून एका भगवद् भक्त आचार्याला दिले होते. द्वितीय प्रवरसेनाच्याही एका ताम्रपटांत या पादमूलांचा उल्लेख आहे. त्यात दिलेल्या गावांचा अर्धा भाग चंद्र नामक वाण्याने विकत घेऊन दान दिला होता. विष्णूचे आणखी एक देवालय अश्वत्थखेटक (बैतूल जिल्ह्यातील सध्याचे पट्टन) येथे होते. त्यातही महापुरुषाच्या (विष्णुच्या) पादुकांचीच पूजा केली जात असे. त्या देवळाला जोडून असलेल्या अन्नसत्राकरीता द्वितीय प्रवरसेनाने काही भूमि दान दिली होती.

श्रीरामचंद्राचे आणखी एक उत्तुंग देवालय वर्ध्याजवळ पवनार येथे धाम नदीच्या तीरावर, जेथे सध्या श्री विनोबाजींचा जेथे आश्रम आहे त्या ठिकाणी, होते असे दिसते. त्याला रामायणातील विविध प्रसंगाच्या शिल्पाकृतीनी भूषित केले होते. त्यापेकी काही शिल्पे काही वर्षापूवी तेथे सापडली होती. **वैष्णव संप्रदाय :**

वाकाटक काळात वैष्णव संप्रदायाचाही विकास झाला. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय प्रवरसेन हे दोन वाकाटक राजे विष्णूचे उपासक होते. बालाघाट ताम्रपटात द्वितीय प्रवरसेनाचे वर्णन परमभागवत असे केले आहे.[५१] विष्णूला परमेश्वर मानुन त्याची पूजा व उपासना करणाऱ्या पंथाला किंवा संप्रदायाला वैष्णव संप्रदाय म्हणतात. हा संप्रदाय व्यापक अर्थाने भागवत धर्म म्हणून ओळखला जातो.[५२] ऋग्वेदात विष्णू ही शुद्र देवता आहे. ते आदित्यरुप व अवकाश देवता आहे. ऋग्वेदात विष्णूच्या त्रिपाद विक्रमाचा गौरव केला आहे- विष्णू ही सृजनदेवता असल्याचे समजले जाते. वैदिक काळात विष्णूला फारसे महत्व नव्हते. परंतु नंतरच्या काळात त्याचे महत्व वाढत गेले. सृजन कल्पनेशी असलेल्या संबंधामुळेच विष्णूशी नारायणाचे ऐक्य कल्पिणे शक्य झाले. पाण्यापासून सृष्टीची निर्मिती झाल्याचे वर्णन वैदिक वाङ्मयात ऐक्य कल्पिणे शक्य झाले. पाण्यापासून सृष्टीची निर्मिती झाल्याचे वर्णन वेथ्दक वाङ्मयात आढळते. या अव्यक्त जलरुप आदितत्वासच नारायण म्हटले आहे आणि त्यातून हिरण्यगर्भ अंड निर्माण होऊन जग निर्माण झाले. नारायण हे देवमानवाचे विश्रांतीस्थान आहे. विष्णूने त्रिविक्रमाने देवमानवांना विश्रांतीसाठी स्थान प्राप्त करुन दिल्यामुळेच विष्णू हाच नारायण होय- शतपथ ब्राह्मण ग्रंथात विष्णूला पुरुष नारायण म्हटले आहे. नारायणाची उपासना अनेक उपनिषदांतही सांगितली आहे. तैतरिय अरण्यकात

नारायणाला भगवान हरी म्हटले आहे. महाभारतात नारायणीधोपाख्यान आलेले आढळते. या नारायणीय पंथात अहिंसेला प्राधान्य आहे. यज्ञयागाने ईश्वरप्राप्ती होते अशी लोकांची श्रध्दा होती. पंचरात्रसंहिता हा या पंथाचा आगमग्रंथ आहे. यामध्ये स्मरण, कीर्तन, वंदन, पादसेवन, अर्चन व आत्मसमर्पण ही षडविध नारायण भक्ती सांगितली आहे.

विष्णू हा यज्ञरुप व सर्व देवात श्रेष्ठ असल्याची श्रध्दा लोकांत निर्माणझाली. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथात या श्रध्देचे मूळ आहे. विष्णूने वेळोवेळी मत्स्यावतार, कुर्मावतार, वराहावतार, नरसिंहावतार, वामनावतार, परशुमावतार, रामावतार, कृष्णावतार, बुध्दावतार व कल्की अवतार हे दहा अवतार घेऊन पृथ्वीवर निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत आपली विधायक भूमिका निभावली, असा लोकविश्वास आहे.

हरिवंश, विष्णूपुराण व भागवत ग्रंथ हे वैष्णव संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ आहेत. काळात वैष्णव संप्रदाय उदयास आल्याचे मानले जाते. याच काळात हिंदू, बौध्द व जैन तिन्ही धर्म प्रचलित होते. याच काळात ब्रह्मा, विष्णू व महेश ही त्रिदेव संकल्पना रुढ झाली. याच काळात वराह, वामन, नृसिंह व रामावतारातील विष्णूपूजा सुरु झाली. वैदिक यज्ञ मागे पडले व पौराणिक धर्माचे अनुकरण वाढले. उपासनेत भक्तीला प्राधान्य मिळाले. वाकाटक काळात अनेक ठिकाणी विष्णूची मंदिरे उभारण्यात आली. नांदेड जिल्ह्यात हदगाव तालुक्यात शिऊर येथे वैष्णव पंथाच्या लेणी आहेत. या लेण्यात स्तंभावर वैष्णवपंथाची विविध शिल्प कोरलेली आहेत.

शैव संप्रदाय :

वाकाटक काळात वैष्णव संप्रदाय प्रमाणेच शैव संप्रदायही प्रचलित होता. वाकाटक राजे शिवाचे उपासक होते. शिवाला परमेश्वर मानून त्याची उपासना करणाऱ्या पंथ किंवा संप्रदायाला शैव संप्रदाय म्हटले जाते. शिव हा भारतात सर्व जाती - जमातीतील लोकांकडून पूजेला जाणारा महादेव आहे. शैव संप्रदायांतर्गत पाशुपत, अघोरी, कापालिक, नाथ, काश्मिरी शैव, नयन्यार शैव, वीरशैव (लिंगायत) इत्यादी उपपंथ आहेत.[५३] या सर्व उपपंथानी शैव संप्रदायाचा संपूर्ण भारतात प्रसार केला. बौध्द धर्माच्या विरुध्द निर्माण झालेल्या प्रतिक्रियामुळे जेव्हा वैदिक धर्माचे पुनरुत्थान झाले, तेव्हा या प्राचीन धर्माने जे अनेक परिवर्तित रुप प्राप्त केले, त्यापैकीच एक शैव संप्रदाय होय.

शिव हा वैदिक देवतापैकीच एक होता. शिवाचेच दुसरे रुप रुद्र आहे. वेदवाङ्मयात रुद्र या देवतेची स्तुती करणारी तीन सुक्ते आढळतात. वैदिक साहित्यात या देवतेसाठी शिव व रुद्र या दोन्ही नावाचा उपयोग केला आहे. रुद्र हे त्याच्या रौद्र अर्थात भीषण रुप प्रकट आणि शिव हे त्याचे कल्याणकारी रुप दर्शविते. जेव्हा ही देवता दुष्टाचे दमन किंवा सृष्टीचा प्रलय करते तेव्हा ती रुद्र रुप धारण करते आणि जेव्हा ही देवता सृष्टीचे पालन करते तेव्हा त्यास शिव आणि शंकर म्हटले जाते. डॉ. मॅकडोनल यांनी रुद्र व अग्नी यांच्यातील साम्यावरुन रुद्र हा विनाशाचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे. डॉ. भांडारकर रा.गो. यांनीही रुद्र देवतेस सृष्टीतील विध्वंसक शक्तीचे प्रतीक म्हटले आहे. रुद्राला अथर्ववेदात पशुपती व महादेव ही विशेषणे प्रथम लावलेली आढळतात. त्यानंतरच्या काळात त्यास शिव, शिचतर, शंकर, गिरीकांत व गिरीश इत्यादी नावे देण्यात आली. वैदिक रुद्रालाच अग्नी या अर्थाने पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ या तीन ठिकाणी जन्मणारा म्हणून त्र्यंबक असे नाव रुढ झाले. भारतात शिवाची उपासना लिंग रुपाने प्रचलित आहे. सिंधू संस्कृतीत शिवाची उपासना लिंग रुपाने केली जात होती. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात शंकूच्या आकाराचे व दंडगोलाकार लिंग मिळाले आहेत. हे लिंग दगड व चुन्यापासून तयार केले होते. शिवलिंग हे जननेंद्रियाचे प्रतीक समजले जाते. वैदिकांनी सिंधू संस्कृतीतील लिंगोपासना आत्मसात केली व तीच पुढे रुढ झाली. रामायण व महाकाव्यात शिवाला महादेव, महेश्वर, शंकर व त्र्यंबक व इत्यादी नावांनी उल्लेखिले आहे तर महाभारत या महाकाव्यात योग व तपश्चर्या या साधनांना शिवाच्या प्राप्तीचे मार्ग म्हणून महत्व देण्यात आले आहे.

पौराणिक वाङ्मयात शिव व पार्वती यांच्या ऐक्याचे तत्वज्ञान मांडले आहे. तसेच त्यामध्ये त्यांच्या उपासनेचा भक्तिमार्गही कथन करण्यात आला आहे. याच काळात भारतात अनेक शिवमंदिरांची स्थापना झाली आणि शिवलिंगाची पूजा सुरु

झाली. सामान्य शैव पंथ सौम्य आणि बुध्दिनिष्ठ असून विद्यज्ञ, क्रिया, योग आणि चर्या या चार पादांमधून शैव पंथाची शिकवण विशद केली आहे.[५४] विद्या या पदामध्ये पशू, पती व पाश यांची माहिती दिली आहे. पती म्हणजेच शिव हा कर्मपाशातून मुक्त आहे आणि तो पशूच्या म्हणजेच जीवाच्या कर्मानुसार उपभोग्य विश्वांची निर्मिती करतो- पती हा मंत्र, मंत्रेश्वर, महेश्वर आणि मुक्त

आहे, तर अमुक्त पशु, मल, कर्म, माया व रोधशक्ती अशा चार पाशांनी बध्द होतो. मलपाशामुळे ज्ञान आणि कार्यशक्ती अवगुंठित होते, तर कर्मपाशामुळे पशूला कर्मफलाचा भोग प्राप्त होतो. पशू हा मायापाशामुळेच मायाजालात अडकतो. तसेच रोधशक्तीमुळे आत्मस्वरुप झाकले जाते. क्रिया, योग व चर्या हे मुक्तीचे मार्ग आहेत. मुक्तावस्थेत पशू शिवानुग्रह झाल्यामुळे शिवस्वरुप बनतो, परंतु मुक्तावस्थेतही पशू आणि पती यांचे एकात्म कल्पिले नाही. त्यामुळे हा पंथ द्वैतवादीच आहे. क्रियापादात संध्या, पूजा, जप व अग्निहोत्र हे वर्णाश्रम विहित मार्ग सांगितले गेले, तर योगपादात योग साधनेचा मार्ग सांगितला आहे. लिंगपूजा, नंदीपूजा, मंत्रजप आणि पंथोचित हा आचार चर्यापादात कथन केला आहे. या त्रिविध मार्गाने पाशमुक्त होऊन पशू शिवस्वरुप बनतो, अशी शैव धर्माची शिकवण होती. वाकाटक राजांनी अनेक ठिकाणी शिवमंदिरे बांधून शैव संप्रदायाचा विकास केला.

बौध्द धर्म :

वाकाटक काळात हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मही प्राचलित होता. परंतु हिंदू धर्माच्या तुलनेत या धर्माचा प्रभाव कमी होता. बौध्द धर्म हा प्राचीन धर्म असून गौतम बुध्द हे या धर्माचे संस्थापक आहेत.

गौतम बुध्दाच्या हयातीतच मराठवाड्यात पर्यायाने दक्षिण भारतात बौध्द धर्माचा प्रसार झालेला होता. जैन धर्माच्या तुलनेत महाराष्ट्रात बौध्द धर्माचाच सर्वप्रथम प्रसार व प्रभाव निर्माण झाला. बौध्द धर्म हा अवैदिक धर्मापैकी सर्वात लोकप्रिय धर्म होय. गौतम बुध्दाच्या आणि त्यांनी स्थापन केलेल्या संघाच्या शिकवणीमुळे समाजाला एक प्रकारची संघटन शक्ती प्राप्त झाली, त्यामधूनच एका नवीन संस्कृतीचा उदय झाला. गौतम बुध्दांनी वैदिक धर्मातील कर्मकांडावर चढविलेल्या प्रखर हल्ल्यामुळे आणि सांघिक जीवनाच्या प्रेमळ शिकवणीमुळे बौध्द धर्माच्या प्रसाराला गती मिळाली. याशिवाय त्यांनी जातीयतेवर प्रखर हल्ले चढवून जन्मावरुन जात ही कल्पना नाकारली. तसेच त्यांची मानवतावादी शिकवण समतेच्या तत्वावर आधारलेली होती.[५५] त्यामुळे बौध्द धर्माचा दक्षिण भारतात प्रसार झपाट्याने होऊ शकला. गौतम बुध्दांनी सर्वप्रथम कौंडिण्य, अश्वजित, महानाम, कश्यप आणि भद्रिक या पाच तपस्व्यांना सारनाथ येथे प्रथम

आपल्या नव्या धम्माची दीक्षा दिली.[५६] यानंतर त्यांनी वाराणसी नगरातील यश या मुलास वत्यांच्या ५४ मित्रांना धम्मदीक्षा देऊन त्यांना भिक्खू संघात सामील करुन घेतले.[५७] यश हा एक धनाढ्य व्यापाऱ्याचा मुलगा होता. गौतम बुध्दांनी यश व त्याचे ५४ मित्र जे भिक्खू झाले होते ते आणि ज्या पाच तपस्व्यांना प्रथम दीक्षा दिली होती ते पाच भिक्खू, अशा साठ भिक्खुंना एके दिवशी बोलाविले आणि त्यांना कल्याणप्रद अशा आपल्या सद्धम्माचा उपदेश करण्यासाठी चारही दिशांना संचार करण्याचा आदेश दिला.[५८] अशाप्रकारे धम्म प्रचारक, भिक्खू व व्यापाऱ्यामुळे गौतम बुध्दांच्या हयातीतच बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्र व दक्षिण भारतात झाला होता. याचे श्रेय बावरी या वैदिक पंडिताला व त्यांच्या शिष्य समूहाला द्यावे लागते.[५९] बावरी हा वैदिक पंडित उत्तर भारतातील कोसल देशातील श्रावस्ती येथील रहिवाशी असून तो गौतम गुध्दाला समकालीन होता.[६०] इ.स.पू. ८०० ते इ.स.पू. ६०० मध्ये बावरी उत्तर भारतातून दक्षिण भारतात आला आणि तो अस्मक व मुलक या दोन राज्याच्या सरहद्दीजवळ गोदावरी नदीच्या तीरावर पैठण परिसरात आश्रम थाटून राहू लागला.[६१] त्याने तेथे एक महायज्ञ करण्याची तयारी सुरु केली. याचवेळी त्याला गौतम बुध्द व त्यांच्या मानवतावादी धर्म याची वार्ता समजली. याचा पडताळा पाहण्यासाठी, बुध्दाचे तत्वज्ञान कसून पाहण्यासाठी आणि शक्य झाल्यास बुध्दाला आव्हान देण्यासाठी त्याने आपल्या सोळा शिष्याना बुध्दांकडे राजागृह येथे धर्मवादासाठी पाठविले.[६२] गौतम बुध्दांशी झालेल्या चर्चेत या सोळा शिष्यांना पराभव स्वीकारावा लागला. बुध्दांच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या या सोळा शिष्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला व ते परत पैठणला आपल्या गुरुकडे आले.[६३] त्यांनी आपला अनुभव आपले गुरु बावरीला सांगितला. शेवटी बावरी सुध्दा बुध्दांच्या व्यक्तिमत्व व विचाराने प्रभावित झाला.[६४] आणि त्यानेही बौध्द धर्माची दीक्षा घेतली. अशा रीतीने बावरी व त्यांचे सोळा शिष्य हे महाराष्ट्रातील पहिले बौध्द भिक्खू व धर्मप्रसारक ठरतात. त्यांनी व त्यांच्या शिष्यपरंपरेने दक्षिण भारतात बौध्द धर्माचा प्रसार केला.

ठाणे जिल्ह्यातील सोपारा (सुप्परका) येथील व्यापारी अर्हत पुण्ण याने श्रावस्ती येथे गौतम बुध्दांकडून धम्माची दीक्षा घेतली.[६५] यानंतर त्याने सोपारा येथे विहार बांधला व धम्माचा प्रचार सुरु केला. ईसिदिन्ना हा गोवा, महाड किंवा वाई येथील रहिवाशी असावा.[६६] तो सोनापरांत

देशातील व्यापारी होता. त्यानेही विहार बांधून बौध्द धर्माचा प्रचार सुरु केला. पंपसुयनी व सारथ्यप्पकरिणी या ग्रंथात पूर्णाच्या आमंत्रणावरुन गौतम बुध्द सोपाऱ्याला गेले होते, असा वृत्तांत आढळतो. सोपारा येथेच गौतम बुध्दांनी कृष्ण व गौतम या प्रबळ राजांना धम्मदीक्षा दिली होती. कृष्ण राजाच्या नावावरुन सोपाऱ्या शेजारच्या डोंगराला कान्हेरी असे नाव पडले. सोपाऱ्याच्या शेजारील मुसालिक नावाच्या टेकडीवर राहणाऱ्या ब्रह्मर्षीला गौतम बुध्दांनी धम्मदीक्षा दिली. सोपारा येथील भवनाच्या गृहस्थानेही बुध्दांकडून धम्माची दीक्षा घेतली होती, असा उल्लेख दिव्यावदान या ग्रंथात आढळतो.[६७] अशाप्रकारे साध्या आणि सोप्या शिकवणूकीमुळे आणि गौतम बुध्दांच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे तसेच धम्मप्रचारक बौध्द भिक्खमुळे बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्रात झाला.

वाकाटक काळात बौध्द धर्माला वाकाटक राजांनी आश्रय दिला. त्यामुळे याकाळात औरंगाबाद, वेरुळ, अजिंठा आणि घटोत्कच याठिकाणी बौध्द लेणी खोदण्यात आल्या. हरिषेण नृपतीचा सचिव वराहदेव याला ऐहिक वस्तूंचे क्षण भंगुरत्व पटल्यामुळे त्याने अजिंठा येथे आपल्या मातापित्यांना उद्देशून एक भव्य विहार लेणे कोरविले, व त गवाक्षे, दरवाजे, सुंदर चित्रावलि, अप्सरांच्या व इतर मूर्ति इत्यादिकांनी सुशोभित केले. त्याच्या मागील बाजूस बुध्दमूर्ति असून जवळच पाण्याचे टाके व नागराजाची मूर्ति असलेले लहानसे लेणे कोरले आहे. हे सुंदर लेणे त्याने बौध्द संघाला अर्पण केले.

वराहदेवाने अजिंठ्याच्या पश्चिमेस सुमारे दहा मैलांवर गुलवाडा येथे आणखी एक विहार कोरविले.[६८] त्याला आता घटोत्कच लेणे नाव आहे. याच्याही आंत मागील बाजूस धर्मचक्रप्रवर्तन मुद्रा असलेली भव्य बुध्दमूर्ति आहे. हे लेणे सुंदर शिल्पांनी व उत्तम नक्षीकाम केलेल्या स्तंभांनी सुशोभित केले आहे, पण यात चित्रे नाहीत. यातील लेखांत वराहदेवाने आपल्या पूर्वजांची माहिती दिली होती. पण तो लेख आता फारच खंडित झाला आहे. जवळच आणखी एक लहानसे विहार लेणे आहे. तेंही याच सचिवाने खोदून बौध्द संघास अर्पण केले आहे.

अजिंठ्यांची आणखी दोन लेणी वाकाटककालीन आहेत. ती म्हणजे क्रमांक १७ चे विहार लेणे व क्रमांक १९ चे चैत्य लेणे ही होत. ही दोन्ही लेणी हरिषेणाचा मांडलिक असलेलया ऋषीक देशाच्या एका अधिपतीने कोरविली. त्याने १७ क्रमांकाच्या लेण्यांत आपल्या पूर्वजांचा व

आपला वृत्तांत देणारा लेख कोरविला होता, पण दुर्दैवाने तो आता फार खंडित झाला आहे. अवशिष्ट भागावरुन असे दिसते की या राजाला आपला धाकटा भाऊ रविसांब याच्या अकाली निधनाने अत्यंत दु:ख झाले. संसाराची असारता पटल्यामुळे त्याने अत्यंत धार्मिकपणाने आपले आयुष्य घालविण्याचा निश्चय केला आणि अनेक स्तूप व विहार यांनी पृथ्वीला सुशोभित केले. त्याने अजिंठा येथे भगवान बुध्दाचे चैत्य आंत असलेला एकाश्म मंडप कोरविला. तेच सतरा क्रमांकाचे लेणे होय. जवळच त्याने गोड, हलके, स्वच्छ व थंडगार पाणी असलेले सुंदर टाके कोरविले. तसेच त्याच्या पश्चिमेस त्याने एक भव्य गन्धकुटीहि खोदविली. तिला आता क्रमांक एकोणीसचे चैत्य लेणे म्हणतात. ही लेणी त्यातील सुंदर शिल्पे व चित्रे यामुळे सुप्रसिध्द झाली आहे. वाकाटक राजांनी हिंदू मंदिरांना व ब्राह्मणांना भरपूर दान दिले. परंतु त्या तुलनेत मात्र बौध्द धर्मास कमी दान देण्यात आले. हेही काही कमी नव्हते.

४.३ आर्थिक स्थिती :

वाकाटक काळातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती होता. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधनही शेती हेच होते. उत्पादनाचा दहावा भाग भूमीकर म्हणून शेतकरी राज्याला देत असत. राजाचे शेतकऱ्याकडे सर्वाधिक लक्ष असे. शेतकरी युध्द व राजकारणापासून दूर होते. शेतीतील पीक नष्ट होऊ नये यासाठी सैनिकांनी पिकातून जाऊ नये असा राजाचा आदेश असे. शेती हल व बैलाच्या मदतीने केली जाई. उत्पादन वाढण्यासाठी विभिन्न खतांचा वापर करीत. तसेच पाणीपुरवठा करण्यासाठी तलाव, कालवे व विहिरी खोदल्या जात. त्यासाठी राज्याकडून शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान दिले जात असे. कालवे व पाटबंधाऱ्यातून राज्यामार्फत शेतीला पाणीपुरवठा केला जात असे. त्या मोबदल्यात काही कर शेतकऱ्यांकडून घेतला जात असे. शेतकरी हेच भूमीचे मालक असत. वराहमिहीरच्या बृहतसंहिता मध्ये रब्बी, खरीप व आणखी एका तिसऱ्या पिकांचा उल्लेख आला आहे. थोडक्यात, प्राचीन भारतातील लोकांच्या आर्थिक जीवनात शेती व्यवसायाला सर्वाधिक महत्व होते. लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून होती.[६९]

या काळातील लोक शेती करण्यासाठी विभिन्न अवजारांचा वापर करीत होते. बैल हा शेतीच्या कार्यात उपयोगी पडणारा महत्वाचा प्राणी होता. बैलाच्या मदतीने शेतीची संपूर्ण मशागत

केली जात असे. हल (नांगर) हे शेती उपयोगी महत्वाचे साधन होते. प्राचीन काळात हल (लहान लाकडी नांगर) व नांगल (मोठा लोखंडी नागर) असे नांगराचे दोन प्रकार होते. त्यामुळेच शेतकऱ्यांना हलिक असे म्हटले आहे. नांगराचा उपयोग शेतीकार्यात वैदिक काळापासून करण्यात आला आहे. नांगराने जमीन नांगरली जात असे. याच नांगराने दोन ते चार इंच खोल रेषा जमिनीत ओढली जाई. याच रेषेत बी बियाणे टोचली जात असत. नांगरास धारदार फाळ असे नांगर ओढण्यासाठी बैलांचा वापर केला जाई. या काळात सहा, आठ, बारा व चोवीस बैल नांगरास जुंपत असल्याचे उल्लेख संहिता व ब्राह्मण ग्रंथात आढळतात. शेतीचे लहान शेती व मोठी असे दोन प्रकार प्रचलित होते. मोठ्या शेतात पाचशे नांगराची आवश्यकता पडत असे. तसेच अनेक मजूर काम करीत असत. पिकांच्या उत्पादनात वाढ व्हावी यासाठी प्राण्यांच्या शेणाचा खत म्हणून वापर केला जाई. शेतकऱ्यांना उत्पन्नाचा दहावा हिस्सा शेतसारा (भूमीकर) राजांना द्यावा लागे.

लोक वर्षातून दोन वेळा आणि क्वचित प्रसंगी तीन वेळा पीक घेत असत. शेती ही मान्सुनवर अवलंबून असे.[७०] पाऊस कमी पडला तरी पिकांचे नुकसान होत असे व पाऊस अधिक झ ाला तरीही पिकांचे नुकसान होत असे. पाऊस वेळेवर पडल्यास पीक जोमदार येत असे ; परंतु पाऊस वेळेवर पडेलच असे नव्हते. त्यामुळे शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी प्राचीन काळात विविध योजना साकार झालेल्या होत्या. नद्यामधील पाणी अडवून धरणे व कालवे बांधले जात असत. अनेक विहिरी खोदल्या जात व अशा विहिरीतून पाणी बाहेर काढण्यासाठी रहाटाचा वापर केला जाई. हे पाणी शेतीला पुरविले जाई. वैदिक काळात विहिरीवर झाकण बसविले जात असे. सम्राट अशोक व चंद्रगुप्त मौर्याच्या काळात नद्यांचे पाणी अडवून अनेक ठिकाणी धरणे बांधली होती. विहिर, तलाव व धरणे बांधण्यासाठी राज्याकडून पैसा खर्च केला जाई. तसेच शेतकऱ्यांना अनुदानही दिले जाई. पाणीपुरवठ्याचा मोबदला म्हणून शेतकऱ्यांना राज्याच्या तिजोरीत काही कर भरावा लागे.

या काळात विविध प्रकारची पिके घेतली असत असत. वर्षातून कमीत कमी दोन व क्वचित प्रसंगी तीनही पिके घेतली जात असत. शेती संपूर्णपणे मान्सुनवर अवलंबून असली तरी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी नद्यांवर धरणे व कालवे बांधण्यात आले. तसेच विहिरीही

खोदण्यात येत असत, शेतीत रब्बी आणि खरीप पिके घेतली जात असत. तांदुळ , चरु, जव, ज्वारी, कापूस, हरभरा, एरंडी, भुईमुग, तीळ मसुर, मूग, मिरची, अद्रक, हळद, अलसी व सरस या पिकांचे उतपादन घेतले जाई. तसेच अनेक प्रकारच्या वृक्षांचीही लागवड केली जात असे. औषधीयुक्त वृक्ष मोठ्या प्रमाणात लावत असत. विविध फळांची झाडेही लावली जात असत. अंगूर, शाक व ईख ही महत्त्वाची फळझाडे होती.

राजा हा जमिनीचा प्रमुख नाही तर प्रजेचा प्रमुख मानला जात असे. त्यामुळे जमिनीवरील खाजगी मालकी मान्य केल्याचे दिसते. राजाला नियमितपणे कर देण्याचाही अधिकार ऋग्वेदकाळात नव्हता. राजाने युध्दात विजय मिळविल्यास लोक खुशीने व स्वइच्छेने आपल्या ऐपतीनुसार त्यास वस्तू किंवा धान्य देत असत. ऋग्वेद काळात जमिनीची मोजणी केली जात होती. यावरुन जमिनीच्या खाजगी मालकीची माहिती मिळते. अत्री ऋषीची कन्या अपाला ही आपल्या पित्याच्या जमिनीची उत्पादनक्षमता वाढावी व पीक भरपूर यावे यासाठी इंद्राची प्रार्थना करीत होती. यावरुनही स्पष्ट होते की, या काळात जमिनीची खाजगी मालकी मान्य करण्यात आली होती. ब्राह्मण ग्रंथ, बौध्द व जैन साहित्य आणि नारदस्मृती व बृहस्पती स्मृतीवरुनही जमिनीवरील खाजगी मालमत्तेची माहिती मिळते. असे असले तरी राजा हाच सर्व जमिनीचा मालक आहे अपाणि प्रजेकडे लागवडीसाठी असलेल्या जमिनीच्या बदल्यात कर घेण्याचा अधिकारही त्याला असल्याचे मान्य करण्यात आले होते. जोपर्यंत जमीनधारक राजाला कर देईल तोपर्यंत त्यास जमिनीचा उपभोग घेता येत असे. मौर्य, गुप्त, वाकाटक[७१] आणि वर्धन काळातही खाजगी मालकी मान्य केलेली होती आणि जमीनधारक हा राजाला वार्षिक कर देत असे.

जमिनीवरील कर हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख आणि महत्त्वाचे साधन होते. हा कर घेत असताना उत्पादकांची उत्पादनक्षमता नष्ट होणार नाही याचीही काळजी घेतली जात होती. आकस्मिक संकटाच्यावेळी मात्र कराचे प्रमाण कमी केले जात असे जमिनीची उत्पादनक्षमता, पाणीपुरवठ्याची सोय व पिकांचा विचार करुन करांचे प्रमाण ठरविले जात होते. ग्रामणी, अनुभवी व वृध्द लोकांच्या संमतीनेच करांचे प्रमाण ठरविले जात असे. नव्याने जमीन लागवडीखाली

आणणाऱ्यास सुरुवातीस काही वर्षे करीत सूट दिली जात असे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने उत्पादनावर कर घेतला जाई.

शेतीप्रमाणेच प्राचीन भारतातील लोकांचा पशुपालन हा दुय्यम परंतु महत्त्वाचा व्यवसाय होता.[७२] दूध, दही, लोणी, तूप आणि दुधापासून बनविलेले अनेक पदार्थ हे लोकांचे प्रमुख अन्न होते. त्यामुळे दूध देणारे प्राणी पाळण्यावर लोकांचा सर्वाधिक भर होता. गाय, बैल, घोडा, गाढव, बकरी, मेंढी, कुत्रा, हत्ती, डुक्कर, व खेचर हे प्राणी पाळले जात होते. गाईचे समाजात महत्वाचे स्थान होते. त्यामुळे लोक सर्वाधिक गाई पाळत असत. गाय हीच मूल्यवान संपत्ती होती. यज्ञप्रसंगी मूळ दक्षिणा म्हणून गाय दिली जाई. तसेच गाय ही वस्तुविनिमयाचे महत्वाचे साधन होते. गाय पवित्र वस्तू ठरल्यामुळे गाईचा वध करणाऱ्यास मृत्यूदंड दिला जाई. एखाद्याकडे अधिक गाई असणे म्हणजे ते त्याच्या प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाई. गाय भेट म्हणूनही दिली जात असे. राजा जनकाने आपल्या सभेतील विद्वानांचा सन्मान एक हजार गाई भेट देऊन केला होता. पशूंना अन्नपाणी देण्यासाठी व त्यांना रानात चारण्यासाठी घेऊन जाण्यासाठी एक गोपालकांची नियुक्ती केली जाई. हत्ती, घोडा या प्राण्यांचा उपयोग युध्दात होत असे. कुत्रा घराचे संरक्षण करीत असे. घोडा रथ ओढण्याचेही काम करीत असे. उंट व हत्ती सामान वाहतुकीचे महत्वाचे साधन होय. या पाळीव प्राण्यांच्या शेणाचा उपयोग शेतीत खत म्हणून टाकण्यासाठी होत असे.

या काळात उद्योगधंद्याचा विकास झालेला होता. प्राचीन भारतात अनेक व्यवसाय व उद्योगधंदे करीत असत. क्षत्रिय युध्द करण्यात मग्न होते, वैश्य व शूद्र हे लोक शेती व्यवसाय व पशुपालन आणि उच्चवर्णीयांची सेवा करत असत. कोणत्याही वर्णातील व्यक्ती कोणताही व्यवसाय करीत असे. समाजात शिल्पकांराचा उदय झालेला होता. ऋग्वेदात विभिन्न शिल्पकांराच्या नावाचा व त्यांच्या कार्याचा उल्लेख आढळतो. सुतार हा विविध प्रकारचा रथ, गाड्या व नौका बनवीत असे.[७३] त्यावर सुंदर नक्षीकाम केले जाई. ऋग्वेदात लोहारासाठी कर्मार या शब्दाचा प्रयोग करण्यात आला आहे. लोहार, तांबे, लोखंड, लाकूड व मातीपासून विभिन्न प्रकारची भांडी व शस्त्रे बनवीत असे. चर्मकार कातड्यापासून अनेक वस्तू तयार करीत असे- कातड्याची भांडीसुध्दा बनवीत असत. गवतापासून चटई बनवीत असत.

उद्योगधंदे व व्यवसायाचा फार विकास झाला. श्रमविभाजनाचे तत्व याच काळात उदयास आले. संहिता व तैत्तरीय ब्राह्मण या ग्रंथात विविध व्यवसाय व उद्योगधंद्याची सूची आढळते. मत्स्य उद्योग, धोबी, रंगरेज (रंगारी), नाई (न्हावी) जौहरी, रथकार, कुंभार, लोहार, नट, महावत, गायक, नर्तक, ज्योतिषी, वैद्य, धातूकार, सावकार, घरकाम करणारे सेवक, टोपली विणणारे व दोरी बनविणारे इत्यादी लोक आपल्या व्यवसायात पारंगत होते.

या काळात अनेक लहानमोठे उद्योगधंदे प्रचलित होते. कुटीर उद्योग प्रत्येक गावात चालत होते. मातीची भांडी तयार करण्याचे काम कुंभार करीत असे. लोखंडी भांडी, अस्त्र - शस्त्र व शेतीसाठी लागणारी अवजारे लोहार तयार करत असे. लाकडाची अवजारे तयार करण्याचे काम सुतार करत असे तर आभूषणे बनविण्याचे काम सोनाराचे असे. कपडे विणण्याचाही उद्योग त्या काळात प्रचलित होता. यावरुन असे दिसते की, वाकाटक काळात लोक आपापला परंपरागत व्यवसाय करत होते. सुती वस्त्रोद्योग त्या काळात प्रगतीवर होता. रेशमी, सुती व लोकरी वस्त्रे तयार केली जात होती. मूर्तीकाम आणि मोतीकाम त्या काळात प्रसिध्द होते. धातू उद्योग प्रसिध्द होता.

व्यवसायाच्या विकासाबरोबरच व्यापाराचाही मोठ्या प्रमाणात विकास झाला. अंतर्गत व्यापाराबरोबरच विदेशी व्यापारातही वाढ झालेली होती. व्यापाऱ्यांना राजाकडून संरक्षण प्राप्त झाल्यामुळे व्यापारी लोक वस्तूच्या खरेदी - विक्रीसाठी भारतात सर्वत्र भ्रमण करीत असत. व्यापार भूमार्ग व जलमार्गाने होत असे. नदी व समुद्रातून व्यापारी आपला माल जहाजातून वाहून नेत असत. अश्विनी युगलच्या स्तुतीमध्ये ऋषी स्पष्ट म्हणतो की, या देवतांनी समुद्रात विपत्तिग्रस्त भुज्यू नावाच्या व्यक्तीस शंभर पतवारोवाली नावेमार्फत वाचविले होते. याचा अर्थ वैदिक काळापासून समुद्र मार्गाने व्यापार चालत होता. वैश्य वर्णाचे लोक व्यापार करण्यात आघाडीवर होते. देशात दोन प्रकारचे व्यापारी होते. पहिल्या प्रकारातील व्यापारी लोकांना श्रेष्ठी म्हटले जाई.[७४] ते नगर किंवा गावात आपले दुकान घालून व्यापार करीत असत. दुसऱ्या प्रकारातील व्यापाऱ्यांना सार्थवाह म्हणत. हे लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन आपला माल विकत असत. कपडे, मीठ, खाद्यपदार्थ, मसाले व बहुमूल्य धातूच्या वस्तू व मूर्ती या वस्तूंचा आंतरिक व्यापारात समावेश होत असे. मलमल, रेशमी वस्त्र, पैठणी, मसाले, नारळ, सौंदर्यप्रसाधने, रत्ने व सुगंधित

द्रव्ये भारतातून विदेशी पाठवीत असत. बैलगाडी, हत्ती, घोडा व गाढव ही वाहतुकीची साधने होती. गावात किंवा नगरात दुकाने घालून व्यापार करणाऱ्यांना श्रेष्ठी म्हणत असत. तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेऊन विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना सार्थवाह म्हणत असत.[७५] व्यापार करण्यासाठी सार्थ बनवून यात्रा करीत असत. त्याच्या प्रमुखास सार्थवाह म्हणत असत. सार्थवाह संपूर्ण सार्थाच्या विभिन्न ठिकाणी व्यापाऱ्यांच्या निवासाची, भोजनाची, त्यांच्या सुरक्षिततेचे व भूमार्गदर्शकाचे कार्य करीत असे. सार्थ व्यापाऱ्यांच्या प्रवासात त्यांचे व त्यांच्या मालाचे चोर, दरोडेखोर लुटारु व जंगली प्राण्यापासून रक्षण करण्याचे काम थलनियामक नावाची व्यक्ती करीत असे.

बौध्द साहित्यात सार्थवाहचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. महात्मा गौतम बुध्दास सार्थवाह म्हटल्याचे उल्लेख बौध्द साहित्यात आढळतात. तसेच त्यांनी व्यापाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करुन संभाव्य हानीपासून वाचविल्याच्याही कथा जातक कथात आढळतात. व्यापारी केंद्रांकडे किंवा निर्यातीच्या ठिकाणी व्यापाऱ्यांना सुखरुप थांबे, बाजारभाव, घनदाट अरण्ये, चोर, लुटारु व दरोडेखांराची ठिकाणे, बाजारपेठांची लक्षणे व मागणी पुरवठ्याचे तंत्र याबद्दलचे ज्ञान सार्थवाहाला असणे आवश्यक होते. सार्थवाह ज्यापथाने मार्गक्रमण करीत असत त्यास सार्थवाहपथ म्हणत असत.

वरील प्रकरणामध्ये वाकाटक कालीन सामाजिक , धार्मिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेतला आहे. वाकाटक कालीन समाजामध्ये वर्ण व्यवस्था प्रचलित असून समाजामध्ये ब्राह्मण वर्गाला सर्वच स्थान होते. लोक शाकाहारी व मांसाहारी होते. स्त्री - पुरुष विविध प्रकारची केस रचना व पोषाख करीत असून या काळात हिंदू धर्माचा प्रभाव होता. हिंदू धर्मात शैव व वैष्णव संप्रदाय लोकप्रिय होते. हिंदू धर्माबरोबरच बौध्द धर्म हि प्रचलित होता. वाकाटक कालखंडात शेती, पशुपालन, विविध व्यवसाय, उदयोगधंदे व व्यापार यांची भरभराट झालेली असून वाकाटककालीन मराठवाडा आर्थिक दृष्टया समृध्द होता.

संदर्भ सूची

१. ऋग्वेद १०/९०/१-२,१२.

२. कित्ता.

३. महाभारत, शांतीपर्व, १२/१२२/४-५

विष्णु पुराण, १/६/६

वायुपुराण, ९/११३

मनुस्मृती, अ. १ श्लो.८७-९१.

४. भगवद्गीता, ४/१३

चातुवर्ण्य मया सृष्ट गुणकर्मविभागश: ।

५. महाभारत, शांतीपर्व, १२/१८८/५.

६. मनुस्मृती, अ.१ श्लो.८७-९१.

७. गोयल प्रीतीप्रभा, भारतीय संस्कृती, १९९२, पृ.१९.

८. मनुस्मृती, अ.१ श्लो. ८७-९१.

९. कित्ता.

१०. आपस्तंब धर्मसूत्र, १.६.१८.२१-२३.

काणे पी.व्ही., धर्मशास्त्राचा इतिहास, पृ.१२६,१२७.

११. कित्ता, १.१०.२९.६.

परीक्षार्योपि ब्राह्मण आयुधं नाददीत ।

१२. मनुस्मृती, अ.८ श्लो. ३४८.

शस्त्र द्विजातिभिर्ग्राह्य धर्मो यत्रोपरुध्यते ।

द्विजातीनां च वर्णांना विप्लवे कालकारिते ।

१३. गोयल प्रितीप्रभा, पूर्वोक्त, पृ.३४.

१४. आपस्तंब धर्मसुत्र, २.९.२५.१०.

गुरुनमात्यांश्च नातिजीवेत् ।

१५. आपस्तंब धर्मसुत्र, २.९.२५.११.

न चास्य विषये क्षुधा रोगेण हिमातपाभ्यां वावसीदेदभावाध्दुध्दिपूर्व वा कश्चित् ।

१६. कित्ता, २.९.२५.१५.

क्षेमकृदाजा यस्य विषये ग्रामेरण्ये वा तस्करभयं न विद्यते.

१७. कित्ता, २.५.११.२.

न च सन्देहे दण्डं कुर्यात् |

१८. कित्ता, २.५.११.२३.

१९. गोयल प्रिीतीप्रथा, पूर्वोक्त, पृ.३५.

२०. मनुस्मृती, अ. ९ श्लो. ३२५-३३४.

२१. मनुस्मृती, अ.९ श्लो. ३२५-३३४.

२२. गोयल प्रितीप्रथा, पूर्वोक्त, पृ.३६,३७.

२३. Buhalar, Archaeological Survey of western India - Vol - IV, 1883, p. 124, plate No. 67.

२४. पाटील गौतम, मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास, २०११, पृ.१८, १९.

२५. कित्ता, पृ.१६,१७.

२६. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काल,१९५६, पृ.८.

२७. कित्ता, पृ.८१.

२८. Altekar A.S., The Position of women in Hindu civilization, 1962, p. 35.

२९. Ibid. P -58

३०. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ. ९७.

३१. कित्ता, पृ.९८.

३२. कित्ता, पृ.९९.

३३. Altekar A.S., Education in Ancient India, 1938, p. 103.

३४. bid. P -105

३५. bid. P -107

३६. कठारे अनिल, प्राचीन भारत, २००१, पृ.१२७.

३७. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.८९.

३८. कित्ता, पृ.९०

३९. कित्ता, पृ.९२.

४०. कित्ता, पृ.९३.

४१. कित्ता, पृ.९४.

४२. कित्ता, पृ.

४३. कित्ता, पृ.९५.

४४. कित्ता, पृ.९६.

४५. कित्ता, पृ.८६.

४६. Epigraphia Indica - Vol-XV, p. 258.

४७. Buhalar, Archaeological Survey of western India-Vol-IX, p. 138.

४८. Epigraphia Indica-Vol-XXIV, p. 260-67.

४९. Caningham, Archaeological survey report - Vol-VII, p. 123-25.

५०. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.१०४.

५१. Eipgraphia India - Vol-IX, p. 367.

५२. साखरे विजया, प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, २००९, पृ.३०३.

५३. कित्ता, पृ.३०५.

५४. कित्ता, पृ. ३१०.

५५. Bapat P.V. (Ed.), 2500 Years of Buddhism, 1971, p. 38.

५६. आंबेडकर भी.रा., पूर्वोक्त, पृ.९५.

५७. कित्ता, पृ.१०६.

५८. मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बौध्द धम्माचा इतिहास, २०००, पृ.३३.

५९. बापट पु.वि. (संपा.),सुत्तनिपात, १९५५.

६०. कित्ता, ५.१.१ गा. क्र. ९७६.

६१. कित्ता, ५.१.२ गा.क्र.९७७.

६२. कित्ता, ५.१.३८ गा.क्र.१०१३.

६३. कित्ता, ५.१८.५ गा.क्र.११२८.

६४. कित्ता, ५.१८.२५ गा.क्र.११४८.

६५. मोरे एम.एस., पूर्वोक्त, पृ.५,३६.

६६. कित्ता.

६७. कित्ता.

६८. Buhalar, Archaeological sarvey of western India-Vol-IV, p. 138.

६९. साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.३१४.

७०. कित्ता, पृ.३१५.

७१. कित्ता, पृ.३१७.

७२. कठारे अनिल व नगराळे एन.एन., मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.१३८.

७३. कित्ता., पृ.१४०.

७४. पाटील गौतम, मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास, २०११, पृ.७९.

७५. कठारे अनिल व नगराळे एन.एन., पूर्वोक्त, पृ.१३९.

प्रकरण पाचवे

कला व स्थापत्य

कलेची निर्मिती का केली जाते, याविषयी उलट सुलट मते मांडली जातात. काही विद्वानांच्या मते कलानिर्मितीला बंधन नसावे ती मुक्त असावी. कलेसाठी कला की जीवनासाठी कला अशा प्रकारचे वाद या संदर्भात निर्माण झालेले दिसून येतात. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात कला ही केवळ करमणूकीचे साधन समजली जात नसावी. मानवाच्या प्रगतीसाठी भक्ती, ज्ञान यांच्या इतकीच कलेची आवश्यकता होती.

कला हा स्त्रीलिंगी शब्द आहे. चित्र, संगीत, नाटय, स्थापत्य व शिल्प इत्यादी घटकांना कला असे म्हटले आहे. परंतु कला शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल व अर्थाबाबत विद्वांनात, भाषाशास्त्रज्ञात मतभिन्नता आहे. इंग्रजी भाषेमध्ये कलेसाठी 'ART' म्हटले जाते. 'ART' शब्दाचा संबंध फ्रेंच 'ART' व लॅटिन artis (आर्टिस) किंवा ars (आर्स) शब्दाशी जोडला जातो. अर् या धातूपासून हा शब्द बनला असून त्याचा अर्थ उत्पन्न करणे, बनविणे असा होतो.[१] संस्कृतमधील ईर् (जाणे, फेकणे, उपयोग करणे) हा धातू अर् या धातूशी संबंध मानलेला आहे. संस्कृतमध्ये कला किंवा शिल्प यांचा जो सर्वसाधारण अर्थ होतो. तोच अर्थ लॅटिन 'आर्स' शब्दाचाही होतो.

१३ व्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रजी भाषेत 'ART' शब्दाचा प्रयोग फक्त कौशल्य अशा अर्थाने करण्यात आला. पुढे सतराव्या शतकानंतर संगीत, चित्र, काव्य, नृत्य, गायन, वास्तू, मूर्ती इत्यादी सर्व ? घटकांना उद्देशून कला शब्दाचा वापर होऊ लागला. कला शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत पंडितानी पुढीलप्रमाणे सांगितली आहे. १) कम् आनन्दं लाति इति = आनंद देणारी ती कला. २) कल् = शब्द करणे, वाजवणे यावरुन तत्संबंध्द ती कला. ३) कल म्हणजे सुंदर, मधुर, सुख देणारे ती कला. ४) कड् = मदमस्त करणे, प्रसन्न करणे. तदनुकुल ती कला होय. संस्कृत शब्दकोशात कला म्हणजे चंद्राचा सोळावा भाग. एखाद्या वस्तूचा सोळावा अंश, राशीच्या तिसाव्या
भागाचा साठावा भाग, मुद्दलाचे व्याज, काळाचा एक भाग, एखाद्या कामातील अपेक्षित कौशल्य[२] असा दिला आहे. महाराष्ट्र शब्दकोशात कौशल्याच्या कामाला कला असे म्हटले आहे.[३]

महाराष्ट्र शब्दकोशात दिलेला हा अर्थ कला शब्दाच्या आधुनिक अर्थाशी जवळचा वाटतो. कलेमध्ये भावनेला फार महत्व आहे. अंतकरणातील भावना व्यक्त करण्याचे कौशल्य म्हणजे कला होय. अशी कलेची समर्पक व्याख्या केली जाते. कला ही मानवाच्या विविध क्रियाप्रमाणे एक क्रिया आहे. मानवी सृजनशीलतेचा एक आविष्कार म्हणजे कला होय. सर्वप्रथम कलेची अमूर्त अभिव्यक्ती मनात होते आणि नंतर स्वर, शब्द, रंग, अभिनय इ.द्वारा तिचा बाहय आविष्कार होतो व मग दुसऱ्यालाही त्या कलाकृतीचा आस्वाद घेता येतो. भावनेची उत्कंठा वाढली म्हणजे ती कोणत्याही माध्यमाद्वारे व्यक्त होते. भावनेला प्रयत्नाची व कौशल्याची जोड देऊन कलाकार कला निर्मिती करतो. कलेचे सौंदर्य आत्मा असून, आनंद हा परिणाम आहे. कला ही संस्कृतीची जननी असून ती राष्ट्राची संस्कृती जिवंत ठेवणारे माध्यम सुध्दा आहे.

प्राचीन काळापासून भारतीयांना कलेचे विविध प्रकार ज्ञात होते असे दिसून येते. यजुर्वेदाच्या तिसाव्या अध्यायामध्ये वेगवगेळ्या ६४ कला प्रकाराविषयी विवेचन केले आहे.[४] जैन साहित्यामध्ये ७२ कलांचा संदर्भ आढळतो.[५] महाराष्ट्र व त्यातील मराठवाडयाला प्राचीन काळापासून कलेचा वारसा लाभलेला आहे. मराठवाडयाचा कलेचा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे.प्राचीन मराठवाडयातील राजकीय इतिहासाची सुरुवात सातवाहन घराण्यापासून होते.सातवाहन घराण्यानंतर मराठवाडयावर वाकाटक घराण्याने राज्यकारभार केला. वाकाटक घराण्याने जवळजवळ ३०० वर्षे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कला व स्थापत्य क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केल्याचे दिसते. वाकाटक राजे शिव व विष्णूचे उपासक असले तरी त्यांनी बौध्द धर्माला राजाश्रय दिला. वाकाटकांच्या काळात मराठवाडयामध्ये हिंदु धर्माबरोबरच बौध्द धर्माची प्रगती झाली असल्यामुळे त्याकाळात कला व स्थापत्य क्षेत्रात निर्मिती झाली. मराठवाडयामध्ये हिंदू व बौध्द लेणी, बौध्दस्तूप व विहार, चित्रकला, मूर्तिशिल्प यांचा विकास झ ाला. मराठवाडयातील अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, औरंगाबाद, उस्मानाबाद, नांदेड, खारोसा, कंधार, शिऊर इ. ठिकाणी कला व स्थापत्य क्षेत्रात बरीच प्रगती झाली. वरील स्थळांचा कला व स्थापत्याच्या आढावा प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

५.१ लेणी स्थापत्य :

भारतीय जीवनामध्ये धर्माचे स्थान अनन्यसाधारण आहे. भारतीयानी धर्मविषयक कल्पना कलेच्या माध्यमातून मांडण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. स्थापत्य आणि शिल्पकलेची खरी प्रगती मराठवाडयामध्ये वाकाटक कालखंडात झाली. या कालखंडामध्ये मराठवाडयातील अनेक ठिकाणी डोंगरामध्ये लेणी खोदण्यात आली. लेणी स्थापत्य हा स्वतंत्र कलाविष्कार किंवा वास्तू प्रकार आहे. लेणी स्थापत्यालाच शैलगृह, शैलस्थापत्य आणि गुंफा या नावानेही ओळखले जाते. राजे महाराजांनी बौध्द धर्मियासाठी (बौध्द भिक्खू- भिक्खूणी) लेणी खोदण्यासाठी दान दिले. आपल्या देशातील डोंगराळ भागामध्ये लेणी खोदकाम करण्यात आले. परिणामी भारतामध्ये १५४५ लेणींची [६] निर्मिती झाली. लेणी निर्मितीमध्ये भारतातील मौर्य, सातवाहन, गुप्त, वाकाटक, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालूक्य, कांचीचे पल्लव व देवगिरीचे यादव इत्यादी राजघराण्याने महत्वाचे योगदान दिले. वरील लेणीपैकी जवळ जवळ ८०० पेक्षा अधिक लेणी महाराष्ट्रात आहेत.[७] म्हणजेच एकूण लेण्यांच्या ६० टक्के एवढी लेणी महाराष्ट्रात उपलब्ध आहे.[८] तसेच कलेच्या दृष्टीकोनातून श्रेष्ठ दर्जाची समजली जाणारी लेणी महाराष्ट्रातच आहेत. ही सर्व लेणी सहयाद्रीत, काही मुख्य दक्षिणोत्तर श्रेणीत आणि कांही कोकणात तसेच देशावर पसरलेल्या सहयाद्रीच्या पूर्व-पश्चिम श्रेणीत आहेत. महाराष्ट्रात असणाऱ्या ८०० लेणीपैकी मराठवाडयात एकूण १२८ लेणी आहेत.[९]

लेणीचे खोदकाम करण्यात मौर्य सम्राट अशोक व दशरथ यांनी सर्वप्रथम सुरुवात केली. भगवान गौतम बुध्द हे बौध्द धर्माचे संस्थापक असून सम्राट अशोकाने बौध्द धर्मीय लेणी खोदकामास सुरुवात केली. गौतम बुध्दास वेदप्रामाण्य, परमेश्वराचे अस्तित्व व देवतानुग्रह मान्य नसल्यामुळे गौतमबुध्दाच्या हयातीत व नंतरही अनेक वर्ष बौध्दधर्मात मूर्तीपूजा प्रचलित नव्हती. गौतमबुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतर अनेक वर्षानंतर त्यांच्या अनुयायात महायान पंथ उदयास आला. या पंथाने मूर्तीपूजा सनातन धर्मापासून घेतली .महायान पंथाने मूर्तीपूजेचा अंगिकार केल्यावर गौतम बुध्दाचीच प्रतिमा बनवून तिची पूजा अर्चा सुरु केली. बौध्दमताचा विशेष प्रचार

सम्राट अशोकाने केला . त्याने स्तूप बांधल्याचे दिसून येते. पण बौध्द प्रतिमा कोरल्याचे संदर्भ सापडत नाहीत.[१०]

चैत्य,विहार, स्तूप या वास्तू बौध्द संप्रदायाच्या संबंधित आहेत. चैत्य म्हणजे बौध्दाचे देऊळ, प्रार्थना मंदिर होय. विहार म्हणजे बौध्द मठ जिथे बौध्द भिक्षूची राहण्याची व्यवस्था केली जाते. स्तूप म्हणजे मृत व्यक्तीचे स्मारक म्हणून बांधलेले शिल्प होय. बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी बुध्दाचे पात्र, वस्त्र, अस्थी, केस वगैरे वस्तू पूज्य मानून वाटून घेतल्या व त्यावर स्मारक स्तूप उभारले गेले. पुजनिय व्यक्तीचे अवशेष मातीच्या अथवा धातूच्या पायात घालून स्तूपाच्या मध्यभागी ठेवून त्यावर जो ढिगारा अथवा शिल्पकाम केलेले असते त्यास अंड म्हणतात. त्याच्या डोक्यावर एक चौरस वेदी असते तिला हर्मिका म्हणतात. हर्मिका भोवती कठडा व वर छत्र असते. स्तूपाच्या या पदविन्यासाचा पुढीलप्रमाणे तात्विक अर्थही लावला जातो. स्तूपाची संपूर्ण आकृती म्हणजे जगाची प्रतिकृती होय. चौथरा म्हणजे भूलोक व त्यावरील अर्धगोलाकार अंड म्हणजे आकाश स्तूपाच्या माथ्यावरील हर्मिका म्हणजे देवलोक आणि छत्र म्हणजे स्वर्ग होय.[११]

महायान पंथाने बुध्दाच्या मूर्ती निर्माण करण्यापूर्वी लोक स्तूपाची पुजा करत. प्रदक्षिणा घालता यावी म्हणून पुढील काळात प्रदक्षिणामार्ग बांधण्यात आले. स्तूपासमोर प्रार्थना, भजन करण्यासाठी सभामंडप बांधण्यात आले. स्तूप व सभामंडप असलेल्या प्रार्थना मंदिरालाच चैत्यग्रह असे नाव मिळाले. प्रत्येक विहाराशी सलग्न एक चैत्यमंदिर असे. महायान पंथाच्या अगोदर बौध्द धर्मात मूर्तीपूजा नव्हती. गौतमबुध्दाविषयी वाटणारा पूज्यभाव व्यक्त करण्यासाठी त्यांचे अनुयायी पुढील प्रतिकांची पुजा करत. बैल, घोडा, हत्ती, कमळ ही प्रतीके बुध्दाच्या जन्माशी संबंधित आहेत. बोधीवृक्ष हे ज्ञानप्राप्तीचे, धर्मचक्र हे पहिल्या उपदेशाचे तर स्तूप हे महानिर्वाणाचे . या प्रतिकांची प्रारंभीच्या काळात पूजा करत. या प्रतिकांना शिल्पकारानी आपल्या कलेमध्ये स्थान दिलेले दिसते.

लेण्यांना शैलगृह या नावाने ओळखले जाते. बौध्द धर्मामध्ये हीनयान व महायान पंथीयाची वेगवेगळी शैलगृहे होती. हीनयान पंथीमध्ये 'स्तूप' हा लेण्यात आढळतो. तर महायान पंथीयात लेण्यामध्ये बुध्दमूर्ती आढळते.[१२] बौध्द लेण्याचे चैत्य आणि विहार असे दोन भाग

आढळतात. चैत्यामध्ये सभामंडपात बुध्दमुर्ती अथवा स्तूप आढळतो तसेच तिथे प्रार्थना, प्रवचन यासाठी सभामंडप असतो. तर विहारात सभामंडपाच्या भोवती डोंगराच्या पोटात तिन्ही बाजूंनी लहान लहान खोल्या खोदलेल्या असतात.त्या खोल्यांमध्ये बौध्द भिक्षूंना विश्रांती घेण्यासाठी शयनासन म्हणजे लहान पलंगसदृश डोंगरात खोदलेला दगडी आकार असतो.

सम्राट अशोकाने तिसऱ्या बौध्द धर्मपरिषदेत बौध्द धर्माच्या प्रसारासाठी विभिन्न प्रदेशात धम्म प्रचारक पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 'महाधम्मरक्षित'हा स्थविर धम्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्रात आला व बौध्द धर्माचा प्रसार केला . त्यानंतर बौध्द स्थापत्य व शिल्प महाराष्ट्रात समृध्द झाले. प्राचीन भारतात भारतामध्ये मोठ मोठया डोंगरात खडक कोरुन लेणीचे खोदकाम करण्यात आले. परंतु भारतात ज्या ज्या ठिकाणी डोंगर आहेत. त्या सर्व ठिकाणी लेणी निर्माण करण्यात आल्या नाहीत. तर कलाकारांनी लेणी या स्थापत्य प्रकाराला अनुकूल असलेला खडक ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, अशाच डोंगरात लेणीचे खोदकाम केले.

भारतामध्ये सहयाद्री पर्वताच्या मोठ मोठया रांगा आहेत. या पर्वत रांगा लेणीच्या खोदकामासाठी आणि शिल्प प्रकाराला विशेष अनुकूल आहेत. लेणींच्या निर्मितीपूर्वी त्या खडकाचा आपणास हवा तेवढा भाग कोरुन, घासून सपाट केला जातो. यानंतर लेणीच्या खोदकामाला प्रारंभ करता येतो. सहयाद्री पर्वताचा खडक लेणी स्थापत्य प्रकाराला अनुकूल आहे. म्हणून कलाकारांनी जेथे जेथे सहयाद्री पर्वत आहे. तेथे तेथे लेणीचे खोदकाम केलेले नाही. भारतात ज्या ज्या ठिकांणी लेणीचे खोदकाम करण्यात आले त्या सर्व लेणी प्राचीन महामार्गावर व व्यापारी मार्गावर खोदण्यात आल्या. विशेष म्हणजे या सर्व लेणीचे खोदकाम नगरांपासून दूर अंतरावर असलेल्या डोंगरातच करण्यात आले. वाकाटक कालखंडात मराठवाडयात अंजिठा, वेरुळ, औरंगाबाद, घटोत्कच, उस्मानाबाद येथे बौध्द लेणी तसेच शिऊर व खरोसा येथे हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती करण्यात आली आहे.

बौध्द लेणी :

वाकाटक काळात औरंगाबाद अजिंठा, वेरुळ, उस्मानाबाद आणि घटोत्कच येथे बौध्द लेणींची निर्मिती करण्यात आली. चैत्यगृह आणि विहार हे बौध्द लेणी स्थापत्याचे दोन वास्तुप्रकार

आहेत. बौध्द भिक्खूंच्या प्रार्थनागृहास चैत्यगृह म्हणतात. चापाकार मंडप, नासिका व समोर आयाताकार ओवरी, गजपृष्ठाकार छत, प्रचंड आकाराचे चैत्य तोरण, छताला अर्धवर्तुळाकार लाकडी व दगडी गोपाने, आतमध्ये चौक, चौकात स्तूप, मागच्या बाजूस स्तूप, स्तूपाच्याभोवती प्रदक्षिणामार्ग व चौकाभोवती छताला आधार दिलेले अष्टकोणी खांब असा चैत्यगृहाचा पदविन्यास असे.[१३] बौध्द भिक्खूंच्या निवासस्थानासाठी डोंगर खोदून तयार केलेल्या वास्तूला विहार अशी संज्ञा होती. मध्यभागी प्रशस्त चौक व त्याभोवती ओळीने लहान लहान खोल्या, चापाकार चैत्य, आणि एक - दोन मोठे स्तूप असा विहाराचा पदविन्यास असे.[१४] प्रत्येक विहार स्वायत्त व स्वयंपूर्ण असे. वाकाटक काळात पुढील ठिकाणी बौध्द लेणी स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. वाकाटक राजांनी प्रामुख्याने विहार स्थापत्य निर्माण केले.

वेरुळ :

औरंगाबादमधील खुलताबाद तालुक्यात वेरुळ नावाचे गाव आहे. वेरुळ गावाजवळील चरणाद्री नावाच्या डोंगरात हिंदु- बौध्द व जैन अशा जवळ जवळ ३४ लेणींचा समूह आढळतो.लेणी क्रमांक १ ते १२ हया बौध्द धर्मीय, क्रमांक १३ ते २९ या हिंदू लेणी, क्रमांक ३० ते ३४ हया जैन धर्मीय लेणी आहेत. लेणी क्रमांक १ ते १२ या बौध्द धर्मीय असून त्यातील पहिल्या पाच लेणी हया वाकाटक कालखंडातील आढळतात. या पाच लेणीपैकी पाचव्या क्रमांकाची लेणी महारवाडा सोडून बाकी चार लेणी आकार, प्रकार व स्थापत्याच्या दृष्टिकोनातून अजिंठा लेणीशी मिळत्या जुळत्या आहेत.

१) लेणी क्रमांक १

हीनयान काळातील या गुंफेचे स्वरुप अत्यंत प्राथमिक अवस्थेतील आहे. केवळ पावसाळ्याच्या दिवसात बौध्द भिक्षुंना राहण्यासाठी म्हणून असलेली वर्षा विहाराची संकल्पना या गुंफेद्वारे पूर्ण होताना दिसते. बौध्द भिक्षुंना राहण्यासाठी या गुंफेमध्ये तिन्ही भिंतीत मिळून आठ खोल्या खोदलेल्या आहेत. या गुंफेचे आकारमान ही तसे लहानच आहे. त्यात कलाकारांच्या कौशल्याचे प्रतिबिंब कुठेही जाणवत नाही. काही खोल्या तर पूर्णपणे खोदवण्याचे कामही झालेले नाही. खांबाशिवाय खोदलेली ही गुंफा वेरुळ येथील सर्वात जुनी गुंफा असावी. हीनयान काळातील

या गुंफेत गाभारा नाही. तसेच कुठल्याही प्रकारची मूर्ती अथवा प्रतिमा संपूर्ण गुंफेमध्ये कुठेही नजरेस पडत नाही.

२) लेणी क्रमांक २

या गुंफेमध्ये बऱ्याच मोठया प्रमाणात कोरिवकाम दिसून येते. केवळ वर्षावास या संकल्पनेतून बाहेर पडून बौध्द भिक्षूंना राहण्याबरोबरच बुध्दाची पुजा,मनन व चिंतन या गोष्टी प्रतिमेसमोर करता येतील. या भावनेतूनच गुंफेच्या पाठीमागील भिंतीमध्ये गाभारा किंवा गर्भगृह खोदलेले आहे. या गर्भगृहामध्ये बुध्द प्रतिमा कोरलेली आहे. या संपूर्ण गुंफेत अनेक बौध्द प्रतिमा कोरलेल्या आहेत. गुंफेच्या प्रवेशद्वाराबाहेर डाव्या हाताला पद्मपाणी व उजव्या हाताला वज्रपाणी हे बोधिसत्व द्वारपालांच्या रुपामध्ये उभे आहेत. गुंफा प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला एका छोटयाशा चौकोनी कोनडयात गर्भगृहात बुध्दप्रतिमा अतिशय साधी आहे. प्रलंबपादासनात बसलेली ही बुध्द प्रतिमा धम्मचक्र परिवर्तन मुद्रेतील आहे. बुध्दाचे पाय उमललेल्या कमलासनावर टेकलेले आहेत. बुध्द बसलेले आसन चौकोनी असून, त्यावर सिंहमुद्रा आहेत. पाठीमागे मकर, सिंह, हत्ती यांच्या मुद्रा आहेत. डाव्या बाजूला उडणारे गंधर्व दाम्पत्य आहे.गाभाऱ्यातील बुध्द मूर्तीच्या दोन्ही बाजुला चामरधारी सेवकाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. बुध्दाच्या उजव्या हाताशी उभा असणारा बोध्दिसत्व पद्मपाणी अवलेकितेश्वर आहे. बुध्दमूर्तीच्या डाव्या हाताला भव्य अशी मैत्रयाची सुंदर मूर्ती आहे. मैत्रयाचा मुकूट नक्षीदार असून, रत्नजडित अशा या सुवर्ण मुकुटामध्ये मोठया पदकाच्या मध्यभागी स्तूपाची प्रतिमा आहे. बोधिसत्वांच्या बाजूला पूर्णाकृती अशा बुध्दाच्या उभ्या प्रतिमा आहेत.

गाभाऱ्याच्या बाहेर दोन्ही बाजूला दोन बोधिसत्व द्वारपालाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. डाव्या बाजूला असेली बोधिसत्वाची मूर्ती ही पद्मपाणी अवलोकतिेश्वराची आहे. पद्मपाणी अवलोकितेश्वराचा उजवा हात अभयमुद्रेत असून, त्यामध्ये रुद्राक्षमाला आहे. डाव्या हातामध्ये पद्म असून, डाव्या हाताला स्त्री देवता आहे. तसेच उजव्या बाजूला चामरधारी पुरुष सेवक उभा आहे. हा पुरुष सेवक मणीधर असून स्त्री देवता सदाक्षरी महाविद्या आहे. म्हणूनच हा अवलोकितेश्वर 'सदाक्षरी लोकेश्वर' आहे. उजव्या बाजूला बोधिसत्व वज्रपाणी उभा आहे.

अवलोकितेश्वरा प्रमाणेच वज्रपाणीची मूर्ती सुध्दा अतिशय उंच आहे. वज्रपाणीच्या मुकुटामध्ये आकर्षक कलाकुसर केलेली आहे.

लेणी क्रमांक २ च्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरताच डाव्या भिंतीमध्ये उंच अशा चौकोनी कोनाडयात एका स्त्री देवतेची मोठी मूर्ती आहे. या स्त्रीने आपले वस्त्र कासोटयाच्या पातळाप्रमाणे नेसलेले आहे. वस्त्राच्या निऱ्या दोन्ही पायाच्या मध्यभागी सोडलेल्या आहेत.

लेणी क्रमांक ३

आकाराने लहान असलेली ही गुंफा लेणी क्र. दोनच्या मानाने अगदीच साधी आहे. शिल्पकला व कोरीवकाम याचे फारसे दर्शन या गुंफेमध्ये दिसत नाही. गुंफेच्या मध्यभागी असलेले चौरस आकाराचे सभागृह प्रत्येक बाजूला चार याप्रमाणे बारा खांबांनी आधारलेले आहे. सभागृहाच्या पाठीमागील बाजूस गाभारा असून त्यामध्ये गौतम बुध्दाची प्रतिमा कोरलेली आहे.

गर्भगृहातील बुध्दमूर्ती अतिशय ओबडधोबड आहे. प्रलंबपादासनात बसलेल्या गौतम बुध्दाच्या अंगावरील वस्त्र धोतराप्रमाणे गुंडाळलेले आहे. डाव्या खांदयावरुन पाठीमागे नेलेल्या या वस्त्राचा सोगा बुध्दाच्या डाव्या हातामध्ये धरलेला स्पष्टपणे दिसत आहे. लेणीच्या गाभाऱ्यामध्ये बुध्दमूर्तीच्या दोन्ही बाजूला सेवकाच्या रुपामध्ये बोधिसत्व उभे आहेत. उजव्या हाताला पद्मपाणी अवलोकितेश्वर असून, डाव्या हाताला मैत्रेय उभा आहे. मैत्रेयाच्या डोक्यावरील मुकुटाच्या मध्यभागी स्तूपाची अतिशय ठाशीव अशी प्रतिकृती कोरलेली आहे. उजव्या हातात 'चामर' धरलेला हा मैत्रेय अतिशय ऐटीत उभा आहे. गाभाऱ्याबाहेरील पद्मपाणी अवलोकितेश्वर व वज्रपाणी या बोधिसत्व द्वारपालांच्या मूर्ती फारशा चांगल्या अवस्थेत नाहीत.

लेणी क्रमांक ४

लेणी क्र. ४ ही गुंफा आकाराने अगदी लहान आहे . गाभाराही अतिशय छोटया आकाराचा आहे. गाभाऱ्याच्या बाहेर दोन खांब आणि दोन अर्धस्तंभ यांनी वऱ्हांडयाची सीमारेषा उचलून घेतलेली आहे. वऱ्हांडयापलीकडे गुंफेची ओसरी आहे. स्तंभाचे कोरीवकाम घटपल्लव या पध्दतीचे आहे. घटपल्लव पध्दतीचे शिल्पकाम म्हणजे गुप्तकालीन शिल्पकलेचा प्रभाव आहे. दोन

आणि तीन क्रमांकाच्या गुंफांशी साधर्म्य सांगणारे स्तंभांचे कोरीवकाम पाहून या तीनही गुंफा साधारणत: समकालीन असाव्यात असे वाटते.

लेणी क्र. ४ मधील गाभाऱ्यातील बुध्दमूर्ती अतिशय साधी आहे. वरच्या बाजूला गंधर्व आणि गांधर्वी उडताना दिसत आहेत. बुध्दमूर्तीच्या उजव्या बाजूची बोधिसत्व मूर्ती समूळ नष्ट झालेली आहे. गाभाऱ्याच्या बाहेर प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला बोधिसत्व पद्मपाणी असून, उजव्या बाजूला कोनाडयात अतिशय सुंदर शिल्पपट आहे. यामध्ये बोधिसत्व अवलोकितेश्वराची प्रलंब पादासनात कमलासनावर पाय ठेवलेली अतिशय भव्य अशी मूर्ती आहे. द्विभुज अशा या मूर्तीने आपल्या अभय मुद्रेतील उजव्या हातात अक्षमाला धरलेली असून डाव्या हातात कमलपुष्पाचा देठ आहे असे चित्र आहे.

अवलोकितेश्वराच्या डाव्या खांदयावर मृगाजिन पांघरलेले आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूला उभा असलेली स्त्रीमूर्ती तारा या बौध्द देवतेची आहे. तर उजव्या बाजूला उभी असलेली स्त्रीमूर्ती भ्रुकुटी या बौध्द देवतेची आहे. भ्रुकुटी, बोधिसत्व पद्मपाणी अवलोकितेश्वर व तारा या तिघांचा मिळून असलेला हा सुंदर शिल्पपट 'रक्तलोकेश्वर' म्हणून ओळखला जातो.

लेणी क्रमांक ५

अतिशय विशाल आकार असलेली ही गुंफा वेरुळ येथील सर्वात मोठा विहार आहे. या विशाल गुंफेमध्ये एकूण चोवीस स्तंभ आहेत. दहा स्तंभाची एक ओळ अशा दोन ओळी संपूर्ण विहाराला तीन भागात विभागतात. गुंफेच्या प्रवेशद्वारापासून शेवटच्या टोकापर्यंत या विहाराची लांबी एकशे सतरा फुट असून रुंदी साधारणपणे अठ्ठावन्न फुट आहे. विहाराच्या दोन्ही भिंतीमध्ये छोटी छोटी दालने व ओवऱ्या खोदलेल्या आहेत. या विहाराचा आणखी एक विशेष म्हणजे विहाराच्या मधल्या ओळीत संपूर्ण लांबीमध्ये दोन उंचवटे गुंफेच्याद्वारापासून गर्भगृहापर्यंत ठेवलेले आहेत. या उंचवटयांना पाहताना असे वाटते की, बहुधा विद्यार्थीदशेत असताना भिक्षू या उंचवटयांच्या दोन्ही बाजूस समोरासमोर बसत असावेत. उंचवटयाचा उपयोग अभ्यासाचे साहित्य - ठेवण्यासाठी होत असावा किंवा जेवणासाठी दोन्ही बाजूला भिक्षू बसत असून, जेवणाचे पात्र (ताट) या उंचवटयावर ठेवले जात असावे.

या विहारातील स्तंभाचे आकारमान त्याच्यावरील नक्षी व कोरीवकामाचा प्रकार यावरुन तसेच विहाराच्या प्रशस्त लांबी- रुंदीवरुन हा विहार विद्यार्थी दशेतील भिक्षूंच्या वास्तव्यासाठी वापरला जात असावा. लेणीत धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील बुध्दाची मूर्ती आहे. लेणी क्र. १ ते ४ या धेरवाडा या नावाने ओळखल्या जातात. तर पाचव्या क्रमांकाची लेणी महारवाडा या नावाने ओळखली जाते. गर्भगृहात गौतम बुध्दाची आसनस्थ मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूस द्वारपाल आहेत. लेणीत अवलोकितेश्वर झोका घेत असल्याचेही शिल्प आहे. या लेणीचा उपयोग सामुदायिक पध्दतीने अध्ययन, अध्यापन, निवास, भोजन, धर्मचर्चा,पूजापाठ, प्रार्थना, प्रवचन तसेच सामाजिक व धार्मिक कार्यासाठी केला जात असावा. या विहाराचे आकारमान जरी एवढे विशाल असले तरी त्यामध्ये फारच थोडया शिल्पमूर्ती आहेत.

घटोत्कच लेणी : -

औरंगाबाद जिल्हयात सोयगाव तालुक्यात जंजाल, जंजाळा गावापासून ३ मैल अंतरावर असणाऱ्या डोंगरामध्ये घटोत्कच विहार आहे.[१५] घटोत्कच अजिंठा येथील लयनसमुहापासून दूर असला तरीही तो अजिंठा येथील लयन समुहाचाच एक भाग मानला जातो.[१६] पूर्वी येथे तीन लेणी होती असे दिसते. त्यापैकी सद्या दोन विहार अवशिष्ट आहेत. तिसऱ्या लेणीच्या फक्त कांही खुणा तेवढया दिसतात. राहिलेल्या दोन्ही लेणी विहार पध्दतीच्या आहेत. या दोन विहार पध्दतीच्या लेण्यापैकी एक आकाराने लहान असून त्याचे पुढील स्तंभ नष्ट झाले आहेत. एक अर्धस्तंभ व दुसऱ्या एका स्तंभाचे शीर्षक काळाच्या तडाख्यातून वाचले आहेत.[१७]

घटोत्कच लेणी पैकी दुसरे मोठे लेणे मात्र बरेचसे शाबुत आहे. त्याच्याही व्हरांडयाचे सर्व खांब नष्ट झाले आहेत.व्हरांडयाच्या उत्तरेच्या बाजूला एक खंडीत शिलालेख दिसतो. त्यामध्ये वराहदेवाची आरंभापासून वंशावळ दिली आहे. त्यातील काही ओळी वाचता येतात. तर काही खराब झाल्या असल्यामुळे वराहदेवाने कोणत्या उद्देशाने हे लेणे खोदविले व कोणत्या बौध्दभिक्षूसंघास दान दिले ही माहिती आता नष्ट झाली आहे. वाकाटक नृपती हरिषेण याचा सचिव वराहदेव यानेच ही लेणी खोदविली आहे.[१८]

घटोत्कच लेणी म्हणजे वाकाटकांचे एक सांस्कृतिक योगदान आहे. वाकाटक कालीन शिल्प स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून या लेण्यांचा उल्लेख केला जातो. घटोत्कच लेणीतील शिल्पे दृष्टीने प्रगल्भ व लावण्यपूर्ण आहेत. मूर्तीच्या शारीरिक ठेवणीपासून हातापायांची बोटे यांच्या घडणीपर्यंतच्या प्रत्येक क्रियेत लालित्य आहे. मूर्तीतून प्रतीत होणारे सौंदर्य मती गुंगविणारे आहे. या लेणीतील दोन विहारापैकी एक मोठा आहे. तो समुारे ८० फुट लांब (२५ मीटर) नि तितकाच रुंद आहे. हा विहार अंजिठा येथील १६ व्या लेण्याप्रमाणे आहे. या विहारास २० स्तंभ आहेत. या विहाराला तीन आयाताकृती प्रवेशद्वार आहे. प्रवेशद्वाराच्या समोरच्या भागात सहा अष्टकोणी स्तंभ असून त्या समोर मोकळा व्हरांडा आहे. प्रवेशद्वाराच्या वरच्या दोन्ही बाजूस दोन स्त्री प्रतिमा कोरलेल्या आहेत.

विहाराच्या अगदी पाठीमागच्या बाजूस तीन गर्भगृहे आहेत. यातील मधले हे आकाराने मोठे व मुख्य गर्भगृह असून यात बुध्दाची धर्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील मूर्ती आहे. त्याच्या उजव्या बाजूस वज्रपाणी चामर घेऊन उभा आहे. डाव्या बाजूसही चामरधारी पद्मपाणी असावा. पण त्यांच्या हातात कमळ दिसत नाही. सिंहासनाच्या खालील भागावर दोन हरिणांच्या मध्ये धर्मचक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस शिष्य व श्रावक गुडघे टेकून बसलेले दाखविले आहेत. बुध्दाच्या डोक्याभोवती प्रभावलय असून त्याच्या दोन्ही बाजूस विद्याधर व विद्याधरी आकाशांतून माला घेऊन पुजेकरिता येत असलेले दाखविले आहे.[१९] बुध्द मूर्तीजवळ विद्याधर, धर्मचक्र व हरिण नेहमीप्रमाणे आहेत. मधल्या दरवाजाच्या चौकटीवर सुंदर नक्षीकामाच्या दोन पट्टया आहेत. तिसऱ्या पट्टीवर बसलेल्या व उभ्या असलेल्या बुध्दमूर्ती, मिथून वगैरे कोरुन तिला शोभिवंत केले आहे. छावणीच्या उंचीवर दोन्ही बाजूस एक देवता आहे.[२०] पण अजिंठयाच्या लेणीतल्याप्रमाणे तिचे वाहन मकर नसून वराह आहे. हे लेणे वराहदेवाने खोदविले यांचे ते सूचक असावे. बाजूच्या दरवाजांना व खिडक्यांना पद्मासनस्थ बुध्दमूर्तियुक्त चैत्यवातायनांनी व त्यावर गोलाकृतींनी सुशोभित केले आहे. मराठवाडयाची भूमी ही खऱ्या अर्थाने भारतीय इतिहासाचा अनमोल सांस्कृतिक ठेवा आहे. त्या सांस्कृतिक ठेव्यातील घटोत्कच लेणे हे अनमोल रत्न आहे. घटोत्कच लेण्यात शिल्प, मूर्ती व उत्तम प्रकारची रंगचित्रे तयार करण्यात आली आहेत.

औरंगाबाद :

खडकी उर्फ औरंगाबाद (संभाजीनगर) हे महाराष्ट्रातील जिल्हयाचे आणि मराठवाडा विभागाचे प्रमुख ठिकाण. गोदावरीची उपनदी खाम या नदीच्या उजव्या तीरावर हे वसलेले आहे. १६०४ मध्ये हे नगर मलिक अंबरने वसवले. याचे मूळ नाव 'खडकी' परंतु औरंगजेबाने त्याचे औरंगाबाद केले. छ. संभाजी महाराजांच्या धाकामुळे येथला कोट उभारला गेला. म्हणूनच आता या गावाचे नाव संभाजीनगर होऊ पाहत आहे.

सहयाद्री पर्वतार्गत देवगिरी पर्वतश्रेणीतील तीन गुंफा समुहापैकी औरंगाबाद हा ही महत्वपूर्ण नि वैशिष्टयपूर्ण गुंफासमूह आहे. औरंगाबादच्या बेगमपुरा या उपनगराच्या उत्तरेला साधारणपणे आठ कि.मी. अंतरावर सहयाचल टेकडयांत ही लेणी कोरलेली आहेत. औरंगाबाद येथील लेण्यांचे दोन समूह आहेत. दोन्ही एकमेकांपासून साधारणत: दोन कि.मी. अंतरावर आहेत. बिबीका मकबरा या थडग्यापासून लेण्यांकडे रस्ता जातो. सहयाद्री पर्वताच्या रांगते सुमारे २ कि.मी. अंतरातील डोंगरात एकूण १२ बौध्द लेणीचे खोदकाम करण्यता आले.[२१] हे खोदकाम वाकाटक व बदामीच्या चालुक्य घराण्याच्या कालखंडात करण्यात आले. या भागावर वाकाटक व बदामीच्या चालुक्य घराण्याची सत्ता होती. येथील लेणी एकाच डोंगरात विशिष्ट अंतर ठेवून तीन ठिकांणी कोरलेल्या आहेत. त्यामुळे येथील लेण्यांचे आपोआपच तीन विभाग पडतात. पहिल्या विभागामध्ये १ ते ५, दुसऱ्या विभागामध्ये ६ ते ९ आणि तिसऱ्या विभागात १० ते १२ औरंगाबाद येथील १२ लेणीपैकी केवळ लेणी क्रमांक १,२,५,६,७ व ८ या सहा लेणी वाकाटक काळातील आहेत.

लेणी क्रमांक : १

लेणी क्रमांक १ ही अपूर्ण असून या लेणीस प्रवेशद्वार व खिडक्या आहेत. लेणीच्या भिंतीवर यक्ष व बुध्दाची चित्रे आहेत. या लेणीत भगवान गौतम बुध्दाच्या विविध आसनयुक्त प्रतिमा आहेत. नागराज, नागराणी, बोधिसत्व, पद्मपाणि आणि वज्रपाणी यांच्याही कोरीव मूर्ती आहेत. या लेणीजवळच पाण्याचा हौद असून ही लेणी विहार आकाराची आहे. या लेणीच्या व्हरांडयाचे छत चार खांबावर आधारलेले आहे.

लेणी क्रमांक : २

या लेणीच्या गर्भगृहात बुध्दाची मूर्ती आहे. बुध्द मूर्तीच्या बाजूला पद्मपाणि वज्रपाणी व ागराज आहेत. या लेणीमध्ये प्रदक्षिणापथ कोरलेला आहे. या लेणीमध्ये दोन खांब असून या खांबावर शिल्पे कोरलेली आहेत. गर्भगृहातील बुध्दाची मूर्ती धम्मचक्रप्रवर्तन मुद्रावस्थेतील असून ती आकाराने मोठी व शिल्पकलेच्या दृष्टीने अतिशय महत्वाची वाटते. बुध्दमूर्तीच्या दोन्ही बाजूला बोधिसत्व अवलोकितेश्वर असून त्याच्या हातामध्ये कमळाचे फूल आहे. या विहारगुंफेचे अनेकानेक बुध्दमूर्ती व विशाल प्रदक्षिणापथ ही वैशिष्टये आहेत.

लेणी क्रमांक : ५

लेणी क्रमांक ५ विहार असून या विहाराच्या पाठीमागच्या प्रदक्षिणामार्गयुक्त खोलीत भगवान गौतम बुध्दांची मूर्ती आहे. बुध्दमूर्तीच्या वर गंधर्व हातात पुष्पमाला घेऊन उभे आहेत. बुध्द मूर्तीच्या बाजूलाच बोधिसत्व आहे. लेणीच्या डावीकडील प्रवेशद्वाराजवळ तीन ठिकाणी बुध्दाच्या मूर्ती आहेत. सुरुवातीच्या काळात ही लेणी जैन धर्मगुरु वर्धमान महावीर यांचे मंदिर होते. सद्या महावीर प्रतिमा म्हणून जैन भक्त मंडळी तिची पूजा करतात.

लेणी क्रमांक ६

लेणी क्रमांक ६ मध्ये बुध्दाची प्रलंबपादमुद्रेतील मूर्ती आहे. बुध्दमूर्तीसोबत स्त्री - पुरुषांच्या प्रतिमा आहेत. तसेच पद्मपाणि व वज्रपाणी आहेत. मध्यभागी श्रीगणेशाची मोठी मूर्ती आहे. ही लेणी विहार व चैत्य अशा संमिश्र स्वरुपाची आहे. या लेणीचा व्हरांडा ३८ फुट १ इंच लांब व ९ फुट रुंद आहे. त्याच्या छताला चार खांबाचा आधार दिला आहे. यामधील खांब मध्यभागापर्यंत गुळगुळीत असून त्याच्या वरच्या बाजूला कोरीव काम केलेले आहे. व्हरांडा व लेणीच्या बाजूच्या भिंतीवर चित्रकाम केलेले होते; परंतु आज त्याचे केवळ अवशेष बाकी आहेत.

लेणी क्रमांक ७

औरंगाबाद लयन समुहातील सर्वश्रेष्ठ लेणी म्हणून लेणी क्रमांक ७ चा उल्लेख होतो. या लेणीच्या दोन्ही बाजूस द्वारपाल असून उजवीकडे संकटग्रस्तांना मदत करत असताना अवलोकितेश्वर दाखवला आहे. गर्भगृहात बुध्दाची मूर्ती आहे. या लेणीत चार खांब आहेत. व्हरांडयाच्या डाव्या बाजूला बोधिसत्व आहे. व्हरांडयाच्या दोन्ही कोपऱ्यामध्ये गंगा व यमुना नदी

यांचे शिल्प आहे. लेणीमध्ये प्रलंबपाद आसन अवस्थेतील व धम्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बुध्दाची मूर्ती आहे. त्यांच्या पायाजवळ एक ठेंगू यक्ष आहे. डाव्या बाजूच्या भिंतीवर नृत्य करणाऱ्या स्त्रियांचा समूह आहे. या नृत्यसमुहातील नायिकेचा साजशृंगार पारंपारिक पध्दतीचा आहे. नृत्यसमूहाच्या उजव्या बाजूस प्रेक्षकांचा समूह बसला आहे. या नृत्यसमूहातील प्रमुख नायिका म्हणजे नर्तिका ही औरंगाबादची राजतडाग आहे. या लेणीतील सभागृह ३८ फुट रुंद आहे. यामध्ये पुन्हा एक हॉल असून त्याची लांबी ३४ फुट व रुंदी २४ फुट आहे. लेणी क्रमांक ७ ही औरंगाबाद लेणीसमुहातील सर्वात श्रेष्ठ लेणी म्हणून ओळखली जाते.

लेणी क्रमांक ८ :

औरंगाबाद लेणीसमूहातील वाकाटक कालीन लेणी क्रमांक ८ ही सद्या नावापुरतीच शिल्लक आहे. याचा आकार २७ फुट लांब व २० फुट रुंद आहे. या लेणीच्या समोर व्हरांडा आहे. व्हरांडयाच्या डाव्या बाजूस उध्वस्थ अवस्थेतील बुध्दाची मूर्ती आहे. व्हरांडयाच्या बाहेर सहा स्त्रीया आहेत. लेणीच्या दुसऱ्या भिंतीवर बुध्द, बोधिसत्व व त्यांच्या अनुयायांचे शिल्प आहे. औरंगाबाद येथील आठव्या क्रमांकाच्या लेणीत विशेष काही नाही.

अजिंठा :

बौध्द लेणीसाठी प्रसिध्द असलेले हे एक जगप्रसिध्द ठिकाण आहे.औरंगाबादच्या (संभाजी नगरच्या) उत्तरेला सुमारे ११० कि.मी. अंतरावर अजिंठा येथील जगप्रसिध्द लेणी आहेत. प्रसिध्द चिनी प्रवासी युआन च्यांग (इ.स. ६०२ ते ६९४) हा दक्षिणेत बादामीला गेला असता त्याने या गुंफांचे जे वर्णन ऐकले ते लिहून ठेवले आहे.[२२] ते असे महाराष्ट्र देशाच्या पूर्व भागात एक मोठी पर्वतश्रेणी आहे. तिथे एका दरडीत भव्य मंडप दालने कोरलेली आहेत. त्यांत एक मोठा संघाराम आहे. अचेलो या पश्चिम भारताच्या रहिवाशाने तो खोदविला असे सांगतात. त्यातील मंदिर शंभर फुटांहूनही अधिक उंच आहे. त्या मंदिरात सत्तर फुट उंचीची एक भव्य बुध्दमूर्ती आहे. पुढे निर्मनुष्य झाल्यानंतर तिथे रान माजले आणि त्यात जंगली जनावरांनी वसती केली . त्यामुळे मध्ययुगात हे स्थान अज्ञातच राहिले. त्याचा शोध लावण्याचे श्रेय परकीय राज्यकर्त्यानाच द्यावे लागते. इ.स. १८१९

मध्ये मद्रास विभागातील काही गोरे लष्करी अधिकारी अजिंठयाच्या रानात हिंडत असताना, त्यांनी ही लेणी पाहिली. व इ.स. १८२४ मध्ये जनरल सर जेम्स अलेक्झांडर याने तिथे जाऊन त्या सर्व गुंफाची नीट पाहणी केली आहे.[२३]

अजिंठा लेणी पाहण्याचा जो प्रमुख केंद्रबिंदू आहे. त्यास व्हयु पॉईट म्हणतात. येथून सर्व लेणी सहजपणे दिसतात. येथूनच वघेरा नावाची नदी वाहते. इ.स. १९५१ मध्ये अजिंठा व वेरुळ लेणींना भारत सरकारने राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले. यानंतर दोन वर्षानी या लेणी भारतीय पुरातत्व विभागांकडे सोपविण्यात आल्या. बौध्दधर्मात महायान व हीनयान हे दोन पंथ आहेत. हीनयान पंथाला मूर्तिपूजा मान्य नाही. तर महायान पंथीय लोक मूर्तिपूजक आहेत. हीनयान पंथीय लोकांनी स्तूपांची पुजा करण्यास प्रारंभ केला तर महायान पंथीय लोकांनी बुध्द मूर्तीपूजा सुरु केली. वाकाटक काळात अजिंठा येथे हीनयान व महायान या दोन्ही पंथाच्या लेण्या आहेत.

अजिंठा लेणीच्या खोदकामास पैठणच्या सातवाहन घराण्यातील सम्राटांनी सुरुवात केली. वाकाटकांच्या काळात अजिंठा येथील लेणी क्र. १,२, १६,१७, व १९ चे खोदकाम झाले. वाकाटक सम्राट हरिषेण (इ.स. ४७५ ते ५००) याचा सचिव हस्तिभोज याचा पुत्र वराहदेव यांने अजिंठा लेणी क्रमांक १६ खोदण्यासाठी आर्थिक साहाय्य केले. या लेणीत वाकाटककालीन असलेल्या शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.[२४] या शिलालेखावरुन वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची माहिती मिळते. अजिंठा लेण्यांच्या निर्मितीचा काळ इसवी सनाचे दुसरे शतक ते सातवे शतक असा आहे.

लेणी क्र. १

या लेणीत २० खांबावर आधारीत एक दालन आहे. खांबावर फारच सुंदर नक्षीकाम केलेले आहे. लेणी क्रमांक १ ही चैत्य व विहार अशा संमिश्र स्वरुपाची वास्तू आहे. मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस खिडक्या आहेत. द्वारकाशाखा विविध प्रकारचे कोरिवकाम करुन सजविल्या आहेत. मंडपातून आत गेल्यानंतर गौतम बुध्दाची मोठया आकाराची मूर्ती आहे. गर्भगृहातील ही मूर्ती जगातील सर्व मूर्तीपैकी सर्वश्रेष्ठ आहे. या मूर्तीचे वैशिष्टये असे की, आपण मूर्ती पाहण्याची जागा बदलली की मूर्तीचे हवभाव

सुध्दा बदलतात. (तपस्या, शांती, किंचित हास्यमय, प्रसन्न) या मूर्तीच्या दोन्ही बाजूला चवरी धारण केलेले काही (रक्षक) शिल्पे आहेत. लेणी क्र. १ मध्ये वज्रपाणी, हरीण, इत्यादी शिल्पे आहेत. शिल्प व चित्र या दोन्ही दृष्टीनी हे लेणे विशेष प्रेक्षणीय आहे. बुध्दाच्या जीवनातील प्रसंग, हत्तीच्या झुंजी इ. विविध प्रकारचे कलापूर्णशिल्पकाम येथे दिसते. इथले स्तंभ अतिशय देखणे आहेत.

लेणी क्र. २

अजिंठा येथील लेणी क्र. १ व लेणी क्र. २ मध्ये बरेचसे साम्य दिसते. लेणी क्र. २ ही विहार आहे. पहिल्या क्रमांकाच्या लेणीपेक्षा आकाराने थोडी लहान दिसते. लेणीच्या प्रवेशद्धारावरच सुंदर शिल्पकाम केलेले आहे. लेणीच्या गर्भगृहात गौतम बुध्दाची एक भव्य मूर्ती धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेत कोरली आहे. गर्भगृहात पंचिक आणि हारितीच्या मूर्ती आहेत. लेणीमध्ये शिक्षक, अभ्यासात मग्न असणारी मुले, खेळणारी मुले, मेंढी, यक्षमूर्ती आहेत. याच लेणीमध्ये जांभाल हारितीचे शिल्प आहे. वाकाटक काळात लेणी क्र. २ चे खोदकाम करण्यात आले. या लेणीतील शिल्पकाम सुंदर आहे. शिल्पकला व चित्रकला या दोन्ही दृष्टीने हे लेणे प्रेक्षणीय आहे.

लेणी क्र. १६

अजिंठा येथील १६,१७ व १९ या क्रमांकाची लेणी स्थापत्य व चित्रकला या दोन्ही दृष्टीनी भारतातल्या कुठल्याही लेण्यांपेक्षा उत्कृष्ट आहेत, असे बर्जेसने म्हटले आहे.[२५] यातले १६ वे लेणे वाकाटक नृपती हरिषेण (इ.स. ४७५ ते ५००) याच्या वराहदेव नावाच्या सचिवाने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपचयासाठी खोदविले आहे. हे लेणे अजिंठा येथील सुंदर विहारांपैकी एक आहे. प्रवेशद्धाराच्या दोन्ही बाजूस हत्ती कोरलेले आहेत. समोर नागराज आणि नागराणीचे शिल्प आहे. दालनाच्या बाहेरील डाव्या भिंतीवर वाकाटक सम्राट हरिषेण याचा मंत्री वराहदेव याने कोरलेला एक शिलालेख आहे. लेणीत १४ भिक्षूगृहे हे असून गर्भगृहात बुध्दाची प्रवचन करीत असलेली मूर्ती आहे. बुध्दांची भव्य मूर्ती सिंहासनावर अधिष्ठित असून, ती धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेत आहे. बुध्दांच्या मुखाभोवती तेजोवलय असून, त्यांच्या दोन्ही अंगी वज्रपाणी व पद्मपाणी चवऱ्या घेऊन उभे आहेत. ही लेणी आकाराच्या व स्थापत्याच्या दृष्टीने लेणी क्रमांक सतरा प्रमाणेच आहे.

लेणी क्र. १७

अजिंठा लेणी समुहातील क्र. १७ चे लेणे विहार आहे. या लेणीच्या समोरील डाव्या भिंतीवर मोठया आकाराचे संस्कृत शिलालेख आहे. वाकाटक नृपती हरिषेणाच्या मांडलिकाने रविसांब नावाच्या आपल्या लहान भावाच्या अकाली निधनाने संसाराची असारता पटल्यावर भिक्षुसंघाकरिता खोदवले असे कळते. १७ क्रमांकाचे विहार लेणे सामान्यत: १६ क्रमांकाच्या लेण्यासारखेच आहे. याचा व्हरांडा ६४ फुट लांब व १० फूट रुंद असून याच्या समोर सहा साधे अष्टकोनी स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. लेणीच्या बाहेर पाण्याचा हौद बनवला आहे. गर्भगृहात बुध्दाची व्याख्यान मुद्रेतील एक मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस चवरी धारण केलेल्या वज्रपाणी व पद्मपाणी आहेत. बुध्दाच्या मुखाभोवतील तेजोवलय असून दोन बाजूस आकाशांतून एक एक विद्याधर उपायन घेऊन येऊन ते बुध्दाला अर्पण करीत असलेला दाखविला आहे. या विहारात एकूण १६ खोल्या आहेत.

लेणी क्र. १९

क्रमांक १९ चे लेणे हे ही ऋषीक देशाच्या मांडलिकाने खोदवून बौध्द संघास अर्पण केले होते.[२६] हे लेणे महायान पंथीय चैत्यगृह आहे. या लेण्याला गंधकुटी या नावाने उल्लेखिलेले आहे. या गंधकुटीतील चैत्यात दोन खांबावरच्या कमानीत बुध्दांची उभी मुर्ती कोरलेली आहे. त्यांना पायापर्यंत लोंबणारा अंगरखा घातला असून त्यांची मुद्रां शांत आहे. बाजूच्या भिंतीवर बौध्दमुर्ती, यक्षमुर्ती कोरलेल्या आहेत. डाव्या हाताकडील भिंतीवर कोरलेले नागदंपतीचे शिल्प आहे. चैत्यमंदिरात स्तूपाजवळ भव्य बुध्दमूर्ती असून तिच्यावर मकर- तोरण दिसते. गंधकुटीच्या किंवा चैत्य लेण्याच्या आतील भाग २४ फूट रुंद, ४६ फूट लांब आणि २४ फूट, ४ इंच उंच आहे.

हिंदु लेणी :

वाकाटक सम्राटांनी ज्याप्रमाणे बौध्द लेणी स्थापत्याची निर्मिती केली ; त्याचप्रमाणे त्यांनी हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती केली. या काळात लातूर जिल्ह्यातील खरोसा आणि नांदेड जिल्ह्यातील शिऊर येथे हिंदू लेणी खोदविल्या शिऊर येथील लेणी वैष्णव व खरोसा लेणी शैव लेणी आहेत.

खरोसा येथील लेणी :

हे ठिकाण निलंगा ते लातूर रस्त्यावर असून या लेण्या निलंग्या पासून ३ कि.मी. अंतरावर आहेत. या लेण्यांच्या लगतच खारोसा हे लहानसे गाव वसलेले असल्यामुळे त्यांना खरोश्याच्या लेण्या असे संबोधले जाते. या लेण्या डोंगरात निर्माण केलेल्या आहेत. येथील खडक लालसर रंगाचा व वाळू मिश्रित आहे. त्यामुळे कलाकारांना आपल्या इच्छेप्रमाणे शिल्प साकारता आले नाही. येथे ऐकूण १३ लेण्या असून या लेण्या वाकाटक व राष्ट्रकुट काळातील आहेत असे इतिहासकारांचे मत आहेत.[२७]

या लेण्यांची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येते. पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या लेणीत एकही शिल्प नाही. तिसऱ्या क्रमांकाच्या लेणीत शिवलिंग कोरण्याची धडपड केलेली आहे. येथे सहा स्तंभ असून प्रदक्षिणा घालण्यासाठी रस्ता तयार केलेला आहे. अपेक्षेप्रमाणे खडक उपलब्ध न झाल्यामुळे कलाकारांनी आपले काम अर्धवट अवस्थेत सोडलेले आहे. चौथ्या क्रमांकाच्या लेणीत देखील शिवलिंग कोरण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे. पाचव्या व सहाव्या लेणीत काहीच नाही. सातव्या क्रमांकाच्या लेणीत नृसिंहाचे शिल्प अर्धवट व ओबड धोबड अवस्थेत कोरलेले आहे. आठव्या क्रमांकाची लेणी भव्य असून ते एक सभागृह आहे असे वाटते.कारण येथे कोणतेच शिल्प नाही . नवव्या क्रमांकाची लेणी दोन मजली असून तळमजला पूर्णपणे रिकामा आहे. दुसऱ्या मजल्यावर एक प्रशस्त सभागृह असून त्याला चोवीस स्तंभ आहेत. सभामंडपात अंधार पडू नये म्हणून छताला एक छिद्र ठेवण्यात आलेले आहे. पावसाळ्यात पावसामुळे येणारे पाणी लेणीत साचू नये म्हणून त्या पाण्याची विल्हेवाट योग्य रीतीने लावलेली आहे. यावरुन कलाकार कल्पक व द्रष्टे होते हे स्पष्ट होते. या सभागृहाच्या बाजूला उपमंदीराच्या भिंतीवर काही शिल्पे कोरलेली आहेत.

दहाव्या क्रमांकाची लेणी हे खरोसा लेण्याचे भूषण आहे. या लेणीच्या प्रवेशद्वारावर शिवाची भव्य मूर्ती कोरलेली आहे. लेणीत प्रवेश केल्यानंतर तांडवनृत्य करणारा शिव दिसतो. त्यास 'नटेश्वर' म्हणतात. शिवपार्वतीचे आकर्षक व उत्थान शिल्प हे या लेणीचे वैशिष्टय आहे. तसेच समुद्रमंथनाचे दृश्य अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेले आहे. राम- रावण यांच्या युध्दाचे शिल्पांकन येथे आहे. युध्दभूमीवर अनेक रथ दर्शविलेले आहेत. लक्ष्मणाला बाण लागल्यानंतर हनुमानाने संजीवनी

वनस्पती आणण्यासाठी सर्व पर्वतच उचलून नेण्याचे शिल्प येथे खोदलेले आहे. या लेणीमध्ये विष्णूचे नऊ अवतार अप्रतिम स्वरुपात रेखाटलेले आहेत. त्यापैकी प्रामुख्याने नृसिंह, वराह, मत्स्य, बुध्द, राम हे अवतार विशेष मनमोहक आहेत. गजराज नम्र अवस्थेत दर्शविलेला आहे. एकंदरीत रामायणातील महत्वाचे प्रसंग, शिव महात्म्य, युध्दभूमी इत्यादी गोष्टीवर शिल्पे साकार झालेली आहेत. तत्कालीन कलाकारांच्या प्रतिमेची साक्ष लेण्यांद्वारे पटते.

क्रमांक अकराच्या लेणीत दोन मजले असून त्यापैकी तळमजला मोठया सभागृहासारख्या आहे. येथे एकही शिल्प नाही. दुसरा मजला झोपडीसारख्या आहे. त्यात चार शिल्पे आहेत. पण काळाच्या ओघात या कलाकृती अस्पष्ट झाल्या आहेत. बाराव्या लेणीला 'बुध्द लेणी' असे संबोधले जाते.पण त्यासंबंधी एकही पुरावा आज उपलब्ध नाही. तेराव्या क्रमांकाची लेणी नाममात्रच आहे. एकूण खरोसा लेण्या सुंदर असूनही त्यांचा विकास मात्र झालेला नाही. पण कलाकाराच्या कौशल्याच्या त्या - लेण्या साक्षीदार आहेत.

धाराशिव - ऐतिहासिक व भौगोलिक माहिती

उस्मानाबाद जिल्हा पुर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठवाडा समजला जाणाऱ्या मराठी भाषिक जिल्हयापैकी एक आहे. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर या जिल्हयाचा समावेश महाराष्ट्रात करण्यात आला. उस्मानाबादचे प्राचीन नाव 'नागसेननगर ' होते. पुढे नागसेननगर हे गाव मागे पडून 'धाराशिव ' असे नाव पडले. इ.स.पू. काळात राजा 'करकंड ' याने धाराशिव (धारापूर) नगराची स्थापना केली. धाराशिव नगरी ही तुळजापूरच्या उत्तरेस १२ मैलावर असून, लातूर हे ठिकाण धाराशिवापासून पूर्वेस ५० मैलांवर आहे. बार्शी हे ठिकाण धाराशिवच्या पश्चिमेस २६ मैल अंतरावर आहे. हे नगर उत्तर अक्षांश १७° ३५ ते १८° ४० व पूर्व रेखांश ७५° १६ ते ४६° ४० हया ठिकाणावर आहे. धाराशिव नगरीचा उल्लेख काही प्राचीन साहित्यात आढळून येतो. लेणी खोदकामास करकंड राजास तेरच्या शिवराजाने बरीच मदत केली. लेणी खोदकाम करीत असताना राजाचे वास्तव्य येथे जवळच असले पाहिजे. त्याने तेथे असलेल्या भोगावती नदीच्या किनाऱ्यावर वास्तव्य केले असल्याने तेथेच धाराशिव नगरी वसली असल्याची शक्यता आहे. लेणी- खोदकाम करीत असताना जिवंत पाण्याचा झरा आढळून आला. त्यामुळे शिवराजा आणि धारा (झरा)

यावरुन कदाचित धाराशिव असे नाव पडले असण्याची शक्यता आहे. मध्ययुगीन काळात धाराशिव नगरीचे महत्व वाढले. मुसलमान राजवटीत धाराशिव नगरीच्या परिसरात अनेक घडामोडी घडून आल्या. १८ व्या शतकात या प्रदेशावर निजामाचे वर्चस्व होते. इ.स. १९११ साली तत्कालीन निजाम मीर उस्मान आली तख्तनशील होते.[२८]

धाराशिव लेणी

उस्मानाबाद नगराच्या पश्चिमेस हातला देवीच्या डोंगराजवळ असलेल्या एका डोंगरामध्ये एकूण ९ लेण्या आहेत. त्यापैकी सहा बौध्द , दोन जैन आणि एक -हिंदू लेणी आहे.[२९] धाराशिव येथे सध्या सहा लेण्या दिसतात. त्यापैकी चार एका बाजूस व दोन त्याच्या विरुध्द बाजूस टेकडीत खोदली आहेत.[३०]

धाराशिव लेण्यांच्या कालखंड

धाराशिव लेण्यांच्या संख्येबाबत जशी मतभिन्नता आहे, त्याप्रमाणेच त्यांच्या कालखंडाबाबतही इतिहासकारात मतभिन्नता आहे. उस्मानाबाद शहरापासून अवघ्या ४ कि.मी. अंतरावर एक प्राचीन लेणी आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन ही लेणी ७ व्या शतकातील असावीत. तर काही लेणीचे खोदकाम इ.स. ५ व्या किंवा ६ व्या शतकात वाकाटक राजवंशाच्या कालखंडात झाले असावे. तेर हे धाराशिवच्या ईशान्येस बारा मैलावर आहे. त्याच्याजवळच्या या लेण्यांचा इतिहास आणि वर्णन जैन ग्रंथात आले आहे. सन १९२४ मध्ये डॉ.हीरालाल जैन यांना विदर्भातील कारंजा गावच्या जैन ग्रंथ भांडारात कनकामर कवीच्या 'करकंडचरिऊ' (कर्कंडचरित) या अपभ्रंश भाषेतील ग्रंथाची एक प्रत आढळली .नंतर त्यांनी तो ग्रंथ कारंजा -जैन- ग्रंथमालेत प्रसिध्द केला. या ग्रंथात कर्कंड राजाची पुढील कथा आली आहे. कर्कंड हा उत्तर भारतातील अंग देशाचा राजा होता. त्यांची राजधानी चंपा (सध्याचे भागलपूर) येथे होती. त्याचे राज्य भारतभर पसरले होते. पण दक्षिणचे चोल, चेर आणि पांडय देशांचे राजे मात्र त्याचे स्वामित्व मान्य करीत नव्हते. तेव्हा त्यांना जिंकण्या करिता मोठे सैन्य घेऊन तो त्यांच्या देशावर स्वारी करण्यास निघाला. वाटेत त्याचा मुक्काम तेरापूर येथे पडला. तेथील शिवनामक राजाने त्याला जवळच्या पर्वतावरील लेण्यासंबंधी माहिती दिली तेव्हा तो ती लेणी पाहण्यास गेला. त्यात त्याला पार्श्वनाथाची मुर्ती दिसली. तसेच त्या टेकडीवरील

वारुळात दबलेली आणखी एक पार्श्वनाथची मूर्ती त्याला आढळली. तीही त्याने आणून त्या लेण्यात बसविली. नंतर त्या लेण्यातील पार्श्वनाथ जिनाच्या सिंहासनावर त्याला एक ग्रंथि आढळली. ती तेथे योग्य दिसत नाही, असे वाटून त्याने एका शिल्पीला बोलावून ती ग्रंथि तोडून टाकण्यास सांगितले. तेव्हा तो शिल्पी म्हणाला, 'महाराज, या ग्रंथीच्या आत पाण्याचा मोठा झरा आहे. ती तोडून टाकल्यास पाण्याचा मोठा प्रवाह धो धो वाहत येऊन या लेण्याला धोका पोचेल.' पण राजाने त्याचे न एकेता ती ग्रंथि तोडून टाकण्याची त्याला पुन: आज्ञा केली. पण तसे करताच पाण्याचा ओघ जोराने बाहेर पाडून त्यांनी ते लेणे खराब झाले. त्यामुळे राजाला फार वाईट वाटले. पण तितक्यात एका नागकुमाराने आकाशातून तेथे येऊन त्यांचे सांत्वन केले. हे लेणे कोणी कोरविले असे राजाने विचारले तेव्हा त्याने त्याला पुढील माहिती दिली, दक्षिण वेद्यर्धा मध्ये (म्हणजे कैलासच्या दक्षिण दिशेस) नील व महानील असे दोन विद्याधर भाऊ राज्य करीत होते. शत्रूंनी त्यांचा पाडाव केल्यामुळे ते दक्षिणेत तेरापूर येथे पळून आले आणि तेथे त्यांनी आपले राज्य स्थापिले. तेथे त्यांना एका मुनीने जैन धर्माची दिक्षा दिली. नंतर त्यांनी हे लेणे कोरुन त्यात पार्श्वनाथाची मूर्ति स्थापिली. टेकडीवरील वारुळातील मूर्तीविषयी कर्कण्डाला असे समजले की, दुसऱ्या दोन विद्याधरांनी ती केरळ प्रदेशातील पूदी टेकडीवरुन आणली होती व ती तेथेच सोडून ते निघून गेले होते.

नंतर कर्कण्डाने स्वत: त्या पर्वतात आणखी दोन लेणी कोरविली. पुढे त्यांनी सिंहलद्विपावर स्वारी केली आणि परत येताना चोल, चेर आणि पांडय या देशांना जिंकून तो स्वदेशी चालता झाला. उस्मानाबादच्या या लेण्यांना जैन लेणी, चांभार लेणी, ब्राम्हण लेणी अथवा धाराशिव लेणी असे म्हटले जाते.[३१] या लेण्यांच्या मदतीने तेर संबंधी माहिती मिळते. धाराशिव लेण्यांचे खोदकाम चालू असताना येथून जवळच असलेल्या भोगावती नदीच्या किनाऱ्यावर धाराशिव नगराची उभारणी झाली.

लेणी क्रमांक. २

येथे असलेली क्रमांक २ ही बौध्द लेणी असून या लेणीचे खोदकाम इ.स. च्या पाचव्या शतकात वाकाटक राजवंशाच्या कालखंडात झाले आहे. ही लेणी येथील प्राचीन लेणी आहे. ही लेणी धाराशिव येथील लेणी समूहातील सर्वात प्रेक्षणीय व सुंदर आहे. लेणी क्र. १ पासून ही लेणी

२० फुट अंतरावर असून ती या परिसरात सर्व प्रथम खोदलेली आहे. ही लेणी शिल्प व वास्तुशिल्पाच्या दृष्टीने अंजिठा येथे वाकाटक कालखंडात खोदण्यात आलेल्या क्र. १६ व १७ लेणी समान आहे.[३२] दुसऱ्या लेणीच्या आत सुमारे ८० फुट बाय १० फुट व्हरांडा असून त्याचे छत ३२ खांबांनी पेलून धरले आहे. आतील बाजूस पार्श्वनाथाची भव्य मूर्ती आहे.येथील मूर्ती आजही सुस्थितीत आहेत. प्रवेशद्धाराजवळ पाण्याचे कुंड असून त्यात बारमाही स्वच्छ व गारपाणी असते.

हॉलच्या दोन्ही बाजूच्या व मागच्या भिंती मुनीकरिता २२ खोल्या आहेत. पाठीमागच्या गर्भगृहात सिंहासनावर पार्श्वनाथाची मूर्ती ध्यानमुद्रेत कोरली असून त्याच्या डोक्यावर ७ फणांचा नाग आहे. प्रत्येक फणेवर लहानसा किरीट आहे. सिंहासनाच्या पुढील भागावर सध्या भग्न झालेले, कडेवर उभे असलेले चक्र आणि त्याच्या दोन्ही बाजूस दोन दोन हरिण कोरले आहेत. सिंहासनाच्या दोन्ही बाजूस एक एक शार्दुल, चामरधारी सेवक व मालाधारी विद्याधर दिसतात.[३३]

लेणी क्र. ३

या लयनसमूहातील आणखी एक उल्लेखनीय लेणी म्हणजे क्रमांक ३ . सहा सपाट अष्टकोनी स्तंभावर पेललेला व्हरांडा, व्हरांडयाच्या मागील भिंतीत असलेल्या मंडपात जाण्यासाठी असलेली पाचद्धारे, त्यामागे २६ स्तंभ असलेला मंडप व मंडपाच्या तीन भिंतीत मागील भिंतीतील गर्भगृह वगळता एकूण १२ छोटया खोल्या किंवा कक्ष असा या लेण्यांचा तलविन्यास आहे. मंडपातील स्तंभाची मांडणी चौरस आकार असून या चौरसाच्या प्रत्येक बाजूत एकूण ६ स्तंभ आहेत. या लेणीची लांबी व रुंदी ५९ फूट व उंची ११ फूट ३ इंच आहे. या लेणीस तीन दरवाजे आहेत. या लेणीत २० स्तंभावर आधारलेला नवरंग मंडप आहे. व्हरांडयाच्या शीर्ष पट्टीवर चैत्यगवाक्ष कोरले आहे. छतावर चित्रकाम केलेले आढळते. गर्भगृहात पार्श्वनाथाची पद्मासनास्थ भव्य मूर्ती आहे. मूर्तीच्या सभोवती यक्ष, यक्षिणी, अप्सरा व रक्षकाच्या मूर्ती आहेत. वरील दोन्ही लेणी वैशिष्टयपूर्ण आहेत. या दोन्ही लेण्यामध्ये सिंहासनस्थ पार्श्वनाथाच्या मूर्ती असून त्याच्या दुतर्फा प्रतीहार आहेत. अजिंठा येथील भद्रासन - सिंहासनाप्रमाणेच याही सिंहासनावर धर्मचक्र आणि काळवीट ही प्रयोजने आहेत. सिंहासनाच्या दुतर्फा किंचित मागच्या बाजूस चौरीधारक आणि आकाशात विहारणाऱ्या ठेंगू यक्ष मूर्ती दाखविल्या आहेत. या मूर्तीभोवती अर्ध उठावात ढगांसारख्या

आकृती दाखवल्या आहेत. फरक इतकाच की, या लेण्यास तीर्थकाराच्या डोक्यावर नागाचा फणा दाखविला आहे.

धाराशिव लेणी जैन की बौध्द :

धाराशिवच्या ईशान्येस पश्चिमाभिमुख टेकडीत कोरलेली काही लेणी पुरातत्वज्ञांस परिचित आहेत. बर्जेसने त्याचे वर्णन आपल्या Archaeological survey of western India, Vol-III आणि Caves Temples of India. नामक ग्रंथात केली आहे. त्याच्या मते ती जैन धर्माची लेणी आहे. धाराशिवची लेणी 'करकंडचरिऊ' या अपभ्रंश आणि 'बृहत्कथाकोष' या संस्कृत ग्रंथात जैन धर्माची म्हणून वर्णिली आहेत. तसेच डॉ. सुतार अमर व प्रा. रोडे सोमनाथ यांनी ही धाराशिव लेणी हया जैन आहेत असे मत मांडले.[३४] डॉ. मिराशी वा.वि. यांनी 'धाराशिव लेणी बौध्द की जैन?' हा लेख प्रसिध्द केला व त्यामध्ये त्यांनी हया लेणी जैन धर्मीय असल्याचे मत प्रतिपादन केले.[३५] अलीकडे डॉ. ढवळीकर म.के. यांनी ती बौध्द धर्माची आहेत असे विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिक सन १९६२ आणि सन १९६८ मधील लेखांत सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. या लेण्याच्या वैशिष्टयपूर्ण स्थापत्यावरुन त्या मुळच्या बौध्द असाव्यात पण सातव्या शतकात त्या जैन धर्मीयांनी आत्मसात केल्या असाव्यात असे म्हटले जाते.

शिऊर लेणी :

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात शिऊर नावाचे एक खेडेगाव आहे. या गावची लोकसंख्या ७२७ आहे. हे गाव मराठवाडा - विदर्भाच्या सरहद्दीवर असून पैनगंगा नदीच्या अगदी दक्षिण काठावर वसलेले आहे. पैनगंगा नदी ही मराठवाडा विदर्भाची सरहद्द आहे. पैनगंगेच्या दक्षिण बाजूस मराठवाडा आणि उत्तर बाजूस विदर्भ आहे. शिऊर हे गाव हदगाव पासून ४० कि.मी. अंतरावर आहे. येथे जाण्यासाठी नांदेडहून दोन मार्ग आहेत. नांदेडहून निघाल्यानंतर मानवाडी फाट्यावरुन निवघा (बाजार), कोळी, तळणी, आमगव्हाण मार्गे शिऊरला जाता येते. या मार्गाने नांदेडपासून शिऊर ९९ कि.मी. आहे. दुसरा मार्ग नांदेड- अर्धापूर, वारंगा फाटा, आखाडा बाळापूर - माळेगाव फाटा, शिऊर असा आहे. माळेगाव फाट्याहून शिऊर १६ कि.मी. अंतरावर आहे. या मार्गाने नांदेड पासून शिऊर ७६ कि.मी. आहे.

शिऊर या गावाच्या नैऋत्येला २०७ मीटर अंतरावर एक अगदी लहान माळटेकडी आहे. या माळटेकडीला सपाट डोंगर म्हणता येईल. या सपाट डोंगरात तीन लेण्यांचे खोदकाम करण्यात आलेले आहे. या लेण्या सपाट डोंगर अर्थात माळटेकडीत खोदलेल्या असल्यामुळे जवळ जाईपर्यंत येथील लेण्या दृष्टीस पडत नाहीत. सपाट डोंगरात कोरलेल्या लेण्या अंबाजोगाई येथे आढळतात. शिऊर येथील लेणी पूर्वाभिमुख असून त्या दक्षिण - उत्तर ९२ फूट अंतरात खोदलेल्या आहेत. येथील तिनही लेणींचे विधान गर्भगृह व सभामंडप असे आहे. येथील खडक ठिसूळ असल्यामुळे लेणींचे खोदकाम अर्धवट झालेले आढळते. तसेच लेणीतील स्तंभ, छत व भिंतीचे काम सुबक झालेले नाही. येथील लेणीतील स्तंभ आणि भिंतीवर सुंदर शिल्पकाम केलेले आहे ; परंतु खडक ठिसूळ असल्यामुळे येथील बहुतेक शिल्पे भंगलेल्या व झिजलेल्या स्थितीत आढळतात. शिल्पकलेच्या दृष्टीने येथील लेणी विशेष उल्लेखनीय ठरतात. या लेणी लेणीस्थापत्याच्या विकासाचा प्राथमिक टप्पा दर्शवितात. भारतीय लेणी स्थापत्याच्या विकासात या लेण्यांना महत्वाचे स्थान आहे. शिऊर या गावाच्या नैऋत्याला असलेल्या एका डोंगरात तीन लेण्यांचा समूह कोरलेला आहे. या लेण्या डोंगराच्या पूर्वेला ९२ फूटात कोरलेल्या आहेत. स्थापत्यशास्त्रीय दृष्ट्या पाहिल्यास येथील तिनही लेण्यांचे रेखाटन सारखेच दिसते. या ठिकाणी लेण्यांच्या खोदकामासाठी आवश्यक असलेला आणि योग्य प्रकारचा खडक नसल्यामुळे लेण्यांचे खोदकाम व त्यामधील शिल्पकाम अर्धवट स्थितीत सोडून कलाकारांना दुसरीकडे निघून जावे लागले. पूर्णावस्थेत नसलेल्या या लेण्या इ.स. १९७२ पर्यंत अज्ञात होत्या. याचवर्षी डॉ. प्रभाकर देव आणि डॉ. जी.सी. शेळके यांनी या लेण्यांचे प्रथम सर्वेक्षण केले आणि या लेण्यांवर प्रकाश टाकला.[३६] शेवटी महाराष्ट्र शासनाने इ.स. १९८५ मध्ये या लेण्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिली.

शिऊर येथील लेणी वाकाटक काळातील आहेत. वाकाटकांच्या दोन शाखा होत्या. पहिल्या शाखेची राजधानी नंदीवर्धन होती तर दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म होती. वत्सगुल्म म्हणजे आधुनिक वाशिम होय. इ.स. ३३० ते इ.स. ५५० हा वत्सगुल्मच्या वाकाटक घराण्याचा कालखंड आहे. परभणी, औरंगाबाद, नांदेड व बीड जिल्ह्याच्या भागावर वाकाटकांची सत्ता होती. वाकाटक काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते. द्वितीय विंध्यशक्तीच्या (इ.स. ३५५-

४००) वाशिम ताम्रपटावरुन समजते की, वाकाटककालीन नांदेडचे नाव नांदीकड व नांदीतट होते. याच काळात नांदेडप्रमाणेच कंधार हेही बौध्द कला व स्थापत्याचे प्रसिध्द केंद्र होते. या काळातील एक विहार आणि बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची प्रतिमा अनुक्रमे कंधार व बहाद्दरपूरा येथे आढळते. वाकाटक काळात नांदेड जिल्हा कला व स्थापत्य क्षेत्रात प्रगतीवर होता. याच काळात शिऊरजवळील डोंगरात लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. लेणीस्थापत्य विकासाचा पहिला अर्थात प्राथमिक टप्पा म्हणून या लेण्यांकडे पाहिले जाते. डॉ. देव प्रभाकर आणि डॉ. जी.सी. शेळके यांनीही या लेण्यांचे खोदकाम सम्राट विंध्यशक्ती दुसरा यांच्या काळात झाले असावे असे मत मांडले.[३७] भारतात बौध्द, हिंदू आणि जैन धर्माच्या लेण्यांचे खोदकाम करण्यात आले. वाकाटक सम्राट वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी अजिंठा या ठिकाणी बौध्द धर्माच्या लेण्यांचे खोदकाम केले.वाकाटकांच्याच काळात शिऊर येथे खोदलेल्या लेणी वैष्णव लेणी आहेत.[३८] येथील डोंगराच्या पूर्वेस ९२ फुटात कोरलेल्या लेण्यांमध्ये कोरण्यात आलेली सर्व शिल्पे वैष्णव पंथाची आहेत. त्यावरुन या लेणी वैष्णव पंथाच्या ठरतात. येथील लेण्यांमध्ये ब्रह्मा, विष्णू, त्रिविक्रम, नृसिंह, वराह, राम, वासुदेव पद्मनाथ, सप्तमातृका, कृष्ण, गरुड, महिषासुरमर्दिनी, केशव, हत्ती व किर्तीमुख इत्यादी शिल्पे आढळतात.

लेणी क्रमांक १ :

लेणी क्रमांक १ ही पूर्व - पश्चिम २३ फूट ६ इंच लांब आणि दक्षिण - उत्तर २० फूट रुंद आहे. लेणींच्या छताची उंची ६ फूट ९ इंच आहे. गर्भगृह आणि सभामंडप असे या लेणीचे विधान आहे. या लेणीचे खोदकाम सर्वप्रथम करण्यात आले. या लेणीचा दर्शनी भाग पूर्णपणे नष्ट झाला आहे. या लेणीत चौकोनी आकाराचे १६ स्तंभ होते. त्यापैकी आज १२ स्तंभ शिल्लक असून दर्शनी भागातील ४ स्तंभ नष्ट झाले आहेत. लेणीच्या भिंती, छत आणि स्तंभाचे काम योग्य खडक नसल्यामुळे ओबड - धोबड स्वरुपाचे आढळते, स्तंभ सरळसोट उभे आहेत. त्यांना स्तंभशीर्षाचा आकार दिलेला नाही. हे स्तंभ दक्षिण - उत्तर ३ फूट ४ इंच आणि पूर्व - पश्चिम ३ फूट ६ इंच आकाराचे आहेत. या स्तंभाची उंची ६ फूट ९ इंच आह. लेणीतील स्तंभावर विविध मूर्तिशिल्प कोरलेले आढळते ; परंतु या मूर्तिशिल्पाची मोठी झीज झाली आहे. या लेणीत समोरच्या भिंतीतून

एक मोठा शिलाखंड पुढे आलेला आहे. त्यातून गर्भगृह कोरलेले आढळते. गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ कोरलेला नाही. लेणीचे खोदकाम अर्धवट स्वरुपात आढळते. लेणीचे खोदकाम सर्वप्रथम करण्यात आले असून लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. या लेणीतील दक्षिणेकडून पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर वासुदेवाचे शिल्प आहे. वासुदेव चतुर्भुज आहे. ही मूर्ती स्थानक असून तिची उंची १५० सें.मी. आणि जाडी ६० सेंमी. आहे. विष्णुच्या वरच्या हातात शंख व चक्र आहे, तर खालच्या हातात गदा व पद्म आहे. तिसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावरही अशाच प्रकारची विष्णुमूर्ती आढळते.

लेणी क्रमांक २ :

लेणी क्रमांक १ ला लागूनच डाव्या बाजूस लेणी क्रमांक २ आहे. लेणी क्रमांक १ प्रमाणेच गर्भगृह आणि सभामंडप असे या लेणीचे विधान आहे. तसेच याही लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाला आहे. लेणी क्रमांक १ आणि ३ च्या तुलनेत अधिक खोलवर खोदलेली आहे. या लेणीचा आकार लेणी क्रमांक १ च्या आकारापेक्षा मोठा आहे. ही लेणी पूर्व - पश्चिम २८ फूट ६ इंच लांब, दक्षिण - उत्तर १९ फूट ६ इंच रुंद असून तिच्या छताची उंची ८ फूट ६ इंच आहे. लेणीत मागील भिंतीलगत गर्भगृह आहे. या गर्भगृहाची पूर्व - पश्चिम रुंदी ६ फूट असून दक्षिण - उत्तर लांबी ७ फूट आहे.

गर्भगृहाभोवती प्रदक्षिणापथ कोरलेलाआहे. परंतु मागील भिंतीत थोडासा प्रस्तर खोदण्याचे काम राहिलेले आहे. या लेणीत ८ स्तंभ आहेत. प्रत्येक ओळीत ४ या प्रमाणे स्तंभाच्या २ ओळी आहेत. त्यापैकी पहिल्या ओळीतील पहिला स्तंभ नष्ट झाला आहे. या स्तंभाचा आकार चौकोनी असून त्यास स्तंभशीर्षाचा आकार दिलेला नाही. स्तंभ सुबक आणि शिल्पांकीत आहेत ; परंतु स्तंभांना पूर्णपणे आकार दिलेला नाही. लेणी क्रमांक १ मधील स्तंभाच्या आकारासमानच याही लेणीतील स्तंभाचा आकार आहे. स्तंभावर केशव, नृसिंह, विष्णू, वराह, गरुड, सप्तमातृका व कृष्ण इत्यादी शिल्पे कोरलेली आढळतात. मध्यभागातील दुसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर केशवाची अत्यंत सुंदर मूर्ती कोरलेली आहे, तर खालच्या उजव्या हातात गदा आणि डाव्या हातात पद्म आहे. येथील एका स्तंभावर नृसिंहाचे शिल्प आहे. हे शिल्प भंगलेल्या स्थितीत आहे. लेणीच्या भिंतीवर मात्र शिल्पकाम करण्यात आलेले नाही.

लेणी क्रमांक ३ :

लेणी क्रमांक ३ ही लेणी क्रमांक २ लगत डाव्या बाजूस आहे. ही लेणी येथील लेणी समुहातील सर्वात मोठी असून स्थापत्यशास्त्रीय व शिल्पकलेच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या लेणीचे विधान गर्भगृह आणि सभामंडप असे आहे. या लेणीची अर्थात सभामंडपाची पूर्व - पश्चिम लांबी ५० फूट दक्षिण - उत्तर रुंदी ३२ फूट आणि छताची उंची ५ फूट ९ इंच आहे. आज या लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाल्यामुळे तिची पूर्व - पश्चिम लांबी ४० फूट, दक्षिण - उत्तर रुंदी ३२ फूट आणि छताची उंची ५ फूट ९ इंच आढळते. लेणीच्या मागील भिंतीत मध्यभागात गर्भगृह कोरलेले आहे. त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६ फूट ६ इंच, दक्षिण - उत्तर रुंदी ५ फूट ९ इंच आणि छताची उंची ४ फूट ९ इंच आहे. गर्भगृहात मध्यभागी खडकातच शिवपिंड कोरलेली आहे. ही शिवपिंड उत्तराभिमुख आहे. गर्भगृहाचे खोदकाम पूर्ण झालेले आहे ; परंतु या गर्भगृहाला प्रदक्षिणापथ कोरलेला नाही. तसेच येथील गर्भगृहाला स्वतंत्र प्रवेशद्वारही कोरलेले नाही. केवळ दोन बाजूस दोन भिंती खोदून गर्भगृह तयार केलेले आहे.

या लेणीत २० स्तंभ होते. प्रत्येक ओळीत ५ याप्रमाणे स्तंभाच्या ४ ओळी आहेत. २० स्तंभापैकी दर्शनी भागातील मध्यभागातील एक व दक्षिण बाजूकडील एक असे दोन स्तंभ नष्ट झ ालेले आहेत. या दर्शनी भागातीलच दोन स्तंभ झिजलेल्या व भग्नस्थितीत आढळतात. १६ स्तंभ मात्र चांगल्या स्थितीत आहेत. स्तंभ व स्तंभशीर्षाचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. स्तंभ चौकोनी आकाराचे आहेत. त्यांची दक्षिण - उत्तर लांबी ३ फूट ११ इंच, पूर्व - पश्चिम रुंदी ३ फूट ६ इंच आणि उंची ५ फूट ९ इंच आहे. प्रत्येक स्तंभावर चारही बाजूने शिल्पकाम केलेले आहे. लेणीचे छत व भिंत गुळगुळीत करण्याचा प्रयत्न केला आहे. भिंतीवर अर्धवट कोरलेले गरुड, हत्ती व किर्तीमुख आहेत. लेणीत एका स्तंभावर रामाची स्थानक मूर्ती असून रामाच्या हातात धनुष्यबाण आहे. याच लेणीत लिंगोद्भव शिवमूर्ती आणि शेषशायी विष्णुची मूर्ती आहे. एका

स्तंभावर येथे एक शिवलिंग दाखविले असून त्याच्या डाव्या बाजूस ब्रह्मा नमस्कार मुद्रेत आणि उजव्या बाजूस विष्णू असून त्यांचा डावा हात शिवलिंगावर आहे. हीच लिंगोद्भव शिवमूर्ती होय. ब्रह्मा व विष्णू आसनस्थ आहेत. येथील शेषशायी विष्णु मूर्तीच्या चारही हातात शंख, चक्र, गदा व पद्म आहे. येथे एका स्तंभशीर्षावर गरुड आहे, तर एका स्तंभावर स्थानक सप्तमातृका दाखविल्या आहेत.

वास्तुमंदिरे :

वाकाटक काळात ज्याप्रमाणे गुहामंदिरे म्हणजेच लेणी स्थापत्याची निर्मिती केली गेली. त्याचप्रमाणे याकाळात वास्तूमंदिरेही निर्माण करण्यात आली. वास्तुमंदिरास रचनात्मक मंदिरे असेही म्हणतात. दगड आणि विटा एकावर एक रचुन वास्तूमंदिरे बांधण्यात येतात. वास्तू मंदिराच्या बांधकामासाठी दगड, माती, विटा व चुना उपयोगात आणला जातो. वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौध्द वास्तुमंदिरे निर्माण करण्यात आली. परंतु या काळातील एकही वास्तुमंदिरे आज अस्तित्वात नाही. वाकाटक घराण्याने इ.स. २५० पासून इ.स. ५१० पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले.[३९] वाकाटकांच्या दोन शाखा होत्या. वत्सगुल्म (वाशिम) शाखा ही वाकाटकांची कनिष्ठ शाखा होती.[४०] या शाखेने इ.स. ३३० पासून इ.स. ५१० पर्यंत राज्य केले. वत्सगुल्म वाकाटक शाखेच्या काळात नांदेड हे विषय विभागाचे मुख्यालय होते.[४१] वाकाटक काळात नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कला व स्थापत्याची निर्मिती झाली. परंतु त्यांचे पुरातत्वीय अवशेष कंधार नगर वगळता आढळत नाहीत. कंधार हे वाकाटक काळातील कला, स्थापत्याचे प्रमुख आणि प्रसिध्द ठिकाण होते. याठिकाणी या काळातील बरेच शिल्पावशेष आढळतात. औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा हेही वाकाटक काळातील कलेचे प्रमुख केंद्र होते.[४२] कंधार येथील शिल्पकला व वास्तूकला अजिंठा कलापरंपरेतील आहे. कंधार शहरात दर्गापुरा भागात वाकाटक काळातील बौध्द विहार होते.[४३] त्यांचे अवशेष या ठिकाणी मिळाले आहेत. हे बौध्द विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती दुसरा (इ.स. ३५५-४००) याच्या कारकिर्दीतील असावे. दर्गापुरा भागात सईदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर मकदूम सैया व अवलियांचा दर्गा आहे. हा दर्गा बडी दर्गा म्हणून ओळखला जातो. या दर्गाच्या वास्तुशेजारी एक प्राचीन वास्तू असून ती पाषाणात बांधलेली आहे. या वास्तुची

बांधकाम शैली बौध्द कलापरंपरेतील आहे. पुढे सभामंडप आणि पाठीमागे गर्भगृह अशी, या वास्तुची रचना आहे. या गर्भगृहात गौतम बुध्दांची मोठी प्रतिमा असावी. गर्भगृह आणि सभामंडपाला आधार दिलेल्या दगडी स्तंभावर ज्या प्रतिमा आहेत, त्या प्रतिमा बौध्द परंपरेतील आहेत. अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागाची प्रतिकृती प्रतिमेच्या रुपाने येथील स्तंभावर कोरलेली आढळते. अजिंठायेथील सर्वच लेणी बौध्दधर्मीय आहेत. यावरुन कंधार येथील ही वास्तू सुध्दा प्राचीन बौध्द विहार होते, असा निष्कर्ष निघतो. या वास्तुमधील स्तंभांवर नागाचीही शिल्पे कोरलेली आढळतात. गौतम बुध्दांच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दांची उत्तम प्रतीके समजली गेली. बुध्द व नाग यांचा संबंध जवळचा आहे.

गया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यावर गौतम बुध्द जवळच्या तळ्यातील मूचलिंद नागाकडे गेले. त्यावेळी पाऊस पडू लागला म्हणून मूचलिंदाने आपला फणा त्यांच्या डोक्यावर उभारुन त्यांचे (गौतम बुध्दांचे) पावसापासून रक्षण केले.[४४] त्यामुळे बौध्द वास्तुमध्ये नागांच्या प्रतिमा आढळतात. त्यावरुन ही वास्तू बौध्द विहार, हे स्पष्ट होते. ही वास्तू पूर्णपणे दगडांनी बांधलेली आहे. पुढे बौध्दधर्माचा प्रभाव कमी झाला आणि हिंदू धर्माचा प्रभाव वाढला. त्याचवेळी या बौध्द विहाराला हिंदू मंदिर बनविले. हेच हिंदू मंदिर म्हणजे कालप्रिय (शिवमंदिर) मंदिर होय. याच मंदिरात हाजी सरवर मकदूम सैया यांचे वास्तव्य होते. येथेच त्यांचा मृत्यू झाला. याच ठिकाणी त्यांचा दर्गा बांधण्यात आला. त्यामुळे बौध्द मंदिर अर्थात विहाराचे अस्तित्व संपुष्टात आले.

कंधार तालुक्यात बाळांतवाडी नावाचे गाव आहे. हे गाव कंधारच्या पश्चिमेस कंधार - घोडज रस्त्यावर असून ते कंधारपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. हे गाव अगदी लहान असले तरी या ठिकाणी बरेच प्राचीन शिल्पावशेष आढळतात. या गावालगत उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. आज या ठिकाणी देवीची एक प्रतिमा आहे. ही प्रतिमा भवानी देवी म्हणून ओळखली जाते. येथील भग्नावशेषांचे सर्वेक्षण केले असता या ठिकाणी प्राचीन बौध्द विहार होते, हे स्पष्ट होते. याठिकाणी ५ फूट उंचीचे दोन स्तंभ असून हे दोन्ही स्तंभ आणि दर्गापूरा भागातील विहाराचे स्तंभ यांच्यात साम्य असून या दोन्ही स्तंभांवर अजिंठा लेणी क्र.९ च्या दर्शनी भागाच्या

प्रतिमा आढळतात. यावरुन निष्कर्ष निघतो की, हे दोन्ही विहार वाकाटक सम्राट विंध्यसेन दुसरा याच्या कारकिर्दीतील असावेत.

गौतम गुध्दाच्या प्रतिमा निर्माण होण्यापूर्वी बुध्दाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक प्रतीकांचा शोध घेण्यात आला. अशा परिस्थितीत बुध्दाच्या जीवनाशी संबंधित असलेल्या वस्तू व विशिष्ट घटनांचे स्मरण देणाऱ्या वस्तू या बुध्दाची उत्तम प्रतीके समजली गेली.[४५] मग या प्रतीकांच्या रुपानेच बुध्दाची उपासना सुरु झाली. बुध्दांच्या अनेक प्रतीकांपैकी हत्ती हा एक उत्तम प्रतीक समजला गेला.[४६] महामायादेवीच्या गर्भात ज्यावेळी तथागताने (बुध्द) प्रवेश केला, त्यावेळी तिला स्वप्नात पांढरा हत्ती दिसला होता. त्यामुळे हा हत्ती बुध्द जन्माचे प्रतीक झाला. या ठिकाणी हत्तीच्या चार प्रतिमा पाहावयास मिळाल्या. याशिवाय येथे बुध्दाची एक खंडित प्रतिमाही आढळली. यावरुन स्पष्ट आहे की, येथे प्राचीन बौध्द विहार होते. बुध्द टेकडीवरील विहारापासून हा विहार केवळ अर्धा फर्लांगवर आहे. येथील भग्नावशेषातील हिंदू धर्मीय मूर्तिशिल्पही आढळले. येथे ६० सें.मी. उंचीची व चतुर्भूज असलेली ध्यान मुद्रेतील देवीची प्रतिमा आहे. दोन हात अभय मुद्रेत आहेत तसेच दोन हात सरळ दोन्ही गुडघ्यांवर ठेवलेले आढळतात. या प्रतिमेचे मस्तक खंडित झाले आहे. या प्रतिमेशिवाय येथे आणखी एक स्त्री प्रतिमा आहे या प्रतिमेचीही उंची ६० सें.मी. आहे. याचठिकाणी एका मोठ्या शिळेवर त्रिशूल कोरलेले आहे. आज जरी हे हिंदूधर्मीय मंदिर वाटत असले तरी हे मंदिर मूळ बौध्द विहार होते.[४७] हिंदू धर्माचा प्रभाव वाढल्यानंतर व बौध्द धर्माचा प्रभाव नाहीसा झाल्यावर या बौध्द विहाराचे रुपांतर हिंदू मंदिरात करण्यात आले.इतर बौध्द विहारांच्या ठिकाणी जी बौध्दशिल्पे पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे बौध्दशिल्पे येथेही पाहावयास मिळतात. हीच बौध्दशिल्पे येथे बौध्द विहार असल्याचा प्रत्यक्ष पुरातत्वीय पुरावा आहे.

कंधार शहराच्या दक्षिणेस एक माळटेकडी आहे. ही टेकडी कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्या बाजूस असून ती कंधारपासून २ कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी डोंगर उतरणीस राष्ट्रकूट काळातील बौध्द विहार होते.[४८] यामुळे ही टेकडी बुध्द टेकडी या नावाने ओळखली जाते. आज मात्र या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे.त्यामुळे या ठिकाणी मुस्लिम भूत असल्याचे सांगितले जाते. म्हणूनच आज ही बुध्दटेकडी भुताची टेकडी या नावाने ओळखण्यात येते. भुताची ही बुध्दाची या

शब्दाचा अपभ्रंश आहे. येथे बौध्द विहार होते. या विहारातील बुध्दमूर्ती १२२ सें.मी. उंचीची होती. हे बौध्द विहार पूर्वाभिमुख असून त्याची पूर्व - पश्चिम लांबी ६२ फूट आणि दक्षिण - उत्तर रुंदी ५१ फूट होती. आज या ठिकाणी बौध्द विहाराचे केवळ पुरातत्वीय अवशेष आढळतात. या ठिकाणी एक मुस्लिम तुरबत आहे. या तुरबतचे कच्चे बांधकाम केलेले आहे. या बांधकामासाठी बौध्द विहाराच्या बांधकामासाठी उपयोग आणलेल्या दगडी शिळांचा वापर केलेला आहे. येथे बरेच बौध्द शिल्पावशेष आढळतात. परंतु ते सर्व खंडीत स्वरुपात आहेत. येथील विहाराच्या छताला आधार दिलेल्या दगडी खांबाचा खंडीत भाग येथे पहावयास मिळतो. खांबाचा एक शीर्षभागही येथे पाहावयास मिळतो. २X२ फुटाच्या एका चौरसाकृती दगडावर कोरलेले कमळाचे फूल अत्यंत सुंदर आहे. हे शिल्प एखाद्या स्तंभाचा शीर्षभाग असावा. गौतम बुध्दाची पद्मासन अवस्थेतील तीन शिल्पे येथे आहेत, पण या शिल्पांना चुना लावल्यामुळे त्यांचे मूळ ऐतिहासिकत्व संपले आहे. या ठिकाणी एका २X २ फूटांच्या चौरसाकृती दगडावर चारही बाजूने अजिंठा येथील लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. अशी शिल्पे कंधारमध्ये सर्वत्र आढळतात. एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीसमान असलेल्या शिल्पांवर वरच्या बाजूस मध्यभागी एक वृक्ष आहे, हा बोधिवृक्ष आहे. बोधिवृक्ष हे बुध्दाच्या ज्ञान प्राप्तीचे प्रतीक आहे.[४९] यामुळे बौध्द कलापरंपरेत बोधिवृक्ष दाखविण्यात येतो. हा विहार वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय (इ.स. ३५५-४००) यांच्या काळातील असावा कारण अजिंठा कला परंपरेतील बौध्दशिल्प येथे आढळून आली आहे.

५.२ स्तूप स्थापत्य :

वाकाटक काळात लेणी, मंदिरे आणि स्तूप स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. मराठवाड्यात केवळ कंधार व परिसरात या काळातील स्तूप स्थापत्याचे अवशेष मिळाले. हे स्तूप बौध्द स्तूप असून ते उद्देशिक स्तूप होते. याठिकाणी प्रथम बौध्द स्तूपाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी स्तूप हा शब्द वापरला जातो. अवशेषांवर बांधलेले स्मारक म्हणजे स्तूप होय.[५०] स्तूप हा बौध्द धर्माशी संबंधित असलेला एक वास्तूप्रकार आहे. स्तूप म्हणजे एखाद्या महापुरुषाची विशिष्ट आकाराची समाधी होय. या समाधीमध्ये त्या महापुरुषाचे शरिरावशेष

(अस्थी) आणि त्याने वापरलेल्या वस्तुंचे अवशेष ठेवण्यात येत असत. थोडक्यात, एखाद्या महापुरुषाच्या दफनानंतर त्याच्या अवशेषांवर त्यांच्या स्मरणार्थ तयार केलेल्या वास्तुला अर्थात स्मारकाला स्तूप अशी संज्ञा प्राप्त झाली. एखाद्या महापुरुषाची स्मारकरुप समाधी म्हणजे स्तूप अशीही स्तूपाची व्याख्या करता येते. स्तूप हा संस्कृत शब्द आहे. जोडणे किंवा एक करणे आणि प्रशंसा करणे किंवा स्तवन करणे[५१] असे स्तूपाचे दोन अर्थ आहेत. त्यावरुन लोकांची श्रध्दा असणारे स्मारक उभारणे असा स्तुपाचा अर्थ काढता येतो.

स्तुपाचे प्रकार :

स्तूप मुळात बुध्दाच्या निर्वाणाचे प्रतीक मानला जात असे. परंतु स्तूपाला इतके जास्त पावित्र्य मिळाले की, तो बुध्दाचा प्रतीक सुरुवातीलाच नव्हे तर पुढच्याही काळात मानला गेला. त्यामुळे देवमूर्तीची प्रतिष्ठापना करणे जसे महान व पुण्याचे कार्य समजले जावू लागले तसेच स्तूप बनविणे, स्तुपाचा जीर्णोद्धार करणे व स्तुपाची पूजा, उपासना व वंदना करणे, हे ही पुण्यकर्म समजले जावू लागले. प्रत्येक स्तुपाचे पाच भौतिक अवशेषांचा धातुकरंडक ठेवणे कधीही शक्य नव्हते. त्यामुळेच स्तुपाचे पुढील तीन प्रकार कल्पिले गेले.[५२]

१) **शारीरिक स्तूप -** शारीरिक अवशेषांवर बांधलेला स्तूप हा शारीरिक स्तूप होय. या स्तुपात शरीर धातू असतात.

२) **पारिभोगिक स्तूप -** बौध्दांच्या किंवा श्रेष्ठ भिक्खुंच्या प्रतिनिधित्व अवशेषांवर बांधलेला स्तूप म्हणजे पारिभोगिक स्तूप होय. गौतम बुध्दाच्या परिभोगात, उष्णीष पात्र व वज्रासन इत्यादी वस्तु असत. यावर बांधलेले स्तूप हे परिभोगिक स्तूप समजले जातात.

३) **उद्देशिक स्तूप -** उद्देशिक स्तूप म्हणजे बौध्द प्रार्थना मंदिरे होत. बुध्द किंवा पूर्वकालीन बुध्द यांच्या स्मृतीत तयार केलेले स्तूप म्हणजे उद्देशिक स्तूप होय. मध्ययुगात हा तिसरा प्रकार बराच वाढला. पवित्र बौध्द तीर्थस्थानी गेल्यावर पूजेसाठी दगडाचे लहान लहान स्तूप बांधण्याची पध्दत रुढ झाली.

कंधारच्या दक्षिणेस कंधार - घोडज रस्त्यावर कंधारपासून २ कि.मी. अंतरावर उजव्या बाजूस एक माळटेकडी आहे. ही माळटेकडी चारजमुनी माळालगत आहे. ही माळटेकडी बुध्दटेकडी

या नावाने ओळखली जाते. या माळटेकडीच्या उतरणीस बौध्द विहार[५३] आणि पूर्वेस बौध्द स्तुपाचे[५४] अवशेष मिळाले. आज या ठिकाणी केवळ बौध्द शिल्पावशेष पाहावयास मिळतात. येथील शिल्पावशेष आणि परिसराचे अवलोकन केले असता असे दिसते की, टेकडीच्या वरच्या बाजूस विहार आणि खालच्या बाजूस स्तूप होता. हा स्तूप मानसपुरी येथील स्तुपाच्या तुलनेत आकाराने थोडा मोठा असावा. या स्तुपाचे बहुतेक बांधकाम दगड व मातीने केलेले असावे. केवळ अर्धगोलाकार अंड हा भाग विटांनी बांधलेला असावा. या स्तुपाला एकच प्रवेशद्वार असावे. या प्रवेशद्वाराचा अर्थात तोरणाचा दगडी भग्नावस्थेतील स्तंभ अये आढळून आला. येथे एकाच दगडावर चारही बाजूने कोरलेल्या अर्धवर्तुळाकार कमानीत मध्यभागी बोधिवृक्ष दाखविला आहे.[५५] येथे मिळालेल्या स्तुपांच्या अवशेषात अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागासमान अर्धवर्तुळाकार कमानीच्या प्रतिमा कोरलेल्या आढळतात. यावरुन अजिंठा चैत्यगृह आणि या स्तुपाचा कालखंड एकच असावा. हा स्तूप वाकाटक सम्राट विंध्यशक्ती द्वितीय इ.स. (३५५-४००) यांच्या काळातील आहे. या काळातील भरपूर शिल्पावशेष येथे आढळतात. परंतु वाकाटक काळात स्तूप बांधल्याची उदाहरणे आढळून आली नाहीत. त्यावरुन येथे असा निष्कर्ष काढता येतो की, येथील स्तूप मौर्य काळातील असावा आणि विहार मात्र वाकाटक काळातील असावे. तसेच स्तूप आणि विहाराची पुनर्बांधणी वाकाटक काळात झाली असावी.

कंधार तालुक्यात कंधारच्या पश्चिमेस कंधारपासून साधारणपणे ५ कि.मी. अंतरावर कंधार - घोडज रस्त्याच्या उजव्याबाजूस काही अंतरावर बाळांतवाडी नावाचे एक खेडेगाव आहे. या गावाच्या उत्तरेस एका शेतात प्राचीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. हे भग्नावशेष व शिल्पावशेष हिंदू आणि बौध्द धर्माशी संबंधित आहेत. याच ठिकाणी एक बौध्द विहार होते.[५६] या विहाराच्या जवळच बौध्द स्तुपाचे भग्नावशेष आढळतात. या ठिकाणी बौध्द स्तुपाच्या त्रिदली तोरणाचे अवशेष आढळून आले. या ठिकाणी ५ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे २ स्तंभ आणि ७ फूट उंचीचे व १$^{१}/_{२}$ फूट चौरस आकाराचे ४ स्तंभ प्राप्त झाले आहेत. या स्तंभावर अजिंठा लेणी क्र. ९ च्या दर्शनी भागापासून अर्धवर्तुळाकार चैत्यकमानी आहेत. पदविन्यास पाहता या स्तुपाचा व्यास ३०

फूट असावा. अंड, वेदिका, हर्मिका, छत्रावली व प्रदक्षिणापथ हे सर्व स्तुपाचे घटक येथे अवशेषरुपाने आढळतात.[५७]

५.३ मूर्तिशिल्प :

वाकाटककालीन मराठवाड्यातील मूर्तिशिल्पाचा आढावा घेण्यापूर्वी याठिकाणी मूर्ती म्हणजे काय आणि मूर्ती निर्मितीचा इतिहास पाहणे आवश्यक ठरते. मूर्ती या शब्दाने विशिष्ट व्यक्ती किंवा देवतेचे मूर्त स्वरुप व अनुकृती आणि सादृश्य या गोष्टी ध्वनित होतात. प्रतिकृती, प्रतिमा, प्रतिबिंब, समान आकृती आणि प्रतिरुप इत्यादी शब्द मूर्ती या शब्दाचे समानार्थक आहेत. मूर्ती व प्रतिमा यांच्यात महत्वाचे अंतर असून मूर्ती ही सामान्य मनुष्याची किंवा प्राण्याची प्रतिकृती असते. मात्र प्रतिमा या शब्दाचा उल्लेख देवी, देवता, महात्मा व स्वर्गवासी व्यक्तींच्या संदर्भात केला जातो. आणखी महत्वाचे म्हणजे मूर्ती निर्माण प्रक्रियेत कलाकार स्वतंत्र असतो. परंतु प्रतिमा निर्माण प्रक्रियेत कलाकाराला पूर्णपणे स्वातंत्र्य नसते. प्रतिमा निर्मितीसाठी त्याला निश्चित नियत आणि वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. ज्या मूर्ती कोणत्या ना कोणत्या तरी धर्माशी संबंधीत असतात. अशा मूर्तीसाठी प्रतिमा या शब्दाचा प्रयोग केला जातो. प्रतिमा म्हणजे प्रतिरुप होय. प्रतिरुप म्हणजेच समान आकृती प्रतिकृती किंवा प्रतिबिंब होय. पाणिनीने समान आकृतीसाठी प्रतिकृती या शब्दाचा उपयोग केला आहे.[५८] प्राचीन भारतात वैदिक काळापासून प्रतिमा या शब्दाचा प्रयोग चालत आलेला आहे.[५९] यज्ञाच्या स्वरुपाच्या संदर्भात ऋग्वेदात प्रतिमा हा शब्द प्रयुक्त झालेला आहे. ऋग्वेदात प्रतिमासाठी अर्च्चा शब्दाचा प्रयोग केलेला आहे.[६०] पतंजली यांनी ही आपल्या महाभाष्यात प्रतिमासाठी अर्च्चा या शब्दाचाच प्रयोग केलेला आढळतो.[६१] भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा प्रारंभ सिंधु संस्कृतीपासून होतो. ही संस्कृती प्राचीन समजली जाते. सिंधु संस्कृतीच्या उत्खननात मातीपासून बनविलेल्या अनेक स्त्रीमूर्ती मिळाल्या. त्यांना मातृदेवीच्या मूर्ती म्हणतात. मोहोंजोदाडो[६२] येथील उतखननात पाषाणात घडविलेली एक पुरुष मूर्ती मिळाली आहे. या पुरुषाला दाढी असून त्याच्या अंगावर शालीसारखे वस्त्र आहे. या वस्त्रावर त्रिफूली अलंकरण असून या अलंकरणाचा प्रचार मिश्र, कीट व मेसोपोटेमिया येथे होता. त्या ठिकाणी त्यांचा संबंध देवमूर्तीशी होता. यावरुन ही पुरुष मूर्ती कोणत्या तरी धर्माशी संबंधित असली पाहिजे. मोहोंजोदडो[६३] या

ठिकाणी दुसरी एक पुरुष प्रतिमा मिळाली आहे. एका चौकोनी तुकड्यावर तीन डोकी असलेला आणि शिंगाचा मुकूट घातलेला एक पुरुष योगासनात बसलेला दाखविण्यात आला आहे. हा योगी पुरुष आहे. जे.एन. बॅनर्जी यांच्या मते, हे कुर्मासन आहे.[६४] या योगी पुरुषांच्या उजव्या बाजूस हत्ती व वाघ तर डाव्या बाजूस म्हैस, गेंडा, वाघ व एक मनुष्य आहे, तर समोर एक हरीण आहे. जॉन मार्शल यांच्या मते, हा योगी पुरुष म्हणजे पशुपति शिवाचे प्रारंभिक रुप आहे.[६५] एका दुसऱ्या तुकड्यावर एक पुरुष आसन घालून बसलेला आहे.[६६] त्याच्या डोक्यावर नागफणा असून त्याच्या आजूबाजूस गुडघे टेकून बसलेले उपासक दिसतात. आणखी तीन तुकड्यांवर जैन तीर्थकरांप्रमाणे स्थानक स्थितीत विवस्त्र असलेले वृक्षदेव दाखविण्यात आलेले असून या प्रत्येकाच्या जवळ अर्धा वाकलेला उपासक दाखविला आहे.[६७] या उपासकाच्या डोक्यावर साप आढळतो. उत्खननात मातीचे अनेक तुकडे प्राप्त झालेले आढळतात. मॅकेच्या मते, या गृहदेवता असाव्यात.[६८] याशिवाय उत्खननात विशिष्ट प्रकारची केशभूषा केलेल्या मातीच्या अनेक स्त्रीप्रतिमा सुध्दा मिळालेल्या आहेत, अशा स्त्रीप्रतिमांना मातृदेवीच्या मूर्ती म्हटले जाते.[६९] यावरुन निष्कर्ष काढता येतो की, सिंधु संस्कृतीपासूनच मूर्ती अर्थात प्रतिमा निर्मितीस प्रारंभ झाला. तसेच या संस्कृतीपासूनच मूर्तीपूजेलाही सुरुवात झाली. सर्वप्रथम कोणत्या धर्मात प्रतिमा निर्माण केल्या गेल्या हा प्रश्न निर्माण होतो. गणेश हरी खरे यांच्या मते, सर्वप्रथम जैन, या नंतर बौध्द आणि शेवटी वैदिक अर्थात हिंदू धर्मात प्रतिमा निर्माण केल्या गेल्या.[७०]

हिंदू धर्मात विविध देवदेवता आहेत. या देवदेवतांच्या मूर्ती निर्माण करण्याची सिंधु संस्कृतीपासून सुरु झालेली परंपरा पुढे निरंतर चालू राहिली. हिंदू धर्मात ज्या मूर्ती निर्माण केल्या गेल्या. त्यामध्ये शिव, पार्वती, विष्णू, सूर्य, गणपती, कार्तिकेय, नाग, ब्रह्मदेव, गजलक्ष्मी, मातृदेवता, सप्तमातृका, दुर्गादेवी, वृषभ (नंदी), नृसिंह, श्रीलक्ष्मीनृसिंह, सरस्वती इत्यादी मूर्ति विशेष उल्लेखनीय ठरतात. वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौद मूर्तिशिल्पाची निर्मिती करण्यात आली. परंतु त्याचे प्रमाण अत्यंत कमी आढळते. याकाळातील मूर्तिशिल्प नांदेड, शिऊर आणि कंधार येथेच आढळते.

विष्णूमुर्ती :

शिऊर येथील लेण्यात ९ विष्णुमूर्ती आढळतात. लेणी क्रमांक - १ मध्ये १, लेणी क्रमांक - २ मध्ये १ आणि लेणी क्रमांक -३ मध्ये ७ विष्णुमूर्ती आहेत. ब्रह्मा, विष्णू व महेश (शिव)या महत्वाच्या हिंदू देवता आहेत. सृष्टीचा निर्माण कर्ता ब्रह्मदेव, पालनकर्ता विष्णू व संहारकर्ता महेश समजला जातो. भागवत आणि वैष्णव संप्रदायात विष्णू या देवतेस सर्वोच्च स्थान आहे. विष्णू ही प्राचीन देवता असून ऋग्वेदातील अनेक सुक्तांत त्याचे उल्लेख आढळतात.[७१] कुशाण काळापूर्वीपासून विष्णू प्रतिमानिर्मितीस प्रारंभ झाला. वैखानस आगमातील विवरणानुसार विष्णूमुर्तीचे स्थानक, आसन व शयन असे तीन प्रकार पडतात.[७२] या प्रत्येकाचे योग, भोग, वीर व आभिचारिक असे चार भाग पडतात. विष्णुमूर्तीचे ३६ प्रकार प्रचलित आहेत. या सर्व प्रकारात स्थानक मूर्तीची संख्या अधिक आहे. स्थानकमूर्तीत द्विभूज, चतुर्भूज, अष्ठभुज, चतुर्व्युह, पंचवीर, वैकुंठ, विश्वरुप, अनंत, हरिहर आणि काही अवतार मूर्तीचा समावेश होतो. गदा, चक्र, शंख, पद्म जलपात्र आणि फळ ही विष्णुची आयुधे आहेत.[७३] डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, कटिसूत्र, अंगद, कंकणे, कुंडले, एकावली (टपोऱ्या मण्यांचा एकच सर), हारयष्टी, (मोत्याचे किंवा मण्यांचे एकाधिक पदर एकत्र गुंफून तयार केलेला जाडजूड दागिना) आणि वनमाला(वनपुष्पांची माळा) हे विष्णूचे दागिने आहेत.[७४]

शिऊर येथील लेण्यांतील स्तंभावर असलेल्या विष्णुमूर्ती स्थानक असून चतुर्भूज आहेत. लेणी क्रमांक - १ मधील दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर विष्णुची स्थानक मूर्ती आहे. ही मूर्ती १५० सें.मी. उंचीची आणि ६० सें.मी. जाडी असलेली आहे. ही मूर्ती चतुर्भूज आहे. विष्णुच्या हातात गदा, चक्र, शंख आणि पद्म आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, गळ्यात हार, दंडात बाजूबंद,जानवे, कटिसूत्र, कानात कुंडले, हातात कंकणे व वनमाला आहे. अशाचप्रकारची विष्णुमूर्ती लेणी क्रमांक - २ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर आढळते. याच लेणीत दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर चतुर्भूज आणि स्थानक विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या उजव्या खालच्या हातात गदा व वरच्या हातात फळ आहे, तर डाव्या खालच्या हातात शंख व वरच्या हातात चक्र आहे. चक्र असलेला हात नष्ट झाला आहे.

लेणी क्रमांक -३ मध्ये सहा स्थानक विष्णुमूर्ती असून एक विष्णुमूर्ती शेषशायी प्रकारातील आहे. लेणीत दक्षिणेकडून पहिल्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर विष्णूची स्थानक मूर्ती आढळते. या मूर्तीची उंची १५२ सें.मी. आणि जाडी ८४ सें.मी आहे. ही मूर्ती चतुर्भुज आहे. मूर्तीच्या वरच्या डाव्या हातात चक्र असून खालच्या डाव्या हातात शंख आहे, तर उजव्या वरच्या हातात पद्म व खालच्या हातात गदा आहे. विष्णूच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, मेखला, कंठहार, हातात कंकणे व कानात कुंडले आहेत. दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर द्विभूज विष्णुमूर्ती आहे. या मूर्तीची उंची १५८ सें.मी. असून जाडी ६० सें.मी. आहे.

विष्णुच्या उजव्या हातात कोपराखाली गदा असून डावा हात कमरेवर ठेवलेला आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, कानात कुंडले आणि हातात कंकणे आहेत. याच ओळीतील दुसऱ्या स्तंभावर १४५ सें.मी. उंचीची आणि ६९ सें.मी. जाडीची चतुर्भूज विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या वरच्या डाव्या हातात शंख आहे, तर खालचा हात झिजलेला असल्याने अस्पष्ट झाला आहे. उजव्या वरच्या हातात चक्र आहे, तर खालचा हात कमरेवर ठेवला आहे.

विष्णुच्या डाव्या बाजूस सेविका असून तिची उंची ६९ सें.मी. आणि जाडी २० सें.मी. आहे. विष्णुच्या डोक्यावर मुकूट, कानात कुंडले, अंगावर जानवे, हातात कंकणे, गळ्यात हारयष्टी (मण्यांचे किंवा मोत्याचे एकाधिक पदर एकत्र गुंफून तयार केलेला जाडजूड दागिना) व कटिसूत्र आहे. याच लेणीत दक्षिणेकडून तिसऱ्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर १५८ सें.मी. उंचीची व ७६ सें.मी. जाडीची स्थानक आणि चतुर्भूज विष्णुमूर्ती आहे. विष्णुच्या वरच्या उजव्या हातात शंख असून खालच्या हातात कसलेही आयुध नाही. वरच्या डाव्या हातात फळ आहे, तर खालच्या हाताचा कोपर गदावर टेकवला आहे. विष्णुच्या अंगावर सर्वप्रकारचे अलंकार आहेत. चौथ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर असलेली विष्णुमूर्ती १४५ सें.मी. उंचीची आणि ४५ सें.मी. जाडी असलेली आहे. विष्णू स्थानक व चतुर्भूज आहे. विष्णुच्या डाव्या हातात गदा व उजव्या हातात पद्म आहे. बाकी दोन्ही हात नष्ट झालेले आहेत. विष्णुच्या डाव्या बाजूस पायथ्याशी चवरीधारक सेविका आहे.

शेषशायी विष्णू :

विष्णुमूर्तीचा तिसरा प्रकार म्हणजे शयन विष्णुमूर्ती होय. या मूर्तिप्रकारात फक्त एकाच प्रकारची मूर्ती म्हणजे शेषावर झोपलेला विष्णू आपल्याला पाहावयास मिळतो. शेषनागावर झोपलेल्या विष्णुला शेषशायी, अनंतशायी आणि जलशायी इत्यादी नावानेही ओळखले जाते. विष्णुधर्मोत्तर पुराणात शेषशायी विष्णुला पद्मनाथ नावाने उल्लेखिले आहे.[७५] शेषशायी विष्णुमूर्ती कशा स्वरुपाची असावी, याचेही वर्णन यामध्ये केलेले आढळते. त्यानुसार जलाशयात विष्णू पहुडलेला असावा, त्याचा एक हात मांडीवर आणि दुसरा हात त्याच्या बेंबीजवळ असावा. वरचा उजवा हात मस्तकाजवळ असावा तर डाव्या हातात मंजरी असावी. बेंबीमधून निघालेल्या कमळावर ब्रह्मा आसनस्थ असावा. तसेच राक्षसांनी कमळाच्या देठाला धरलेले असावे. अशा स्वरुपात शेषशायी विष्णुची मूर्ती असावी.

वाकाटक कालखंडात व काळात शिऊर येथील लेणी क्रमांक - ३ मध्ये दक्षिणेकडील भिंतीत स्तंभाच्या पहिल्या ओळीत तंभ क्रमांक -२ आणि ३ च्या मध्यभागातील जागेत शेषशायी विष्णुची मूर्ती कोरलेली आहे. विष्णू शेषनागावर झोपलेले असून ते चतुर्भुज आहेत. विष्णुच्या डोक्यावर पाच नागफणा आहेत. तसेच विष्णुच्या चारही हातात शंख, चक्र, गदा आणि पद्म आहे. ही मूर्ती गुप्त वाकाटक काळातील आहे. विष्णुची ही मूर्ती पूर्व - पश्चिम १३५ सें.मी. लांब आणि दक्षिण - दक्षिण - उत्तर ६० सें.मी. जाडीची आहे. विष्णुचे डोके पूर्वेला तर पाय पश्चिमेस आहेत. विष्णुच्या तिन्ही बाजूस स्तंभावर व भिंतीवर देव - देवतांची शिल्पे कोरलेली आहेत. या देवता स्थानक असून त्यांची उंची ५४ सें.मी. आहे. ही सर्व शिल्पे झिजलेल्या स्थितीत आहेत.

केशव :

विष्णुची एकूण २४ रुपे मानली जातात. त्यापैकी पहिल्या क्रमांकाचे रुप म्हणजे केशव होय. शंख, चक्र, गदा व पद्म ही केशवाची आयुधे आहेत.[७६] केशवाच्या मूर्ती स्थानक स्थितीत व प्रामुख्याने मंदिराच्या बाह्यभिंतीवर आढळतात. येथील लेणी क्रमांक -२ मध्ये पहिल्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर केशवाची स्थानक मूर्ती कोरलेली आढळते. या मूर्तीची उंची १५० सें.मी. आणि जाडी १०५ सें.मी. आहे. केशव चतुर्भुज असून त्यांच्या वरच्या डाव्या हातात चक्र व खालच्या हातात

पद्म आहे, तर उजव्या वरच्या हातात शंख व खालच्या हातात गदा आहे. केशवाच्या वरच्या हातातील आयुधे तुटलेली आहेत. केशवाच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार आहेत. कलाकौशल्याच्या बाबतीत ही मूर्ती उल्लेखनीय नसली तरी महत्वाची ठरते.

पद्मनाथ :

लेणी क्रमांक - ३ मध्ये पहिल्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर पद्मनाथाची उत्तराभिमुख स्थानक मुर्ती कोरलेली आहे. या मूर्तीची उंची १४८ सें.मी. असून ती चतुर्भुज आहे. रुपमंडननुसार शंख, गदा, चक्र व पद्म ही पद्ममनाथाची आयुधे आहेत.[७७] पद्मनाथाच्या खालच्या उजव्या हातात शंख व डाव्या हातात गदा आहे. इतर दोन हात खंडीत झाले आहेत. त्या हातात पद्म व चक्र आहे. या मूर्तीच्या खालच्या दोनही हातात शंख व गदा आहे. त्यावरुन ही मूर्ती पद्मनाथाची असल्याचे मत डॉ. भगवान देशमुख यांनी व्यक्त केले आहे.[७८] पद्मनाथाच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे, गळ्यात कंठहार, कमरेवर मेखला, हातात कंकणे व कानात कुंडले आहेत. पद्मनाथाच्या वरच्या दोन्ही बाजूस आकाश गंधर्वकन्या असून त्यांच्या हातात पुष्पहार आहेत. या गंधर्व कन्यांची उंची ३२ सें.मी. आहे.

वासुदेव :

विष्णुमूर्तीचे २४ प्रकार आहेत. त्यापैकी वासुदेव हा त्यापैकीच एक प्रकार आहे. लेणी क्रमांक --१ मध्ये तिसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर वासुदेवाचे शिल्प कोरलेले आहे. वासुदेवाची ही मूर्ती १४५ सें.मी. उंच आहे. ही मूर्ती स्थानक असून समभंग आहे. वासुदेव चतुर्भुज आहे. वासुदेवाच्या वरच्या हातात शंख आणि चक्र आहे, तर राहिलेल्या दोन हातात गदा आणि पद्म आहे. या मूर्तीचे खालचे दोन्ही हात खंडीत झालेले आहेत. रुपमंडन नुसार गदा, शंख, चक्र व पद्म ही वासुदेवाची आयुधे आहेत.[७९] या मूर्तीच्या वरच्या दोन्ही हातात शंख आणि चक्र असल्यामुळे ही मूर्ती वासुदेवाची आहे. डॉ. प्रभाकर देव यांनी या मूर्तीचा उल्लेख विष्णूमूर्ती म्हणून केला आहे.[८०] परंतु मूर्तिशास्त्रानुसार ही मूर्ती वासुदेवाचीच ठरते.

नृसिंह :

विष्णुच्या १० अवतारापैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे. नृसिंह हा विष्णुचा तात्कालिक अवतार आहे.[८१] येथील लेणी क्रमांक -२ मध्ये दुसऱ्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर नृसिंहाचे एक शिल्प कोरलेले आहे. मूर्तिशास्त्राच्या दृष्टीने गिरीज नृसिंह, स्थौन नृसिंह, यानक नृसिंह, योग नृसिंह व लक्ष्मी नृसिंह असे नृसिंह मूर्तीचेह प्रकार पडतात.[८२] गिरीज नृसिंह पद्मासनात व उत्कटासनात दाखविला जातो. एकटा दाखविल्यास त्यास केवल नृसिंह म्हणतात. हा नृसिंह द्विभुज व चतुर्भूज असतो. त्याच्या दोन हातात गदा व चक्र असते.[८३] शिऊर येथील नृसिंह केवल नृसिंह असून तो द्विभुज आहे. नृसिंह आसनस्थ असून त्याने आपले दोन्ही हात मांडीवर ठेवलेले आहेत. त्याच्या दोन्ही हातात गदा व चक्र आहे. नृसिंहाची ही मूर्ती ११० सें.मी. उंचीची असून तिची बरीच झीज झाल्यामुळे ती अस्पष्ट दिसते. विष्णुच्या १० अवतारापैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे.

वराह :

विष्णुच्या १० अवतारांपैकी एक वराह अवतार आहे. वराहमूर्तीचे शिल्पांकन भूवराह, आदिवराह, नृवराह, यज्ञवराह आणि प्रलयवराह इत्यादी प्रकारात केले जाते. विष्णुधर्मोत्तर पुराणानुसार वराहचे मुख आणि मानवाचे शरीर असलेली अलिधासनात उभी असलेली वराहमूर्ती असावी.[८४] वराहमूर्ती चतुर्भूज असावी. त्याच्या वरच्या दोन्ही हातात शंख व चक्र असून एका हाताने भूदेवीच्या पायाला आधार दिलेला असावा तर दुसऱ्या हाताने भूदेवीला कवटाळले असावे. येथील लेणी क्रमांक - २ मध्ये दुसऱ्या ओळीतील पहिल्या स्तंभावर आणि लेणी क्रमांक - ३ मध्ये तिसऱ्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर भूवराहाची एक एक मूर्ती कोरलेली आहे. लेणी क्रमांक - २ मधील स्तंभावरील वराहमूर्ती १३० सें.मी. उंचीची आहे. वराह द्विभूज असून त्याचा उजवा हात कमरेवर आहे, तर डाव्या हाताने त्याने भूदेवीला कवटाळले आहे. भूदेवी किंचितशी डावीकडे पाहात आहे. वराहाने उजवा पाय जमिनीवर रोवलेला आहे, तसेच डावा पाय चालत्या स्थितीत आहे. वराहाच्या अंगावर जानवे व कटिसूत्र आहे. या मूर्तीची बरीच झीज झाली आहे. अशाचप्रकारची

वराह मूर्ती लेणी क्रमांक - ३ मधील स्तंभावर आढळते. परंतु या मूर्तीची झीज बरीच झाल्यामुळे ती अस्पष्ट झाली आहे.

राम :

विष्णुच्या १० अवतारांपैकी राम आणि कृष्ण हे पूर्णावतार आहेत. रावणाचा संहार करण्यासाठी विष्णुने रामाच्या रुपात अवतार घेतला होता. वाल्मिकी रामायणात रामाच्या जीवनाचे संपूर्ण विवेचन केलेले आहे. रामाच्या मूर्ती द्विभूज आणि चतुर्भुज बनविल्या गेल्या. गुप्तकाळापूर्वीच्या रामाच्या स्वतंत्र मूर्ती मिळाल्या नाहीत. गुप्तकाळात रामायणातील घटना शिलापट्ट आणि मंदिरावर अंकित केल्या जात होत्या. गुप्तकाळानंतर रामाच्या मूर्ती बनविल्या जाऊ लागल्या. राम आणि सीतेची मध्ययुगीन एक आलिंगन प्रतिमा ग्वाल्हेर संग्रहालयात पाहावयास मिळते. मराठवाड्यात रामाच्या मूर्ती वेरुळ लेणी, अंबाजोगाई येथील आमलेश्वर मंदिराच्या बाह्यभिंतीवर , औंढा येथील नागनाथ मंदिराच्या बाह्यभिंतीवर , चारठाणा, वडगाव आणि नांदेड जिल्ह्यातील खानापूर, कापसी (बु.), शिऊर आणि होट्टल येथे मिळाल्या आहेत.[८५] शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये चौथ्या ओळीतील दुसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर रामाची स्थानक मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती १६४ सें.मी. उंचीची असून दक्षिणाभिमुख आहे. रामाच्या डाव्या हातात धनुष्य आहे आणि उजव्या खांद्यावर बाणाचा भाता आहे. राम द्विभुज आहे. त्यांच्या गळ्यात रुद्राक्षाची माळ, मनगटातही रुद्राक्षाचे कंकण, अंगावर केसांचा जटामुकूट आहे. नांदेड जिल्हयात शिऊर व होट्टल व कापसी (बु.) येथे रामाच्या स्थानक मूर्ती मिळाल्या असून यामध्ये शिऊर, खानापूर येथील रामाची मूर्ती सर्वात प्राचीन ठरते. ही मूर्ती वाकाटक काळातील आहे. रामाच्या जवळ उजव्या बाजूस एक स्थानक पुरुष प्रतिमा आहे. ही प्रतिमा लक्ष्मणाची असावी. या प्रतिमेची उंची ८४ सें.मी. आहे. लक्ष्मणाच्या डोक्यावर मुकूट, अंगावर जानवे व कानात कुंडले आहेत.

कृष्ण :

कृष्ण शब्दाचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो.[८६] वासुदेव-देवकीचा पुत्र कृष्ण हा विष्णुचा आठवा अवतार मानला जातो. मत्सपुराणात कृष्णाला विष्णुचा पूर्ण अवतार म्हटले आहे. कुशाण काळापासूनच कृष्णाच्या कथांचे अंकन करण्यास प्रारंभ झालेला होता. कृष्ण जन्माष्टमीच्या कथेचे

शिल्पांकन केलेले एक प्राचीन खंडीत शिल्प मथुरा संग्रहालयात पाहावयास मिळते.[८७] हे शिल्प इसवी सनाच्या दुसऱ्या - तिसऱ्या शतकातील आहे. कृष्णाच्या विविध रुपातील मूर्ती बनविल्या गेल्या. खजुराहो येथे कृष्णद्वारा पुतनावध, शकटभंग, कुब्जानुग्रह, कुवलयापीड वध, चाणूर युध्द, शलयुध्द, तृणावर्त वध, यमलार्जुन उध्दार, वत्सासुर वध, कालियामर्दन व अरिष्टासुर वध इत्यादी मूर्तीचे सुंदर अंकन केलेले आढळते.[८८] शिऊर येथील लेणी क्रमांक - २ मध्ये दुसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर कृष्णाची कालियामर्दन प्रकारातील सुंदर मूर्ती कोरलेली आहे. यमुना नदीच्या एका डोहात कालीया नावाचा विषारी नाग होता. त्यामुळे लोक कालीया नागास घाबरत असत. कृष्णाने या कालीया नागाचे दमन केले. या प्रसंगाचे शिल्पांकन येथे केलेले आढळते. येथे कृष्ण चतुर्भुज असून त्याच्यासमोर मोठा सर्प दाखविला आहे. कृष्ण या सर्पाचे दमन करीत आहे. कृष्णाची ही मूर्ती दक्षिणाभिमुख असून १४५ सें.मी. उंचीची आहे. कृष्णाची ही मूर्ती नांदेड जिल्ह्यातील एकमेव मूर्ती ठरते.

पुतनावध :

प्राचीन भारतात कृष्णाच्या विविध रुपातील मूर्ती बनविल्या गेल्या. त्यापैकीच एक म्हणजे पुतनावध होय. पुतना ही एक राक्षसीण असते. बाल कृष्णाचा वध करण्यासाठी ती त्याला जवळ घेऊन मांडीवर बसवून स्तनपान करते. तिच्या स्तनातील दूध म्हणजे विष असते. त्यामुळेच ती कृष्णाला स्तनपान करते. परंतु कृष्ण तिच्या स्तनातील सर्व दूध पिऊनही स्तन सोडत नाही. तो तिच्या स्तनाद्वारे तिच्या शरीरातील सर्व रक्ताचे शोषण करतो. यावेळी पुतना आकाशात झेप घेते, तरीही कृष्ण तिचे स्तन न सोडता तिचे रक्तशोषण करतो. त्यामुळे पुतना मरण पावते. हाच पुतनावध होय. शिऊर येथील लेणी क्र. २ मधील स्तंभावर एक आणि लेणी क्र. ३ मध्ये दोन स्तंभांवर एक एक अशा २ पुतनावधाच्या मूर्ती शिल्पीत केल्या आहेत. कृष्ण पुतनाचे उजवे स्तनपान करीत आहे, तर पुतना त्याच्या तोंडातून स्तन सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी ती आकाशात झेप घेत आहे. तिने आपले दोन्ही हात वर केलेले आहेत. पुतनावधाची ही मूर्ती ९२ सें.मी. उंचीची आहे.

गरुड :

विष्णुचे वाहन गरुड आहे. भारतीय मूर्तिकलेत गरुडाच्या विविध प्रकारच्या मूर्ती आढळतात.विष्णुधर्मोत्तर पुराणात मनुष्य रुपातील गरुडाचे वर्णन केलेले आहे. [८९] अणकुचीदार नाक, चार हात, एकटा असल्यास त्याच्या हातात छत्र व कुंभ असावा व दोन हात अंजली मुद्रेत जोडलेले असावेत. श्री तत्वनिधिप्रमाणे मात्र मनुष्य रुपातील गरुड द्विभुज असावा. मानवी रुपातील गरुड प्रतिमा द्विभुज, टोकदार नाक, पसरलेले पंख व भरपूर दागिने असलेल्या आहेत. कधी - कधी त्याच्या हातात सर्प दिसते. शिऊर येथील लेणी क्रमांक - २ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्या स्तंभावर गरुडाची मानवी रुपातील मूर्ती कोरलेली आढळते. ही मूर्ती द्विभूज व स्थानक असून ९० सें.मी. उंचीची आहे. गरुडाच्या उजव्या हातात सर्प आहे. गरुड धावत्या - उडत्या स्थितीत दाखविला आहे. गरुडाच्या मस्तकावर मुकूट व कानात कुंडले आहेत. गरुडाच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार आहेत. गरुडाची ही मूर्ती पूर्वाभिमुख असून ती ऊन, वारा व पावसांचा आघात सहन करीत टिकून आहे. ज्या स्तंभावर ही मूर्ती कोरलेली आहे, तो स्तंभ लेणीचा दर्शनी भाग नष्ट झाल्यामुळे उघड्यावर आहे. लेणी क्रमांक - ३ मध्येही तिसऱ्या ओळीतील चौथ्या क्रमांकाच्या स्तंभावर गरुडाची मूर्ती कोरलेली आहे. गर्भगृहाच्या उत्तर बाजूस हा स्तंभ आहे. गरुड स्थानक असून दक्षिणाभिमुख आहे. गरुडाच्या या मूर्तीची उंची ११९ सें.मी. आहे. गरुड द्विभूज असून त्याचे नाक सरळ व टोकदार आहे. त्याच्या डोक्यात मुकूट असून डाव्या हातात सर्प आहे. या मूर्तीची बरीच झीज झाल्यामुळे ती अस्पष्ट दिसते. याच लेणीत भिंतीवरही गरुडाचे शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प अर्धवट स्वरुपात कोरलेले आहे.

त्रिविक्रम :

त्रिविक्रम हा विष्णुचा पाचवा अवतार आहे.[९०] गुप्त - वाकाटक काळापासून त्रिविक्रमाच्या प्रतिमा शिल्पात एक पाय आकाशाकडे उचलून उभा असलेला प्रचलित आढळतो.[९१] अवतार प्रतिमेतील त्रिविक्रम द्विभुज, चतुर्भुज आणि अष्ठभुज दाखविला जातो. त्याच्या हातात धनुष्य, ढाल, शंख, खड्ग, गदा, फळ आणि चक्र ही त्रिविक्रमाची आयुधे आढळतात.[९२] शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये दुसऱ्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर त्रिविक्रमाची मूर्ती कोरलेली आहे. ही मूर्ती

१५५ सें.मी. उंचीची असून उत्तराभिमुख आहे.त्रिविक्रम चतुर्भुज असून त्याच्या वरच्या डाव्या हातात चक्र आणि खालच्या हातात शंख आहे, तर उजवा खालचा हात कमरेवर असून वरच्या हातात फळ आहे. त्रिविक्रमाचा डावा पाय आकाशाकडे उचलून उभा असलेला दाखविला आहे. त्रिविक्रमाच्या मस्तकावर मुकूट, अंगावर जानवे, कानात कुंडले, हातात कंकणे, गळ्यात जाडजुड हार (हारयष्टी) व दंडात बाजूबंद आहेत. त्रिविक्रमाच्या वरच्या दोन्ही बाजूस चवरीधारक सेविका आहेत.

लिंगोद्भव मूर्ती :

लिंगोद्भव शिवमूर्तीचा हा प्रकार भारतात लोकप्रिय होता. लिंगातून उत्पन्न झालेली ती लिंगोद्भव मूर्ती होय.[९३] लिंगोद्भव मूर्तीच्या कथेची माहिती लिंगपुराण, वायुपुराण व शिवपुराणात आढळते. ब्रह्मदेव आणि विष्णू हे दोघेही स्वत:ला श्रेष्ठ समजून एकमेकांना भांडू लागले. अचानक त्या दोघांमध्ये विस्तवाने धगधगणारे एक लिंग प्रगट झाले. त्याच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागत नव्हता. हे दोघेही त्याचा पत्ता लावण्यास निघाले. हंसाचे रुप धारण करुन ब्रह्मदेव वर गेले आणि वराहाच्या रुपाने विष्णुने खालची वाट धरली. दोघेही खूप भटकले. परंतु त्यांना त्यांच्या समोर प्रगट झालेल्या लिंगाच्या मुळाचा व उंचीचा मागमूस लागला नाही तेव्हा एकाएकी प्रणवाचा नाद उमटला. हेच शिवाचे स्वरुप होते. दोघेही त्याला शरण गेले आणि क्रमाने उजवी आणि डावीकडे हात जोडून उभे राहिले.[९४] डॉ. नि.पु. जोशी[९५] यांच्या मते उत्तर भारतात बहुतेक नुसते लिंगच दाखवीत तर दक्षिण भारतात लिंगातून उद्भूत झालेला शंकरही दाखवीत असत. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये तिसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर लिंगोद्भव शिवमूर्ती कोरलेली आहे. ही शिवमूर्ती नांदेड जिल्ह्यातील सर्वात प्राचीन ठरते. या शिवमूर्तीची परंपरा उत्तरेची परंपरा आहे. कारण या लेण्या गुप्त - वाकाटक काळातील आहेत. येथे मूर्ती दर्शवीत असताना केवळ लिंगच दर्शविण्यात आलेले आहे. मध्यभागी १५४ सें.मी. उंचीचे शिवलिंग आहे. शिवलिंगाच्या डाव्या बाजूस ब्रह्मदेव नमस्कार मुद्रेत बसलेले आहेत. ब्रह्मदेव चतुर्मुख आहेत. ब्रह्मदेवाच्या मूर्तीची उंची १५४ सें.मी. असून जाडी २५ सें.मी. आहे. ब्रह्माच्या मस्तकावर मुकूट व गळ्यात हार आहे. शिवलिंगाच्या उजव्या बाजूस विष्णू आहे. विष्णूची मूर्ती ५८ सें.मी. उंचीची व जाडी ३० सें.मी. आहे. त्यांच्या वरच्या उजव्या हातात चक्र असून खालचा उजवा हात अभयमुद्रेत आहे, तर वरचा डावा हात शिवलिंगावर

ठेवला असून खालचा हात गुडध्यावर ठेवला आहे. डॉ. नि.पु. जोशी यांचे मत विचारात घेतल्यास ही शिवमूर्ती लिंगोद्भव शिवमूर्ती ठरते.[९६]

महिषासुरमर्दिनी :

महिषासूर नावाच्या राक्षसाचा संहार करणाऱ्या दुर्गादेवीला महिषासुरमर्दिनी म्हणतात.[९७] देवीमहात्म्य, मत्स्यपुराण आणि रुपमंडन यामध्ये देवीच्या महिषासुरमर्दिनी रुपाला कात्यायनी म्हटले आहे.[९८] सिंह हे महिषासुरमर्दिनीचे वाहन आहे. वज्र, तलवार, ढाल, शूल (त्रिशूल), अंकूश, धनुष्यबाण, पाश, चक्र, सळई (शलाका), मुदगर, डमरु, मुण्ड, खेटक, कठार, गदा, आरसा, ध्वज, शक्ति, अक्षमाळा, दंड, शंख, पद्म, घंटा, पानपात्र व परशु ही महिषासुरमर्दिनीची आयुधे आहेत.[९९] तिला चार, आठ, दहा, सोळा, अठरा व वीस हात आढळतात. या देवीचे स्तन सुपुष्ट, विशाल नेत्र व मान सुंदर असते. दुर्गादेवीच्या महिषासुरमर्दिनीच्या रुपाला चंडी असेही म्हणतात. महिषासुर मर्दिनीच्या प्रतिमांच्या निर्मितीचा प्रारंभ इ.स.पू. पहिल्या किंवा इसवी सनाच्या पहिल्या शतकात झाला. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये पहिल्या ओळीतील पहिल्याच स्तंभावर महिषासुरमर्दिनीचे अत्यंत सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प १५८ सें.मी. उंचीचे आणि ८४ सें.मी. जाडीचे आहे. महिषासुरमर्दिनी चतुर्भुज असून उत्तराभिमुख आहे. तिच्या वरच्या डाव्या हातात घंटा आहे, तर खालचा हात महिषासुराच्या ढोपरावर आहे. वरच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे, तर खालच्या हातात शलाका आहे, तर खालच्या हातात शलाका म्हणजेच सळई आहे. महिषासुरमर्दिनीच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात हार, कानात कुंडले व हातात दोन बांगड्या आहेत. महिषासुरमर्दिनीने उजव्या हातातील त्रिशूल महिषासुराच्या नरड्यावर मारला असून तिने उजव्या पायाने त्याच मस्तक दाबून धरले आहे.

सप्तमातृका :

सर्व प्रकारच्या देवींसाठी सप्तमातृकाचा प्रयोग केला जातो. सप्तमातृकाचे मुळ ऋग्वेदात आढळते, असे मत डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे. प्राचीन भारतीय समाजात मातृदेवतेची पूजा प्रचलित होती. मातृकांची संख्या सात आहे. काही ठिकाणी ही संख्या ८,१६,३२ व ६४ अशी आढळते- देवी भागवत पुराणात ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी

आणि चामुंडा या सप्तमातृकांबरोबरच आठवी मातृका म्हणून लक्ष्मीचा उल्लेख केलेला आढळतो. सप्तमातृकांची शिल्पे लेणी व मंदिराच्या भिंतीवर व छतावर प्रामुख्याने कोरलेली आढळतात. सप्तमातृका आसनस्थ आणि स्थानक स्थितीत कोरलेल्या आढळतात. सप्तमातृकांची शिल्पनिर्मिती कुशाण काळापासून सुरु झाली. कुशाण काळात सप्तमातृकांसोबत स्कंदही दिसतो. इसवी सनाच्या पाचव्या - सहाव्या शतकात स्कंदाची जागा शिवाने घेतलेली दिसते. शिऊर येथील लेणी क्रमांक -३ मध्ये तिसऱ्या ओळीतील दुसऱ्या स्तंभावर स्थानक स्थितीत सप्तमातृकांची शिल्पे कोरलेली आहेत. या ठिकाणी सप्तमातृकांबरोबर शिव दाखविला आहे. ही सप्तमातृकांची शिल्पे स्तंभाच्या पायथ्याशी असून दक्षिणाभिमुख आहेत. सप्तमातृकाची ही शिल्पे ७४ सें.मी. उंचीची आहेत. सप्तमातृकांची शिल्पे आसनस्थ आढळतात. परंतु येथील सप्तमातृका मात्र स्थानक आहेत.

गंधर्वकन्या :

आकाशात उडणाऱ्या गंधर्वकन्यांची शिल्पे प्रामुख्याने लेणींच्या भिंतीवर आणि स्तंभांवर कोरलेली आढळतात. शिऊर येथील लेणी क्रमांक - ३ मध्ये पहिल्या ओळीतील तिसऱ्या क्रमांकाच्या स्तंभावर वरच्या बाजूस आकाशात उडणाऱ्या दोन गंधर्वकन्यांची शिल्पे कोरलेली आहेत. या गंधर्वकन्या आकाशात मुक्तपणे संचार करीत असून त्यांच्या हातात पुष्पहार आहेत. या गंधर्वकन्यांच्या खालच्या बाजूस पद्मनाथाचे शिल्प आहे.

नृसिंह :

विष्णुच्या दहा अवतारांपैकी नृसिंह अवतार हा चौथा अवतार आहे. या अवताराची कथा विभिन्न पुराणात आढळते. स्थौन हे नृसिंहाचे एक विशेषण आहे. स्थौन या शब्दाचा अर्थ खांब अर्थात स्तंभ होय. स्तंभातून प्रकट झालेला नृसिंह तो स्थौण नृसिंह होय. भागवत पुराणावरुन समजते की नृसिंह स्तंभातून प्रकट झाले.[१००] हिरण्यकश्यपू या दैत्याचा पुत्र प्रल्हाद हा हरिचा भक्त होता. वडिलांनी समजावूनही त्याची भगवान हरिची भक्ती कमी झाली नाही. त्यामुळे हिरण्यकश्यपू या दैत्याने आपला पुत्र प्रल्हाद यास रागात विचारले की, तुझा भगवान कुठे आहे ? प्रल्हादने उत्तर दिले की भगवान सर्वत्र आहे. एवढेच नाही तर ते समोरच्या स्तंभातही आहेत. हिरण्यकश्यपूने त्या स्तंभावर आघात करताच त्यातून भगवान विचित्र रुप धारण करुन प्रकट झाले. ते रुप पूर्णपणे

सिंहाचेही नव्हते आणि पूर्णपणे मनुष्याचेही नव्हते. या नृसिंह रुपात भगवानने हिरण्यकश्यपू या दैत्यास आपल्या जांघावर घेऊन त्याचे उदर विदीर्ण केले आणि त्यास ठार केले. भारतात गुप्तकाळात नृसिंह अवताराच्या मूर्ती बनविण्यास प्रारंभ झाला. नृसिंहाची प्राचीन मूर्ती बसाढ येथे मिळालेल्या मुद्रेवर पाहावयास मिळते.[१०१] त्यामध्ये वरचा भाग सिंहाचा आणि खालचा भाग मानवाचा आहे. नांदेड या ठिकाणी प्राचीन नृसिंहाचे मंदिर गोदावरी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर होते. आज हे मंदिर नामशेष झालेले आढळते. या मंदिराचे काही अवशेष होळी भागात नृसिंह गल्लीत पाहावयास मिळतात. या मंदिरात केवल नृसिंहाची मूर्ती होती. ही मूर्ती आनंदीदास लक्ष्मीकांत देशमुख यांच्या वाड्यात आहे. ही मूर्ती गोदावरी नदीच्या पात्रात मिळाली. केवल नृसिंहाची ही मूर्ती द्विभुज व आसनस्थ असून १२२ सें.मी. उंचीची आहे. नृसिंहाने डाव्या पायाची मांडी घातलेली आहे, तर उजवा पाय पंजावर टेकवून मांडी वर उचलेली आहे. या मांडीखाली १५ सें.मी. उंचीची प्रल्हादाची मूर्ती आहे. नृसिंहाचा डावा हात गुडघ्यावर टेकलेला आहे तर उजवा हातही गुडघ्यावर टेकलेला असून त्या हातात चक्र आहे, मनगटात कडे आणि दंडात बाजूबंद आहेत. नृसिंह द्विभूज असून ते ७.५ सें.मी. उंचीच्या आणि १२० सें.मी. लांब व ६० सें.मी. रुंदीच्या आसनावर आसनस्थ झालेले आहेत. आसनावर कमळ कोरले असून त्याखालच्या सिंहासनावर हत्ती कोरलेला आहे. ही मूर्ती वाकाटक कालीन आहे.

बोधिसत्व पद्मपाणि :

नांदेड जिल्ह्यात मानसपुरी आणि कंधार येथे वाकाटककालीन बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराच्या सुंदर मूर्ती मिळाल्या. इसवी सनाच्या पहिल्या शतकात कुषाण काळात बुध्दाच्या प्रथमच मूर्ती बनविल्या गेल्या. यामध्ये महायान संप्रदायाचे योगदान महत्वाचे ठरते. या संप्रदायात बुध्दापेक्षा बोधिसत्वाला अधिक महत्व आहे. याच बोधिसत्वाचा आदर्श महायानचा प्रमुख आदर्श होता. त्यामुळेच सर्वप्रथम बनविण्यात आलेल्या प्रतिमा बोधिसत्वाच्याच आहेत. अशाप्रकारे बुध्दाची प्रथम मूर्ती बोधिसत्व या नावाखाली प्रथम घडविण्यात आली. बोधिसत्वाचे पुढील तीन अर्थ आहेत.[१०२]

१) बोधि प्राप्त करण्याची इच्छा असणारा व्यक्ती.

२) ज्याचा विचार अथवा इच्छा, परमज्ञानावर केंद्रीत झालेली आहे असा व्यक्ती.

३) भावी बुध्द.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यात मानसपुरी येथे बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची एक खंडीत मूर्ती मिळाली.[१०३] ही मूर्ती तेथील मारुती मंदिराजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाच्या बुडाला ठेवण्यात आली होती. या मूर्तीच्या कमरेच्या वरचा भाग मिळाला. या मूर्तीचे मस्तकही खंडीत झालेले आहे. बोधिसत्वाच्या हातात पद्म आहे. या मूर्तीचा खालचा भाग येथेच भीमनगर वसाहतीत मरीआईच्या ओटयावर आढळून आला. प्राप्त अवशेषांवरुन या मूर्तीची उंची १०५ सें.मी. आणि जाडी ३० सें.मी. असावी. कंधार तालुक्यात बहाद्दरपुरा येथील गणेश मंदिरात बोधिसत्व पद्मपाणि अवलोकितेश्वराची सुंदर प्रतिमा आहे. १८० सें.मी. उंचीच्या ६० सें.मी. रुंदीच्या आणि ६० सें.मी. जाडी असलेल्या मोठ्या शिळेवर बोधिसत्व पद्मपाणिचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. हे शिल्प स्थानक स्थितीत असून त्याची उंची १५० सें.मी. आहे. पद्मपाणिच्या मस्तकावर मुकूट, गळ्यात मन्याची माळ, दंडात बाजूबंद, कमरेवर मेखला आणि हातात कंगण आहे. उजवा हात अभयमुद्रेत असून त्याच हातात कमळाचे फुल (पद्म) आहे. डावा हात वरदमुद्रेत आहे. मुकूटावर ध्यानी बुध्द अमिताभचे अंकन केले आहे. तर उजव्या बाजूस अमोघसिध्दीची १२० सें.मी. उंचीची स्थानक प्रतिमा आहे. पद्मपाणिच्या मुकुटाच्या वरील बाजूस धम्मचक्र प्रवचन मुद्रा आहे.

५.४ चित्रकला :

चित्रकला या शब्दांचा विग्रह चित्र + कला असा होतो. चित्र म्हणजे एका ठरवून घेतलेल्या जागेत रेषा, आकार व रंग या तीन घटकांची केलेली सुसंवादी रचना किंवा आकृती होय. महाराष्ट्र शब्दकोशात चित्र काढण्याच्या कौशल्याला चित्रकला म्हटले आहे. मानवी जीवनात चित्राला महत्व आहे. मानवाने प्राचीन काळापासून चित्र काढून आपल्या भावना व्यक्त केलेल्या दिसतात. शं.गो. तुळपुळे यांच्या मते प्राचीन महाराष्ट्रीयन लोकांना चित्रकलेचे आकर्षण नव्हते. म्हणून चित्रकलेच्या दृष्टीने वाखाणण्यासारखे महाराष्ट्रात काहीच नाही. अजिंठयाची भिंती चित्रे

बौध्द धर्मीय पण अन्य प्रांतीयांनीच निर्मिली असावीत.[१०४] अशाच प्रकारचे मत प्राचीन चित्रकलेच्या वारशा संदर्भात द.बा. डिकसळकर यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते महाराष्ट्रातील चित्रकलेला २००० वर्षाची परंपरा आहे.[१०५] परंतु ही मते योग्य वाटत नाहीत. कारण भारतात व महाराष्ट्रात अश्यमयुगपासून चित्रकलेचा वारसा सातत्याने चालत आला आहे.

इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांच्या मते आपल्या प्राथमिक प्रागैतिहासिक काळातील पूर्वजांनी कोरीव व रंगीत चित्रे विचार प्रदर्शनार्थ काढली असावीत.[१०६] आपल्या भावना मुखाद्वारे व्यक्त करण्यासाठी समोरचा माणूस हजर असावा लागतो. अगदी प्राथमिक अवस्थेतील मानवाला लेखनकला अवगत नव्हती. म्हणून तो ज्या स्थळी (डोंगर, कपारी, गुहा) राहत असे. तेथील भिंतीसदृश्य खडकावर किंवा प्राण्यांच्या हाडांवर रेखाचित्र कोरित व त्या चित्राद्वारे आपल्या भावना इतरांपर्यंत कधी काळी पोहोचतील अशी आशा बाळगत असे. जेथे भाषेने संपूर्ण भावना कळविता येत नसे. तेथे उपस्थित मनुष्याला काठीने किंवा बोटाने जमिनीवर, पाने, भूर्जपत्रे इत्यादीवर रंगचित्रे काढून तो आपले मनोगत स्पष्ट करीत असे.

महाराष्ट्रातील मराठवाडयातील वाकाटक कालखंडात चित्रकला प्रगत अवस्थेत आढळते. अजिंठयाची चित्रकला पाहिल्यानंतर माणूस आश्चर्याने थक्क होतो. त्या काळात आधुनिक विद्युत प्रकाश योजने सारखी सुविधा नसताना चित्रकारांनी इतकी उत्तम चित्रे लेण्यातील अंधारात कशी काढली असतील. येथील चित्रकार प्रगल्भ, संवेदनशील, सूक्ष्मरेखाविशारद, उच्च दर्जाचे असावेत. मराठवाडयातील चित्रकला शुध्द स्वरुपात अजिंठयाच्या लेण्यात पहावयास मिळते. आधुनिक काळात चित्रकलेच्या प्रांतात उल्लेखिले जाणारे रेखांकन, स्मरणचित्र, कल्पना चित्र, वस्तूचित्र, संकल्प चित्र आदी सर्व घटक अजिंठयाच्या चित्रात पहावयास मिळतात.

वाकाटक काळात मराठवाडयात अजिंठा लेण्यामध्येच चित्रकाम करण्यात आले.ही चित्रकला जगप्रसिध्द आहे. अजिंठा येथील चित्रकाम दोन टप्प्यात पूर्ण झाले आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पैठणच्या सातवाहनांच्या काळात लेणी क्रमांक ९ व १० मध्ये चित्रकाम करण्यात आले. चित्रकामाचा हा पहिला टप्पा ठरतो. इसवी सनाच्या पाचव्या शतकात गुप्त व वाकाटक काळात लेणी क्रमांक १, २,१६ व १७ मध्ये चित्रकाम करण्यात आले. चित्रकामाचा हा दुसरा टप्पा

ठरतो. चित्रांत हरीण, हत्ती, फळे, फुले, यक्ष, गंधर्व, अप्सरा, बुध्द, मनुष्य व स्त्रियांची चित्रे आढळतात. चित्रांतील नायक, नायिका, देव, गंधर्व व अप्सरा अशा व्यक्ती आकाराने मोठ्या दाखविल्या आहेत.

चित्रकारांचे चित्रकाम करण्याचे तंत्र व शैली विशेष उल्लेखनीय आहे. ज्या ठिकाणी चित्रकाम करावयाचे आहे तेथील भिंत छन्नीने तासून सपाट बनवीत असत. या सपाट भिंतीवर चिखलाचा लेप देत असत. हा लेप पक्का होण्यासाठी त्यामध्ये गाईचे शेण, कडबा, गवत, भुसा आणि तांदळाचा कोंडा मिसळत असत. भिंतीवर कापड किंवा गोणपाट पसरत. हा लेप घोटून घेटून गुळगुळीत करीत आणि तो ओलसर असतानाच चुन्याचे पाणी व लिंबाच्या रसाचे मिश्रण तयार करुन त्यावर लावत असत. या पांढऱ्या रंगावर चित्र काढले जाई. चित्राची बाह्यरेषा ठळक व स्पष्ट पध्दतीची होती. त्यासाठी तांबूस व विटकरी रंगाचा वापर करीत असते. चित्राचा पुर्ण आराखडा झ ाल्यावरच रंगभरणी केली जाई. चित्र रंगविण्यासाठी जलरंगाचा वापर केला जाई. टिकाऊपणा आणण्यासाठी रंगामध्ये डिंक मिसळत असत. चित्र काढणे पूर्ण होईपर्यंत गिलावा ओलसर राहील याची दक्षता घेण्यात येत असे. अचूक रेखांकन व जलद रंगकामासाठी अजिंठ्याचे चित्रकार प्रसिध्द होते. चित्रकामासाठी लाल, हिरवा, निळा, पिवळा, पांढरा व विटकरी रंगाचा वापर करण्यात येत असे.

बेल, भोकर आदी फळांमधील गर, विविध झाडांच्या सालींचा द्रव करुन रंग तयार करण्याची जी पध्दत आहे. तिला पालीमर म्हणतात. याच पालीमर पध्दतीद्वारे अजिंठा लेण्यातील सर्व चित्रे रंगविण्यात आली आहे. चित्रांमध्ये उंचवटा, खोलगट भाग दाखविण्याचे अत्यंत अवघड असे तंत्र अतिशय कल्पकतेने वापरुन महान म्हटल्या जाणाऱ्या चित्रकारांचे डोकेही चक्रावून टाकले आहे.

अजिंठा येथील चित्रांचे विषय बौध्द - धर्मीय होते. त्या ठिकाणी भगवान गौतम बुध्दाच्या जीवनातील प्रसंग आणि जातक कथावर आधारीत चित्रे काढली आहेत. जातक हा शब्द पुनर्जन्म या अर्थाने वापरला आहे. गौतम बुध्दाने का जन्म घेतला, या जातकांची म्हणजे त्यांच्या जन्माच्या कथांची संख्या ५५० आहे. त्यामुळेच बौध्द साहित्यात जातक कथांना महत्व आहे. गौतम बुध्दाच्या

पुनर्जन्माच्या अनेक प्रकारच्या कथा अजिंठा लेण्यात चित्रित केल्या आहेत. याशिवाय हरीण, हत्ती, बैल, नाग, यक्ष, अप्सरा, गंधर्व आणि स्त्री पुरुषांची चित्रेही अजिंठा या ठिकाणी पाहावयास मिळतात. लेणीतील स्तंभ, भिंती आणि छतावर चित्रकाम केलेले आहे. ही चित्रकला जग प्रसिध्द आहे. अजिंठा येथील सर्व चित्रकाम कथानात्मक बोधप्रद असे आहे. स्त्री - पुरुषांची चित्रे शरीरशास्त्रास धरुन अचूक काढली आहेत.

अजिंठा येथील चित्रकलेचा परिचय :

लेणी क्रमांक १

१) शिबी जातकाचे चित्रण :

लेणीत प्रवेश केल्यावर डाव्या बाजूच्या भिंतीवर शिबी जातकाचे चित्र दिसते.[१०७] शिबी या राजाने कबुतर या पक्षाला अभय दिले आहे. शिकाऱ्यापासून राजाने कबुतराचे रक्षण केले, तेव्हा कबुतर राजाला म्हणते की, आपण मला अभयदान देऊन शिकाऱ्याला उपाशी मारत आहात. याचवेळी राजाने कबुतराच्या वजनाइतकेच आपल्या शरीराचे मांस कापून शिकाऱ्याला दिले ; पण त्याने ज्या कबुतराला अभयदान दिले होते, त्यास मुक्तच राहू दिले. या काल्पनिक चित्रात तराजू आणि शिबिपुत्र दाखविले आहेत.

२) कृशकाय सुंदरीचे चित्र:

कृशकाय सुंदरी ही बिछान्यावर झोपलेली आहे आणि तिच्या मैत्रिणी तिचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. दुसऱ्या दृश्यात राजदरबारातील स्त्रिया बसलेल्या आहेत आणि दारात एक भिक्खू उभा आहे. हे दृश्य बुध्दाची स्वत:ची कहाणी आहे. जेव्हा बुध्द स्वत:च्या राजदरबारात भिक्षा मागण्यासाठी गेले, तेव्हाचे हे दृश्य असावे ;

३) शंखपाल जातक कथेचे चित्रण :

या लेणी क्र. १ मध्ये शंखपाल जातक कथा आहे.[१०८] शंखपाल जातक चित्रणाची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्वाचा जन्म मगध नरेशाच्या वंशात झाला. जेव्हा तो तरुण वयात आला तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याच्यावर राज्यकारभार सोपवून संन्यास घेतला. बोधिसत्व आपल्या

वडिलांना भेटण्यासाठी प्रारंभी वनात जात होते. त्यांच्या वडिलांचे प्रवचन ऐकण्यासाठी प्रारंभी नागलोकाचे राजे वनात जात होते.

४) नंदाला धर्मदीक्षा दिल्याचे चित्र :

गौतम बुध्दाने आपला भाऊ नंद यास धर्मदीक्षा दिल्याचे एक चित्र आहे. नंदाला भिक्खू केले आहे. हे पाहून नंदाची पत्नी सुंदरी ही विरहामुळे बेशुध्द होऊन पडली आहे. लेणीच्या बाहेरील भिंतीवर मारा चे चित्र आहे, जो प्रेमदेवता आहे. तो बुध्दाला रोखून ठेवत आहे. तो त्यास तपस्या न करण्यास सांगत आहे असा भास होतो. एका दुसऱ्या चित्रात बुध्दाच्या अनेक मुद्रा दर्शविल्या आहेत.

५) बोधिसत्व पद्मपाणि :

मुख्य मंडपाच्या पाठीमागील भिंतीवर डाव्या बाजूस जगप्रसिध्द बोधिसत्व पद्मपाणि चे सुंदर चित्र आहे. त्याच्या डोक्यावर मुकूट असून चेहऱ्यावर प्रसन्न हावभाव आहेत. त्याच्या हातातील कमळाचे फूल शांती आणि पवित्रतेची निशाणी आहे. त्याचे खांदे रुंद व भरदार आहेत. त्याचे शरीर खांद्यापासून खाली निमूळते होत गेलेले आहे. त्याच्या उभे राहण्यातला डौल खुबीने टिपला आहे. तो सरळसोट उभा राहिल्यामुळे त्याच्यातील ताठरपणा आणि दुर्बलताही दिसत नाही. त्याचा मुकूट व अंगाखांद्यावर असलेले मोजके अलंकार खूलून दिसतात. तो वरुन खाली पाहत आहे. डोळ्यात करुणभाव दिसते. गळ्यात मोत्याची माळ आहे. या मोत्याच्या माळेत मध्यभागी निळा मोती आहे. बोधिसत्वांच्या डाव्या बाजूला त्याची पत्नी राजकुमारीचे चित्र आहे. तिच्या चेहऱ्यावर शांतिभाव आहे. तिच्या हातातसुध्दा कमळाचे फूल आहे. ती निराशेने उभी आहे. डोंगरावर माकड, मोर, गंधर्व, किन्नर आणि अन्य प्राण्यांची चित्रे आहेत. बोधिसत्व पद्मपाणिचे चित्र म्हणजे कलेचा अत्युच्य अविष्कार आहे.[१०९]

६) मारविजयचे दृश्य :

लेणीच्या अंतराळातील डाव्या भिंतीवर मारविजयचे दृश्य चित्रित केले आहे. गौतम बुध्द भूमीला स्पर्श करुन भूदेवीला साक्षीच्या रुपाने बोलावित आहेत. ते बोधिवृक्षाखाली ध्यानमग्न झाले आहेत. त्यांच्या चारही बाजूस मारचे सैन्य आहे. एक ठेंगू राक्षस आपले डोळे वटारुन बुध्दाला भेडसाविण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरा एक मनुष्य बुध्दावर तलवारीचा वार करु इच्छित आहे.

दुसऱ्या बाजूनं सशस्त्र समूह बुध्दावर हल्ला करण्यासाठी चालून येत आहे. खाली एका कोपऱ्यात हिरव्या रंगाचा राक्षस दाखविला असून जवळच एक दानव आहे. त्याच्या तोंडातून साप निघत आहे. उजव्या बाजूस खाली वस्त्र व अलंकाराने सुसज्ज असलेला मार दाखविला आहे. तो बुध्दाला त्याच्या दृढ निश्चयापासून दूर करण्यात अपयशी झाल्याने निराश झालेला आहे. बुध्दाच्या जवळच माराच्या कन्या असून त्या बुध्दाला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांचे कोमल शरीर व कामुकतापूर्ण डोळे आणि चेहऱ्यावरील हावभाव रेखाटण्यात कलाकार यशस्वी झ ालेला आहे ; पण मार आणि त्याच्या कन्या बुध्दाला तपस्येपासून दूर करु शकल्या नाहीत.

७) श्रावस्तीच्या चमत्काराचे चित्रण :

अंतराळाच्या डाव्या भिंतीवर श्रावस्तीच्या चमत्काराचे दृश्य चित्रित केले आहे. गौतम बुध्दाचा जादूटोण्यास विरोध होता ; परंतु काही लोकांना जोपर्यंत चमत्कार पाहावयास मिळणार नव्हता, तोपर्यंत ते कोणत्याही व्यक्तीची महता मानत नव्हते. श्रावस्ती येथे बुध्दाला अशाच सहा संन्याशांपूढे काही चमत्कार दाखविण्यासाठी विवश व्हावे लागले. त्यांनी स्वत:ला विभिन्न रुप आणि मुद्रेत एकाच वेळी दाखविले. त्याचेच दृश्य या ठिकाणी चित्रित केले आहे. या दृश्यालाच श्रावस्तीचा चमत्कार या नावाने ओळखले जाते. अंजिठा लेणीमधील आढळणारे श्रावस्तीच्या चमत्काराचे चित्र अतिशय सुंदर चित्रीत केलेले आहे.

८) बोधिसत्व वज्रपाणी व काळी राणी :

अंतराळातील उजव्या बाजूस पाठीमागील दालनाच्या भिंतीवर बोधिसत्व वज्रपाणीचे चित्र आहे. बोधिसत्वाचा मुकूट अत्यंत सुंदर आहे. बोधिसत्व वज्रपाणीच्या उजव्या बाजूस एक राजा थाळीमध्ये पुष्प घेऊन बोधिसत्वाकडे येत आहे. खालच्या बाजूला दोन स्त्रियांची चित्रे आहेत, त्यामध्ये एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला पुष्प अर्पण करीत आहे. ज्या स्त्रीला पुष्प अर्पण केले जात आहे ती स्त्री काळी राजकुमारी या नावाने प्रसिध्द आहे. तिची शरीररचना आणि डोळ्याची लाली पाहण्यासारखी आहे. तिच्या शरीरावर फक्त आभूषणे दिसतात. बाकी ती नग्नावस्थेत आहे.

९) चांपेय जातक कथेचे चित्र :

अंतराळाच्या उजव्या बाजूस पाठीमागील दालनाच्या भिंतीवर चांपेय जातक कथेचे चित्रण केले आहे. आपल्या पूर्वजन्माच्या इच्छेनुसार बोधिसत्वाने नाग लोकात राजा चांपेयाच्या रुपाने जन्म घेतला. धन व ऐश्वर्याने त्याचे मन लगेच भरुन आले. त्याने दुसऱ्यांच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पण करण्याचा निश्चय केला. तो नागराजाच्या रुपाने मुंग्या असलेल्या बिळावर जाऊन झोपला. मुंग्यानी आपल्या शरीराचे मांस भक्षण करुन आपले पोट भरावे असा त्याचा त्यामागे हेतू होता ; पण घडले वेगळेच. एक नागवाला त्या ठिकाणी आला आणि त्याने नागराजाला पकडून ठिकठिकाणी नाचवून आपला उदरनिर्वाह सुरु केला. एकदा वाराणसीच्या राजासमोर नागवाला आपल्या नागराजाला नाचवीत होता. त्यावेळी बोधिसत्वाची पत्नी नागी सुमना ही बोधिसत्वाचा शोध करीत तेथे आली. तिने जेव्हा वाराणसीच्या राजाला बोधिसत्वाचा बरोबर परिचय दिला, तेव्हा त्याने तात्काळ नागवाल्याच्या ताब्यातून नागराजाची सुटका केली. यानंतर बोधिसत्वाने वाराणसीच्या राजाला नागलोकात नेले आणि तेथे त्याचा सात दिवस अतिथिसत्कार करुन धनधान्यासहित परत त्याच्या राज्यात पाठविले. या कहाणीचे चित्र पुढीलप्रमाणे केले आहे. डाव्या बाजूस वर आपल्या राजमहालात राजा चांपेय जगातील सुखाने थकून बसलेला आहे. उजवीकडे वाराणसीच्या राजाच्या दरबाराचे दृश्य आहे. नागी सुमना ही नागराजाला सोडून देण्यासाठी प्रार्थना करीत आहे. जवळच एक बालक आहे. नागी सुमना म्हणत आहे की, माझ्यासाठी नाही तर किमान या बालकावर दया करुन नागराजाला मुक्त करा. खाली डाव्या बाजूस चांपेयाचा अतिथिसत्कार स्वीकारुन वाराणसीचा राजा नागलोकात येत आहे. उजव्या बाजूस चांपेय प्रवचन करीत आहेत आणि वाराणसीचा राजा प्रवचन ऐकत आहे.

दोन्ही राजांच्या भोवती दासी व महिला आहेत.

१०) राजदरबाराचे दृश्य :

लेणीच्या मुख्य दरवाजातून आत गेल्यावर उजव्या बाजूकडील भिंतीवर राजदरबाराचे एक दृश्य नजरेस पडते. राजा एक उंच आसनावर बसलेला आहे आणि त्याच्याभोवती दरबारातील लोक उभे आहेत. उजव्या बाजूस विदेशी लोक आहेत. त्यापैकी काहीना दाढी आहे तर काही जणांनी

इराणी नुकीली टोपी घातलेली आहे. काही लोक मंडपाच्या बाहेर आहेत तर काही विदेशी मंडपात येत आहेत आणि काही लोक मंडपात आलेले आहेत. जे विदेशी लोक राजाजवळ दाखविले आहेत ते राजाला आदरपूर्वक भेट देत आहेत.

११) बैलजोडीची टक्कर :

लेणीत डाव्या बाजूस बसलेल्या एका स्तंभावर दोन बैलांच्या टकरीचे दृश्य चित्रित केले आहे. हे दोन्ही बैल सजीव वाटतात. दोन्ही बैल जोरजोराने एकमेकांना टक्कर देत आहेत. त्यांची शेपटी वर उंचावलेली आहे.[११०] टकरीमुळे त्यांच्या पायापासून जमिनीवरील धूळ उडत आहे. हे दोन्ही बैल शक्तीशाली असल्यामुळे त्यांच्यापैकी कोणीही जिंकला नाही आणि कोणीही हरलेला नाही. एकमेकांवर धावणाऱ्या या दोन्ही बैलांच्या नसानसातून रक्त ओसंडत आहे. या लेणीच्या छतावरही पक्षी, फुले व फळांची चित्रे आहेत. त्यामध्ये पुष्प, पशू आणि मदिरा पीत असलेले दृश्यसुध्दा विभिन्न आयाताकारामध्ये चित्रित केले आहे. काही विदेशी मदिरापान करीत असल्याचे चित्र आहे. हे चित्र इराणचा राजा खुसरो द्वितीय आणि त्याची सुंदर पत्नी शीरीन यांचे असावे.

१२) नागराज व शिकारीचे दृश्य :

रस्त्याच्या कडेला एक नागराज एकांतात पडले होते. काही शिकारी शिकार मिळाली नाही, म्हणून नाराज होऊन परत चालले होते. तेवढ्यात त्यांनी नागराजाला पाहिले आणि ते त्यास शिकार आहे असे समजून ओढू लागले. शिकारी लोकांची - वेशभूषा विविध प्रकारची आहे. अलार नामक व्यापाऱ्याने बैलगाडीने जाताना हे पाहिल्यावर त्यास नागाराजाची दया आली आणि त्याने शिकाऱ्यांना खूप धन देऊन नागराजावरील संकट दूर केले याचे चित्रण येथे केलेले आहे. ही शंखपाल जातकाची कथा आहे. याच लेणीत एका स्त्रीचे सुंदर व आकर्षक चित्र आहे. स्त्रीच्या केवळ पार्श्वभागाचेच दर्शन होते. तिची बसण्याची शैली अशी आहे की ती आपल्याकडे पाहात तर नाही, पण आपणाबरोबर बोलत मात्र आहे असे आश्चर्यचकीत करणारे हे चित्र आहे.

१३) महाजन जातक कथेचे चित्रण :

महाजन जातक कथेचे तीन विभाग होतात. पहिल्या विभागात राजदरबारात राजा खिन्न मुद्रेत बसलेला आहे. राणी त्याची समजूत घालीत आहे. समोरच नर्तिका नृत्य करीत आहेत- तिसऱ्या

विभागात ते घोड्यावर असून नगरद्वारातून निघताहेत. ताटातुटीच्या वेळेची शोकमग्नता दास व दासी दाखवीत आहेत. पश्चिमाभिमुख भिंतीवर गौतम बुध्द भिक्षापात्र हातात घेऊन बसलेले आहेत. त्यांच्यासमोर भक्तगण बसलेले आहेत. तसेच राजपुत्र स्नान करीत आहे. याच लेणीत मिथून मद्यपान - मस्त दर्शविले आहे. काळ्या राणीच्या जवळ अनेक वृध्दांची चित्रे आहेत. आख्राड्यात काही जनावरे लढत आहेत. राणी अरुंधती झोका घेत असतानाचे चित्र मोहक आहे. सांडाचे चित्रही आश्चर्यचकीत करणारे आहे. सांडाकडे कोणत्याही कोनातून पाहिले तर तो आपल्यावर आक्रमण करण्यासाठी धावून येत आहे असे पाहणाऱ्यास वाटते.

लेणी क्रमांक २ :

लेणी क्रमांक २ मधील बरीच चित्रे सुस्थितीत आहेत. बाहेरच्या दालनात व भिंतीवर भरपूर चित्रे आहेत. लेणीच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूकडील दालनाच्या भिंतीवर अनेक अर्हत व किन्नर बोधिसत्वाची पूजा करण्यात मग्न आहेत. बोधिसत्वाचा मुकूट अतिशय सुंदर आहे. याच चित्रातील इंद्राचे चित्रही सुंदर आहे. छतावर फुले व मानवाची चित्रे आहेत. एका ठिकाणी इराणी व भारतीय वेशभूषेतील दोन व्यक्ती मदिरापान करीत आहेत. छतावर एका नागवाल्याचे सुंदर चित्र आहे. नागवाला गुडघे टेकून बसलेला आहे. त्याच्या बगलेत त्याचे पेटारे असून साप त्यामधून आपली तोंड बाहेर काढत आहेत. लेणीत बुध्दाची भरपूर चित्रे आहेत. गर्भगृह व अंतराळातील भिंतीवर, मंडपाच्या डाव्या भिंतीचा काही भाग आणि मंडपाच्या पाठीमागील भिंतीच्या डाव्या भागावर बुध्दाची भरपूर चित्रे आहेत. ही चित्रे विभिन्न आसन आणि मुद्रेत आहेत. गर्भगृहाच्या उजव्या बाजूस अंतराळाच्या पाठीमागील भिंतीवर एक चित्रित अभिलेख आहे. त्यावरुन बुध्दाच्या चित्रासाठी दिलेल्या दानाची माहिती होते. लेणीच्या आत डाव्या भिंतीवर बुध्दाच्या जन्माशी संबंधित चित्रे रेखाटली आहेत.

१) महामायेच्या शयनागाराचे चित्र :

डाव्या बाजूस सर्वात खाली महामायेच्या शयनागाराचे चित्र आहे.[१११] महामाया झोपली असून जवळच दोन - तीन दासी बसलेल्या आहेत. महामायेच्या स्वप्नातील श्वेत हत्ती येथे स्पष्ट दिसत नाही. या चित्राच्या वरील दृश्यात महामाया आपले पती राजा शुध्दोदन यांना आपल्याला

पडलेले स्वप्न सांगत आहे. समोर दोन ज्योतिषी आहेत. ते स्वप्नांचा अर्थ सांगत असावेत. उजवीकडील कोपऱ्यात रत्न व अलंकाराने सजलेली एक स्त्री खांबाला टेकून उभी आहे. ती महामाया असावी. दोन्ही ज्योतिषांची दोन बोटे वर उंचावलेली आहेत. त्यावरुन ते होणारे बालक चक्रवर्ती राजा किंवा संन्याशी होईल, अशी भविष्यवाणी सांगत असावेत असे वाटते आणि ही भविष्यवाणी ऐकूण महामाया आता काय होईल यावर विचार करीत आहे. तिच्या चेहऱ्यावरील भावचित्रण रेखाटण्यात चित्रकार यशस्वी झालेला आहे.

२) तुषित स्वर्गाचे दृश्य:

भिक्खुगृहाच्या (प्रकोष्ठ) दरवाजाच्या वर तुषित स्वर्गाचे दृश्य चित्रित केले आहे. सिध्दार्थाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी त्याच्या आईचा महामायादेवीचा मृत्यू झाला होता. त्यानंतर बुध्दाने स्वर्गात जाऊन महामायेपुढे प्रवचन केले होते. सिंहासनाच्या दोनही बाजूस मकराच्या आकृती आहेत. बुध्दाचे चित्र धम्मचक्र मुद्रेत आहे. सर्वात खाली बुध्दाचा जन्म दाखविला आहे. शुक्राच्या हातात जन्मलेले बाळ आहे. सिध्दार्थ जन्मल्याबरोबर सात पावले चालले होते. उजव्या बाजूस या सात पावलांची चिन्हे दाखविली आहेत. उपवनाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर भिक्षा मागणाऱ्या लोकांचा एक समूह आहे.

३) महाहंस जातकाचे चित्रण:

मंडपाच्या डाव्या भिंतीवर महाहंस जातंकाचे चित्रण केले आहे.[११२] बनारसचा राजा संयम हा आपली राणी खेमा हिची प्रत्येक इच्छा पूर्ण करीत असे. एकदा राणीने स्वर्ण हंस प्रवचन करीत असल्याचे स्वप्न पाहिले. त्यामुळे तिला स्वर्ण हंसाच्या प्राप्तीची तीव्र इच्छा झाली. त्यासाठी राजाने बनारसजवळ एक तलाव खोदला, ज्यामुळे हंस हिमालय सोडून तेथे येतील आणि हंस तेथे आले की त्यांना पकडण्याचीही व्यवस्था केली गेली. स्वर्णहंसाचा प्रमुख सुमूख हा आपला राजा धित्तरथ व समूहासोबत बनारसला आला. त्याठिकाणी त्यांना पकडण्यात येऊन बनारसच्या राजापूढे उभे केले. राजाने त्यांचा आदर - सन्मान केला आणि स्वर्णहंसांनी त्याला धम्माचे शिक्षण दिले. एका ठिकाणी नागराज कन्या झोका खेळत आहे. तिचे कौमार्य, सौंदर्य व स्वप्निल डोळ्यांचे रेखाटन चांगले केले आहे. तिचे सौंदर्य पाहून यक्ष मुग्ध झाला आहे. डाव्या बाजूस वर एका चित्रसमूहात इंद्रप्रस्थ मध्ये

होणाऱ्या द्युतक्रीडेचे सुंदर चित्रण केले आहे. याठिकाणी पूर्णक व धनंजय जुगार खेळत आहेत. तसेच विधूर पंडित नागलोकात राजा व राणीस धर्माचे (धम्माचे) शिक्षण देत असल्याचे दाखविले आहे.

खालच्या बाजूला एक मृग (हरीण) एका व्यक्तीस आपल्या पाठीवर घेऊन जात आहे. या चित्रणाची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व जेव्हा स्वर्ण - मृगाच्या रुपात जन्माला आले होते तेव्हा त्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता पाण्यात बुडत असलेल्या व्यक्तीचा जीव वाचविला होता ; परंतु त्या व्यक्तीने त्यांना पकडून राजाकडे सोपविले होते. राजाने त्यांचा आदर - सन्मान केला व राणीला त्यांचे प्रवचन ऐकविले.

४) पूर्णावदान जातकाचे चित्रण :

विधूर पंडित जातकात जेथे अरुंधती झोका घेत असल्याचे चित्र आहे, त्याच्या खाली पूर्णावदान जातकाचे चित्रण केले आहे.[११३] पूर्ण व त्याचा भाऊ भाविल यांना त्यांच्या इतर बंधूनी वडिलांच्या संपतीचा कसलाच हिस्सा दिला नाही ; पण पूर्ण ने स्वत: व्यापाराच्या माध्यमातून बरीच संपत्ती मिळविली. नंतर तयाने बुध्दाकडून दीक्षा घेतली व सर्व संपत्ती भाविल यास देऊन टाकली. एकदा भाविल शूर्पारक या व्यापारी केंद्राकडे चालला होता. तेव्हा त्याचे जहाज वादळात अडकले. त्यावेळी त्याने पूर्ण चे स्मरण व ध्यान केले, तेव्हा पूर्ण ने भाविलंची वादळाच्या संकटातून सुटका केली. चित्रात डाव्या बाजूस बुध्द एका भक्तास आशीर्वाद देत असतांना दाखविले आहेत. हा भक्त पूर्ण असावा. त्यानंतर वादळात फसलेल्या जहाजाचे चित्र आहे. वरच्या बाजूस बुध्द एका समूहापूढे प्रवचन देत असल्याचे दाखवले आहे.

५) शांतिवादिन जातकाचे चित्रण:

याच लेणीत शांतिवादिन जातक कथेचे चित्रण केले आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व संन्याशाच्या रुपाने जन्माला आले. त्यांच्या प्रवचनात शांती व धैर्यास मोठे महत्व दिले जात होते. त्यामुळे ते शांतिवादिन या नावाने प्रसिध्द झाले. एकदा तेथील राजा आपली राणी व नर्तकीच्या बरोबर ज्या वनात शांतिवादिन प्रवचन करीत असत त्या वनात आले. तेथे राजाला झोप लागली व तो त्याच ठिकाणी झोपला. इकडे राणी व नर्तकी फिरत फिरत ज्या ठिकाणी संन्यासी प्रवचन करीत होते तेथे आल्या. राजाला जेव्हा जाग आली तेव्हा आपल्याला एकटा पाहून त्यास

इतका राग आला की त्याने बोधिसत्व व नर्तकीचा वध करण्याचा आदेश दिला. चित्रात राजाच्या हातात तलवार आहे. नर्तकीचे रेखाटन अतिशय सुंदर आहे. हे चित्र अजिंठा येथील सर्वश्रेष्ठ चित्रांपैकी एक आहे. नर्तकी राजाची क्षमा मागत असून ती जीवदान देण्याची भीक मागत आहे. लेणीच्या छतावर करण्यात आलेले नक्षीकाम अत्यंत सुंदर आहे.

लेणी क्रमांक १६ :

१) हस्ति-जातक कथेचे चित्रण:

समोरच्या वीथीमध्ये दरवाजांच्या डाव्या बाजूस हस्ति जातक कथेचे चित्रण केले आहे.[११४] त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्वाने हत्तीच्या रुपात जन्म घेतला.एके दिवशी त्याने वनात गोंधळाचा आवाज ऐकला व तेथे जाऊन पाहिले तर तेथे राजाने वनात सातशे लोकांना निर्वासित केल्याचे दिसले. हे सर्व लोक उपाशी होते. वनात त्यांना खाण्यासाठी काही नव्हते ; म्हणून बोधिसत्वाने आपले जीवन समाप्त करुन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने सर्व लोकांना पहाडाच्या पायथ्याशी जाण्यास सांगितले. त्या ठिकाणी एक मृत हत्ती पडलेला आहे आणि त्याचे मांस खाऊन आपली भूक भागवावी असेही त्यांनी त्यांना सांगितले. यानंतर बोधिसत्व पहाडाच्या शिखरावर गेले व तेथून त्यांनी खाली उडी मारुन आपले जीवन संपविले. चित्रात डाव्या बाजूस अग्नीजवळ काही माणसे बसलेली आहेत. त्यापैकी दोन व्यक्ती सुरीने मांस कापत आहेत. त्यांच्या समोरच मृत हत्ती पडला आहे. दुसरी व्यक्ती अग्नीत मांस भाजत असल्याचे दाखविले आहे.

२) महाउमग्ग जातक कथेचे चित्रण:

वीथीच्या डाव्या बाजूकडील भिंतीवर महाउमग्ग जातकाचे चित्रण आहे. डाव्या वीथीमध्ये सौदरानंद ची कहाणी चित्रित आहे. या वीथीच्या भिंतीवर मृण्मयी राजकुमारीचे चित्र आहे. डावीकडे पहिल्या दृश्यात दोन व्यक्ती उभ्या आहेत. त्यामधील एकीच्या हातात मुकूट आहे, तर दुसरी व्यक्ती राजकुमारीस काहीतरी सांगत आहे. एक दासी राजकुमारीला वारा घालत आहे. राजकुमारी आसनावर पडलेली असून पाठीमागून एक दासी तिला आधार देत आहे. दासीने आपले केश पाठीमागे बांधले आहेत. राजकुमारी अशक्त दाखविली असून तिचा चेहरा निस्तेज आहे. ती

बेशुध्दावस्थेत असून एका दुसऱ्या दासीने आपला एक हात राजकुमारीवर ठेवला आहे तर दुसऱ्या हाताने ती तिचा हात हातात घेऊन नाडी पाहत आहे. विरहाने त्रस्त झालेल्या राजकुमारीचे चित्र आहे.

३) सौदरानंद नाटकाच्या कथेचे चित्रण:

सौदरानंद या नाटकाची रचना अश्वघोष यांनी केली. या नाटकाची कथा या ठिकाणी चित्रित केली आहे. नंदाला शुध्दोदनानांतर कपिलवस्तूचे राज्य मिळणार होते. एकदा बुध्द स्वत: कपिलवस्तूमध्ये भिक्षा मागण्यासाठी आले, तेव्हा नंद बुध्दाला भिक्षा देण्यासाठी आपल्या नवविवाहीत पत्नीपासून उठून बाहेर आले, पण बुध्दाने भिक्षा घेतली नाही. यानंतर नंद बुध्दाच्या मागे त्यांच्या निवासापर्यंत चालत आले. त्या ठिकाणी नंदाचे केस मुंडण करुन त्यांना बौध्द बनविण्यात आले. नंद संघात फार दु:खी राहत असे. आपल्या नवविवाहीत पत्नीच्या आकर्षणामुळे नंद दु:खी राहतो, हे बुध्दाला समजले, तेव्हा त्यांनी नंदाला स्वर्गात नेले व त्यास अप्सरांचे दर्शन घडविले. [११५] तेव्हा नंदाचा भ्रम दूर झाला. सौदरानंद नाटकाचे दृश्य डाव्या विथीच्या भिंतीवर चित्रित केले आहे. श्वेत वस्त्र परिधान केलेले व भिक्षापात्र हातात घेतलेले बुध्द सर्वप्रथम दाखविले आहेत. त्यांच्यासमोर एक घोडा व नोकर आहे. त्यांच्यापुढे पुन्हा बुध्दाला दाखविले असून त्यांच्याजवळ एक स्त्री व एक बालक आहे. ते राहूल आणि यशोधरा आहेत. बुध्द कपिलवस्तू येथे परत आल्याचे दाखविण्यासाठी हे दृश्य दाखविले आहे. या दृश्याच्या पुढे दुसऱ्या व तिसऱ्या भिक्खूगृहाच्या वर नंद संघात प्रवेश करीत असल्याचे चित्र आहे. नंतर तो जमिनीवर बसला असून पाठीमागून न्हावी त्याचे केस कापत आहे. दोन भिक्खू हे दृश्य ध्यानपूर्वक पाहत आहेत. पुन्हा मंडपात एक दु:खी भिक्खू दिसतो. तो नंद असावा. डाव्या बाजूस बुध्द एका भिक्खूसोबत हवेत उडत असल्याचे चित्र आहे. बुध्द नंदाला स्वर्गात घेऊन जात असल्याचे हे दृश्य आहे.

तिसऱ्या भिक्खूगृहाच्या वर दोन कोनाड्यांत बुध्दाच्या बसलेल्या अवस्थेतील मनुष्य आहे. खालच्या कोनाड्यात चार व वरच्या कोनाड्यात सात - आठ आकृती असून आकृतीच्या डोक्याच्या मागे प्रभामंडळ आहे आणि त्याच्या पाठीमागे कपड्याच्या गादीचे नमुना आहेत. हे चित्र इसवी सनाच्या आठव्या शतकातील असावे. चौथ्या

भिक्खूगृहाच्या उजवीकडे उडत असलेल्या आकृती आहेत. त्यांचे चित्रण केवळ काळ्या व पांढऱ्या रंगाने केले आहे. आकृतीच्या हातात पाने - फूले असल्यामुळे ते बुध्दाच्या पूजेसाठी जात असावेत असे वाटते. या चित्राच्या खाली एका अलंकृत सिंहासनावर बुध्द बसले आहेत. त्यांचे हात धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेत असून त्यांच्या दोन्ही बाजूस एक पुरुष व एक स्त्री उभी आहे.

४) सुजाताचे चित्रः

लेणीच्या पाठीमागील भिंतीवर बुध्द प्रवचन करीत असल्याचे चित्र आहे. जवळच हत्तीसहित एक मिरवणूक निघाली आहे. बुध्दाला भेटण्यासाठी जात असलेल्या अजातशत्रूची ही मिरवणूक असावी. लेणीच्या डाव्या वीथीच्या भिंतीवर बुध्दाच्या जीवनासंबंधी काही चित्रे आहेत. डाव्या बाजूस सर्वात वर सुजाता बुध्दाला खीर वाढत असल्याचे चित्र आहे[११६] सुजाता दोन्ही हाताने धरलेल्या भांड्याने बुध्दाच्या भिक्षापात्रात काही तरी घालत आहे. उजव्या बाजूस सुजाता अग्नीवर खीर बनवीत असल्याचे दाखविले आहे. तिच्या पाठीमागे चार गाई दाखविल्या असून त्यापैकी तीन गाई बसलेल्या आहेत व एक गाय उभी आहे. त्याच्यापूढे वृध्द बसलेले असून त्यांच्या दोन्ही बाजूस तपस्यु आणि मल्लिक या व्यक्ती आहेत. हे दोन व्यापारी बंधू ओरिसाचे राहणारे होते आणि बुध्दत्व प्राप्तीनंतर सर्वप्रथम त्यांनीच बुध्दाला खाद्यपदार्थ अर्पण केले होते. या चित्रांच्या खाली बुध्दाच्या जीवनातील काही चित्रे आहेत. बिंबिसार बुध्दाजवळ येत असल्याचे एक चित्र आहे. दृश्यात बिंबिसारच्या जुलूस दाखविला आहे. या चित्राच्या उजव्या बाजूस सिध्दार्थ बालपणातच समाधिस्थ झाल्याचे दृश्य दाखविले आहे. सिध्दार्थ शेती करण्याच्या हंगामाच्या वेळी आपल्या आई वडिलांसमवेत बाहेरगावी गेले होते. चित्रात नांगर व बैल दाखिवले आहेत. त्या ठिकाणी एका वृक्षाखाली बालवयातच ते समाधिस्थ झाले होते. वृक्षाची सावली जेथे होती ती तेथेच थांबलेली होती हे या चित्राद्वारे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

५) शुध्दोदन व महामायादेवीचे चित्रः

वरील चित्राच्या डावीकडे शुध्दोदन आणि महामायादेवीचे चित्र आहे.[११७] जवळच महामायेच्या स्वप्नांचे दृश्य आहे. राजा व राणीच्या चित्राच्या खाली त्या चार प्रसिध्द चित्रांचे अंकन केले आहे ज्यास पाहिल्यानंतर सिध्दार्थाने संन्यास ग्रहण केला होता. राजा-राणी सिध्दार्थाच्या या

दु:खद गोष्टीचा विचार करीत आहे. महामायेच्या या स्वप्नदृश्याच्या पार्श्वभूमीवर हत्तीचे दोन दात अंकित केले आहेत. महामाया बिछान्यावर झोपलेली असून तिच्या पायाजवळ एक तक्कया आहे. तिच्याजवळ दोन दासी आहेत.

त्या सुध्दा झोपलेल्या आहेत. डाव्या बाजूस एक वृत्ताकार बारहदरीमध्ये राजा व राणी दास आणि दासीसमवेत दाखविले आहेत. राणी -राजाला कांहीतरी सांगत आहे आणि राजा ते ध्यान देऊन ऐकत आहे. हे दृश्य महामाया शुध्दोदनाला आपल्याला पडलेले स्वप्त पडल्याचे सांगत आहे. पहिल्या व दुसऱ्या भिक्कू गृहाच्यामधील भिंतीवर बुध्दाच्या बाल जिवनातील दृश्ये चित्रीत केली आहेत. या लेणीत मगरीचेही सुंदर चित्र आहे.

लेणी क्र. १७

या लेणीतील चित्रे सर्वाधिक सुरक्षित राहिली आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या भिंतीवरील चित्रे नष्ट झाली आहेत. पण काही चित्रे ओळखू येतात. तेथे गंधर्वाची उडती चित्रे आहेत. विना वाजवीत असलेल्याही काही आकृती आहेत. गायकाचे चित्र आहे. दरवाजाच्या चौकटीवर दांपत्याची सुंदर चित्रे आहेत. पक्षांची चित्रे आहेत. बाहेरच्या दालनात प्रवेशद्वाराच्या बाजूकडील भिंतीवर डाव्या बाजूस एका मंडपात राजा -राणी मध्यपान करीत आहेत. त्यानंतर ते दांपत्य विचारमग्न अवस्थेत नगरद्वाराच्या उजवीकडे बोधिसत्वाच्या बरोबर एक मंजिरा वाजवीत असलेली अप्सरा अतिशय सुंदर आहे.

१) नालागिरी दमनचे चित्रण :

दालनाच्या भिंतीच्या सर्वात उजवीकडे नालागिरी दमनचे दृश्य चित्रित केले आहे.[११८] बुध्द स्वत: चमत्काराच्या विरोधी होते. पण तरीही त्यांनी आपल्या जिवनात आठ चमत्कार दाखवावे लागले. नालागिरी दमन हा त्यापैकीच एक चमत्कार आहे. बुदाचा भाऊ देवदत्त ने बुध्दाला ठार मारण्याचा प्रयत्न अनेकवेळा केला होता. एकदा बुध्द राजगृहात होते. तेव्हा देवदत्ताने अजातशत्रूच्या मदतीने एक षडयंत्र रचले व बुध्दाला मारण्यासाठी एक पागल हत्ती - नालागिरीस सोडला. या हत्तीने रस्त्यावर अनेक निरपराध लोकांना ठार केले. अशावेळी बुध्दाने पळून जावे असे त्यांच्या शिष्यांनी सांगितले. पण बुध्द पळून न जाता हत्तीसमोर गेले. तेव्हा हत्तीने शरण येऊन बुध्दाच्या

चरणांना स्पर्श केला. बुध्दाने आपला हात त्याच्या मस्तकावर ठेवला. चित्रात राजगृहाची सडक आणि त्याच्या कडेला घरे दाखविली आहेत. भीतीने त्रस्त झालेले नागरिक आणि संतापलेले अजातशत्रु व देवदत्तही दाखविले आहेत. दालनाच्या डावीकडे पाठीमागील भिंतीवर जीवन - चक्राचे आलेखन केले आहे. त्यामध्ये कुंभार, वानर, मिथून दृश्य, उंट, बाजार आणि उद्यान इत्यादींचे दृश्य दाखविले आहे. या जीवन चक्रास एका व्यक्तीने दोन्ही हाताने पकडले आहे. नालागिरी दमन हा त्यापैकीच एक चमत्कार आहे. बुध्दाचा भाऊ देवदत्त ने बुध्दाला ठार मारण्याचा प्रयत्न अनेकवेळा केला होता.

एकदा बुध्द राजगृहात होते. तेव्हा देवदत्ताने अजातशत्रूच्या मदतीने एक षडयंत्र रचले व बुध्दाला मारण्यासाठी एक पागल हत्ती - नालागिरीस सोडला. या हत्तीने रस्त्यावर अनेक निरपराध लोकांना ठार केले. अशावेळी बुध्दाने पळून जावे असे त्यांच्या शिष्यांनी सांगितले. पण बुध्द पळून न जाता हत्तीसमोर गेले. तेव्हा हत्तीने शरण येऊन बुध्दाच्या चरणांना स्पर्श केला. बुध्दाने आपला हात त्याच्या मस्तकावर ठेवला. चित्रात भीतीने त्रस्त झालेले नागरिक आणि संतापलेले अजातशत्रु व देवदत्तही दाखविले आहेत. दालनाच्या डावीकडे पाठीमागील भिंतीवर जीवन - चक्राचे आलेखन केले आहे. त्यामध्ये कुंभार, वानर, मिथून दृश्य, उंट, बाजार आणि उद्यान इत्यादींचे दृश्य दाखविले आहे. या जीवन चक्रास एका व्यक्तीने दोन्ही हाताने पकडले आहे.

२) छदंत जातक कथेचे चित्रण:

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरील वीथीच्या डाव्या भींतीवर छदंत जातक कथेचे चित्रण आहे.[११९] सर्वात वर डाव्या बाजूला आजाराचा बहाणा करुन राणी आजारी पडल्याचे दाखविले आहे. ती बिछान्यावर झोपली आहे. अगदी खाली बोधिसत्वाला हत्तीच्या रुपात अन्य हत्तीसमवेत कमलवनात दाखविले आहे. उजव्या बाजूला पहाडाच्या आडून शिकारी हत्तीला पाहत आहेत. पाहाडावर माकडे खेळत आहेत. सर्वात वर सोनोत्तर शिकाऱ्यावर बाण चालवीत असल्याचे दाखविले आहे. खाली सोनोत्तर बोधिसत्व हत्तीची वंदना करीत आहे. या दृश्याच्या डाव्या बाजूस शिकारी हत्तीचे दान घेऊन राजदरबारात पोहोचल्याचे दाखविले आहे. राजा राणीला हाताने आधार देत आहे तर राणी हत्तीचे दात पाहून बेशुध्द होत आहे.

३) महाकपी जातक कथेचे चित्रण:

वरील चित्रांच्या पुढे महाकपी जातक कथेचे चित्रण केले आहे.[१२०] हे चित्र खिडकी व लहान दरवाजे यांच्या मध्ये आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व माकडाच्या रुपाने जन्माला आले. ते आपल्या अन्य साथीदारासह गंगा किनाऱ्यावरील जंगालात राहत होते. हा समूह आंब्याच्या बागेतील आंबे खात असे. वाराणसीचा राजा ब्रह्मदत्त यालाही येथील आंबे खाण्याची इच्छा झाली. पाण्यातून वाहून आलेल्या एका आंब्याचा स्वाद फार चांगला असल्यामुळे राजाने त्या आंब्याच्या बागेचा शोध आपल्या सेवकामार्फत लावला. राजाचे सेवक जेव्हा या बागेतील आंबे घेण्यासाठी आले तेव्हा जी माकडे या बागेतील आंबे खात होती त्यांचे जीवन संकटात आले. अशावेळी बोधिसत्वांनी आपल्या शरीराचा नदीवर एक पूल बनविला, जेणेकरुन त्यांचे सहकारी त्यांच्या पाठीवर चढून संकटातून दूर होतील ; पण त्यांचा भाऊ देवदत्त जो माकडाच्या रुपाने जन्माला आलेला होता त्याने मुद्दाम बोधिसत्वाच्या पाठीवर जोरात उडी टाकली. त्यामुळे बोधिसत्वांचा हात सुटला आणि ते ब्रह्मदेवाच्या सेवकांच्या हाती सापडले, परंतु बोधिसत्वाने केलेल्या या त्यागाने ब्रह्मदत्त प्रभावीत होऊन त्याने बोधिसत्वांचा आदर केला व त्यांच्या प्रवचनाचा लाभ घेतला. चित्रात दरवाजाच्या डावीकडे नदीचे दृश्य चित्रित केले असून नदीत मासे व अन्य जलचर प्राणी आहेत.

काही लोक स्नान करीत आहेत. डाव्या बाजूस राजा घोडेस्वारांसमवेत आहे. त्यामधील काही लोक माकडांकडे बाण मारत आहेत. सर्वात वर बोधिसत्वांच्या पाठीवरुन चालून गेलेली माकडे आहेत. खाली बोधिसत्वाला चादरीत गुंडाळून काही लोक घेऊन जात आहेत. खिडकीच्या वर बोधिसत्व राजाला प्रवचन ऐकवीत आहे.

४) हस्ति व हंस जातक कथेचे चित्रण :

पुढे हस्तिजातक कथेचे चित्रण आहे. डाव्या बाजूस भिंतीवर दोन भागात चित्रकाम केले आहे. या चित्राची कथा नेमकी कोणती आहे याचा शोध लागलेला नाही. वरच्या बाजूस राजदरबाराचे चित्र आहे. आणि खाली राजा हातात तलवार घेऊन बसलेला आहे. हंस जातक कथेचेही चित्रण येथे केलेले आहे. त्याचा काही भाग वडील पुषती व संजय यांचा निरोप घेत आहे.

वेसांतर हात जोडून बसला आहे. पुषती दु:खाने पुत्राकडे पाहात आहे. एक दासी पुषती व वेसांतर यांच्या मध्यभागी दु:ख व्यक्त करीत उभी आहे. इतर दोन पुरुष स्त्रियांसुध्दा वेसांतरकडे पाहात आहेत. पुढील दृश्यात माद्री व वेसांतर आपल्या दोन पुत्रांसह नगराबाहेर जात असल्याचे दाखविले आहे. पुढे ते सर्वजण रथात बसलेले आहेत. समोर भिक्षा मागणारे लोक आहेत. वेसांतर त्यांना घोडे व रथही दान देत आहे. पुढील दृश्यात कुमार वेसांतर, माद्री व त्यांची दोन मुले पायी चालत आहेत. आता त्यांच्या अंगावर कसलीच आभूषणे नाहीत.

थोडे पुढे गेल्यानंतर झुज्जक माद्रीला मुले देण्याची भिक्षा मागत असल्याचे चित्र आहे. माद्रीने या मागणीस नकार दिल्याने झुज्जक कुमार वेसांतरकडे मुलांची भिक्षा मागत आहे. मुले भीतीने वेसांतरला चिपकली आहेत, पण वेसांतरने मुलांना दान म्हणून झुज्जकला देऊन टाकलेच. यानंतर झुज्जकने राजा संजयच्या दरबारात जाऊन मुले परत केल्याचे व बदल्यात पैसे घेतल्याचे दाखविले आहे. झुज्जकचे पुढे दोन हात तुटलेले असून त्यास थोडीसी दाढी आहे. पुढील दृश्यात वेसांतर व माद्री परत येत असल्याचे दाखविले आहे.

६) महाकपित जातक कथेचे चित्रण:

पाठीमागील वीथीच्या डाव्या भिंतीवर महाकपित जातक कथेचे चित्रण केले असून त्याची कथा अशी आहे. एकदा एक ब्राह्मण शेतकरी आपल्या बैलांचा शोध घेताना जंगलात रस्ता चुकला. तो बऱ्याच दिवसापासून उपाशी होता. एका झाडावरील फळे तोडण्याच्या प्रयत्नात तो एका खड्डयात पडला. यावेळी बोधिसत्व माकडांच्या रुपाने जन्माला आले होते. त्यांना त्या ब्राह्मणाची दया आली आणि त्यांनी त्या ब्राह्मणास खड्डयातून वर काढले. तसेच त्यास खाण्यासाठी फळे दिली, पण बोधिसत्व झोपी गेले तेव्हा त्या कृतघ्न ब्राह्मणाने त्यांना दगड मारण्याचा प्रयत्न केला- त्यामुळे बोधिसत्व उडी घेऊन झाडावर चढले. एवढे होऊनही त्यांनी त्या ब्राह्मणास जंगलाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला.

चित्रात एक मनुष्य उडी मारुन फळे तोडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे व नंतर तो एका खड्ड्यात पडत असल्याचे दाखविले आहे. त्याला बाहेर काढण्यासाठी माकडाला खड्डयात

डोकावलेले दाखविले आहे. यानंतर झोपत असलेल्या बोधिसत्वाला मारण्यासाठी ब्राह्मणाने दगड उचलला आहे. शेवटी तेच माकड त्या ब्राह्मणाला जंगलातून बाहेर जाण्याचा रस्ता दाखवीत आहे.

४) सुतसोम जातक कथेचे चित्रण:

पाठीमागील वीथीच्या भिंतीवर डावीकडे सुतसोम जातक कथा चित्रित केली आहे.[१२१] त्याची कथा अशी आहे. बनारसचा राजा सुदास हा एकदा जंगलात शिकार करता करता आपल्या सहकाऱ्यांपासून अलग झाला. तो थकून झोपला तेव्हा जंगलातील एका वाघिणीने त्याचा पाय चाटला. नंतर त्या वाघिणीस मुलगा जन्मला तेव्हा ती वाघीण सुदासकडे गेली. त्याच्या मुलाला सौदासला नंतर राज्य मिळाले. वाघिणीच्या पोटी जन्माला आल्यामुळे सौदासला मानवाचे मांस खाण्याचा छंद होता. राजा झाल्यावर त्याला यासाठी मोकळीक मिळाली. नंतर प्रजेने त्यास पदच्युत केले. आता तो जंगलात निर्भयपणे मानवाचे मांस खाऊ लागला. एकदा इंद्रप्रस्थचा राजा सुतसोम जंगलात सौदासच्या हाती लागला. त्याने सौदासला अशी विनंती केली की मला खाण्यापूर्वी बुध्द कश्यप चे प्रवचन मला ऐकू द्यावे. बुध्दाचे प्रवचन ऐकल्यानंतर सुतसोम सौदासकडे आला ; पण त्याच्या प्रभावामुळे सौदासच्या वागण्यात बदल
झाला.

चित्रात राजा सुदास घोड्यावर बसून नगराबाहेर जात असल्याचे दाखविले आहे. त्याच्यासोबत त्याचे सहकारी आहेत. कुत्र्यांचा समूह हरणांचा पाठलाग करीत आहे. यानंतर राजा एकटाच दाखविला असून सभोवती जंगल व जंगली प्राणी आहेत. यानंतर वाघीण त्याचे पाय चाटीत आहे. ती बाजारात फिरत आहे. लोक आश्चर्यचकीत झाले आहेत. उजव्या बाजूस वाघीण राजासमोर उभी आहे. बालक राजाच्या हातात आहे. त्याच्या खाली सौदास विद्योपार्जन करीत आहे. उजवीकडे सौदासचे राज्यारोहण आणि स्नान दाखविले आहे. दुसऱ्या तीन दृश्यात मानवाचे मांस कापले जाणे, ती शिजविणे व राजापुढे सादर करणे हे दाखविले आहे. एका दृश्यात सौदास व प्रजा यांच्यातील लढाई दाखविली आहे. डाव्या बाजूला तो पदच्युत झाल्यानंतरचे दृश्य आहे.

८) शरभ मृगजातक कथेचे चित्रण:

अंतराळाच्या उजवीकडे पाठीमागील भिंतीवर चार जातक कथांचे चित्रण केले आहे. वरील भागावर शरभ मृगजातक कथा चित्रित आहे. त्याची कथा अशी आहे. एकदा बोधिसत्व हरणाच्या रुपाने जन्माला आले. वाराणसीच्या राजाने शिकार करण्यासाठी त्याचा पाठलाग केला, पण तो खडड्यात पडला. बोधिसत्वाने मात्र आपला प्राण घेण्यासाठी आलेल्या राजाला खडड्यातून वर काढले व त्याचा जीव वाचविला. चित्रात मध्यभागात शिकारीला निघालेल्या लोकांचा समूह दाखविला आहे. उजवीकडे बोधिसत्वाच्या पाठीवर दगड ठेवून भार वाहून नेत असल्याचे दाखविले आहे. त्यानंतर बोधिसत्व राजाला पाठीवर घेऊन जात असल्याचे दाखविले आहे.

९) मच्छ जातक कथेचे चित्रण:

शरभ मृग जातकाच्या उजवीकडे मच्छ जातक कथेचे चित्रण करण्यात आले आहे.[१२२] एका सरोवरात एक मोठा मासा व अन्य लहान लहान मासे इतर प्राण्यांसह दाखविले आहेत. दुसऱ्या ठिकाणी असलेल्या एका चित्रात नाक डोळे बंद करुन म्हशीच्या पाठीवर बसलेले आहे. दुसऱ्या चित्रात एक क्रुध्द हल्या (रेडा) माकडास आपल्या पायाने दाबत असल्याचे दाखविले आहे. पाठीमागील व उजव्या बाजूकडील वीथीजवळ एका उपांत स्तंभावर एक यक्ष आहे. त्याच्या उजव्या हातात कमळाचे फूल आहे आणि तो उजवीकडे थोडा झुकला आहे. अलंकाराचे चित्रण सुंदर आहे. अजिंठा लेणी क्र. १७ मधील मच्छ जातक कथेचे चित्रण अतिशय सुंदर केलेले आहे.

१०) सिंहल अवदान जातक कथेचे चित्रण:

उजवीकडील वीथीमध्ये सुरुवातीच्या आणि शेवटच्या दोन उपान्त्य स्तंभाच्या मध्यभागी संपूर्ण भिंतीवर सिंहल अवदान जातकाचे चित्रण आहे. सिंहल विजयाची कथा दिव्यावदान मध्येही वर्णन केलेली आहे. या लेणीत चित्रित केलेली कथा दिव्यावदानाच्या कथेशी मिळती - जुळती पण थोडीशी भिन्न आहे. त्याची कथा अशी आहे. सिंहकल्पचा राहणारा व्यापारी सिंहक याचा पुत्र सिंहल हा मोठा प्रतिभाशाली होता. शिक्षणाची दीक्षा घेतल्यानंतर आपल्या पित्याला विदेशी जाऊन व्यापार करण्याची त्याने परवानगी मागितली. पित्याची इच्छा आपला पुत्र दूर जावा अशी नव्हती, पण तो पुत्राला थांबवू शकत नव्हता. सिंहल पाचशे अन्य व्यापाऱ्यांसह काही सामान घेऊन विदेशी गेला- व्यापाऱ्यांशी आपल्या वस्तू किफायतशीरपणे विकून ते परत निघाले. रस्त्यात ते ताम्र द्वीप या

ठिकाणी थांबले. याठिकाणी राहत असलेल्या राक्षसींनी सुंदर रमणीची रुपे घेऊन त्या पाचशे व्यापाऱ्यांचा आदर व सन्मान केला. सिंहल यास काही संशय आल्याने त्याने व्यापाऱ्यांना तेथून तात्काळ निघण्याचा सल्ला दिला, पण व्यापाऱ्यांनी ऐकले नाही. सिंहलला मदत करण्यासाठी बोधिसत्व आले. त्यावेळी ते घोड्याच्या रुपाने जन्माला आले होते. सिंहल आपल्या काही सहकाऱ्यासह घोड्यावर बसून उडून गेला. अन्य व्यापाऱ्यांना रात्री राक्षसींनी खाऊन टाकले.

सिंहल तेथून जम्बुद्वीपला गेला. राक्षसिणींनी त्याचा पाठलाग केल्यामुळे तो परत सिंहकल्पला आला. एक राक्षसीण पुन्हा सुंदरीचे रुप घेऊन व एक मुलगा हातात घेऊन तेथे आली व तिने त्याच्यासोबत राहू देण्याची विनंती केली. सिंहलने ती राक्षसीण असल्याचे राजाला समजाविले; पण राजाला तिची भुरळ पडली. सिंहलने तिला स्वीकारण्यास नकार दिला. तेव्हा राजाने स्वत: तिच्याशी विवाह केला. परिणामी या राक्षसिणीने अन्य राक्षसिणींना बोलाविले आणि त्यांनी राजमहालातील सर्व लोकांना खाऊन टाकले. पुढे सिंहलच्या नेतृत्वाखाली लोकांनी राजमहालावर हल्ला करुन राक्षसिणींना मारुन पळवून लावले. पुढे तेथील लोकांनी सिंहलला राजा बनविले.त्यांनी ताम्रद्वीप येथूनही राक्षसिणींना पळवून लावले. तेव्हापासून ते ठिकाण सिंहलद्वीप या नावाने प्रसिध्द झाले.

चित्रात सर्वात खाली तुटलेले जहाज आणि काही सुंदरी आहेत. एका खोलीत एक पुरुष व एक स्त्री आहे. दुसऱ्या दृश्यात राक्षसीण सिंहलच्या राजदरबारात आहे. तिच्या पाठीमागे राजाचा मंत्री आहे. दुसऱ्या दृश्यात राक्षसिणींचा राजमहालावरील हल्ला दाखविला आहे. राजमहालावर गिधाडेही आहेत. सिंहलने राजमहालावर चढाई केल्याचे चित्र आहे. राक्षसिणी पळत आहेत. सिंहलचे राज्यारोहणही दाखविले आहे- पुढे हत्ती, घोडे व पायदळ सैनिक ताम्रद्वीपवर चढाई करीत आहेत. ढाल, तलवार, भाला, तीर व धनुष्यबाण ही शस्त्रे सैन्याच्या हातात आहेत. याच वीथीमध्ये उपान्त्य स्तंभावर शृंगार करीत असलेल्या एका स्त्रीचे चित्र आहे. दोन दासी प्रसाधनाच्या कामात तिला मदत करीत आहेत. हे सुंदर चित्र अजिंठा येथील सुंदर चित्रापैकी एक आहे.

११) शिबी जातक कथेचे चित्रण:

समोरील वीथीमध्ये शिबी जातक कथा चित्रित केली आहे. लेणी क्रमांक एक मधील शिबी जातक - कथेपेक्षा ही जातक - कथा थोडी वेगळी आहे. याठिकाणी शिबी आपले डोळे दान देतो, त्याची कथा चित्रित केली आहे. एका दृश्यात शिबीचा दरबार आहे. पुढे शिबीचे डोळे काढत असल्याचे दृश्य आहे. नंतर शिबीने केलेल्या नेत्रदानामुळे खूश व प्रसन्न होऊन शक्क ने शिबीचे डोळे परत केले. शिबी - जातकात काही ठिकाणी अभिलेख चित्रित केले आहेत. या कथेतील चित्र एकाच वेळी पण अलग अलग कलाकारांनी काढल्यामुळे चित्रांत अंतर पडले आहे.

१२) रुरु जातक कथेचे चित्रण:

याच ठिकाणी रुरु जातक - कथा चित्रित केली आहे [१२३] एकदा बोधिसत्वाने स्वर्ण - मृगाच्या रुपाने जन्म घेतला. त्याने पाण्यात बुडत असलेल्या एका व्यक्तीचा जीव वाचविला या ठिकाणी चित्रात बुडत असलेलया व्यक्तीस स्वर्ण - मृग वर काढत असल्याचे चित्र आहे. राजाला जंगालात घोड्यावर बसून कुत्र्यासह शिकार करण्यासाठीजात असल्याचे दाखविले आहे. एक व्यक्ती स्वर्ण - मृगाला पकडण्याचा प्रयत्न करीत आहे. तिचा हात कापला जातो. शेवटी रथात बसलेल्या स्वर्ण मृगाचा जुलूस दाखविला आहे.

१३) निग्रोध मृग जातक कथेचे चित्रण:

वरील चित्राच्या पुढे निग्रोध मृग जातक कथा चित्रित आहे. त्याची कथा अशी आहे. बोधिसत्वाने एका गर्भवती हरीणीचा जीव वाचविण्यासाठी स्वत:ला बनारसच्या राजाच्या भोजनासाठी अर्पण केले. राजावर या घटनेचा इतका प्रभाव पडला की त्याने मांस खाणे सोडून दिले. चित्रात उद्यानात मृग दाखविले आहेत. काही मृग बसलेले आहेत, तर काही मृग उभे आहेत. काही वळून पाहात आहेत. वर राजाच्या स्वयंपाक घरात मृग स्वत:ला अर्पण करत असताना दाखविले आहे. पुढे मृग प्रवचन करीत असल्याचे चित्र आहे.

अंतराळातील भिंतीवर बुध्दाच्या जीवनातील अनेक चित्रे आहेत. उजवीकडील भिंतीवर श्रावस्तीचा चमत्कार चित्रित केला आहे. डावीकडील भिंतीवर तुशित स्वर्गात महामायेला प्रवचन सांगत आहे. सांकाश्य ब्रह्मा व शुक्रबरोबर पृथ्वीवर उतरत असल्याचे दृश्य आहे. सांकाश्यच्या सभेत

अनेक विदेशींची चित्रे आहेत. या लेणीत दरवाजाच्या डावीकडे अंतराळाच्या पाठीमागील भिंतीवर सर्वोत्कृष्ट चित्र आहे. बुध्दाला कपिलवस्तू नगरात यशोधरेसमोर भिक्षा मागत असल्याचे दाखविले आहे. लेणीच्या छतावर सुंदर चित्रण केले आहे. याच लेणीत कोंबड्याची झुंज, पहिवानांच्या कुस्त्या, बैलांच्या टकरी, किन्नर आणि विभिन्न प्रकारचे पक्षी चित्रित केले आहेत. बुध्दाला वंदन करण्यासाठी जात असणाऱ्या गंधर्व - अप्सरांचेही सुंदर चित्र या लेणीत आहे.

५.५ वादनकला :

नृत्य गायनाला ताल व साथ देण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या ध्वनीयुक्त साधनाला वादय म्हणतात. महाराष्ट्र शब्द कोशामध्ये वाजवणे, शब्द काढणे,वाद्यादिकांतून सूर काढण्याची क्रिया, गाण्याची साथ करणे, गायनाची निर्जीव पदार्थापासून तयार केलेल्या यंत्राने नक्कल म्हणजे वादन होय, असे म्हटले आहे.[१२४] वाद्य वाजवण्याच्या कौशल्याला वादन कला म्हणतात. गायन, नृत्य, चित्रे आदी कलां प्रमाणेच वाद्य कलेचा शोध मानवाने प्रारंभीच लावला असावा. प्राथमिक रानटी आवस्थेत मानवाने शिकारीसाठी वापरलेली हत्यारे ही वाद्याच्या उत्पत्तीचे दुवे आहेत.

दगडी हत्यारे परस्परांवर आदळल्यानंतर होणारा आवाज हा घनवर्गाच्या वाद्य उत्पत्तीस साहाय्यभूत झाला असावा. शिकारीसाठी मारलेल्या प्राण्यांचे कातडे वाळल्यानंतर त्यावर आघात केला असता वेगळा आवाज झाला. अशा कृतीतून चर्मवाद्यांची निर्मिती झाली असावी. शिकारीसाठी वापरल्या जाणाऱ्या धनुष्याच्या दोरी टणत्कारातून तंतू वाद्याचा जन्म झाला असावा. तसेच दरी, डोंगर, कपारी अथवा झाडाच्या पोकळीतून जोराने वाहणाऱ्या वाऱ्याचा वेगळा आवाज अनुभवून मानवी बुध्दीतून हवेच्या मदतीने वाजविल्या जाणाऱ्या सुषीर वाद्याचा जन्म झाला असावा. अशा प्रकारे निरीक्षण व अनुभव यांच्या साहाय्याने मानवाने निसर्गातील सुप्त शक्तीतून वाद्ये विकसीत केली असावीत.वादनकलेचे संवर्धन सिंधू संस्कृतीच्या काळातही कायम
होते. सिंधु संस्कृतीच्या उत्खननात जवळ जवळ ५५० शिक्के सापडले असून या शिक्क्यावर विविध आकृती व पशुपक्षांचे चित्रे अंकित केलेली आहेत. तसेच काही शिक्क्यावर वीणा व ढोल या वाद्यांची चित्रे देखील अंकीत केलेली दिसून येतात.[१२५]आज प्राचीन वाद्ये, वादनशैली, आकार, त्यांचा स्वर

काळाच्या पडद्याआड गेला आहे. केवळ प्राचीन शिल्पामध्ये ती पहावयाला मिळतात. भारतीय वाद्यांचे वर्गीकरण १) तंतुवाद्ये २) सुषिर वाद्ये ३) अवनद्ध वाद्ये ४) घनवाद्ये असे चार प्रकारात केले जाते.[१२६]

१) तंतुवाद्ये :

'तत' हा शब्द 'तन' म्हणजे ताणणे या धातूपासून उत्पन्न झालेला आहे.दोरी, रेशीम वा अन्य धातूची तार, अथवा प्राण्यांच्या आतडयाची दोरी घट्ट ताणली म्हणजे त्यातून संगीतमय नाद निघतो. अशा दोरीचा वा तारेची ज्या वाद्यामध्ये उपयोग केला जातो. त्या वाद्यांना तंतुवाद्ये असे म्हणतात. उदा. तुणतुणे, तंबोरा, सतार, व्हायोलीन, सरस्वती वीणा, नारदी वीणा ही तंतूवाद्ये आहेत.

२) सुषिर वाद्ये :

हवेच्या साहाय्याने वाजवली जाणारी वाद्ये म्हणजे सुषिर प्रकारची वाद्ये होय. उदा . बासरी, पावा, पुंगी, हार्मोनिअम, पिपाणी, तितरी, बिन, अलगूज ही सुषिर वाद्ये आहेत.

३) अवनद्ध वाद्ये :

चर्माच्छादित वाद्ये म्हणजे अवनद्ध प्रकारची वाद्ये होय. उदा. डफ, तबला, ताशा, मृदंग, ढोलकी, चौघडा, खंजिरी, कुडकुडे ही अवनद्ध वाद्ये आहेत.

४) घन वाद्ये :

घन वस्तूंचा एकमेकावर आघात करुन वाजवली जाणारी वाद्ये म्हणजे घन प्रकारची वाद्ये होय. उदा. टाळ, खुळखुळा, घंटा, घुंगरु, टिपरी, झर्झर ही घनवाद्ये आहेत.

मराठवाडयातील वाकाटक कालीन लेणीतील चित्रावरुन तत्कालीन वाद्यसंस्कृतीची माहिती मिळते. वाकाटक काळात मराठवाडयातील अंजिठा लेणी क्र. १ व १६ मध्ये कच्छपी वीणेचे चित्र आहे. अजिंठा लेणी क्र. १७ मधील प्रवेशद्वाराच्या उजवीकडे बोधीसत्वाच्या बरोबर एक मंजिरी वाजवत असलेली अप्सरा अतिशय सुंदर आहे. लेणी क्र. १७ मध्ये आलापिनी वीणेचे चित्र आहे. तसेच अजिंठा येथील लेणी क्र. १ मध्ये पाश्चात्य गिटारच्या धर्तीची वीणा मांडीवर घेतलेल्या पुरुषाचे चित्र पहावयाला मिळते. या लेणीमध्ये एक स्त्री आडवी बासरी धरुन वाजवत असल्याचे चित्र आहे.

अजिंठा येथील लेणी क्र. २ मध्ये उजव्या बाजूकडील उपगृहामध्ये दोन भव्य यक्षमूर्ती आहेत.त्यांच्या हातात शंख व पद्म असल्याने शंखनिधी व पद्यनिधी दाखवण्याचा प्रयत्न केला असावा.

वाकाटक कालीन औरंगाबाद येथील लेणी क्र. ७ मध्ये गर्भगृहाच्या पश्चिम भिंतीमध्ये नृत्य सभेचे शिल्प असून या शिल्पात नर्तिकेभोवती सहा स्त्रिया वेगवेगळी वाद्य वाजवित आहेत. एक स्त्री आडवा मृदंग वाजवत आहे. दोन स्त्रिया टाळ वाजवित आहेत. एक डमरु वाजवत आहे. एक स्त्री दोन उभे मृदंग ठेवून वाजवित आहे. एक स्त्री आडवी बासरी धरुन वाजवीत आहे.

अजिंठा लेणी क्र. १ मध्ये नृत्य सभेचे चित्र रेखाटले आहे. या चित्रात मध्यभागी एक नर्तकी नृत्य करत आहे. तिच्या भोवती सहा स्त्रियांचा वाद्यवृंद आहे. नर्तकीच्या उजव्या बाजूला एक स्त्री दोन उभे मृदंग वाजवत आहे. तिच्या खालच्या बाजूला असलेली स्त्री त्रिवली हे अवनद्ध वाद्ये वाजवत आहे. या चित्रात उभ्या मृदंगाचे तोंडावरील कातडे घट्ट गोल बांधलेले व दोऱ्यांनी ताणलेले दिसून येते. वाजवणाऱ्या स्त्रीच्या हातात दोन छोटया काडया आहेत. नर्तकीच्या डाव्या बाजूला दोन स्त्रिया लांबी रुंदीच्या दृष्टीने लहान अशी वेणू वाजवीत आहेत.औरंगाबाद लेणी क्र. ७मधील नृत्य सभा शिल्पात दोन अवनद्ध वाद्यासोबत दोन डाळ (छोटया चिपळया) वाजविणाऱ्या स्त्री वादक आहेत. यावरुन तत्कालीन नृत्यरंग शाळेत मृदंगासोबत दुसरे छोटे अवनध्द
वाद्यांचा उपयोग आवश्यकतेनुसार केला जात असावा असे वाटते.

५.६नृत्य कला :

नृत् या धातूवरुन नृत्त, नृत्य, नर्तन असे शब्द बनले आहेत. महाराष्ट्र शब्दकोशात नर्तन (नृत्य) म्हणजे मनोरंजनार्थ अनेक अवयवांचे नियमबध्द व सताल चलनवलन करुन दाखविण्याची क्रिया ; नृत्, नाच, नृतकाने गाणे म्हणून त्यातील रस व भाग अंगविक्षेपाने व अभिनयाने प्रकट करण्याची क्रिया होय असे म्हटले आहे.[१२७] उत्तम नर्तन करण्याच्या कलेला नृत्यकला म्हणतात. महाराष्ट्र शब्दकोशात नाचणारा, नाचकाम करणारा, नाच्या आदीला नर्तक म्हटले आहे. नृत्य करणाऱ्या स्त्रीला नर्तकी म्हणतात. तिला नृत्यांगना, नटी, कलावंतीन असेही म्हणतात. नृत्यकला हे एक प्रकारचे रसायन आहे की, ज्यात रस, भाव आणि अभिनय यांचा समावेश असतो. रस आणि भाव यांची अभिव्यक्ती अभिनयाची जोड देऊन नृत्याद्वारे नर्तक करतो. कथानकाचा आशय, रस,

भाव अभिनयाचा सुरेख संगम साधून शब्दाचा वापर न करता ही तो प्रेक्षकांच्या अंत:करणापर्यंत पोहचवू शकतो.

भारताला नृत्यकलेचा वारसा प्राचीन काळापासून लाभला आहे. महाराष्ट्रातील मराठवाडयात प्राचीन चित्र शिल्प पाहवयाला मिळतात. वाकाटक कालखंडात मराठवाडयात अजिंठा लेण्यामधील सतराव्या क्रमाकांच्या लेण्यामध्ये ओसरीच्या डावीकडील भिंतीवर एका भव्य चक्राचे चित्र असून त्यात ग्रामीण व नागरी जीवन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. उदा : शेतकऱ्यांची घरे, जनावरे, तसेच नगरातील नाचरंग, प्रेमी युगलांचे विविध विलास, एकांतात आरण्यात चिंतन करणारे ऋषीगण चित्रित केले आहेत.

अजिंठा लेणी क्र. १ मध्ये जे नृत्य सभेचे चित्र आहे त्याचा विषय बुध्द जातक कथेतील महाजातक कथेतील आहे. शिवाली राणीच्या महालातील नृत्यसभा चित्राच्या माध्यमातून दर्शविली आहे. मध्यभागी सुंदर रंगीत व पूर्ण बाहयांचा पायघोळ गाऊनसारखा वेष परिधान करुन नर्तिका नृत्य करत आहे. त्रिभांगवस्थेतील सुंदर - हस्तमुद्रा व थोडीशी तिरकी मान केली आहे. तिच्या डोक्यावर आभूषण आहे. हे चित्र नृत्यातील गतिमानता दाखवीत आहे. लेणी क्र. १ मध्येच महाजन जातक कथेचे चित्रण आहे. पहिल्या विभागात राजदरबारात खिन्न मुद्रेत बसलेला आहे. त्याची राणी त्याची समजूत घालत आहे. समोरच नर्तिका नृत्य सादर करीत आहे.

अजिंठा लेणी क्र. २ मध्ये शांतिवादिन जातकचे चित्रण आहे. या चित्रामध्येही राणी व नाचणाऱ्या नर्तकीचे चित्र आहे.येथील नृत्य करणाऱ्या नर्तकीचे रेखाटन अतिशय सुंदर आहे. नर्तकी राजाची क्षमा मागत असून ती जीवदान देण्याची भीक मागत आहे.

वाकाटककालीन औरंगाबाद येथील लेणी क्रमांक ७ मध्ये शिल्पाच्या माध्यमातून नृत्यसभेचे दर्शन होते. औरंगाबाद लेणी क्र. ७ मधील गर्भगृहाच्या पश्चिम भिंतीला नृत्यसभेचे शिल्प आहे. या नृत्यसभेतील शिल्पामध्ये अत्यंत सौष्टवपूर्ण आणि घाटदार शरीराची एक नर्तिका मध्यभागी नृत्य करीत असून तिच्या बाजूला सहा स्त्रियांचा वाद्यसमूह वेगवेगळी वाद्य वाजवीत आहेत. येथील नर्तिकेचा सुंदर पदन्यास, वैशष्यपूर्ण हस्तमुद्रा व कमरेतील लवचिकता यामुळे ही नर्तिका उठावदार दिसते. या नृत्यसमुहात मध्यभागापासून उजवीकडे तीन स्त्रीया व डावीकडे

तीनपेक्षा जास्त स्त्रिया आहेत. नृत्यसमुहातील नायिकेचा साजशृंगार पारंपारिक पध्दतीचा आहे. नृत्यसमूहाच्या उजव्या बाजूस प्रक्षेकांचा समूह बसला आहे.या नृत्य समूहातील प्रमुख नायिका म्हणजे नर्तिका ही औरंगाबादची राजतडाग आहे.[१२८] वाकाटक काळात नृत्यकलेला स्थान होते या वरुन सिध्द होते.

वरील प्रकरणामध्ये वाकाटक कालीन कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे. वाकाटक काळात मराठवाडयात कला व स्थापत्या क्षेत्रात भरीव स्वरुपाची प्रगती झाली. औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, उस्मानाबाद व शिऊर, खारोसा येथे बौध्द व हिंदू लेणी स्थापत्याची निर्मिती झाली .या कालखंडात मूर्ती शिल्प व चित्रकलेचा ही विकास झाला. शिऊर लेणीत मुर्ती शिल्प असून अजिंठा लेणीतील चित्रकाम जगप्रसिध्द आहे.

संदर्भ सूची

१. एन. डब्ल्यू. डी.ई.एस., १९८१ पृ. ५७.

२. सर मोनियर विल्यमस, एस.ई.डी.., १८९९. पृ. २६१.

३. दाते य.रा. (संपा) म.श. विभाग दुसरा. १९८८. पृ.६२३.

४. शर्मा, श्रीराम (संपा) यजु, १९६२, अध्याय, ३० श्लोक ६ ते २२

५. रोडे सोमनाथ व सुतार अमर, १९८६. पृ.८.

६. Sharan R., Ancient Indian History Culture and Archae ology, 2002, p. 428.

७. रोडे सोमनाथ व सुतार अमर, पूर्वोक्त. पृ.९.

८. Gokhale B.G. Buddhism in Maharashtra. p. 3,4

९. कठारे अनिल, मराठवाडयातील लेणी, २००१. पृ. १०.

१०. भावे वा.कृ. मुसलमान पूर्व महाराष्ट्र, खंड २. १९४७.पृ.३.

११. जोशी महादेवशास्त्री, (संपा) भा.सं. को. खंड दहावा, १९७९. पृ.१८७.

१२. पाटील माया, पुरातत्व: एक पर्यालोचन, २०११. पृ ३२

१३. कठारे अनिल, भारतीय कला व स्थापत्य, २०००. पृ. २८

१४. कित्ता. पृ. २९.

१५. औरंगाबाद डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर,१८८४. पृ. २५२.

१६. कठारे अनिल, भारतीय कला व स्थापत्य, खंड दुसरा २००६. पृ. १६

१७. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काल, १९५६, पृ. १६८.

१८. कित्ता. पृ. १६७.

१९. जोशी सु.ह. महाराष्ट्रातील लेणी, जाने २०११, पृ. ४१.

२०. दि घटोत्कच केव्ह इन्स्क्रप्शनस् (हैद्रबाद आर्किऑजिलिक सीरीज) प्लेट ४ व ५

२१. Pathy T.V. & Prasad V.R.N., Ajanta, Ellura and Aurangabad Caves - 1972, p. 113-115.

२२. जोशी सु.ह. पूर्वोक्त. पृ. १८.

२३. कित्ता.

२४. Buhalar, op.cit., 1883, p. 124.

२५. जोशी सु.ह. पूर्वोक्त. पृ. २१.

३१. काटे पी.व्ही. पूर्वोक्त, पृ. २१२.

३२. कठोर अनिल., पूर्वोक्त, पृ. २४

३३. A.S.W.I., Vol. -III, Plate III, Plate No.1,2

३४. रोडे सोमनाथ व सुतार अमर, पूर्वोक्त. पृ.२२.

३५. मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली सर. क्रमांक ६. १९७२. पृ. २०६

३६. Deo P.R. and Shelke G.C., Brahmanical Caves of Siur, Vol.XI. 1972, p. 71.

३७. Ibid.

३८. साखरे विजया, नांदेड जिल्ह्यातील पुरातत्व-एक अभ्यास, जुलै २००८, पृ.१०५-१०७.

३९. मिराशी वा.वि., पूर्वोक्त. पृ. १३.

४०. कित्ता.

४१. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977.

४२. Dhavlikar Madhukar, Ajanta : A Cultural Study, 1973, p. 112.

४३. Kandhar through Epigraphy and Archaeology - Journal of Epigraphical Society of India, Vol. VII, 1980, p. 23.

४४. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ.१९५.

४५. जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.३६१,३६६.

४६. कित्ता, पृ.३६३.

४७. Indian Archaeology - A review, Delhi, 1937-38, p. 96.

४८. Annaul Report of the Archaeological Department of H.E.H, Nizams Dominion, 1914-15, Hyderabad, p. 86.

४९. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६२.

५०. पाठक अ.शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, २००२, पृ.२९८.

५१. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, १९९३, पृ.१९१.

५२. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.३६४.

५३. Indian Archaeology - A review, Delhi, 1937-38, p. 96.

५४. Ibid. p-98

५५. Ibid. p-105

५६. Ibid. p-96,99

५७. Ibid. .

५८. पाणिनि., ५,६,९६.

५९. ऋग्वेद, १०.१३०.३.

६०. कित्ता, ७,९,१९,

६१. पतंजलि, महाभाष्य, १९३५, पृ.४५.

६२. Marshall Jonh, Mohenjodaro and Indus Civilisation, Vol. I, 1931, p. 44.

६३. Ibid. .

६४. Banerjea J.N., The Development of Hindu Iconography, 1956, p. 159.

६५. Marshall John. Op. Cit.

६६. Banerjea J.N., Op. Cit. p. 176.

६७. Marshall John, Op. Cit., Plate - XII, Figs. 13,14,19.

६८. Mackey E., Further Excavations at Mohenjodarao, 1938, p. 258-259.

६९. Ibid.

७०. खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग पहिला, १९५१, पृ.१७६.

७१. ऋग्वेद ९.२२.१६,१.१५४.१-६.

७२. Gopinathrao T.A., Elements of Hindu Iconography, vol. I, 1968, p. 78-80.

७३. जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, १९७९, पृ.५०-५१.

७४. कित्ता, पृ. ५३-५५.

७५. विष्णुधर्मोत्तर पुराण, ८१.२.८.

७६. श्रीवास्तव बलराम (संपा.), १९६४, ३.९.२०, पृ.१३५.

७७. कित्ता.

७८. Deshmukh B.S., Murthishilpvaibhav, 1986, p. 54.

७९. रुपमंडन, पृ.१५८.

८०. Deo Prabhakar and Shelke G.C., Brahmanical caves of Siur, 1972, p. 72.

८१ . Gopinathrao T.A., Op. Cit., Vol. II., pp. 119-120.

८२. Banerjea J.N., Op.Cit., 1956, p. 415.

८३. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.६७.

८४. विष्णुधर्मोत्तर पुराण, पुस्तक - ७९, २.७.

८५. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, 1987, pp. 59-60.

८६. ऋग्वेद, ८,८४,३-४.

८७. श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, १९९०, पृ. ५१.

८८. Agrawala Urmila, Khajuraho Sculptures and Their Signifi cance, 1964, p. 186.

८९. विष्णुधर्मोत्तर पुराण, ८०.२.९.

९०. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.१०६.

९१. मेश्राम प्रदिप व इतर, भद्रावती- पुरातत्वीय वैभव २००४.पृ. ४५.

९२. कित्ता.

९३. Deshmukh B.S., Murtishilpvaibhav, Explorations in local History and Literature, 1986,P. 59.

९४. लिंगपुराण , पुस्तक -१७,१५-२२, मनुसुख्वराय मोर, कलकत्ता , १९६०, पृ. ४०-४४

९५. जोशी नि.पु., पूर्वोक्त, पृ.१०६.

९६. कित्ता.

९७. देवीभागवत पुराण, ५, २, १७-४८, पृ. ३३६-३३८.

९८. वामनपुराण (संपा. जोशी प्र.न.) शके १९०५, पृ. ५६.

९९. विष्णूधर्मोत्तर पुराण, ११७-२०,२२.

१००. भागवतपुराण, २, ७, १४.

१०१. Spooner D.B., Excavatopms at Basarh, Archaeological Survey of India Annual Report, 1913-14, p. 133. Plate -XL, VI, No. 191.

१०२. Hastings Majes, Encyclopaedia of Religion and Ethics, VOl. II, 1953, p. 739.

१०३. दळवे अरुण, पूर्वोक्त, पृ. २७०.

१०४. तुळपुळे, शं.गो. (संपा) १९८४. पृ. ३६.

१०५. डिकसळकर., द.बा., म.प्रा.इ.स. १९६४. पृ.७६.

१०६. राजवाडे वि.का. भा.वि.सं. इ.२००६.पृ. १००.

१०७. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 20.

१०८. Ibid .P.21.

१०९. पाटील माया, पूर्वोक्त पृ. ३५

११०. जोशी सु.ह. पूर्वोक्त पृ. २३

१११. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 30

११२. Ibid .P.31

११३. Ibid .P.32..

११४. मिराशी वा.वि., पूर्वोक्त पृ. १४४

११५. कित्ता पृ. १४७.

११६. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 53.

११७. पाटील माया, पूर्वोक्त पृ. २१

११८. Debala Mitra , A. S. of India, Tweth edication, 2003 P. 57

११९. Ibid .P.58

१२०. Ibid .P.59..

१२१. मिराशी वा.वि., पूर्वोक्त पृ. १५९

१२२. कित्ता पृ. १६२.

१२३. कित्ता पृ. १६३.

१२४. दाते य.रा. (संपा) म.श. विभाग सहावा, १९८८ पृ. २७९३

१२५. लुनिया बी.एन., प्रा. भा.सं. २००९. पृ. ६१.

१२६. रातंजनकर श्री. ना. संगीत परिभाषा १९७३. पृ. १२५.

१२७. दाते य.रा. पूर्वोक्त पृ. १७९६.

१२८. कठारे अनिल., पूर्वोक्त, पृ. २२.

प्रकरण सहावे

उपसंहार

दक्षिण भारतात जी अनेक महत्वाची राजघराणी होऊन गेली ; त्या राजघराण्यांमध्ये वाकाटक राजघराणे उल्लेखनीय ठरते. वाकाटक राजघराण्याने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत म्हणजेच तीनशे वर्ष दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटक राजघराण्याची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. वाकाटक राजघराण्याच्या नंदिवर्धन आणि वत्सगुल्म या दोन शाखा होत्या. नंदिवर्धन ही वाकाटकांची जेष्ठ शाखा असून प्रथम प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र आणि गौतमीपुत्राचा पुत्र प्रथम रुद्रसेन याने या शाखेची स्थापना केली. तसेच प्रथम प्रवरसेन याचा दुसरा पुत्र सर्वसेन याने वत्सगुल्म शाखेची स्थापना केली. वत्सगुल्म म्हणजेच आजचे विदर्भातील वाशिम होय. वाशिम हे आज जिल्ह्याचे ठिकाण आहे. वाकाटक राजघराण्याने विदर्भातून दक्षिण भारताच्या बऱ्याच भुभागावर राज्य केले. दक्षिण भारतातच मराठवाडा हा प्रदेश समाविष्ट होता. वाकाटकांनी संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. या काळात मराठवाड्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्य, कला व स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. प्रस्तुत शोध प्रबंधात वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि पुरातत्वीय अवशेष, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती आणि कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे.

मराठवाड्यावर प्रथम सातवाहन घराण्याने राज्य केले. सातवाहन घराण्याच्या कारकिर्दीपासूनच मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. या घराण्याने एकूण ४६० वर्षे राज्य केले. यानंतर मराठवाड्यावर वाकाटक घराण्याने राज्य केले. वाकाटक काळात सांस्कृतिक, कला आणि स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विशेष उल्लेखनीय प्रगती झाली. या सर्व घटकावर प्रकाश टाकणे महत्वाचे ठरते. वाकाटकांची राजवट ही मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. त्यामुळे वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास करणे अत्यंत महत्वाचे ठरते. त्यामुळे संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली. या संशोधनातुन मी पुढील निष्कर्ष काढला आहे.

मराठवाडा हा एक प्रादेशिक विभाग असून या विभागाची राजधानी ओरंगाबाद आहे. या विभागात आज आठ जिल्हे असून या आठ जिल्ह्यात ७८ तालुके आहेत. मराठवाडा या विभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ २५००० चौरस मैल आहे. या प्रदेशाच्या सीमा आंध्र प्रदेश, कर्नाटक प्रदेश, नासिक, अहमदनगर, सोलापूर, जळगाव, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्याशी जोडलेल्या आहेत. मराठवाडा प्रदेशातील जमीन काळी, मुरमाड व खडकाळ आहे. या प्रदेशातील भूभाग भूकंप प्रवण आहे. या भागाला आजपर्यंत अनेकवेळा भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. ३० सप्टेंबर १९९३ मध्ये बसलेला भुकंपाचा धक्का फार मोठ्या स्वरुपाचा होता. भूकंपाच्या या धक्क्यामुळे मराठवाडा जगाला परिचित झाला. मराठवाड्यात अनेक पर्वत रांगा आणि डोंगर आहेत. यामध्ये सह्याद्री पर्वताच्या रांगा, बालाघाट पर्वताच्या रांगा, सातमाळ आणि अजिंठ्याच्या डोंगररांगा उल्लेखनीय ठरतात. सह्याद्री पर्वतरांगामुळे मराठवाड्याच्या प्राचीन संस्कृतीत भर टाकता आली. कारण याच पर्वतरांगेत अजिंठा, वेरुळ आणि औरंगाबाद येथील लेणी स्थापत्य साकारले आहे. या लेण्यातील मूर्तिशिल्प सुध्दा उल्लेखनीय आहे. या लेण्या जगप्रसिध्द आहेत.

मराठवाड्यात अनेक नद्या असून त्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात. गोदावरी, मांजरा, पुर्णा, तेरणा, मन्याड या मराठवाड्यातील प्रमुख नद्या आहेत. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यातून वाहणाऱ्या अनेक नद्या आहेत. या सर्व नद्यातील पाण्यामुळे मराठवाडा सुजलाम सुफलाम बनला आहे. गोदावरी ही या भागातील प्रमुख नदी आहे. या नदीला गौतमी गंगा, गंगा आणि दक्षिण गंगा म्हणतात. मराठवाड्याच्या सांस्कृतिक व आर्थिक विकासात या नदीचा सहभाग महत्वाचा आहे. या नदीच्या खोऱ्यात अश्मयुगीन मानवी संस्कृती उदयास आली. याच नदीच्या काठावर अनेक नगरे वसली व विकसित झाली. पैठण, गंगाखेड नांदेड ही नगरे प्राचीन असून ती गोदावरी नदीच्या काठावर वसली आहेत. पैठण हे सातवाहनाच्या राजधानीचे ठिकाण होते, तर नांदेड हे नंदवंशाच्या दक्षिण भारतातील राजधानीचे ठिकाण होते. उस्मानाबाद हे नगर भोगावती नदीच्या काठावर, तेर हे तेरणा नदीच्या काठावर आणि कंधार हे मन्याड नदीच्या काठावर वसले आहे. मराठवाड्यातील हवामान किंचित उष्ण आणि कोरडे आहे या भागात पाऊसही कमी पडतो. कधी कधी अतिवृष्टीही होते. मराठवाड्यात भरपूर नैसर्गिक संपत्ती आहे. यामध्ये विविध प्रकारची वृक्ष व प्राण्यांचा

समावेश होतो. प्राण्यांमध्ये वाघ, सिंह, हरिण, वानर, माकड, कोल्हा, मुंगुस, मोर, लांडोर, अस्वल व ससा या पशु पक्षांचा समावेश होतो. मराठवाड्यातील वनात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आढळतात.

मराठवाड्याला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा मोठा वारसा मिळालेला आहे. मराठवाडा या विभागाने महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या सांस्कृतिक इतिहासात महत्वाची भर टाकली आहे. कला, वास्तुकला, मंदिर स्थापत्य तसेच मुर्तिकलेच्या आणि चित्रकलेच्या क्षेत्रात मराठवाड्याने प्राचीन काळात फार मोठी प्रगती केली आहे. अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, उस्मानाबाद व शिऊर ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. मराठवाडा या नावालाही एक वेगळा इतिहास आहे. इ.स. १७२४ पासून इ.स. १९४८ पर्यंत मराठवाड्यावर हैदराबादच्या निजामाची सत्ता होती. या हैदराबाद राज्यात मराठवाडा प्रदेश सामील होता. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या प्रदेशाला मराठवाडा असे नाव मिळाले. इ.स. १८७० मध्ये मराठवाडा हे नाव रुढ झाले. विंध्यपर्वत व त्याच्या दक्षिणेकडील समांतर वाहणाऱ्या नर्मदा नदीमुळे भारतवर्षाचे दोन भागात विभाजन झाले. यापैकी उत्तरेकडील भागास उत्तरापथ आणि दक्षिणेकडील भागास दक्षिणापथ म्हटले जाते. दक्षिणापथालाच दंडकारण्य, दख्ख्न पठार आणि दक्षिणदेशा म्हणत. प्राचीन काळात मराठवाडा हा दक्षिणापथाचा एक भाग होता. दक्षिणापथामध्येच अश्मक, मुलक, कुंतल, कलिंग आंध्र व महाराष्ट्र इत्यादी जनपदांचा विकास झाला. यापैकी अश्मक, मुलक, महाराष्ट्र , कुंतल व पितनिक ही जनपदे व राज्ये मराठवाड्यात विकसित झाली. अश्मक जनपदाची राजधानी बोधन, मुलक जनपदाची राजधानी पैठण, भोगवर्धन राज्याची राजधानी भोकरदन, पितनिक राज्याची राजधानी पैठण व महाराष्ट्र राज्याची राजधानी पैठण होती.

मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाची सुरुवात सातवाहन काळापासून होते. सातवाहन काळापासूनच मराठवाड्याचा राजकीय इतिहास ज्ञात होतो. या राजघराण्याने जवळपास चारशे वर्षे राज्य केले. या राज्याची राजधानी मराठवाड्यातील पैठण होती. या काळात बौध्द धर्माचा विकास झाला. पितळखोरा आणि अजिंठा येथील काही लेण्यांचे खोदकाम सातवाहन काळात करण्यात आले. तेर, भोकरदन, पैठण, कंधार, अंबाजोगाई आणि देवपोली ही सातवाहन काळातील

वैभवशाली नगरे आणि प्रसिध्द बाजारपेठा होत्या. सातवाहन राजवंशानंतर मराठवाड्यावर वाकाटक राजघराण्याने राज्य केले. सातवाहनाप्रमाणेच वाकाटक घराण्यानेही तीनशे वर्ष मराठवाड्यावर राज्य केले. या काळातही साहित्य, कला आणि स्थापत्य क्षेत्रात अभुतपूर्व प्रगती झाली. वाकाटक घराण्यानंतर मराठवाडयावर बदामीच्या चालुक्य घराण्याने राज्य केले. या काळातील मंदिर स्थापत्य आणि लेणी स्थापत्याचे अवशेष आढळतात. वेरुळ येथील काही लेण्यांचे खोदकाम याच काळात झ ाले. बदामीच्या चालुक्यानंतर मराठवाड्यावर राष्ट्रकुटांनी राज्य केले. वेरुळ आणि कंधार ह्या त्यांच्या राजधान्या होत्या. राष्ट्रकुटकालीन मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाचे अवशेष लातूर आणि कंधार येथेच आढळतात. वेरुळ येथील काही लेण्यांचे खोदकाम राष्ट्रकूट काळात झाले. येथील लेणी क्रमांक १६ ही कैलास लेणी या नावाने प्रसिध्द असून ते शिवमंदिर आहे. हे कैलास लेणे आधी कळस मग पाया या पध्दतीने कोरले असून ते जगप्रसिध्द आहे. राष्ट्रकुटानंतर मराठवाड्यावर कल्याणीच्या चालुक्य घराण्याने राज्य केले. या घराण्याने नांदेड, उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, हिंगोली जिल्ह्यावर राज्य केले. परंतु या काळातील मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाचे अवशेष नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक आढळतात. कल्याणीचे चालुक्य घराणे हे देवगिरीच्या यादव राजघराण्यास समकालीन होते. देवगिरीच्या यादवांनीही संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. यादवांचा पंतप्रधान हेमाद्री यांनी मंदिर स्थापत्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली. त्यांनी विशिष्ट मंदिर बांधकाम शैली विकसित केली. त्यामुळे त्यांनी बांधलेली सर्व मंदिरे त्यांच्याच नावावरुन हेमांडपंती मंदिरे म्हणून ओळखली जाऊ लागली. याचकाळात मूर्तिशिल्पाच्या क्षेत्रातही भरीव स्वरुपाची प्रगती झाली. मंदिराच्या बाह्यभागावर शैव आणि वैष्णव पंथाची मूर्तिशिल्प तयार करण्यात आली. यादवांच्या अस्तानंतर मराठवाड्यावर मुस्लिम सत्ता स्थापन झ ाली. ही सत्ता इ.स. १९४८ पर्यंत होती. याकाळात मात्र मराठवाड्याची कला वास्तुकला, स्थापत्य, मूर्तिशिल्प व साहित्य क्षेत्रात फारशी प्रगती झाली नाही.

दक्षिण भारतात जी अनेक राजघराणी प्राचीन काळात होऊन गेली. त्यापैकीच एक वाकाटक राजघराणे होय. या राजघराण्याने विदर्भातून दक्षिण भारतावर तीनशे वर्ष राज्य केले. वाकाटक राजघराण्याचा दोन शाखा अस्तित्वात होत्या. नागपूर जिल्ह्यातील नंदिवर्धन ही वाकाटक

राजघराण्याची जेष्ठ शाखा होती, तर वत्सगुल्म येथील वाकाटकांची शाखा ही कनिष्ठ शाखा होती. सातवाहन राजघराण्याने पैठण येथून दक्षिण भारतावर प्रदिर्घ काळ राज्य केले. सातवाहन घराण्यानंतर वाकाटक घराण्यानेच दक्षिण भारतावर प्रदिर्घ काळ राज्य केले. सातवाहन राजघराण्याच्या काळात ज्या प्रमाणे मराठवाड्याचा साहित्य, कला, स्थापत्य, वास्तुकला, मूर्तिशिल्प सामाजिक व धार्मिक क्षेत्रात विकास झाला. त्याप्रमाणेच वाकाटक काळातही मराठवाड्याचा साहित्य, कला स्थापत्य, वास्तुकला, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अभुतपूर्व विकास झाला. त्यामुळे वाकाटकांची राजवट मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. वाकाटक मुळचे दक्षिण भारतातीलच होते. ते ब्राह्मण होते. प्रथम विंध्यशक्तीचा उल्लेख अजिंठा लेणी क्रमांक १६ मधील कोरीव लेखात द्विज असा केला आहे. द्विज म्हणजे ब्राह्मण जातीय होय. याच लेखात वाकाटकांचे गोत्र विष्णुवृध्द असल्याचाही उल्लेख या कोरीव लेखात केला आहे. वाकाटक हा वाकाटक राजवंशाचा आद्य नृपती आहे. यानंतर प्रथम विंध्यशक्ती याचा क्रमांक लागतो. परंतु प्रथम विंध्यशक्ती यांनीच वाकाटक राज्याचा विस्तार केला व स्वतंत्र राज्य उपभोगले. त्यामुळे त्यांनाच वाकाटक राजघराण्याचे संस्थापक समजले जाते.

वाकाटक राजघराण्यात अनेक कर्तबगार राजे होऊन गेले. प्रथम विंध्यशक्तीनंतर प्रथम प्रवरसेन राज्यावर आला. आपल्या राज्याची राजधानी पुरिका केली. त्याने सप्तसोम व अश्वमेघ यज्ञ केले. या नंतर पृथ्वीसेन, सर्वसेन, विंध्यसेन दुसरा, प्रवरसेन दुसरा व देवसेन इत्यादी राजे होऊन गेले. द्वितीय रुद्रसेन आणि द्वितीय पृथ्वीसेन हे दोन वाकाटक राजे सोडले तर बाकी सर्व वाकाटक राजे शिवाचे उपासक होते. द्वितीय रुद्रसेन आणि द्वितीय पृथ्वीसेन हे दोनच राजे विष्णुचे उपासक होते. ते परम भागवत असल्याचा उल्लेख आढळतो. वाकाटक राजे शिवाचे उपासक असल्यामुळे याकाळात शैव संप्रदायचा चांगलाच विकास झाला. याचबरोबर वैष्णव आणि बौध्द धर्मही विकासाच्या दृष्टीने मागे राहीला नाही. वाकाटकांचे राजकीय सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात फार महत्वाचे योगदान आहे. वाकाटकांचे साम्राज्य फार मोठे होते. प्रशासनाच्या सोयीसाठी साम्राज्याचे विषय आणि विषयाचे विभाजन अनेक उपविभागात केले गेले होते या उपविभागालाच भुक्ती म्हणजेच भोग म्हणत असत. वाकाटक राजे धर्ममहाराज म्हणवून

घेत असत. वाकाटक काळात मंत्रिपरिषद अस्तित्वात नव्हती. वाकाटक राज्यात अनेक मांडलिक होते. त्यांना अंतर्गत स्वायतत्ता होती. वार्षिक कर देणे आणि आदेश येईल तेव्हा वाकाटक राजांना मदत करण्याचे बंधन वाकाटकांच्या मांडलिकावर होते. वाकाटक राजांनी संस्कृत भाषेला राजाश्रय दिला. त्यामुळे या काळात संस्कृत साहित्याचा विकास झाला. त्यांनी कवी कालिदास सारख्या विद्वान पंडितास आश्रय दिला. कवी कालिदासचे संस्कृत भाषेत रचलेले साहित्य प्रसिध्द आहे. काही वाकाटक राजेही साहित्यिक होते, हेही विशेष उल्लेखनीय ठरते. वाकाटक राजांनी मंदिर स्थापत्य, लेणी स्थापत्य आणि मूर्तिशिल्पाच्या क्षेत्रातही प्रगती केली.

वाकाटक घराण्याने प्रदिर्घ काळ विदर्भातून मराठवाड्यावर राज्य केले. या काळात मराठवाड्याची बहुतेक सर्व क्षेत्रात प्रगती झाली. परंतु या काळातील पुरातत्वीय अवशेष मराठवाड्याच्या सर्व भागात आढळत नाहीत. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील शिऊर, कंधार आणि कंधार तालुक्यातील बाळांतवाडी व बहाद्दरपुरा, भोकर, नांदेड, उस्मानाबाद, औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबाद, पैठण, अजिंठा, वेरुळ व लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील खरोसा अशा निवडक ठिकाणीच वाकाटक काळातील पुरातत्वीय अवशेष आढळतात. या पुरातत्वीय अवशेषात मंदिर स्थापत्य, रचनात्मक विहार स्थापत्य, लेणी स्थापत्य, बौध्द स्तूप स्थापत्य, बौध्द व हिंदू मूर्तिशिल्प इत्यादीचा समावेश होतो. हे अवशेष म्हणजे वाकाटक काळातील मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासाची साधने आहेत.

नांदेड जिल्ह्यातील खुद्द नांदेड हे नगर वाकाटक काळात विषय विभागाचे मुख्य केंद्र होते. त्यामुळे या काळात नांदेड नगराचा सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात विकास झाला असणार हे निश्चित आहे. नांदेड येथे होळी भागात नृसिंह गल्लीत वाकाटक काळातील नृसिंह मंदिराचे अवशेष पाहावयास मिळतात. याच मंदिरातील केवल नृसिंहाची पाषणात घडविलेली मूर्ति याच भागातील एका मंदिरात पाहावयास मिळते. येथे प्राप्त झालेले मंदिर स्थापत्याचे अवशेष आणि नृसिंहाची मूर्ति हे या भागातील वैष्णव पंथाच्या अस्तित्वाची साक्ष देते. नांदेड जिल्ह्यातील कंधार हे नगर वाकाटक काळातील धार्मिक केंद्र होते. या काळात बौध्द धर्मास राजाश्रय दिला गेला. परंतु वाकाटक राजापेक्षा वाकाटकांच्या मांडलिकांनीच बौध्द धर्माचा प्रसार आणि विकासासाठी प्रयत्न

केले. कंधार आणि कंधार परिसरात वाकाटक कालीन बौध्द विहार व बौध्द स्तूप स्थापत्य निर्माण केले गेले. बौध्द स्तूपाचे तीन प्रकार पडतात. त्यापैकी उद्देशिक स्तूप हा एक प्रकार आहे. कंधार आणि परिसरात बांधण्यात आलेले स्तूप उद्देशिक स्तूप होते. बौध्द विहार आणि स्तूपाच्या प्राप्त झालेल्या अवशेषांवरुन स्पष्ट होते की, वाकाटक काळात कंधार आणि परिसर बौध्द धर्माचे प्रसिध्द केंद्र होते. याच पध्दतीने उस्मानाबाद, पैठण, अजिंठा, वेरुळ, नांदेड, भोकर आणि परिसरात बौध्द धर्माचा अधिक प्रभाव निर्माण झालेला होता.

वाकाटक काळातील समाजाचा प्रमुख आधार वर्णव्यवस्था हाच होता. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा वर्णानुक्रम होता. समाजातील वर्णव्यवस्था मात्र लवचिक दिसते. समाजात ब्राह्मण वर्णातील लोकांना उच्च व मानाचे स्थान होते. धार्मिक विधी करण्याचे मुख्य काम त्यांच्याकडेच होते. प्रशासकीय क्षेत्रातही त्यांची नियुक्ती उच्च पदावर करण्यात आलेली दिसते. वराहदेव व आणि देव हे ब्राह्मण वाकाटकांचे मंत्री होते. ब्राह्मणानंतर क्षत्रियांचे स्थान होते. या काळात वर्णव्यवस्था ताठर नव्हती, तर ती लवचिक होती. विवाह साधारणपणे आपापल्या जातीतच होत होते. परंतु या काळात आंतरजातीय विवाह सुध्दा होत असत. वाकाटक राजवंश ब्राह्मण होता. तर गुप्त राजवंश क्षत्रिय होता. वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन व चंद्रगुप्ताची कन्या प्रभावती गुप्ता यांचा विवाह झाला होता. या काळात संयुक्त कुटूंब पध्दती प्रचलित होती. पुरुष हाच कुटूंबाचा गृहपती अर्थात प्रमुख होता. कुटूंब आणि समाजात स्त्रीयांना मानाचे स्थान होते. वाकाटक राजघराण्यातील स्त्रीया प्रशासनात सहभाग घेत असत. पतीच्या निधनानंतर मुले अल्पवयीन असल्यामुळे प्रभावती गुप्ता यांनी प्रशासन चालविले होते. या काळात लोकांचा आहार शाकाहारी व मांसाहारी होता. या काळातील लोकांची घरे सामान्य स्वरुपाची होती. श्रीमंत लोकांची घरे दगड, माती, चिखल व विटांची होती. तर सामान्य लोकांची म्हणजेच गरिबांची घरे गवताची घरे असत. श्रीमंत लोकांची घरे उंच लाकडी खांबावर उभारली जात असत. हे खांब तीन ठिकाणी म्हणजे खाली, मध्यभागी व शिरोभागी, कोरीव कामाच्या किंवा रंगाच्या पट्टयांनी सुशोभित केलेले असत. स्त्री आणि पुरुष विभिन्न प्रकारचा पोषाख वापरत असत. तसेच ते विभिन्न प्रकारची केसरचना करीत असत. अजिंठा येथील चित्रावरुन तत्कालीन लोकांच्या वंशाच्या, मानवी शरिराची,

अलंकार, पोषाख व केसरचनेची माहिती मिळते. स्त्री - पुरुष अधोवस्त्र वापरत असत. पुरुष साधारणपणे उत्तरीय वापरत असत. त्यांचे दुसरे कमरेखाली असे. उत्तरीय हे खांद्यावरुन अंगावर घेण्याचे वस्त्र असे. स्त्रिया आपल्या स्तनावर वस्त्राची पट्टी वापरत असत. अजिंठा लेणीतील चित्रात स्त्रीयांना चोळी किंवा अर्धबाह्यांचे जाकीट घातल्याचे दाखविले आहे. चित्रात खणाची हिरवी चोळी घातलेली स्त्री दाखविली आहे. मुलांचा पोषाखही अंतरीय व उत्तरीय असा दोन प्रकारचा असे. स्त्री - पुरुषांच्या पायात चप्पल घातली जात असे. चप्पलचा पट्टा त्यांच्या घोट्याजवळ पायाभोवती बांधला जात असे. अजिंठा चित्रांमध्ये तत्कालीन शस्त्रास्त्राचीही चित्रे आढळतात. धनुष्य, बाण, भाले, बरच्या, खंजीर व तरवार ही तत्कालीन शस्त्रास्त्रे आहेत.

वाकाटक राजे हिंदू धर्माचे पुरस्कर्ते होते. हिंदू धर्मात शैव व वैष्णव संप्रदाय प्रचलित होते. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय पृथ्वीसेन हे दोन वाकाटक राजे विष्णुचे उपासक होते, तर बाकीचे सर्व राजे शिवाचे उपासक होते. वाकाटक राजांनी शैव व वैष्णव संप्रदायाचा विकास करण्याचा सतत प्रयत्न केला. त्या अनुशंगाने त्यांनी शिव व विष्णुची अनेक मंदिरे बांधली. शिव आणि विष्णुच्या मंदिराशिवाय या काळात रामाचीही मंदिरे बांधण्यात आली. याकाळात हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मही प्रचलित होता. गौतम बुध्दाच्या हयातीतच मराठवाड्यात बौध्द धर्माचा प्रसार आणि विकास झाला होता. याचे श्रेय पैठण परिसरात वास्तव्य करुन राहीलेल्या बावरी या ब्राह्मण पंडितास द्यावे लागते. पुढे सातवाहन राजवंशाने बौध्द धर्मास आश्रय दिल्यामुळे या काळात बौध्द धर्म चांगलाच विकसित होऊन लोकप्रिय झाला. सातवाहन राजवंशानंतर सत्तेवर आलेल्या वाकाटक राजवंशानेही सातवाहन राजवंशाप्रमाणे बौध्द धर्मास आश्रय दिला. त्यामुळे वाकाटक काळात बौध्द धर्माचा विकास झाला. वाकाटक राजे हिंदू धर्माचे कट्टर पुरस्कर्ते असले तरी ते धर्मसंहिष्णू होते. त्यामुळेच या काळात हिंदू व बौध्द धर्म प्रचलित असल्याचे दिसते.

वाकाटक काळात शेती हा लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. शेती हेच त्यांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन होते. तसेच भुमिकर हे राज्याच्या उत्पन्नचे प्रमुख साधन होते. वाकाटक राजांनी शेतीच्या विकासासाठी सतत प्रयत्न केले. शेती निसर्गावर अवलंबुन असली तरी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी नदीवर कालवे आणि धरणे राज्याकडुन बांधली जात असत. पशुपालन हा लोकांचा

दुय्यम व्यवसाय होता. पशुपालनाशिवाय लोक अनेक प्रकारचे लहान - लहान उद्योगधंदे आणि व्यवसाय करीत असत. या काळात व्यापारी क्षेत्रातही बरीच प्रगती झालेली होती. व्यापार अंतर्गत आणि विदेशी चालत होता. कंधार, नांदेड, उस्मानाबाद, वत्सगुल्म, पैठण आणि वेरुळ ही या काळातील व्यापारी केंद्रे होती.

वाकाटक काळात कला आणि स्थापत्य क्षेत्रात अभुतपूर्व प्रगती झाली. या काळात मराठवाड्यात बौध्द व हिंदू लेणी स्थापत्य, बौध्द आणि हिंदू मूर्तिशिल्प बौध्द विहार आणि स्तूप स्थापत्य आणि चित्रकलेच्या क्षेत्रात मराठवाड्यात भरपुर प्रगती झाली. लेणी हा प्राचीन भारतीय वास्तुकलेचा एक प्रकार आहे. लेणी स्थापत्यालाच गुहामंदिर स्थापत्य असेही म्हणतात. भारतात लेणी स्थापत्याचा प्रारंभ मौर्य काळात झाला. मौर्य सम्राट अशोक आणि त्यांचा नातू दशरथ यांनी भारतात सर्वप्रथम लेणी स्थापत्याची निर्मिती केली. बौध्द भिक्खूंना पावसाळ्यात गावाबाहेर राहण्यासाठी मोठमोठ्या डोंगरात डोंगर पोखरुन लेणी खोदविल्या गेल्या. भारतात सर्वप्रथम बौध्द लेणींचे खोदकाम करण्यात आले. मौर्य काळात लेणी खोदकामाची सुरु झालेली परंपरा वाकाटक काळातही चालू राहिली. चैत्यगृह आणि विहार हे बौध्द लेणी स्थापत्याचे दोन प्रकार पडतात. बौध्द भिक्खुच्या प्रार्थनागृहाला चैत्यगृह असे म्हणत असत, तर त्यांच्या निवासस्थानाला विहार असे म्हणत. वाकाटक काळात चैत्यगृह व विहार स्थापत्याची निर्मिती करण्यात आली.

वाकाटक काळात औरंगाबाद, वेरुळ, अजिंठा, घटोत्कच आणि उस्मानाबाद याठिकाणी चैत्यगृह व विहार खोदण्यात आले. औरंगाबाद शहराच्या उत्तरेस सह्याद्री पर्वताची एक रांग आहे. या पर्वतरांगेत एकूण १२ बौध्द लेणी आहेत. त्यापैकी लेणी क्रमांक १,२,५,६,७ आणि ८ या सहा लेणींचे खोदकाम वाकाटक काळात झाले. या सर्व बौध्द लेणीत गौतम बुध्द आणि बोधिसत्व पद्मपाणी अवलोकितेश्वर यांच्या मूर्ति कोरलेल्या आढळतात. औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यात वेरुळ नावाचे खेडेगाव आहे. या गावाजवळील डोंगरात एकूण ३४ लेणींचे खोदकाम करण्यात आले. या ३४ लेणीपैकी १२ बौध्द,१७ हिंदू आणि ५ जैन लेणी आहेत. येथील १२ बौध्द लेणीपैकी लेणी क्रमांक १ ते ५ या बौध्द लेणींचे खोदकाम वाकाटकांच्या काळात झाले. लेणी

क्रमांक १ आणि ४ हे विहार आहेत. लेणी क्रमांक २ हे चैत्यगृह आणि विहार असे समिश्र स्वरुपाचे आहे. या सर्वच लेणींमध्ये गौतम बुध्द व बौध्द धर्माशी संबंधित शिल्पकला पाहावयास मिळते.

औरंगाबाद जिल्ह्यात सोयगाव तालुक्यात अजिंठा नावाचे गाव आहे. या गावाच्या जवळील डोंगरात ३० बौध्द लेणीचे खोदकाम विविध कालखंडात करण्यात आले. येथील लेणी क्रमांक १,२, १६, १७ व १९ चे खोदकाम वाकाटक काळात करण्यात आले. अजिंठा आणि वेरुळ येथील लेणी जगात प्रसिध्द आहेत. औरंगाबाद आणि वेरुळ येथील लेणीप्रमाणेच अजिंठा लेणीतही गौतम बुध्द व बौध्द धर्माशी संबंधित मूर्तिशिल्प व विविध जातक कथांतील प्रसंग चित्रित केलेले आहेत. येथील सर्व लेणी वास्तुकला, चित्रकला आणि शिल्पकलेच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात घटोत्कच नावाचे गाव आहे. या गावाजवळील डोंगरातही वाकाटक काळात लेणीचे खोदकाम करण्यात आले. वाकाटक राजा हरिसेन याचा मंत्री वराहदेव यांनी या लेणीचे खोदकाम करण्यासाठी आर्थिक सहकार्य केले. घटोत्कच येथील लेणी ह्या अजिंठा लेणी समुहाचाच एक भाग समजला जातो येथील विहाराची रचना अजिंठा लेणी क्रमांक २१ च्या पदविन्यासप्रमाणे आहे. या सर्व बौध्द चैत्यगृह आणि विहार स्थापत्यावरुन वाकाटक काळातील बौध्द लेणी स्थापत्याच्या विकासाची आणि बौध्द धर्माच्या प्रभावाची कल्पना येते.

वाकाटक काळात बौध्द लेणी स्थापत्याप्रमाणेच हिंदू लेणी स्थापत्याचीही निर्मिती झाली. वाकाटक राजे हिंदू धर्माचे कट्टर अनुयाची होते हे खरे असले तरी त्यांनी बौध्द धर्माचाही विकास करण्याचा प्रयत्न केला. वाकाटक काळात मराठवाड्यात शैव व वैष्णव संप्रदायाचा विकास केला. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यात खरोसा नावाचे गाव आहे. या गावाजवळील डोंगरात शैव लेणीचे खोदकाम करण्यात आले. या शैव लेणीत शैव आणि वैष्णव संप्रदायाची मुती शिल्पे आहेत. येथील खडक ठिसूळ असल्यामुळे लेणीचे खोदकाम अपूर्ण राहीले. ठिसूळ खडकामुळे स्थापत्य कलाकारांना कला साकारण्यासाठी इतरत्र जावे लागले. खरोसा याठिकाणी एकूण १३ लेणी आहेत. येथील लेणी क्रमांक १२ ही एकच लेणी लेणी बौध्द लेणी आहे. बाकीच्या सर्व लेणी शैव आहेत. येथील लेणीमध्ये शिव, नृसिंह वराह, मत्स्य व राम इत्यादी मूर्तिशिल्प आढळते.

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात शिऊर नावाचे गाव आहे. या गावालगत एक सपाट माळटेकडी आहे. या माळटेकडीत वाकाटक काळातील ३ लेणी आहेत. या लेणी वैष्णव लेणी आहेत. खरोसा येथील डोंगरातील खडक जसा ठिसूळ आहे. त्याचप्रमाणे शिऊर येथीलही डोंगरातील खडकही ठिसूळ आहे. तसेच पाऊसाच्या पाण्यामुळेही येथील लेणींची झिज झाली आहे. या लेणी वाकाटक काळातील लेणी स्थापत्याचा उत्तम नमुना ठरतो. या लेणीत असलेले सर्व मूर्तिशिल्प वैष्णव पंथाची आहेत. अपवाद म्हणून लेणीतील एका स्तंभावर लिंगोद्भव शिवमुर्ती आढळते. येथील लेणीतील भिंतीवर व स्तंभावर असलेली वैष्णव शिल्प मूर्तिकलेच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. यामध्ये विष्णू, विष्णूचे विभिन्न अवतार, उदा. राम, कृष्ण, केशव, पद्मनाथ, वासुदेव, नृसिंह, वराह, त्रिविक्रम, गरुड, तसेच महिषासुरमर्दिनी, सप्तमातृका, हत्ती व किर्तीमुख या मूर्तिशिल्पाचा समावेश होतो.

वाकाटक काळात लेणी स्थापत्याप्रमाणे रचनात्मक मंदिरे म्हणजेच वास्तुमंदिर स्थापत्याचाही विकास झाला. या काळात मोठ्या प्रमाणात शिव आणि विष्णु मंदिरे बांधण्यात आली. रामटेक येथे बांधण्यात आलेली वास्तूमंदिरे तर विशेष उल्लेखनीय आहेत. मराठवाड्याच्या संदर्भात विचार केल्यास असे दिसते की विदर्भाच्या तुलनेत मराठवाड्यात फार कमी प्रमाणात शिव, विष्णू आणि बौध्द मंदिरे बांधण्यात आली. मराठवाड्यात हिंदू मंदिरे स्थापत्याचे अवशेष केवळ नांदेड येथेच मिळाले आहेत. नांदेड येथे होळी भागात नृसिंह गल्लीत वाकाटक काळातील नृसिंह मंदिर स्थापत्याचे अवशेष प्राप्त झाले. इतर हिंदू मंदिर स्थापत्याचे अवशेष मिळाले नाहीत. याचा अर्थ असा की वाकाटक काळात मराठवाड्यात फारसी हिंदू मंदिरे बांधण्यात आली नाहीत. नांदेड जिल्ह्यात कंधार येथे आणि कंधार तालुक्यात बाळांतवाडी येथे बौध्द मंदिरे वाकाटक काळात बांधण्यात आली. कंधार शहरात दर्गापुरा भागात बौध्द मंदिराचे अवशेष पाहावयास मिळतात. या बौध्द मंदिराचे रुपांतर कालांतराने हिंदू मंदिरात आणि त्याच हिंदू मंदिराचे रुपांतर मस्जिद या वास्तूत करण्यात आले. कंधार परिसरात कंधार - घोडज रस्त्यावर बुध्दटेकडी येथेही वाकाटक काळातील बौध्द विहार अर्थात बौध्द मंदिराचे अवशेष प्राप्त झाले. कंधार तालुक्यातील बाळांतवाडी येथेही बौध्द मंदिराचे अवशेष मिळाले. बुध्दटेकडी व बाळांतवाडी येथे बौध्द मंदिराप्रमाणेच बौध्द

स्तूपाचेही अवशेष मिळाले. बौध्द मंदिर स्थापत्य आणि बौध्द स्तूप स्थापत्याच्या अवशेषांवरुन या भागातील वाकाटक काळातील बौध्द धर्माच्या अस्तित्वाची कल्पना येते.

मूर्ति या शब्दाने विशिष्ट व्यक्ती किंवा देवतेचे मूर्त स्वरुप अनुकृती व सादृश्य या गोष्टी ध्वनित होतात. सिंधु संस्कृतीपासून मूर्ति निर्माण करण्याची परंपरा सुरु झाली, ती वाकाटक काळातही चालूच राहीली. सर्वप्रथम जैन, नंतर बौध्द व शेवटी हिंदू धर्मीय मूर्ति अर्थात प्रतिमा बनविल्या गेल्या. हिंदू धर्मात विभिन्न देवदेवता व बौध्द धर्मात गौतम बुध्द आणि बौध्द धर्माशी संबंधित इतर मूर्तिशिल्प बनविले गेले. वाकाटक काळात हिंदू आणि बौध्द मूर्तिशिल्पाची निर्मीती केली गेली. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात शिऊर नावाचे गाव आहे. येथे वाकाटक काळातील वैष्णव पंथाच्या ३ लेणी आहेत. या लेणीतील स्तंभावर आणि भिंतीवर केशव, विष्णू, पद्मनाथ, त्रिविक्रम, सप्तमातृका, महिषासुरमर्दिनी, गरुड, पुतनावध, राम, कृष्ण, नृसिंह, वराह आणि वासुदेव इत्यादी मूर्तिशिल्प आढळते. या मूर्तिशिल्पावरुन या काळातील मराठवाड्यातील वैष्णव पंथाच्या प्रभावाची कल्पना येते. नांदेड येथे होळी भागात नृसिंह गल्लित एक मंदिर आहे. या मंदिरातही गरुड आणि केवल नृसिंह मूर्ती पाहावयास मिळते. वाकाटक काळातील बौध्द मूर्तिशिल्प नांदेड जिल्ह्यात नांदेड, कंधार, भोकर, बाळांतवाडी आणि बुध्दटेकडी येथे पाहावयास मिळते. परंतु बुध्द मूर्तिशिल्पाचे केवळ अवशेष आढळतात. हे सर्व मूर्तिशिल्प कला आणि स्थापत्याच्या दृष्टीने उल्लेखनीय ठरतात.

वाकाटक काळात वास्तुकला, लेणी स्थापत्य, शिल्पकला, मूर्तिकला आणि स्तूप स्थापत्याच्या क्षेत्रातच प्रगती झाली आहे असे नाही. तर या काळात चित्रकलेच्या क्षेत्रातही भरपूर प्रगती झाली आहे. या काळात केवळ अजिंठा लेणी क्रमांक १,२,१६ आणि १७ मध्येच चित्रकाम करण्यात आले. हे चित्रकाम जगप्रसिध्द आहे . येथील लेणीत बौध्द जातक कथातील विविध प्रसंग चित्रित करण्यात आहेत. या चित्रकलेवरुन आपल्याला तत्कालीन मानवी जीवन, स्त्री - पुरुषांचे अलंकार, पोषाख, राहणीमान, शरीररचना आणि प्राण्यांची कल्पना येते. येथील चित्रामध्ये हत्ती, घोडा, गाय, बैल, वाघ, हरिण, माकड आणि कुत्रा हे प्राणी दिसतात. परंतु उंट मात्र कोठेही

आढळत नाही. तसेच जलचर प्राण्यांमध्ये मासे, कासव आणि सुसरी दिसतात. थोडक्यात निष्कर्ष असा की,

१. वाकाटक राजवंशाने मराठवाड्यावर ३०० वर्षे राज्य केले. सातवाहन राजघराण्यानंतर मराठवाड्यावर प्रदिर्घ काळ राज्य करणारे वाकाटक घराणे एकमेव ठरते.

२. सातवाहन राजघराण्याचा कालखंड मराठवाड्यासाठी जसा सुवर्णकाळ ठरते. तसेच वाकाटक राजवंशाची कारकीर्दही मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरते.

३. वाकाटक राजघराण्याच्या काळात मराठवाड्यात प्रशासकीय संघटन निर्माण झाले. वाकाटकांनी त्यांच्या मांडलिक राजांना स्वायत्तता दिली. त्यामुळे मांडलिक राजांनीही मराठवाड्याचा विकास करण्याचा सतत प्रयत्न केला.

४. वाकाटक राजवंशाने मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासात महत्वाची भर टाकली. याच सांस्कृतिक इतिहासाने भारतीय सांस्कृतिक इतिहासात भर टाकली.

५. वाकाटक राजवंशाने मराठवाड्यावर राज्य केले असले तरी मराठवाड्यात मोजक्याच ठिकाणी वाकाटक काळातील पुरातत्वीय अवशेष आढळतात. याच पुरातत्वीय अवशेषांच्या आधारे तत्कालीन मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

६. वत्सगुल्म वाकाटक शाखेचा मराठवाड्यावर अधिक प्रभाव जाणवतो. वत्सगुल्म

वाकाटकांच्या काळातील पुरातत्वीय अवशेष प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यात नांदेड, भोकर, कंधार, बहाद्दरपुरा, मानसपुरी व बाळांतवाडी येथे आढळतात. यामध्ये मंदिर स्थापत्य, बौध्द विहार व स्तूप स्थापत्य आणि मूर्तिशिल्पांचा समावेश होतो. ७.वाकाटक काळातील मराठवाड्यातील समाजाचा प्रमुख आधार वर्णव्यवस्था असला तरी तत्कालीन वर्णव्यवस्था ताठर नव्हती. या काळात अनुलोम व प्रतिलोम विवाह होत असत. ब्राह्मण व क्षत्रियांचे विवाह झाल्याची अनेक उदाहरणे आढळतात. ८. कुटूंब आणि समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. प्रशासनातही स्त्रियांचा सहभाग होता. प्रभावतीगुप्ताने राज्य कारभार केला होता.

९. या काळातील अलंकार, घरे, केसरचना, मानवी शरिर, पोषाख व सौंदर्य प्रसाधनांची माहिती आपल्याला अजिंठा लेणीतील चित्रकला आणि शिल्पकलेवरुन होते. त्यामुळे ते अत्यंत महत्वाचे इतिहासाचे साधन ठरते.

१०.अग्रहार, विहार, मंदिरे ही या काळातील शिक्षण केंद्रे होती. पैठण, नांदेड, कंधार, अजिंठा, औरंगाबाद, वेरुळ, नंदिवर्धन, वत्सगुल्म, रामटेक व उस्मानाबाद ही या काळातील शिक्षण केंद्रे होती.

११.या काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौध्द धर्म प्रचलित होते. हिंदू धर्माच्या अंतर्गत शैव आणि वैष्णव संप्रदाय विकसित झाले होते. याकाळात शैव व वैष्णव संप्रदायाचाच अधिक विकास झालेला होता.

१२.वाकाटक राजवंशातील बहुतेक राजे शिवाचे उपासक होते. त्यामुळे याकाळात शिवाचीच प्रामुख्याने उपासना सुरु झाली. परिणामी वाकाटक राजांनी शिवमंदिरे मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आली. परंतु या काळात वैष्णव पंथाची मंदिरेही उभारण्यात आली. दुसरा रुद्रसेन व दुसरा पृथ्वीसेन हे विष्णुचे उपासक होते. त्यांनीही मराठवाड्यात विष्णुच्या उपासनेचा विकास केला.

१३.वाकाटक सम्राटांनी आणि त्यांच्या मांडलिक राजांनी हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मालाही आश्रय दिला. त्यामुळे बौध्द धर्मही या काळात लोकप्रिय झाला.

१४.या काळातील लोक शेती, पशुपालन, व्यवसाय व उद्योगधंदे करुन आपली उपजिवीका करीत असत. राज्याकडून शेती व व्यवसायाच्या विकासासाठी प्रयत्न केले जात असत. शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी वाकाटक राजांनी विविध योजना केलेल्या दिसतात.

१५.व्यवसाय आणि उद्योगधंद्याप्रमाणेच याकाळात मराठवाड्यात व्यापाराचाही विकास झालेला होता. व्यापार अंतर्गत आणि विदेशी चालत असे. भुमार्ग व जलमार्गाने व्यापार चालत असे. व्यापारावर राजाचे नियंत्रण असे. कंधार, वेरुळ, अजिंठा, नांदेड, भोकर, पैठण व तेर ही या काळातील व्यापारी केंद्र होते.

१६.वाकाटक काळ कला व स्थापत्याच्या दृष्टीने मराठवाड्याच्या बाबतीत सुवर्णकाळ ठरतो. कारण या काळात मंदिर स्थापत्य , लेणी स्थापत्य, स्तूप स्थापत्य व मूर्तिकलेच्या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती झ ाली.


१७.मौर्य काळात लेणी स्थापत्याचा प्रारंभ झाला. ही परंपरा वाकाटक राजवंशाने जोपासली. या काळात हिंदू आणि बौध्द लेणी स्थापत्य निर्माण करण्यात आले. अजिंठा, वेरुळ, घटोत्कच येथे बौध्द विहार आणि खरोसा व शिऊर येथे हिंदू लेणी स्थापत्य निर्माण केले. अजिंठा, वेरुळ व घटोत्कच येथील बौध्द लेणीस्थापत्य जगप्रसिध्द आहे. वाकाटकांची कला क्षेत्रातील ही फार मोठी देणगी आहे.

१८.वाकाटक काळात मराठवाड्यात, गुहा मंदिर स्थापत्याप्रमाणेच वास्तु मंदिरांचीही निर्मिती करण्यात आली. नांदेड, भोकर, कंधार व बाळांतवाडी येथे हिंदू आणि बौध्द वास्तू मंदिराचे एकमेव अवशेष आढळतात.

१९.स्तूप स्थापत्य हा बौध्द कला व स्थापत्याचा एक प्रकार आहे. वाकाटक काळात कंधार आणि कंधार परिसरात स्तूप स्थापत्य निर्माण केले गेले. हे सर्व स्तूप उद्देशिक होते. २०. वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू व बौद मूर्तिशिल्प निर्माण करण्यात आले. या काळात शैव व वैष्णव पंथातील देवदेवतांच्या मूर्ति बनविल्या गेल्या. खरोसा लेण्यात शैव व शिऊर लेण्यात वैष्णव पंथाची शिल्प आढळतात.


२१. वाकाटक काळात गुहामंदिरे, वास्तू मंदिरे व शिल्पकला या क्षेत्रात ज्याप्रमाणे प्रगती झाली. त्याचप्रमाणे या काळात चित्रकला, वादनकला व नृत्यकला या क्षेत्रातही प्रगती झाली. अजिंठा लेणी क्र. १,२,१६, १७ व १९ मध्ये याकाळात चित्रकाम करण्यात आले. हे चित्रकाम जगप्रसिध्द असून वाकाटकांची ही फार मोठी देणगी आहे.

१)भारतातील वाकाटकांचा साम्राज्य विस्तार




(संदर्भ : - मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, सर दहावा.)

२) वाकाटककालीन महाराष्ट्र



(संदर्भ : - मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, सर दहावा.)

३) महाराष्ट्रातील वाकाटकांचे साम्राज्य व प्राचीन प्रमुख नगरे, लेणी व व्यापारी मार्ग



④ महाराष्ट्रातील वाकाटकांचे साम्राज्य व प्राचीन प्रमुख नगरे, लेणी व व्यापारी मार्ग.

(संदर्भ : - मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, सर दहावा.)

४) वाकाटकांच्या वर्चस्वाखालील मराठवाडा



(संदर्भ : - मिराशी वा.वि., संशोधन मुक्तावली, सर दहावा.)

नांदेड येथील नृसिंह मंदिर




नृसिंह मंदिरासमोरील भग्न अवस्थेतील खांब



नृसिंह मंदिरासमोरील प्राचीन अवशेष



मंदिरातील वाकाटक कालीन नृसिंह मूर्ती



आनंदीदास लक्ष्मीकांत देशमुख - नांदेड



वाकाटककालीन बुध्द विहार -इतवारा वसाहत, नांदेड.



बाळंतवाडी (कंधार) येथील वाकाटक कालीन भग्न हत्तीची मुर्ती



बाळंतवाडी (कंधार) येथील वाकाटक कालीन भग्न बुध्द मूर्ती



बाळंतवाडी (कंधार) येथील वाकाटक कालीन भग्न मंदिर खांब



बाळंतवाडी (कंधार) येथील वाकाटक कालीन भग्न खांबावरील शिल्पकला



कंधार येथील बोधिसत्व पद्मपाणी अवलोकितेश्वर मूर्ती



धाराशीव येथील पार्श्वनाथाची मूर्ती



कंधार येथील बुध्द टेकडी (भूताची टेकडी)



बुध्द टेकडीवरील विहाराचे भग्नावशेष



मानसपुरी येथील बोधिसत्व पद्मपाणीची खंडीत मुर्ती



भोकर येथील बुध्द मुर्ती



भोकर येथील बुध्द मुर्ती व शेजारी चौरीधारक



भोकर येथील बुध्द मूर्ती व शेजारी नाग मूर्ती



धाराशीव येथील पार्श्वनाथाची भग्न मूर्ती



धाराशीव येथील पार्श्वनाथाची मूर्ती



शिऊर येथील वाकाटक कालीन लेणी.



वेरुळ लेणी क्र. १



वेरुळ लेणी क्र. २



वेरुळ लेणी क्र. ३



वेरुळ लेणी क्र. ३ मधील दगडी खांब



वेरुळ लेणी क्र. ३ मधील बुध्दमूर्ती



वेरुळ वेरुळ लेणी क्र. ४



वेरुळ लेणी क्र. ४ मधील बुध्दमूर्ती





घटोत्कच लेणी

घटोत्कच लेणी



घटोत्कच लेणी मधील भगवान गौतम बुध्दाची ध्यानस्थ मूर्ती



वाकाटककालीन औरंगाबाद येथील लेणी क्र. १



औरंगाबाद लेणी क्र. १ मधील दगडी खांबावरील शिल्पकाम



औरंगाबाद लेणी क्र. १ मधील बुध्दाची ध्यानस्थ मूर्ती



औरंगाबाद लेणी क्र. २ . बाहेरुन घेतलेले दृश्य



औरंगाबाद लेणी क्र. २ मधील बुध्दाची ध्यानस्थ मूर्ती





लेणी क्र. २. गर्भगृहातील बुध्दाची मूर्ती व बाजूला पद्मपाणी , वज्रपाणी आणि नागराज

औरंगाबाद लेणी क्र. ५ .बाहेरुन घेतलेले दृश्य



औरंगाबाद लेणी क्र. ५.मधील दगडी खांब



औरंगाबाद लेणी क्र. ६.



औरंगाबाद लेणी क्र. ६. मधील प्रलंबपादमुद्रेतील मूर्ती



लेणी क्र. ६. बुध्दाच्या डाव्या व उजव्या बाजूला यक्ष व यक्षीणी



औरंगाबाद लेणी क्र. ६ गणेश मूर्ती



औरंगाबाद लेणी क्र. ७.



औरंगाबाद लेणी क्र. ७ मधील बुध्द मूर्ती



औरंगाबाद लेणी क्र. ७ . राजतडाग नर्तकी



औरंगाबाद लेणी क्र. ८.



अंजिठा लेणीचे दृश्य



वाकाटक कालीन अंजिठा लेणी क्र. १



अंजिठा लेणी क्र. १ मधील बोधिसत्व पद्मपाणी



लेणी क्र. १ महाजन जातक कथा



लेणी क्र. १ बोधिसत्व वज्रपाणी



लेणी क्र. १ मधील स्नान दृश्य



लेणी क्र. १ महाजनक जातक




अजिंठा लेणी क्र. २.



लेणी क्र. २ मधील भगवान गौतम बुध्दाची मूर्ती



लेणी क्र. २. पंचिका आणि हारति



लेणी क्र. २ विदुर पंडीत जातका



लेणी क्र. २ मधील छतावरील चित्रकला



लेणी क्र. २ मधील छतावरील चित्रकला



लेणी क्र. २ मधील गौतम बुध्द



लेणी क्र. २ मधील दगडी खांबावरील शिल्पकला




लेणी क्र. १६ प्रवेशद्वारावरील हत्ती



लेणी क्र. १६ प्रवेशद्वारावरील हत्ती



लेणी क्र. १६ मधील ध्यानस्थ बुध्द मूर्ती



लेणी क्र. १६ मृत अवस्थेकडील राजकन्या



लेणी क्र. १७ मधील ध्यानस्थ बुध्द मूर्ती



लेणी क्र. १७ मधील भगवान बुध्द, यशोधरा व राहुल



लेणी क्र. १७ मधील वेसांतर जातक कथा



लेणी क्र. १७ मधील अप्सरा



लेणी क्र. १७. आकाशातून उडणारा इंद्र



लेणी क्र. १७. वेसांतर जातक कथा, दुसरे दृश्य



लेणी क्र. १९. प्रवेशद्वार



लेणी क्र. १९ मधील प्रवेशद्वारावरील शिल्पकला



लेणी क्र. १९ मधील स्तूप



वाकाटक कालीन खारोसा लेणी



खारोसा लेणीच्या प्रवेशद्वारावरील शिवमूर्ती



खारोसा लेणीतील शिवलिंग



खारोसा लेणीतील भगवान गौतम बुध्द




वाकाटक कालीन धाराशीव लेणी क्र. २



वाकाटक कालीन धाराशीव लेणी क्र. ३



लेणी क्र. २ मधील पार्श्वनाथाची मूर्ती , डोक्यावर सात फण्याचा नाग



धाराशीव लेणीतील पार्श्वनाथाची मूर्ती



शिऊर लेणीमधील विष्णू मूर्ती



शिऊर लेणीमधील वृषभ (नंदी)



शिऊर लेणीमधील गदाधारी विष्णू मूर्ती



शिऊर लेणीमधील विष्णूची चतुर्भूज मूर्ती



शिऊर लेणीमधील शिवलिंग



घटोत्कच लेणीतील शिलालेख




अजिंठा लेणी क्र.१६ मधील शिलालेख




लेणी क्र. १७ मधील शिलालेख




वाकाटक नृपतिंच्या वंशावळीचा ताम्रपट




वाकाटक नृपति द्वित्तीय रुद्रसेनचा ताम्रपट




द्वितीय प्रवरसेनचा ताम्रपट




धाराशिव लेणी


N
SCALE
0
50'
400'
INCH
NO 2
NO 3
NO 4
NO 1
MANOR
GOVT. OF MAHARASHTRA
DEPT OF ARCHAEOLOGY AND MUSEUMS
OFFICE OF THE ASSTT. DIRECTOR OF ARCHAEOLOGY A'BAD
PLAN OF DHARASHIV CAVES AT DHARASHIV
TA.&DIST. OSMANABAD
DRAWN BY
P.V.Sonkamble
TRACED BY.
JR. ENGINEER
ASSTT. DIRECTOR.
DRG. NO. O/DSV/011
DATE- 10-5-97


धाराशिव लेणी


N
SCALE
0
50'
400'
INCH
NO. 5
NO. 5
NO. 7
GOVT. OF MAHARASHTRA
DEPT OF ARCHAEOLDGY AND MUSEUMS
OFFICE OF THE ASSTT. DIRECTOR OF ARCHAEOLOGY A'BAD
PLAN OF DHARASHIV CAVES AT DHARASHIV
TA.&DIST. OSMANABAD
DRAWN BY Sd
P.V.Sonkamble
TRACED BY
JR. ENGINEER
ASSTT. DIRECTOR
DR G. NO. O/DSV/011
DATE- 10-5-97


धाराशिव लेणी क्र. २


N
SCALE1:101
Front Elevation
Section of Dharashiv Caves No.-2
Plan of Dharashiv Caves No.-2


धाराशिव लेणी क्र. ३


N
SCALE1:100
Elevation of Dharashiv Caves No.- 3
Section of Dharashiv Caves No.- 3
Plan of Dharashiv Caves No.- 3


खारोसा लेणी



SCALE 1:200
2
1
GOVT OF MAHARASHTRA
DEPT OF ARCHAEOLOGY AND MUSEUMS
OFFICE-THE ASSTT DIRECTOR OF ARCHAEOLOGY ABAD
SITE PLAN OF KHAROSA CAVES KHAROSA
TALUKA- AUSA DIST- LATUR
DRAWN BY—
TRACED BY—
JR ENGINEER
ASSTT DIRECTOR
DRG NO/L /AUS/KHA / 03 (1)
DATE 17-10-06

खारोसा लेणी


SCALE 1:200
Cave no. 4
GOVT OF MAHARASHTRA
DEPT OF ARCHAEOLOGY AND MUSEUMS
OFFICE-THE ASSTT DIRECTOR OF ARCHAEOLOGY ABAD
SITE PLAN OF KHAROSA CAVES KHAROSA
TALUKA- AUSA DIST- LATUR
DRAWN BY—
TRACED BY—
JR ENGINEER
ASSTT DIRECTOR
DRG NO/L /AUS/KHA/ 03 (1)
DATE 17-10-96

घटोत्कच लेणी





DEPT. OF ARCHAEOLOGY AND MUSEUMS
GOVT. OF MAHARASHTRA.
OFFICE OF THE DY. DIRECTOR AURANGABAD.

PLAN OF GHATOTKACH CAVE AT:-
JINJALA TQ:- SOYGAON
DIST:- AURANGABAD.

DRAWN BY S.I- S. C. DHAN		
TRACED BY	JR. ENGINEER.	DY. DIRECTOR.
ORG NO:- A/SGN/00(II)		DATE -26-10-79

संदर्भ ग्रंथ

अ) प्राथमिक साधने

Archaeological Sruvey of Historical Sites

1) Ajintha
2) Aurangabad
3) Balatwadi
4) Bhokar
5) Ghatatkoch
6) Kandhar
7) Kharosa
8) Manaspuri
9) Bahadarpura
10) Nanded
11) Osmanabad
12) Paithan
13) Siur
14) Ter
15) Verul

English Books

1) A Corpus of Inscriptions in the Telangana Districts of H.E.H. The Nizams Dominions.

2) Abul Fazal, The Akbarnama, Trasnlated by Beveridge H., Vol. III, Delhi, Atlantic Publishers and Distributors, reprinted 1989.

3) Ali S.M., Geography of the Puranas, Delhi, 1966.

4) Asvaghosha, Buddha Charita, Cowall E.B.(Ed.), Delhi, Oxford University Press, 1886.

5)Bajpai K.D., Two Rare Images of Vishnu from Mathura, Journal of the Uttar Pradesh Historical Society, Vol. II, Part-I&II,1954.

6)Barrett, Douglas, Ter, Bhulabhai Memorial Institute, Bombay, 1960.

7) Bhattacharya Benoytosh, The Indian Buddhist Iconography, Madras, 1924.

8) Bhattasali N.K., Iconography of the Buddhist and Branmahical Sculptures in the Dacca Museum, Dacca, 1929.

9) Brown Percy, Indian Architecture, Buddhist & Hindu, Bombay, D.B. Taraporewala Sons & Co. Pvt. Ltd., 1971.

10) Burgess and Indraji, Inscriptions from cave Temples of Western India, Bombary, 1884.

11) Buhalar, Archaeological Survey of Western India, Vol. V, Delhi, 1883.

12) Champakalakshmi R., Vaisnava Concept in Early Tamil Nadu, Journal of India History, Vol. I, Part-II, Dec. 1972.

13) Chapekar B.N., Report on the Excavations at Ter, Poona, 1958.

Cahvi, Bharat Kala Bhavan, Varanasi, 1960.

14) Clark Grahame, Archaelogy and Society, London, 1957.

Cousens Henry, Archaeologycal Survey of India, 1902, 1903 Annual report.

15) Cousens Henry, Chalukya Architecture of Kanarese District, Archaeological Survey of India, Vol. XLII, Calcutta, 1892.

16) cousens Henry, The Architectural Antiquities of Western India, London, The India Society, 1926.

17) Degloorkar G.B., Temple Architecture and Sculpture of Maharashtra, Nagpur, 1974.

18) Deheja Vidya, Early Buddhist Rock Temples, London, 1972.

19) Deo P.R. and Shelke G.C., Brahmanical Caves of Siur, Aurangabad, Marathwada University Journal , Vol. XI, 1972.

20) Deo Prabhakar, Temples of Marathwada, Jaipur, Publications Scheme, 1993.

21) Deo S.B. & Gupte R.S., Excavations at Bhokardan, 1973, Marathwada & Nagpur University, 1974.

22) Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, Jaipur, Publication Scheme, 1987.

23) Deshmukh B.S., Murtishilp Vaibhav, Explorations in Local History and Literature, Nanded, 1986.

24) Deshpande M.N., Ajanta, The Kaleidoscopic Enigma for Art Historians, Art of Ajanta, Delhi, 1991.

25) Deshpande M.N., The Caves - their Historical Perspective, Ajanta Murals, Delhi, 1967.

26) Deshpande M.N., The Rock Cut Caves of Pitalkhora in the Deccan, Ancient India, No. 15, New Delhi,, 1959.

27) Diskalkar D.B., Sculptures in the Mathura Museum, Journal of Uttar Pradesh Historical Society, Vol. V.

28) Dixit M.G., Excavation at Paithan, 1964-65, Poona.

29) Dixit M.G., Fresh Light on the Pitalkhora, Journal of Bombay History Society, VI, Nos. 1-2, 1941.

30) Dulari Qureshi & Pathy T.V., Sculpture in the History Museum Aurangabad, Marathwada university, 1984.

31) Fleet, J., Inscriptions from Cave Temples of Western India, Bombary, 1884.

32) Foucher A., Beginnings of Buddhist Art of Other Essays, (L.A. Thomas and F.W. Thomas, translated) Paris, 1917.

33) Gokhale Shobhana & dhavlikar M.K., Excavations at Kandhar - A Report, 1986, Pune, Deccan College.

34) Gokhale Shobhana & dhavlikar M.K., Excavations at Kandhar 1982 - A Report, Pune, Deccan College. 35)Grimwedel A., Buddhist Art in India, (translated by A.C. Gibson), London, 1901.

36)Gupta P.L., Gupta Empire, Varanasi, University Publication, 1970.

37) Gupte R.S., The Iconography of the Buddhist Sculptures of Ellora, Aurangabad, Marathwada University, 1964.

38) James Burgess, Report on the Buddhist Cave Temples and Their Inscriptions, Archaeological Survey of Western India, Vol-IV, London, 1883.

39)James Ferguson and James Burgess, The Cave Temples of India, London, 1880.

40) Jayaswal K.P., Jain Images of Mourya Period, Patna Journal of Bihar and Orrisa Research of Society, 1937.

41) John Marshall, Annual Report, Archaeological Survey of India, Delhi, - 1927.

42) John Marshall, Memories of the Archaeological Survey of India, No. 7.

43)John Marshall, Mohenjodaro and Indus Civilisation, Vol. I, London, 1931.

44)Kali O.C., Buddhist Cave Temples of India, D.B. Taraporewala, Bombay, 1975.

45) Kandhar through Epigraphy and Archaeology Journal of Epigraphical society of India, Vol. VII, 1980.

46) Kane P.V., Ancient Geography and Cilvilisation of Maharashtra, Bombay, branch of Royal Asiatic Society (XXIV)

47) Mackey E., Further Excavations at Mohenjodaro, New Delhi, 1938.

48) Magnus Magnusson, Introducing Archaeology, London, 1942.

49) Mate M.S./ Pathy T.V. (Ed.), Daulatabad - Report, Pune, Deccan College and Marathwada University, Aurangabad, 1992. 50)Morwanchikar R.S., Deogiri-Daulatabad : An Archaeological Overview, Dhule, Rajwade Sanshodhan Mandal, 1993.

51)Morwanchikar R.S., The City of the Saints Paithan through the Ages, Delhi, Ajanta Publication, 1985.

52) Mujumdar S.N & McCrindle J.W. (Ed.), Ancient India described by Ptolemy, Calcutta, Chakravarty Chatterjee and Company, 1927.

53) New Websters Dictonary of the English Language, Delux Encaiclopedik Ediction,1981. The dealer Publishing Company. U.S.A.

54) Naik A.V., Archaeology of the Deccan, (Unpublished Ph.D. Thesis) Bombay, University of Bombay, 1947.

55) Naik A.V., Structural Architecture of the Deccan, New Indian Antiquary, Vol. IX, Nos. 7-12, July 1947.

56) Pruthavi Kumar, Gupta Temple Architecture, Delhi, 1965.

57) Rajashekhara, Kavya Mimamasa, Dalal K.D., and Shastri Anant Krishana (Ed.), Baroda, Central Librrary, 1916.

58) Ritti Shrinivas & Shelke G.C. (Ed.), Inscriptions from Nanded District, Nanded, Yeshwant Mahavidyalaya, 1968.

59) Rosenfield John, Dynastic Art of the Kusans, California, 1957.

60) Sankalia H.D., An Introduction to Indian Archaeology, Poona, 1965.

61) Schoff W.H. (Ed.), Periplus of the Erythrean Sea, New York, Longmans Green and Company, 1912.

62) Senart E., Le Mahavasta, Vol. II, Paris, 1882.

63) Sharma Y.D., Remains of Early Historical Cities, Archaeological Remains and Museums, Part- I, Archaeological Survey of India, Delhi, 1964.

64) Shrivastava V.S., The Ancient Siva Temple at Mt. Harsha, Sikar, The Researcher - V-II, 1964-65.

65) Sircar D.C. (Ed.) , Select Inscriptions, Vol. II, Delhi, Motilal Banarsidas, 1983.

66) Sircar D.C., Indian Epigraphy, Delhi, 1960.

67)Sircar D.C., Some Selected Inscriptions, Calcutta, 1942.

68)Spooner D.B., Excavations at Basarh, Archaeological Survey of India Annual Report, 1913-14.

69) Yazdani Ghulam, Kandhar Fort, Annual Report of the Archaeological Dept. of H.E.H. the Nizams Dominions for 1921-24, Hyderabad.

70) Yazdani Gulam / Others, Archaeological Report on the Archaeology, Hyderabad.

71) Yazdani Gulam M., Excavations at Paithan, 1937, Hyderabad, Govt. of Hyderabad State, Hyderabad, 1937.

मराठी ग्रंथ

१) अग्रवाल वासुदेवशरण, सारनाथ, दिल्ली, भारतीय सर्वेक्षण, १९९२.

२)अग्रवाल वासुदेव शरण, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, तृत्तीय आवृत्ती, १९९२.

३) अग्निपुराण, आनंदभवन संस्कृती, सिरीज, पुणे, १९९०.

४) अर्थशास्त्र (कौटिल्य), कंगले र.पं. (अनु.), मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पुनर्मुद्रण, १९९५.

५) अष्टाध्यायी (पाणिनी) के.पी. पंडित, मुंबई व चित्रावशास्त्री, पुणे, १९३५.

६) कथासरित्सागर (सोमदेवकृत), जोशी क.अ. (संपा.), क्षीरसागर आणि कंपनी, पुणे, १९६२.

७)कुंटे भ.ग. (अनु.), अहमदनगरची निजामशाही, मुंबई, मुरली प्रकाश्न, १९६२.

८) कुंटे भ.ग. (अनु.), बहमनी राज्याचा इतिहास, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९६६.

९) कुंटे भ.ग. (अनु.), दिल्लीच्या शहाजहानचा इतिहास, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८९.

१०) कुंभार आनंद, तमलूर शिलालेखाच्या निमित्ताने, संशोधक, धुळे, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, वर्ष -६५, अंक - ४, डिसेंबर १९९७.

११) कुलकर्णी ज.बा., सत्यपुरी अथवा तेर महात्म्य, मुंबई, १९७५.

१२) कुळे मुकुंद, महाराष्ट्रातील ऐतिहासिक विहिरी, मुंबई, चित्रलेखा, द्विपोत्सव २००३.

१३) कोलते वि.भि. (संपा.), महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८७.

१४) कोसंबी धर्मानंद, बुध्दलीला, औरंगाबाद, कौशल्य प्रकाशन, चौथी आवृत्ती २००२.

१५) खरे ग.ह., तेर येथील चार शिलालेख, मुंबई, १९७७.

१६) खरे ग.ह. (संपा.), दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड-१, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३०.

१७) खरे ग.ह. (संपा.), दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड-२, पुणे, भा.इ.सं.मं., १९३४.

१८) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५.

१९) गोपी साधु विद्यार्थी, तारापूरचा अशोक कालीन स्तूप, यवतमाळ, विद्यार्थी साहित्य प्रकाशन, १९९४.

२०) चापेकर भगवान नारायण, प्राचीन तेर, शिरुर ताजबंद, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, राधाकृष्ण रामकृष्ण प्रकाशन, १९७४.

२१) जोगळेकर स.अ. (संपा.), हाल सातवाहनाची गाथासप्तशती, पुणे, प्रसाद प्रकाशन, १९५६.

२२) ठोसर हरिहर, प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व, काळे भगवान संपादित मराठवाडा काल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन, १९८६.

२३) डिकसळकर, द.बा. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, प्रथमावृत्ती, पुणे विद्यापीठ पूणे.

२४) ढवळीकर मधुकर केशव, प्राचीन भारतीय नाणक शास्त्र, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५.

२५) ढवळीकर एम.के. व जामखेडकर अरविंद, कंधार येथील क्षेत्रपाल, स्थानिक इतिहास आणि साहित्य- एक शोध, नांदेड, नांदेड १९८६.

२६) तुळपुळे शं.गो. (संपादक), प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे, पुणे विद्यापीठ, १९६३.

२७) दळवे अरुण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, नांदेड, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, २००४.

२८) दाते, य.रा., (संपा) महाराष्ट्र शब्दकोश, विभाग, २,६,८ वरदा, सेनापती बापट मार्ग पुणे. दास मारुती विरचित, अथ श्रीसाधूसुधा, खंदार, शके १९०७.

२९) दीक्षित मो.ग., तेर वस्तुसंग्रहालयातील पुरातन वस्तुंचा परिचय, मुंबई, १९७२.

३०) दीक्षीत मो.ग. (संपा.), महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९४७.

३१) देगलूरकर गो.बं., मराठवाड्यातील मंदिरे आणि शिल्पे, शिरुर ताजबंद, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, १९७५.

३२) देगलूरकर गो.बं., कला, पठाण के.जी. व मंगनाळे व्ही.एस. संपादीत, इंटलेक्चयुअल्स संदर्भ महाराष्ट्र, भोपाळ, २००५.

३३) देगलूरकर गो.ब., सुरसुंदरी, पुणे, भारतीय विद्याभवन, २००४.

३४) देव प्रभाकर, स्थापत्य अवशेष, राजन अमिताभ संपादित स्थानिक इतिहास आणि साहित्य - एक शोध, नांदेड, १९८६.

३५) देव प्रभाकर, माहूर परिसरातील लेणी स्थापत्य, औरंगाबाद, म.इ.प., निवडक शोधनिबंध, खंड-३. १९९९.

३६) देव शां.भा., पुरातत्व विद्या, म.वि.ग्रं.नि.मं., १९७६.

३७) देव शां.भा., महाराष्ट्र एक पुरातत्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, १९६५.

३८) देव. शां.भा., महाराष्ट्रातील उत्खनने, दिल्ली, डायरेक्टर पब्लिकेशन डिव्हीजन, १९६२.

३९) देव शां.भा., महाराष्ट्र व गोवे शिलालेख व ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, मुंबई, महाराष्ट्र

राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८२.

४०) देव शां.भा. (संपा. जामखेडकर अ.प्र.), भारतीय पुरातत्व एक समालोचन, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८९.

४१) देव शां.भा., तेर, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन. पगडी सेतु माधवराव (संपा., अनु.), मोगल दरबार बातमीपत्रे, खंड -२, मुंबई, म.रा. सा. व सं.मंडळ, १९८३.

४२) पठाण यु.म. (संपा.), मराठवाड्यातील मराठी शिलालेख, औरंगाबाद, मराठवाडा विद्यापीठ, १९८९.पतंजली महाभाष्य, मुंबई निर्णयसागर प्रेस, १९३५.

४३) परांजपे प्रभाकर गोविंद, केंद्रीय संग्रहालय इंदौर की संक्षिप्त मार्गदर्शिका, इंदौर, १९६१.

४४) पाठक अ.शं., ब्रह्मदेवाची मूर्ती (शिराढोण, जि. नांदड) , संशोधक, धुळे राजवाडे संशोधन मंडळ, मार्च - जून १९९९.

४५) पाठक अं.शं., लोककला व पुरातत्व संबंध, भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई, इतिहास ४६) संशोधन मंडळ, वर्ष -३३, पुस्तक-१३२, जानेवारी - मार्च १९९७.

४७) प्रियबाला शाह, (संपा.) विष्णु धर्मोत्तर पुराण, बडोदा, १९५८.

४८) पोहनेरकर न.शे. व ठोसर हरिहर (संपा.) रटवंशीय बल्लाळ यांचा अर्धापूर शिलालेख, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ, १९६५.

४९) बापट पु.वि. (संपा.) सुत्तनिपात, मुंबई, धर्मानंद ट्रस्ट, १९५५.

५०) बोरकर र.रा., माहूर येथील मूर्तिलेख, इतिहास संशोधन पत्रिका, खंड -६, औरंगाबाद, म.इ.प.,२००१.

५१) बोरकर र.रा., पुरातत्वीय शोध, नागपूर, कल्याण शिक्षण संस्था, २००४.

५२) भागवतपुराण (संपा.)संन्याल, कलकत्ता, १९३४.

५३) मन्डन मिश्र (संपा.), देवीपुराण, दिल्ली, श्री लाल बहादूर शास्त्री संस्कृत विद्यापीठ, १९७६.

५४) महावंश, कौसल्यायन भदंत आनंद (संपा.), नागपूर, बुध्दभूमी प्रकाशन, २०००.

५५) मार्टीन हाग (संपा.), ऐतरेय ब्राह्मण आनंदाश्रम ग्रंथांक, मुंबई, १९६३.

५६) मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख, मुंबई, १९७९.

५७) मित्र देबला, सांची, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, १९९२.

५८) मोरमन सुखराय (संपा.), कूर्म पुराण, कलकत्ता, १९६२.

५९) मोरमन सुखराय (संपा.), देवी भागवत पुराण, कलकत्ता, १९६०.

६०) मोरमन सुखराय, लिंगपुराण, कलकत्ता, १९६०.

६१) मोरमन सुखराय, मार्कंडेय पुराण, कलकत्ता, १९६२.

६२) वामनपुराण (संपा. जोशी प्र.न्), पुणे, प्रसाद प्रकाशन, शके १९०५.

६३) वाल्मिकी रामायण उत्तर, गोरखपुर, गीता प्रेस, १९६०.

६४) वासुदेवाचार्य (संपा.), रामायण मुंबई, १९०२.

६५) विष्णु धर्मोत्तर पुराण, खंड -२, मुंबई, श्री व्यंकटेश्वर प्रेस, १९१२.

६६) सांकलिया ह.धि., पुरातत्व परिचय, पुणे, डेक्कन कॉलेज, १९९६.

६७) सांकलिया ह.धि. व माटे म.श्री., महाराष्ट्रातील पुरातत्व, मुंबई, महाराट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९७६.

६८) सांकलिया ह.धि., भारतीय पुरातत्व, एक समालोचन, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८९.

६९) श्रीवास्तव बलराम (संपा.), रुपमंडन सूत्रधार मंडनकृत, वाराणसी, १९६४.

ब) दुय्यम साधने

English Books

1) Agrawala Urmila, Khajuraho Sculptures and Their Significance, Delhi, 1964.

2) Agrawala V.S., Indian Art, Varanasi, 1965.

3) Agrawala V.S., Mathura Ayagapattas, Journal of the G.P. Historical Society. Vol XVI.

4) Alexander Cunigham, Ancient Geography of India, Calcutta, Chakravarty Chatterjee & Company, 1924.

5) Allchin and Bridget, The Birth of Indian Civilisation, England, Penguin Books, 1968.

6)Altekar A.S., Rashtrakutas and Their Times, Poona, Oriental Book Agency, 1934.

7)Bakshi S.R., Advanced History of Ancient India, Vol. II, Delhi, Anmol Publication, 1965.

8)Banerjea J.N., The Development of Hindu Iconography, Calcutta, 1956.

9)Banerje A.P., Mouryan Sculptures from Lohanipur, Patna, Journal of Bihar and Orrissa Research Society, 1940.

10)Bapat P.V. (Ed.), २५०० Years of Buddhism, Delhi, Govt. of India, Thired Reprint, 1971.

11)Barua D.K., Viharas in Ancient India, Calcutta, 1969.

12)Basham A.L., The Wonder that was India, Calcutta, rupa & Co., 1971.

13)Benjamin Rowland, Art and Architecture of India, Baltimore, 1953.

14)Bhandarkar R.G., Early History of the Deccan, Vol. I, Delhi, 1894.

15)Bhandarkar R.G., Vaisnvism, Savism and religious Sects, Delhi, Reprint, 1965.

16)Bhanderkar R.G., Early History of the Deccan down to Mohammedan Conquest, Calcutta, Charkravarthy Chatterjee and Company, 1928.

17)Carol Radclifte Bolon, Forms of the Goodess Lajja Gauri in Indian Art, Delhi, Motilal Banarsidas, 1997.

18)Chaudhari H.C., Political History & Ancient India, Calcutta, 1932.

Chopra P.N. (Ed.), The Gazetteer of India, History and Culture, Vol. II,

Delhi, govt. of India, 1973.

19) Coomaraswamy Anand Kumar, History of Indian and Indonesian Art, London, 1927.

20) Datt A.N., Early History of Spread of Buddhism, London, 1925.

21) Datt B.B., Town Planning in Ancient India, Calcutta and Simla, 1925.

22) Datt S.K., Early Monastic buddhism, (२ volumes), Calcutta, 1960.

23) Day N.L., Geographical dictionary of Ancient & Mediaeval India, Calcutta, 1927.

24) Deo S.B., History of Jain Monarchism from Inscriptions of Literature, Poona, 1956.

25) Desai P.B., Jainism in South India & Some Jain Epigraphs, Solapur, 1977.

26) Deva Krishna, Temples of North India, Delhi, National Book Trust, 1969.

27) Dhavalikar M.K., Master Pieces of Indian Terracottas, Bombay, 1977.

28) Dhavlikar M.K., Ajanta - A Cultural Study, Pune, Pune University, 1973.

29) Gokhale B.G., Buddhism in Maharashtra, Bombay, Popular Prakashan, 1976.

30) Gopalan S., Outlines of Janism, Delhi, Wiley Eastern Ltd., First Reprint, 1975.

31) Gopinath Rao T.A., Elements of Hindu Iconography (४ Volumes), Delhi, 1968.

32) Hastings James (Ed.) Encyclopaedia of Religion and Ethics, Vol. VI, Edinburg, T.t. Clark, 1953.

33) Havel, Indian Architecture, Delhi, S. Chand & Company, 1913.

34) Jain Ratanlal, Ajanta and Ellora, Nagpur, Vishwabharti Publications, 1978.

35) Joshi P.N., Mirashi V.V. and Dikshit M.G. (Ed.) Satabda Kaumudi, Centaury Vol, Nagpur, Central Museum, 1964.

36) Kate P.V., Marathwada Under the Nizams, Delhi, Mittal Publication, 1987.

37) Khare G.H., Select Articles, Pune, B.I.S.M., 1966.

38) Kosambi D.D., An introduction the Study of Indian History, Bombay, Popular Book Depot, 1956.

39) Kosambi D.D., Culture of Civilisation in Historical Outline, London, 1965.

40) Law B.C., Historical Geography of Ancient India, Paris, Societe Asiatique De Paris, 1954.

41) Law B.C., India as described in the Early Text of Buddhism & Jainism, London, 1941.

42) Lunia B.N., Indian Culture, Indore, Kamal Prakashan, 1988-89.

43) Madan A.P., The History of Rashtrakutas, Delhi, Herman Publications, 1990.

44) Maurizio Taddei, The Ancient Civilisation of India, Nagel Publishers, Geneva, Barrie and Jenkins, London, 1970.

45) Mirashi V.V., Studies in Indology - II, Nagpur, 1956.

46) Mujumdar R.C. (Ed.), The Age of Imperial Kunauj, Bombay, Bhartiya Vidya Bhavan, 1964.

47) Mujumdar R.C., History & Culture of Indian People (६ Volmues) Bombay.

48) Mujumdar R.C., Raychandhari H.C. and Kalikinkar Datta, An Advanced History of India, London, Macmillan & Co. 1970.

49) Mukharjee R.K., Ancient India, Patana, Rajkamal Prakashan, 1990.

50) Muley Sumati, Studies in the Historical & Cultural Geography & Ethnography of the Deccan, Pona, 1972.

51) Pathak A.S., Barva Architecture Part - I, Sanshodhan, Dhule, V.K., Rajwade Sanshodhan Mandal, June 2001.

52)Pathak A.S. and Kulkarni U.D., role of Religion in Water Management : Study of Water Storage Structures in Maharashtra, Sanshodhak, Dhule, V.K., Rajawade Sanshodhan Mandal, March 2006.

53) Pathak A.S., The Time of Baravas, Sanshodhak, Dhule, V.K., Rajwade Sanshodhan Mandal, December -2004.

54) Pathy T.V. & Prasad V.R.N., Ajanta, Elura and Aurangabad Caves, An Appreccciation, Bombay, 1972.

55) Pathy T.V., Elura - Art and Culture, Delhi, Sterling Publishers Pvt., 1980.

56) Piggot S., Some Ancient Cities of India, Oxford University Press, 1945.

57) Rapson E.J., Cambridge History of India, Vol. I, Ancient India, Delhi, S. Chand & Company, 1955.

58) Saletore R.N. (Ed.) Encyclopaedia of Indian Culture, Vol. II, Delhi, Sterling Publishers Pvt. Ltd., 2nd, 1986.

59) Shah U.P., Studies in Jain Art, Varanasi, 1955.

60) Sharma R., Ancient Indian History, Culture and archaeology, delhi, Radha Publication, 2002.

61) Shastri K.N.A., A Comprehensive History of south India, Vol. II, Bombay, 1957.

62) Shastri Nikanta K.A., A History of south India, Delhi, Oxford University Press (4th Ed.) , 1976.

63) Sircar D. C. Studies in the Geography of Ancient and Medieval India, Varanasi, Motilal Banarasidas, 1960.

64) Sircar D.C. Beginning of Indian History & Civilisation, Delhi, 1943.

Smith V.A., History of Fine Arts in India & Ceylon, London, Oxford ed., University Press, 1911.

65) Smith V.A., The Jain Stup and Other Antiquities of Mathura, Allahabad,

66) Sir Moniyar Vilymes, Samslrit English Dictonary, Oxford-Uni Press., A.M.E. House, London.

67) Smith Vincent, The Early History of India, London Oxford University Press, 4th ed., 1957.

68) Smith Vincent, The Oxford Students History of India, London, Oxford University Press, 1954.

69) Srinivasson K.R., Temples of South India, Delhi, National Book Trust India, 1971.

70) Srivasta V.C., Sun - worship in Ancient India, Allahabad, 1972.

71) Thaper Romila, Ashoka & the Decline of the Mauryas, Bombay, Oxford University Press, Reprint 1977.

72) Thosar H.S., Historical Geography of Maharashtra dn Goa, Mumbai, A.I.R.I. 2004.

73) Thosar H.R., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, unpublished Ph.D., Thesis, Aurangabad, Marathwada University, 1977.

74) Tripathi R.S., Hostory of Ancient India, Delhi, Motilal Banarasidas, 1967.

75) Tylor E.B., Religion in Primitive Culture, New York, 1958.

76) Wauchope r.S., Buddhist Cave Temples of India, Calcutta, 1933.

77) Yazdani Gulam (Ed.), The Early History of the Deccan
(4 Volumes) , London, 1960.

मराठी ग्रंथ

१) अग्रवाल वासुदेव शरण, मथुरा कला, अहमदाबाद, १९६४.

२)अग्रवाल वासुदेव शरण, भारतीय कला, वाराणसी, १९६६.

३)अहिरराव प्र.रा. व भावे ह.अ., भारतीय शिल्पातील प्राणी, पुणे, वरदा प्रकाशन, २००५.

४)कर्वे चिं.ग., जोगळेकर स.आ. व जोशी य.गो. (संपा.), महाराष्ट्र परिचय, पुणे, प्रसाद प्रकाशन,

५)काटे पी.व्ही. मराठवाडयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स् औरंगाबाद १९९९.

६) खरे ग.ह., मूर्तिविज्ञान, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३९.

७) खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, भाग -१, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९५१.

८) खरे ग.ह., कंधारपूर कोठे आहे ? त्रैमासिक, वर्ष -१६, अंक -२, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३५.

९) गणेश शास्त्री लेले त्रिंबककर, तीर्थ यात्रा प्रबंध, पुणे, देशमुख प्रकाशन, द्वि.आ.१९६४.

१०) जामवाडीकर सुलभा, सुवर्णनगरी तेर, औरंगाबाद, श्री लक्ष्मी प्रकाशन, १९९३.

११) जोशी त्र्यं.मो. मराठवाड्यातील शक्तीदर्शन, इगतपुरी, १९७९.

१२) जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, नागपूर, म.वि.ग्रं.नि. मंडळ, १९७९.

१३) जोशी श.वि., मराठवाड्यातील अश्मयुगीन संस्कृती, मराठवाडा संशोधन मंडळ, वार्षिक, १९७६.

१४) डांगे सिंधू, जैन धर्म आणि तत्वज्ञान, नागपूर, म.वि. ग्रं. नि. मंडळ, १९८०.

१५) डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे, पुणे विद्यापीठ, १९६४.

१६) ढेरे रा.चि., लज्जागौरी, पुणे, श्री विद्या प्रकाशन, पुनर्मुद्रण, १९८८.

१७)देगलूरकर गो.बं., प्राचीन कालखंडाचा ऐतिहासिक मागोवा, स्थानिक इतिहास आणि साहित्य - एक शोध, नांदेड, १९८६.

१८)देगलूरकर गो.बं., महाराष्ट्रातील शिल्पकलेची वाटचाल, संशोधक, धुळे राजवाडे संशोधन मंडळ, जून १९९६.

१९)देव प्रभाकर, कंधार - एक ऐतिहासिक शहर, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८५.

२०) देव प्रभाकर, महाराष्ट्राचे प्राचीन कलावैभव, काळे भगवान संपादित, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन, १९८८.

२१) देशपांडे ब्रह्मानंद, देवगिरीचे यादव, औरंगाबाद, समर्थ प्रकाशन, शके १८९७.

२२)देशपांडे ब्रह्मानंद, शोधमुद्रा, खंड -१,२,३,४, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, १९९६, २००१, २००४.

२३) पाटील गौतम, मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास, पूनम प्रकाशन कंधार, २०११.

२४) पाठक अ.शं., महाराष्ट्रातील बारव स्थापत्य , लातूर, मराठवाडा संशोधन मंडळ, २००१.

२५) पाठक अ.शं. , (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास, प्राचीन काळ, खंड -१,२, मुंबई, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००२.

२६) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १९६३.

२७) माटे म.श्री, प्राचीन कला भारती, पुणे कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९९८.

२८) मिराशी वा.वि., वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, नागपूर, नागपूर विश्वविद्यालय, १९५७.

२९) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर पहिला, नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९५४.

३०) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर दुसरा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९५७.

३१) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर सहावा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९५७.

३२) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर तिसरा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९६०.

३३) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर चौथा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९६१.

३४) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर पाचवा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९६६.

३५) मिराशी वा.वि., संशोधनमुक्तावली, सर सातवा , नागपूर, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, १९७६.

३६) मेश्राम प्रदिप व इतर, भद्रावती पुराततवीय वैभव, नागपूर, संकेत प्रकाशन, २००४.

३७) मेश्राम प्रदिप व इतर , भटाळा, नागपूर, संकेत प्रकाशन, २००५.

३८) मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बुध्द धम्माचा इतिहास, औरंगाबाद, कौशल्य प्रकाशन, तृ.आ. २०००.

३९) मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण,पुणे, रविराज प्रकाशन, १९८७.

४०) मोरवंचीकर रा.श्री., पैठण दर्शन, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन विभाग, मुंबई १९८५.

४१) रातंजनकर, श्री.ना. संगीत परिभाषा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, १९७३.

४२) राजन अमिताभ व इतर (संपा.), स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, नांदेड, नांदेड जिल्हा संदर्भ ग्रंथ समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, १ मे १९८६.

४३) शर्मा बजेंद्रनाथ, जैन प्रतिमा, दिल्ली, इंडोलॉजिकल बुक हाऊस कार्पोरेशन, १९७९.

४४) शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, कोल्हापूर, मोघे प्रकाशन, १९७४.

४५) साखरे विजया , भारतीय कलेचा इतिहास, नांदेड, कल्पना प्रकाशन, २००८.

४६) साखरे विजया, प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००९.

४७) सुतार अमर व रोडे सोमनाथ, धाराशिव येथील जैन लेणी, बाहुबली, कार्यदशी्र अनेकांत शोधपीठ व्यवस्थापन समिती, १९८६.

४८) लोकराज्य -स्वातंत्र्य दिन विशेषांक, संपा. दिवाकर गंधे, १९ ऑगस्ट १९९३.

हिन्दी ग्रंथ

१) जैन हिरालाल, भारतीय संस्कृती मे जैन धर्म का योगदान, भोपाल, मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, १९६२.

२) पवन वीणा, भारतीय मूर्तिकला का इतिहास, दिल्ली, इस्टर्न बुक लिंकर्स, १९९१.

३) वर्मा परिपूर्णानंद, प्रतिकशास्त्र, लखनौ, १९६४.

४) श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, वाराणसी विश्वविद्यालय प्रकाशन, (द्वि.आ.) १९९०.

५) लूनिया,बी.एन. प्राचीन भारतीय संस्कृती, लक्ष्मी नारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा.२००९.

६) शर्मा ,श्रीराम (संपा) बीस स्मृतिया, प्रथम खंड, संस्कृति संस्था, ख्वाजा कुतूब, बरेली (उत्तरप्रदेश) १९७९.